# १

# मराठयांच्या इतिहासाची साधने

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ मराठ्यांचा इतिहासाची साधने

१.३ मराठी साधने

१.४ संस्कृत साधने

१.५ फारसी साधने

१.६ युरोपियन साधने

१.७ सारांश

१.८ प्रश्न

१.९ संदर्भ

## १.० उद्दिष्ट्ये

१. मराठ्यांच्या इतिहासाच्या लिखीत साधनांची ओळख करुन घेणे.

२. मराठी व फारसी भाषेतील साधनांचे महत्त्व समजून घेणे.

३. युरोपियन भाषेतील विविध साधने जाणून घेणे.

## १.१ प्रस्तावना

१७ व्या शतकात शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि मराठी सत्तेचा उदय झाला. शिवाजी महाराजांच्या मृत्यू नंतर संभाजी, राजाराम व ताराबाई यांनी मोगली आक्रमण रोखून धरले. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत पेशव्यांनी मराठा सत्तेच्या विस्ताराला सुरुवात केली. अठरावे शतक मराठयांच्या विस्ताराचे ठरले. मराठी सत्ता अखिल भारतीय स्वरुपाची बनली. मराठयांचा इतिहास हा फक्त मराठयांचा किंवा महाराष्ट्राचा प्रादेशिक इतिहास नाही. तर हा भारतीय उपखंडाचा इतिहास बनलेला आहे.

इ.स.१२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीवर प्रथम आक्रमण केले व इस्लामने दक्षिणेत प्रवेश केला. त्यानंतर महाराष्ट्रात बहामनी सुलतानाची सत्ता १३४७ ते १५१० पर्यंत होती. नंतर आदिलशाही व निजामशाहीची सत्ता होती. या राजवटींच्या काळात अनेक मराठयांनी स्वकर्तृत्व व पराक्रम यांच्या जोरावर मानाच्या जागा मिळवल्या. परंतु स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा विचार करण्यास कोणी धजावले नाही.

परकीय सत्तेच्या दडपशाहीचा वरवंटा फिरत असताना शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली व त्यामुळे भारतीय इतिहासातील एक महान पर्वाला सुरुवात झाली.

## १.२ मराठयांच्या इतिहासाची साधने

ज्यांच्या आधारे किंवा ज्याच्या सहाय्याने इतिहास लिहिला जातो, त्यांना इतिहासाची साधने म्हणतात. ही साधने लिखित व पुरातत्वीय स्वरुपाची असतात. मराठयांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे अनेक ग्रंथ बखर रुपाने उपलब्ध आहेत. इतिहास लेखन हा साहित्यप्रकार मराठेशाहीतही अस्तित्वात होता. परंतु इतिहासाकडे व ऐतिहासिक व्यक्तिकडे बघण्याची दृष्टी शास्त्रीय नव्हती. बखरकारांवर पुराणांची फार मोठी छाप पडलेली दिसते. पुरावे गोळा करावेत, त्यांचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करावा, त्याची विश्वसनीयता पडताळून पाहणे व त्यातून निष्कर्ष काढून इतिहास लिहावा, हा शास्त्रीय दृष्टिकोन बखरकारांत दिसत नाही. इतिहास लेखन एक शास्त्रशुध्द प्रक्रिया असते. उपलब्ध साधनांच्या साहाय्याने इतिहासाचा मागोवा घ्यावा लागतो ह्याचे भान बखरकारांना असल्याने जाणवत नाही.

मराठेशाहीचा इतिहास शास्त्रीय दृष्टीने युरोपियनांनीच लिहिला. मराठेशाहीच्या अस्तापूर्वीच इ.स.१८१० साली स्कॉट वेअरिग या इंग्रज इतिहासकाराने मराठयांचा इतिहास प्रसिध्द केला. पुढे मराठयांची सत्ता इ.स.१८१८ साली नष्ट झाली. साता-याच्या छत्रपतीच्या गादीचे इंग्रजांनी पुनरुज्जीवन केल्यावर ग्रँट डफची रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. ग्रँट डफ हा चौकस, जिज्ञासू व इतिहासाचा अभ्यासू होता. ज्यांचे राज्य नष्ट करुन हिंदुस्थानातील सत्ता हाती घेतली, त्या मराठयांच्या सत्तेच्या इतिहासाचे आपण आकलन केले पाहिजे, असे त्यास वाटून त्याने मराठी कागदपत्रे जमविण्यास व त्यांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. साता-याच्या राजाने अनेक कागदपत्रे उपलब्ध करुन दिली. त्यांच्या अविश्रांत परिश्रमातून व चिकाटीतून ''मराठयांचा इतिहास'' हा ग्रंथ १८२६ साली तीन खंडात प्रकाशित झाला.

पुढे बरीच वर्षे ग्रँट डफचा इतिहास प्रमाण मानला जात होता. पुढे इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर महाराष्ट्रात जनजागृती झाली. युरोपियन इतिहासकारांनी आपला इतिहास लिहिताना केलेल्या चुका भारतीयांच्या लक्षात येऊ लागल्या. सर्व प्रथम रावबहादूर नीळकंठ जनार्दन किर्तने यांनी सन १८६७ साली एक लेख लिहून ग्रॅट डफच्या इतिहासातील चुका उडघकीस आणल्या. या नंतर अनेक विचारवंतांच्या नजरा मराठयांच्या इतिहासाकडे वळल्या. मराठयांच्या इतिहासाला उपयुक्त असणारी कागदपत्रे शोधून, त्यांना छापण्याचे काम जिनसीवाले, कीर्तने, चिपळूणकर, साने, मोडक यांनी केले. 'विविध ज्ञान विस्तार, 'काव्येतिहाससंग्रह', 'भारत वर्ष' या मासिकांतून शेकडो कागदपत्रे प्रसिध्द झाली.

परंतु कागदपत्रे शोधून ती संकलित करुन आपल्या भाष्यासह प्रसिध्द करण्याचे महान कार्य इतिहासाचार्य राजवाडे यांनी केले. राजवाडयांनी अनेक संकटे सोसून, हजारो कागदपत्रे जमा केली व 'मराठयांच्या इतिहासाची साधने' या मालेचे २२ खंड प्रकाशित केले. हजारो कागदपत्रे प्रकाशात आणली. पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधान मंडळा'ची स्थापना त्यांनीच केली (सन १९१०). इतिहासाचार्य राजवाडयांशिवाय महाराष्ट्रात राव.ब.द.ब.पारसनीस, ग.चि.वाड, वासुदेवशास्त्री खरे इत्यादी पंडितांनी मराठयांच्या इतिहासाची बहूमोल साधने प्रसिध्द केली. या नंतरच्या पिढीत रियासतकर सरदेसाई, वा.सि.बेंद्रे, मा. वि.गुजर, ग.ह.खरे, न.र. फाटक, अप्पासाहेब पवार, सेतूमाधवराव पगडी, स.मा.गर्गे, स.श.देसाई इत्यादी संशोधकांनी मागील पिढीचे कार्य पुढे चालवून अनेक प्रकारची ऐतिहासिक साधने प्रसिध्द केली आहेत.

**उपलब्ध साधनांच्या दृष्टीने मराठयांच्या इतिहासाचे दोन भाग करता येतात.**

१) शिवकाल (१६३०-१७०७) या भागात स्वतः छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई यांच्या कारकिर्दीचा समावेश होतो.

२) पेशवेकाळ (१७०७-१८१८) या भागात बाळाजी विश्वनाथ ते दुसरा बाजीराव हा अखेरचा पेशवा यांच्या कारकीर्दीचा समावेश होतो. या पैकी पेशवे काळाविषयी विपुल साधने उपलब्ध आहेत.

शिवकाळाचा इतिहास लिहिताना मात्र साधनांचा अपुरेपणा प्रकर्षाने जाणवतो. शिवकाळाविषयीच्या साधनांच्या तुटवडयाची कारणे पुढीलप्रमाणे देता येतात-

अ) शिवकाळ हा मराठयांच्या इतिहासातील धामधुमीचा व पूर्वतयारीचा काळ होता. या काळात सरकारी कागदपत्रे तयार करणे, त्यांच्या नकला करणे किंवा त्यांची योग्य देखभाल करणे शक्य नव्हते.

ब) इ.स.१६८९ मध्ये मराठयांची राजधानी रायगडहून दूरवर जिंजी येथे हलवण्यात आली. त्यावेळेस अनेक सरकारी कागदपत्र नष्ट झाली.

क) तत्कालीन समाज इतिहासाच्या शास्त्रशुध्द अभ्यासाविषयी फारसा जागरुक नव्हता.

ड) दानपत्रे, निवाडा पत्रे, अन्य खाजगी कागदपत्र व दस्तऐवज उपलब्ध आहेत, परंतु शिवकाळाचा विश्वसनीय इतिहास लिहिण्यासाठी त्यांचा फारसा उपयोग होत नाही.

मराठयांच्या इतिहासाची साधने मराठी, संस्कृत, फारसी, हिंदी, कानडी, इंग्रजी, फ्रेंच, डच व पोर्तुगीज भाषेत आहेत.

## १.३ मराठी साधने

मराठी साधनांमध्ये प्रामुख्याने मराठी कागदपत्रे, बखरी, शकावल्या, आज्ञापत्रासारखे ग्रंथ, पोवाडे इत्यादी साधनांचा समावेश होतो.

**१.३.१ आज्ञापत्र** - आज्ञापत्र हा ग्रंथ शिवशाहीमधील प्रधान रामचंद्रपंडीत अमात्य याने सन १७१५ च्या सुमारास लिहिला. रामचंद्रपंत अमात्य शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील एक प्रधान होते. महाराजांची राजनीती त्यास पूर्ण समजली होती. ही राजनीती त्यांच्या वारसांना मार्गदर्शक ठरावी, म्हणून रामचंद्रपंताने हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात राजा, त्याचे प्रधानमंडळ, किल्ले, आरमार इत्यादी विषयांवर अमात्याने आपले विचार मांडले आहेत. हे विचार म्हणजे शिवाजी महाराजांची राजनीतीच आहे.

**१.३.२ जेधे शकावली** - शिवकाळात काही प्रसिध्द घराण्यांत ऐतिहासिक घटना लिहून ठेवण्याची पध्दत होती. त्यानुसार काही घराण्यांनी लिहून ठेवलेल्या नोंदी इतिहास संशोधकांना सापडल्या आहेत. अशा एकत्रित नोंदी असणा-या कागदास 'शकावली' असे म्हणतात. कारीचे (पुणे जवळ) जेधे देशमुख यांच्या घराण्याची अशीच एक शकावली महत्वाची आहे. कान्होजी नाईक जेधे, बाजी सर्जेराव या जेधे मंडळीनी शिवाजी महाराज, संभाजी महाराज इत्यादींची सेवा केली होती. शकावलीतील नोंदी व तारखा अचूक आहेत. मराठयांचा इतिहास समजून घेण्याचे हे उत्कृष्ट साधन आहे.



munotes.in

**१.३.३ बखरी** - बखर या शब्दाची उत्पती अरबी शब्द खबर (बातमी, वृत्तांत) पासून झालेली आहे. मराठयांच्या काळात बखर हा शब्द माहिती देणे या अर्थाने रुढ झाला आहे. अशी माहिती अर्थातच ऐतिहासिक व्यक्ती व घटना यांच्याविषयी असते. अनेक वेळा चरित्रनायकाच्या हुकूमावरुन बखरकाराकडून लिहून घेण्यात येत असे. तथापि बखरकार एका विशिष्ट पक्षाचे असल्याने त्यांचा इतिहास पक्षपातीपणे लिहिला जात असे. स्वकियांची स्तुती व परकीयांची निंदा असे. तरीही राजकीय स्वरुपाच्या इतिहास लेखनाची परंपरा या दृष्टीने त्यांचे महत्व आहे. शालीवाहन बखर ही सर्वांत जुनी बखर आहे. वि.का.राजवाडे यांच्या मते १८१८ पर्यंत सुमारे अडीचशे बखरी लिहिल्या गेल्या. इतिहासाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या ७० बखरी प्रसिध्द झाल्या आहेत.

**मराठी बखरींची वैशिष्टये**

१) बखरी मोडी लिपीत लिहिलेल्या आहेत.

२) अनेक वेळा बखरी राजा किंवा अनेक लहान मोठया सरदारांच्या सांगण्यावरुन लिहिल्या जात.

३) अनेक बखरींचा विषय राजकीय असला तरी कालानुक्रम इतिहास लिहिला जात नसे.

४) बखरीमध्ये राजकीय घडामोडींच्या तुलनेत सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे उल्लेख कमी आढळतात.

५) दंतकथा आणि परंपरागत दाखले देऊन बखर वाचनीय करण्याचा प्रयत्न केला जात असे.

६) बखरकार स्वकियाची स्तूती करत असे, चमत्कार, अवताराच्या कल्पनांचाही मोठया प्रमाणात समावेश असे.

७) बखरींचे निवेदन पौराणिक पध्दतीचे असे.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी बखरींचे वर्गीकरण तीन भागात केले आहे.

**१) समकालीन बखरी** - समकालीन बखरकारांनी लिहिलेल्या बखरी -

**२) ऐकीव माहितीवर आधारलेल्या बखरी** - घटना घडल्या नंतर काही काळाने आपल्या आठवणींवर किंवा ऐकीव माहितीवर विसंबून बखरकाराने अशी बखर लिहिलेली असते.

**३) जुन्या बखरीवर आधारित असलेल्या बखरी** - काही वेळा या बखरी म्हणजे जुन्या बखरींच्या नकला असत. त्यामध्ये मूळ बखरीतील सर्व चुकांच्या बरोबर नकलकाराने नक्कल करताना केलेल्या चुकांचाही समावेश असतो आणि म्हणूनच त्या पूर्णपणे अविश्वसनीय असून त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येते.

डॉ. र.वि.हेरवाडकर यांनी मराठी बखरींचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

१) चरित्रात्मक बखर - या बखरीत चरित्र्य नायकाच्या चरित्राचे वर्णन असते.

उदा. कृष्णाजी अनंत सभासद यांचे शिवचरित्र

२) विशिष्ट घराण्याचा इतिहास -एखाद्या घराण्याची हकिगत. उदा. पेशव्यांची बखर, भोसले वंशचरित्र.

३) आत्मचरित्रात्मक बखर - उदा. नाना फडणिसाचे आत्मचरित्र

munotes.in

४) प्रसंगात्मक बखर - या बखरीत एखाद्या महत्वाच्या प्रसंगाचे वर्णन असते.
उदा. पानिपतची बखर

५) विशिष्ट काळाचा इतिहास - उदा. पेशवाईच्या अखेरची बखर

६) विशिष्ट पक्षाची बाजू मांडणारी बखर. उदा - होळकरांची कैफियत

७) सांप्रदायिक बखर - उदा. समर्थांची बखर

८) भाषांतरित बखर - उदा. बुंदेल्यांची बखर

९) स्थळवर्णनात्मक बखर - उदा. महाबळेश्वरची जुनी माहिती

१०) उत्पन्नाविषयीची बखर - सरकारला सादर केलेल्या कैफियती

**बखरींची विश्वसनीयता** - बखरींची विश्वसनीयता हा एक अत्यंत वादाचा विषय आहे. सुप्रसिध्द इतिहासकार जदुनाथ सरकार यांच्या मते इतिहास लेखनाच्या दृष्टीने मराठी बखरी कुचकामी आहेत. राजवाडे यांच्या मते मराठी बखरी साधारणपणे तीन प्रकारचे दोष आढळतात १) स्थळविपर्यास २) काळविपर्यास ३) व्यक्तिविपर्यास, बखरीतील हे दोष सर्वमान्य असून कोणालाही हे नाकारता येत नाहीत.

परंतु बखर हा शास्त्रशुध्द इतिहास नसला तरी इतिहासाचे एक साधन आहे हे मान्य करावेच लागते.

### १.३.४ शिवकालीन बखरी

**१) सभासद बखर** - ही शिवाजी महाराजांवरील सर्वात जुनी व शिवकालात लिहिली गेलेली बखर आहे. हिचा कर्ता कृष्णाजी अनंत सभासद हा असून त्याने शिवाजी महाराजांचा पराक्रम स्वतः पाहिलेला व ऐकिलेला आहे. राजाराम महाराजांच्या आज्ञेने ही बखर इ.स. १६९४ मध्ये लिहिण्यात आली. मराठी इतिहासाच्या अभ्यासूंच्या दुर्दैवाने सभासदाने ही बखर फार संक्षिप्त अशी लिहिली आहे. तरीही शिवाजी महाराजाच्या काळातील ही बखर असल्याने तिला अनन्यसाधारण महत्व आहे. या बखरीत महाराजांची राज्यकारभार व्यवस्था, लष्कर व्यवस्था, किल्ले, खजिना, सरदार इत्यादी अनेक बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.

**२) ९१ कलमी बखर** - ही बखर '९१ कलमी बखर' या नावाने प्रसिध्द आहे. कारण यात ९१ कलमे असून मालोजी राजे भोसले यांच्यापासून ते शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंतचा इतिहास कथन केला आहे. ही बखर प्रसिध्द करण्याचे श्रेय संशोधक वि.स.वाकसकर यांच्याकडे जाते (इ.स.१९३०) वाकसकरांच्या मते, ही बखर मंत्री दत्ताजी त्रिमळ वाकेनिविस यांनी तयार केली. तिचा लेखनकाल १६८५ ते १७०७ या दरम्यानचा असावा.

**३) चिटणीस बखर** - मल्हारराव रामराव चिटणीस याने इ.स.१८११ मध्ये दुस-या शाहू महाराजाच्या आज्ञेवरुन ही बखर लिहिली. बखरकाराचे आजोबा बाळाजी आवजी चिटणीस शिवाजी महाराजांचे समकालीन होते. या बखरीत एकूण सात प्रकरणे आहेत. ही बखर प्रथम 'विविध ज्ञानविस्तार' या मासिकात इ.स. १८७७ मध्ये प्रसिध्द झाली. बखरकाराकडे साधनाची अनुकूलता असली तरी साधनसामग्रीचा पध्दतशीर उपयोग करण्याचे ज्ञान त्याला नव्हते. बखरीतील घटना कालानुक्रमाने दिलेल्या नाहीत.

**४) चित्रगुप्त बखर** - ही बखर सभासद बखरीवर आधारित आहे. हिचा कर्ता रघुनाथ यादव चित्रगुप्त (चित्रे) हा असून बखरींच्या मजकूरात अधूनमधून त्याने आपल्या कविता घातल्या आहेत. हा बखरकारही बाळाजी आवजी चिटणीस यांच्याच घराण्यातील होता. सभासद बखरीत ज्या पुरुषांची आडनावे दिली नाहीत. त्यांची आडनावे चित्रगुप्त लिहिण्याच्या ओघात सहजासहज देऊन जातो. ही बखर १७६५ च्या सुमारास लिहिली गेली असावी.

**५) दलपतरायाची बखर** - शिवाजी महाराजांच्या विरोधी पक्षात असणा-या लेखकाने ही बखर लिहिली आहे. त्यामुळे महाराजांच्या विरोधात असणा-या तत्कालीन मंडळींचे त्यांच्या कार्याविषयी काय मत होते, हे अजमाविण्यासाठी या बखरींचा उपयोग होते.

**६) शिवदिग्विजय** - ही बखर सन १८१८ साली लिहली गेली आहे. हिचा कर्ता अज्ञात आहे. इतिहास संशोधक नंदुरबारकर व दांडेकर यांनी तिचे संपादन केले व ती सन १८९५ साली प्रसिध्द केली. इतिहासाचार्य राजवाडयांच्या मते या बखरीचा मजकूर एखाद्या जुन्या बखरीवरुन घेतला असावा. राजाराम महाराजांना राजपद मिळावे म्हणून राणी सोयराबाईने केलेल्या कृत्यांचे वर्णन या बखरकाराने केले आहे.

**७) मराठी साम्राज्याची छोटी बखर** - या बखरीचा रचना इ.स.१८१७ साली झाली असावी. इतिहासकार बाळाजी जनार्दन मोडक यांनी ती ‘काव्येतिहासंग्रह’ या मासिकात प्रसिध्द केली. स्थल, व्यक्ती व काल यांचा बराच विपर्यास या बखरीत आहे. तरीही शिवचरित्रामधील काही नव्या बाबी या बखरीतून पुढे येतात.

**८) चिटणीसकृत संभाजी महाराजांची बखर व राजाराम महाराजांची बखर** - मल्हार रामराव चिटणीसानेच या दोन बखरी लिहिल्या आहेत. मराठयांच्या बाजूकडून संभाजी महाराज व राजाराम महाराज यांची चरित्रे कळण्यासाठी याच बखरींचा उपयोग होतो. हा बखरकार संभाजी महाराजांच्या विरोधात लिहितो व राजारामच्या संबंधी प्रशंसेचे उद्‌गार काढतो.

याशिवाय श्री. शिवप्रताप, शेडगावकर बखर, शहान्नव कलमी बखर, शिवाजी प्रताप इत्यादी बखरी शिवकालावर उपलब्ध आहेत. परंतु त्याचे ऐतिहासिक मूल्य फारच थोडे आहे.

**१.३.५ पेशवेकालीन बखरी** - इ.स.१७०७ मधील शाहूचे दक्षिणेतील आगमन ते इ.स.१८१८ मध्ये झालेला मराठी राज्याचा अस्त या पेशवे काळाविषयीही अनेक बखरी लिहिल्या गेल्या आहेत. त्यापैकी काही महत्वाच्या बखरी खालीलप्रमाणे आहेत.

**१) साष्टीची बखर** - उत्तर कोकणातील साष्टी व वसई प्रांतावर इ.स.१७३७ ते ३९ या काळात मराठयांनी स्वारी केली व ते प्रांत जिंकून घेतले. या विजयाची माहिती या बखरीत दिली आहे. ही बखर इ.स. १७४२ मध्ये लिहिली गेली आहे. वसईच्या संग्रामाचे खरे श्रेय गंगाजी नाईक यांचे असून यांच्या तुलनेत चिमाजी अप्पाचे या संग्रामातील योगदान गौण असल्याचे प्रतिपादन या बखरीत करण्यात आले आहे.

**२) श्री. शाहू महाराज यांची बखर** - या बखरीचा कर्ता गोविंदराव खंडेराव चिटणीस आहे. या बखरीत शाहू महाराजांचा जन्म ते मृत्युपर्यंतची माहिती विस्ताराने दिली आहे. मुघलांच्या कैदेतील शाहू महाराजांच्या परिस्थितीचे तपशीलवार वर्णन बखरकाराने केले आहे.

**३) पेशव्यांची बखर** - या बखरीचा कर्ता कृष्णाजी सोहीनी आहे. इ.स.१७१३ ते १८१८ या काळातील सर्व घडामोडींचा तपशीलवार उल्लेख या बखरीत आढळतो. ही बखर पेशव्यांच्या पराक्रमाची गाथा आहे. मराठयांच्या इतिहासातील विविध प्रसंगाचे वर्णन त्यामध्ये केले आहे.

**४) पानिपत बखर** - इ.स.१७६३ मध्ये रघुनाथ यादव याने पेशवा नानासाहेब यांची विधवा पत्नी गोपिकाबाई हिच्या आज्ञेवरुन ही बखर लिहिली होती. रघुनाथ यादव हा पेशव्यांच्या पदरी कारकून होता. पानिपतच्या संग्रामात वीरगती प्राप्त झालेल्या महत्वाच्या व्यक्तींची यादी हे या बखरीचे विशेष वैशिष्टये आहे. पानिपतच्या संग्रामानंतर लगेचच ही बखर लिहिली गेली असल्याने त्यातील हकीगत खरी असावी ही सर्वसाधारण अपेक्षा मात्र खोटी ठरते. जदुनाथ सरकार तर या बखरीचे वर्णन 'अफीमबाजाचे लेखन' असे करतात.

**५) भाऊसाहेबांची बखर** - पत्ररुपातील या बखरीचा लेखक शिंदे यांच्या पदरी एक सेवक असावा. या बखरीत इ.स.१७६१ च्या पानिपतच्या संग्रामाविषयीचे तपशीलवार वर्णन करण्यात आले आहे. मात्र त्याच्या विश्वसनीयतेची खात्री देता येत नाही. बखरीतील मजकूरावरुन काही तत्कालीन चालीरीतीवर प्रकाश पडतो. सतीची पध्दत, पाठीवर जखम झालेल्या सैनिकाची समाजात होणारी हेटाळणी यांचा उल्लेख बखरकाराने केला आहे.

**६) काशीराजाची बखर** -

काशीराज हा मराठी ब्राम्हण अवधचा नवाब शूजाउद्दौलाच्या सेवेत होता. त्याने फारसी भाषेत पानिपतच्या लढाईचा वृतांत लिहिला आहे. पानिपतच्या लढाईच्या तपशिलाविषयक हा वृतांत महत्वाचे साधन आहे.

वरीलप्रमाणे मराठयांच्या इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या काही महत्वाच्या बखरी आहेत. या बखरींमध्ये अनेक दोष असले तरी बखरकारांनी काही जुनी कागदपत्रे अभ्यासली होती जी आता सापडत नाहीत. तेव्हा त्यासाठी बखरींवर विसंबून राहणे, आवश्यक ठरले. इतिहासात जेथे त्रूटी आहेत, तेथे बखरी आपल्या साहाय्यस येऊ शकतात.

### १.३.६ सरकारी व खाजगी पत्रे

सरकारी पत्रात तहनामे, करार, कायदेकानून, सनदा, रोखे, वतन पत्रे, राजा, प्रधान यांनी अधिकाऱ्यांना उद्देशून काढलेले हुकूम, कारखान्यांना दिलेल्या सूचना यांचा समावेश होतो. पेशवेकाळात मराठा राज्याचा विस्तार झाला. परमुलखात बातमीदार नेमले जात असत. तसेच मराठा सरदारांचे बातमीदार पुणे दरबारात असत. त्यांची बातमीपत्रे इतिहास लेखनाची महत्वाची साधने आहेत.

खाजगी पत्रांमध्ये राज्यकारभार, व्यवहार, व घरगुती अशा तिन्ही प्रकारचा प्रत्यक्ष पुरावा आढळतो.

## १.४ संस्कृत साधने

प्रामुख्याने महाराष्ट्रातून आणि भारतातील इतर ठिकाणावरुन अनेक संस्कृत पंडित छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारात येत असत. यापैकी काही पंडितांनी शिवकाळाविषयी संस्कृत भाषेत काव्यरचना वा प्रशस्ती केलेली आहे. हे साहित्य काव्याच्या स्वरुपात असल्यामुळे त्यात

अतिशयोक्ती असू शकते. मराठांच्या इतिहासाच्या दृष्टीने काही संस्कृत साधने महत्वाचे आहेत. त्यातील काही महत्वाचे साधने पुढीलप्रमाणे

**१.४.१ विश्वगुणांदर्शचंपू** - या काव्यग्रंथाची रचना कवी वेंकटाश्वरी यांनी केलेली आहे. हा कवी उत्तर भारतातील असावा. या काव्यामध्ये शिवकालीन मराठे आणि ब्राम्हण यांच्याविषयी बोधप्रद लिखान आलेले आहे. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत तो महाराष्ट्रात आलेला असल्यामुळे महाराजांच्या जिवनातील काही घटनांवर या काव्याद्वारे प्रकाश पडतो. शिवाजीच्या कार्याचे समर्थन करणारे हे काव्य होय.

**१.४.२ सुर्यवंशम किंवा अनुपूराण** - हा काव्यग्रंथ कवी परमानंद यांनी लिहिलेला आहे. हे काव्य १०० सर्गांचे करण्याची त्याची इच्छा होती. परंतुपहिले ३१ सर्ग त्याने १६८० पर्यंत रचले. त्यानंतरच्या काळात त्याने १९ सर्ग रचले तर शेवटी त्याने १३ सर्ग रचले आहे. या काव्यग्रंथात शहाजी राजे, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयीचे वर्णन आलेले आहे. राणी सोयराबाईंच्या सौंदर्यांच्या प्रभावाखाली शिवाजी महाराजांनी संभाजी राजांचा गादीवरील हक्क नाकारला व राजारामाला आपले उत्तराधिकारी नेमले, असा युक्तीवाद या ग्रंथात आलेला आहे. यावरुन छत्रपती शिवाजीच्या नंतर हा ग्रंथ तयार झाला असावा किंवा कोणाच्या तरी प्रभावाखाली या ग्रंथात काही भागांचे लिखाण झाले आहे असे वाटते.

**१.४.३ शिवभारत** - हा ग्रंथसुध्दा कवि परमानंद यानेच लिहिलेला आहे. या ग्रंथामध्ये थेट मालोजीराव भोसले, शहाजीराजे भोसले यांच्या कारकिर्दिचा आढावा घेण्यात आलेला आहे. यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोकण विजयापर्यंतचा इतिहास आलेला आहे. यातील वृत्तांत सुध्दा काव्यरुपानेच लिहिण्यात आलेला आहे.

**१.४.४ अशावतारम्** - या काव्यग्रथांचा कर्ता गोविंद हा असुन हा कवी परमानंदचा नातू होय. याला ‘कविंद्र‘ हा किताब देण्यात आला होता. या काव्यग्रंथाची रचना छत्रपती शाहुमहाराजांच्या आज्ञेवरुन करण्यात आली. साधारणपणे या ग्रंथाची रचना इ. स. १७४० ते १७५४ या कालावधीमध्ये झाली असे मानले जाते.

**१.४.५ शिवराज्याभिषेक कल्पतरु** - या काव्यग्रथांचा मुख्य विषय शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा आहे. या काव्यग्रथांचा कर्ता अनिरुध्द सरस्वती असून हा उत्तर हिंदुस्थानातील आहे. अनिरुध्द सरस्वती शिवराज्याभिषेकाच्या वेळी रायगडावर उपस्थित होता. गोविंद आणि निश्चलपूरी या दोन ब्राम्हणांच्या संवादरुपाने राज्याभिषकाचे वर्णन यात आढळते. गागाभट्टाने केलेला वेदोक्त राज्याभिषेक कसा चुकिचा होता यावर या काव्यग्रंथात चर्चा आलेली आहे.

**१.४.६ राधा माधव विलासचंपू** - हा काव्यग्रंथ जयराम पिंडे यांनी रचला आहे. याचा निवास बागलान प्रातांतील सप्तशृंगी डोंगराच्या पायथ्याशी होता. त्या ठिकाणी तो पिंड पाडण्याचे काम करित असे म्हणून त्याला पिण्डे असे आडनाव मिळाले. काही ठिकाणी त्याचा नामोल्लेख जयराम पंडीत असाही होतो. या काव्यग्रंथात प्रामुख्याने शहाजीराजांची माहिती आलेली आहे. जयराम पिंडे हे शहाजीराज्यांच्या दरबारात ही होते त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांच्या दरबारातही होते.

**१.४.७ पर्णाल पर्वत ग्रहणाख्यानम्** - हा काव्यग्रंथच असुन, तो जयराम पिंडे (पंडीत) यानेच रचला आहे. इ. स. १६७३ साली शिवाजी महाराजांनी (अण्णाजी दत्तो व कोंडाजी फर्जंद) पन्हाळा किल्ला जिकंला हा या काव्याचा मुख्य विषय आहे यावरुन पन्हाळा दुसऱ्यांदा कसा घेतला याची माहिती मिळते. या काव्याची रचना इ. स. १६७४ साली झाली असावी, असे

संशोधक स. म. दिवेकर यांचे मत आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्रावर प्रकाश टाकणारा हा महत्त्वपूर्ण साधन ग्रंथ मानावयास हरकत नाही.

**१.४.८ राजाराम चरितम्** - राजारामाच्या दरबारी पंडीत केशवपंडीत यांनी हा ग्रंथ रचला आहे. या ग्रंथामध्ये राजाराम महाराजांच्या काळातील परिस्थितीचे वर्णन आलेले आहे. हा ग्रंथ तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयात श्री. वा. सी. बेन्द्रे यांनी शोधून काढला व तो इ. स. १९३१ ला प्रसिद्ध केला. या ग्रंथात विशेषतः राजाराम महाराजांचा जिंजीचा प्रवास वर्णिलेला आहे.

## १.५ फारसी साधने

मध्ययुगीन भारतातील विविध राज्यकर्त्यांची फारसी ही प्रशासकीय भाषा होती. या राज्यकर्त्यांचा आणि मराठयांचा जो संबंध आला त्याविषयीचे अनेक उल्लेख फारसी भाषेतील सरकारी कागदपत्रे व दस्तऐवज यामध्ये सापडतात. तसेच मोगल इतिहासकारांनी लिहिलेले मोगल साम्राज्याचे इतिहास, बादशाहाची चरित्रे, मोगल दरबारची बातमीपत्रे मराठा इतिहासाची महत्वाची साधने आहेत.

**१. मासिरे आलमगिरी (आलमगिरचे कर्तृत्त्व) :** - साकी मुस्तैदखान याने हा ग्रंथ १७०९ मध्ये लिहीला आहे. औरंगजेबाच्या खास तैनातीमधील अधिकारी असल्याने मोगल-मराठा संघर्ष त्याने प्रत्यक्ष डोळयांनी पाहिला होता. साकीने आपल्या चरित्रात बादशाहाच्या राज्यारोहणाच्या वर्षापासूनच्या घडामोडी व घटना दिल्या आहेत. बहुतेक ठिकाणी तो अचूक तारखा देतो. त्यामुळे मोगल-मराठा संघर्षाचा अभ्यास करणा-यास बहुमोल मदत होते. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांच्या कारकीर्दीचा अभ्यास या ग्रंथाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही.

सन १८७१ साली हा ग्रंथ रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेने प्रथम प्रसिध्द केला. त्याचे इंग्रजी भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनी केले आहे. तर मराठी भाषांतर श्री. सेतु माधवराव पगडी यांनी 'मराठे व औरंगजेब' या नावाने प्रसिध्द केले.

**२. मुन्तखवुल लुबाब-ए-महंमदशाही (तारीखे खाफीखान) :-** महंमद हाशिम खाफीखान याने हा ग्रंथ १७३४ मध्ये लिहिला. १८७४ मध्ये रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेने तो प्रकाशित केला. मराठी भाषांतर श्री. ग.ह.खरे व श्री. पगडी यांनी प्रसिध्द केले आहे. मोगलांचा एक अधिकारी या नात्याने खाफीखान औरंगजेब बादशाहाच्या मोहिमेत दक्षिणेत हजर होता. त्याने स्वतः मोगल-मराठा संघर्ष पाहिला होता. खाफीखानाने मोगल-मराठयांच्या अनेक लढाया वर्णिलेल्या आहेत. त्यावरुन मोगल व मराठा यांची लढण्याची पध्दती व रणनीती यासंबंधी खूप माहिती मिळते. जदुनाथ सरकाराच्या मते हे लिखाण अत्यंत विश्वसनीय असल्याने विशेष महत्वाचे आहे.

**३. तारीखे दिल्कुशा :-** औरंगजेब बादशाहाच्या पदरी असणा-या भीमसेन सक्सेना याचे हे आत्मचरित्र आहे. औरंगजेबाबरोबर तो दक्षिणेच्या मोहिमेत हाता व सन १७०१ साली जुल्फिकार खानाने पन्हाळयास वेढा दिला, त्यावेळी हा तेथे हजर होता. भीमसेन सक्सेनाने आपल्या या आत्मचरित्रात मोगल साम्राज्याच्या सन १६५६ सालापासून १७०९ पर्यंतचा इतिहास कथन केला आहे. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व महाराणी ताराबाई या मराठा राज्यकर्त्यांनी औरंगजेबांशी दिलेल्या संघर्षाची प्रथम दर्जाची माहिती भीमसेन आपणास

सादर करतो. महाराणी ताराबाईचे नेतृत्व गुण याविषयी विस्तृत माहिती मिळते. या ग्रंथाचा प्रथम अनुवाद इंग्रजीत कॅ. जोनाथन स्कॉट यांनी इ. स. १७९४ मध्ये केला. इ. स. १९६३ साली श्री. सेतू माधव पगडी यांनी हा ग्रंथ 'मोगल आणि मराठे' या ग्रंथरूपाने मराठीत प्रकाशित केला.

**४. फुतूहाते आलमगिरी :-** फुतूहाते आलमगिरी म्हणजे आलमगीर औरंगजेब बादशाहाच्या विजयाची कथा. हा ग्रंथ ईश्वरदास नागर याने लिहिला. बादशाहाच्या मुख्य न्यायाधीशाचा ईश्वरदास नागर हा कारकून होता. आपल्या ग्रंथास ईश्वरदासने मोगलांचा शाहिस्तेखानाच्या मोहिमेपासून (सन १६६०) ते साता-याच्या वेढयापर्यंत (सन १७००) हकीगत दिली आहे. संभाजी महाराज, कवि कलश, दुर्गादास राठोड, अकबर, राजाराम महाराज, संताजी व बादशाही सरदार यांच्याविषयीची बरीच नवी माहिती ईश्वरदास नागरच्या या ग्रंथात मिळते. संभाजी राजांनी औरंगजेबापुढे मान झुकली नाही व डोळे काढले गेल्यावर अन्नत्याग केला, ही संभाजी महाराजांच्या शेवटच्या दिवसांची हकीगत ईश्वरदासानेच दिली आहे. अशा अनेक नव्या माहितीमुळे हा ग्रंथ मराठयांच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरला आहे.

**५. खुतूते शिवाजी :-** खुतूते शिवाजी म्हणजे शिवाजी महाराजांची पत्रे या ग्रंथात केवळ महाराजांचीच पत्रे नाहीत तर औरंगजेब बादशाहा, शहजादा अकबर, जुल्फिकार खान, जयसिंह, शाहू महाराज यांची ही पत्रे या ग्रंथात आहेत. या पत्रांचा इंग्रजी अनुवाद 'मोगल-मराठा संघर्ष' या पुस्तकात श्री सेतू माधवराव पगडी यांनी प्रसिध्द केला आहे. शिवाजी महाराजांनी जिजियाच्या निषेधार्थ औरंगजेबाला लिहिलेले पत्राचा समावेश या ग्रंथात आहे.

**६. हफ्त अंजुमन :-** मिर्जा राजा जयसिंग यांच्या पत्रांचा हा संग्रह आहे. जयसिंग हा शिवाजी महाराजांचा पराभव करण्यासाठी दक्षिणेत आला होता. या मोहिमेत जयसिंगने औरंगजेबास वेळावेळी जी पत्रे पाठवली ती या संग्रहात आहे. जयसिंगाचा चिटणीस उदयराज याने हा संग्रह एकत्रित करुन त्यास 'हफ्त अंजुमन' असे नाव दिले. या पत्रांवरुन जयसिंगाच्या दक्षिणेतील मोहिमेवर, त्याच्या डावपेचावर प्रकाश पडतो. शिवचरित्राचे हे एक महत्वाचे साधन आहे.

**७. लुत्फुल्लाखानाची पत्रे :-** लुत्फुल्लाखान हा औरंगजेबाचा सरदार होता. सन १६९० च्या सुमारास तो खटावचा ठाणेदार होता. त्यावेळी त्याच्या संताजी व धनाजी यांच्याशी अनेक लढाया झाल्या. या लढायांच्या वृत्तांत त्यांच्या पत्रांतूनच आपणास समजतो. सन १६९९ नंतर तो विजापूर, औरंगाबाद व वऱ्हाड येथे मोगल सुभेदार म्हणून होता. श्री सेतू माधवराव पगडी यांनी लुत्फुल्लाखानाचा ४० पत्राचा अनुवाद 'मोगल मराठा संघर्ष' या पुस्तकात दिला आहे. ही पत्रे मोगल-मराठा संघर्षावर प्रकाश टाकणारी आहेत.

**८. मातबरखानाची पत्रे :-** मातबरखान हा मोगलांचा सरदार होता. संभाजी महाराजांच्या काळाच्या शेवटी नाशिक, बागलाण, उत्तर कोकण येथील किल्ले घेण्यात त्याने मोठा पराक्रम गाजवला. त्याने बादशाहाला व इतर मोगल सेनाधिका-यांना लिहिलेली काही पत्रे उपलब्ध आहेत. मातबरखानाचा चिटणीस जेठमल याने ही पत्रे व खानाच्या पराक्रमाची हकीगत एकत्रित करुन 'कारनामा' नावाचा ग्रंथ लिहिला. या पत्रांपैकी काही पत्रांचा अनुवाद श्री. पगडी यांनी मराठीतील 'नवभारत' या मासिकात प्रसिध्द केला आहे. संभाजी महाराज व राजाराम महाराज यांच्या काळातील मोगल-मराठा संघर्ष समजून घेण्यासाठी या पत्रांचा उपयोग होतो.

**९. बुसातिन-उस्-सलातीन :-** विजापूरच्या आदिलशाहीचा हा इतिहास आहे. हा इतिहास महंमद इब्राहिम अली जूबैरी याने १८२४ साली लिहिला. या ग्रंथाचा अनुवाद मोडक व वझे यांनी प्रथम प्रसिध्द केला. श्री. ग. ह. खरे व श्री. वा. सी. बेंद्रे यांनीही याचे अनुवाद 'विजापूरच्या

आदिलशाही घराण्याचा इतिहास' या नावाने केले आहेत. शिवाजी-आदिलशाही संबंधाचा अभ्यासासाठी हे महत्वाचे साधन आहे.

**१०. सियाल-उल-मुंतखरीन :-** या ग्रंथाचा लेखक सय्यद गुलाम हुसेन तबतबी हा मुघल सरदार होता. त्याचे बहुतेक आयुष्य बंगाल प्रांतामध्ये गेले होते. शाहू महाराज व महाराणी ताराबाई यांच्यातील यादवी युध्द, मराठे निजाम संबंधावर तो प्रकाश टाकतो.

**११. अखबारात :-** बादशाहाच्या दरबारात दररोज होणाऱ्या घडामोडींचा वृत्तांत सरकारी अधिकाऱ्यांकडून लिहिला जाई. तसेच मोठया सरदारांचे हस्तकही दरबारात असत. ते दरबाराच्या वार्ता आपल्या धन्यास कळवीत असत. या वार्तापत्रांना 'अखबारात' असे म्हणतात. काळाच्या ओघात या अखबारातांपैकी बरीच नष्ट झाली. त्यापैकी काही भाग लंडन, जयपूर, कलकत्ता येथील दप्तरखान्यांत आहेत. श्री. ग.ह.खरे व श्री. पगडी यांनी या अखबारातांचे भाषांतर मराठीत केले आहे. दक्षिणेतील मोगल मराठा संघर्ष, त्याची लष्करी व राजकीय कारभार व्यवस्था, इत्यादी अनेक बाबींवर हे अखबारात प्रकाश टाकतात. त्यांच्या आधारे मराठयांचा तारीखवार इतिहास लिहिणे सुलभ झाले आहे.

## १.६ युरोपियन साधने

सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली व याच दरम्यान पोर्तुगीज वगळता युरोपियन सत्ता व्यापाराच्या उद्देशाने हिंदूस्थानात आल्या. इंग्रजांनी पौर्वात्य देशांबरोबर व्यापार करण्याच्या प्रमुख उद्देशाने ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. त्यानंतर लवकरच हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यांवर सुरत, मुंबई, राजापूर, कारवार या बंदरांमध्ये वखारी स्थापन केल्या. लवकरच या युरोपियन सत्तांची राजकीय महत्वाकांक्षा वाढू लागली. नव्याने निर्माण झालेल्या मराठी सत्तेकडे ते संशयाने पाहू लागले. मराठयांच्या सर्व हालचालींवर त्यांची बारीक नजर होती. १६५९ मध्ये शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या केलेल्या वधानंतर युरोपियन साधनांमध्ये शिवाजी महाराजांविषयीच्या उल्लेखात वाढ झाली. भविष्यात मराठा सत्तेबरोबर आपला संघर्ष अटळ आहे, या जाणिवेतून मराठा राज्याविषयी इत्यंभूत माहिती इंग्रज मिळवत असत. त्याचे विस्तृत वर्णन त्यांच्या दस्तऐवजात आढळते.

**१.६.१ इंग्लिश साधने** - इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरत, मुंबई, राजापूर, कारवार, मद्रास, कलकत्ता इत्यादी ठिकाणी अनेक वखारी होत्या. प्रथम सुरत व नंतर मुंबई येथे इंग्रजाची प्रमुख वखार होती. या वखारी ज्या प्रांतात असत, त्या प्रांतातील राजकीय व व्यापारी घडामोडी, त्या आपल्या प्रमुख वखारीला कळवीत असत व भारतामधील प्रमुख वखार भारतातील सर्व वृत्तांत इंग्लंडमधील आपल्या डायरेक्टरांना कळवीत असे. सुरत, मुंबई, राजापूर, कारवार व मद्रास या ठिकाणच्या वखारींच्या वृत्तांतात व त्यांच्या मंडळाच्या बैठकीच्या ठरावांत मराठयांच्या हालचाली, मोहिमा, राजकारण याविषयी अत्यंत मोलाची माहिती मिळते. हे इंग्रज व्यापारी स्वतः माहिती गोळा करत. तसेच हेरांच्याकडून बातम्या गोळा करत. त्यांच्या व्यापाराच्या संरक्षणासाठी हे करणे त्यांना आवश्यक होते. त्यांच्या या कागदपत्रांत मराठयांचा तारीखवार इतिहास लिहिण्यास मदत झाली आहे.

लंडन, कलकत्ता, मद्रास, मुंबई इत्यादी ठिकाणी सरकारी दप्तरखान्यात कंपनीची लक्षावधी कागदपत्रे आहेत. इ. स. १९३१ साली शिवाजी महाराजांचा संबंध असलेली इंग्लिश कागदपत्र 'English Records on Shivaji' या ग्रंथाच्या रुपाने एकत्रित छापली आहेत. लंडनमधील

'इंडिया ऑफीस'मधील शेकडो कागदपत्रांची नकल करुन श्री.वा.सी.बेंद्रे यांनी आणली आहेत. सुप्रसिध्द इतिहास संशोधक व लेखक डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी सन १९२७ साली 'फारेन बायॉग्रॉफीज ऑफ शिवाजी' हा ग्रंथ संपादन करुन मराठयांच्या इतिहासाच्या साधन ग्रंथात मोलाची भर टाकली आहे, या ग्रंथात इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज इत्यादी तत्कालीन लेखकांनी शिवाजी महाराजांसंबधी केलेल्या लिखाणांचा इंग्रजी अनुवाद डॉ. सेन यांनी प्रसिध्द केला आहे. या परकीय लेखकांमध्ये जीन-द-थेवेनो, बार्थिलेमी कॅरे, फ्रॅन्सिस मार्टिन यांचा समावेश आहे. त्याशिवाय डॉ. सेन यांनी शिवाजी महाराजांसंबधीची डच कागदपत्रेही इंग्रजीत अनुवादित करुन ती ग्रंथात दिली आहेत. शिवाजी महाराजांशी इंग्रज व्यापाऱ्यांनी केलेले करारनामे, त्यांच्या वकिलांचे वृत्तांत यांचाही समावेश येथे करण्यात आला आहे.

**१.६.२ पोर्तुगीज साधने** - पोर्तुगीज हे मराठयांचे जवळचे शेजारी होते. हिंदुस्थानच्या राजकारणात भाग घेणारे ते पहिले युरोपियन होते. त्यामुळे त्यांच्या कागदपत्रांमध्ये मराठयांचे उल्लेख आपल्याला सापडतात. हिंदुस्थानात गोवा व पोर्तुगालमध्ये लिस्बन येथे असणाऱ्या दप्तरखान्यांत मराठयांच्या इतिहासाशी संबंध असणारी हजारो कागदपत्रे आहेत. पोर्तुगीज व्हाइसरॉयने आपल्या राजास लिहिलेली पत्रे, मराठी व मोगल सरदार यांना लिहिलेली पत्रे, आपल्या मंडळातील ठराव इत्यादींचा या साधनात समावेश होतो. इतिहास संशोधक डॉ. पांडुरंगराव पिसुर्लेकर यांनी 'पोर्तुगीज-मराठा संबंध' या ग्रंथ लेखनात पोर्तुगीज साधनांचा उपयोग केला आहे. श्री. स.शं. देसाई यांनी पोर्तुगीज साधनांचा मराठीत अनुवाद केला आहे.

**१.६.३ फ्रेंच साधने** - फ्रेंच साधने पॅरिस, लंडन इत्यादी ठिकाणच्या दप्तरखान्यांत आहेत. या कागदपत्रांमध्ये हिंदुस्थानातील फ्रेंच वखारवाल्यांनी मायदेशी लिहिलेली पत्रे, हिंदी राजांना लिहिलेली पत्रे यांचा समावेश आहे. सर्वात मराठयांच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे साधने म्हणजे फ्रेंच गर्व्हनर मार्टिन याने लिहिलेली रोजनिशी. या रोजनिशीचे इंग्रजी भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनी प्रसिध्द केले आहे. मार्टिनचे वास्तव्य पाँडेचरीला असल्या कारणाने मराठयांच्या कर्नाटकातील हालचालींचा अभ्यास करण्यासाठी मार्टिनची ही रोजनिशी अत्यंत महत्वाची आहे. शिवाजी महाराजांची कर्नाटकाची स्वारी व राजाराम काळातील जिंजीचा वेढा या संबंधी महत्वाची माहिती आपल्याला फ्रेंच कागदपत्रांमध्ये सापडते.व का ?

इतिहास संशोधक डॉ. हाताळकर यांनी फ्रेंच कागदपत्रांचा वापर करुन Relations between the French and the Marathas (1668-1815) हा उत्कृष्ट ग्रंथ तयार केला आहे.

**१.६.४ डच साधने** - हेग, बटाव्हिया, लंडन इत्यादी शहरांच्या पुराभिलेखागारातील डच रेकॉर्डमध्ये मराठयांसंबंधी बरीच महत्वाची माहिती आढळते. या डच रेकॉर्डचा उपयोग डॉ. बाळकृष्ण यांनी आपल्या ``Shivaji the Great" या ग्रंथाच्या ४ खंडात पुरेपुर केलेला आहे. रेव्ह हेरास यांनी त्याचा इंग्लिश अनुवाद केलेला आहे.

**१.६.५. परकीय प्रवाशांनी लिहिलेले वृत्तांत**

१) जॉन फ्रायर :- जॉन फ्रायर हा ईस्ट इंडिया कंपनीचा सर्जन होता. इ.स.१६७२-१६८१ या काळात तो हिंदुस्थानात काम पाहत होता. त्याने महाराष्ट्रातील मुंबई, रायगड, जुन्नर, कारवार, गोवा, वेंगुर्ला इत्यादी ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. त्याने लिहिलेला प्रवास वृत्तांत सन १८७३ साली 'Travels in India in the Seventeenth Century' या पुस्तकात प्रसिध्द करण्यात आला आहे. शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या चरित्रास उपयुक्त संदर्भ या प्रवास-वृत्तांतात आढळतात.

**२) निकोलस् मनुची :-** हा इटालियन प्रवासी होय. आपल्या वयाच्या १७ व्या वर्षी म्हणजे इ.स.१६५६ मध्ये तो हिंदुस्थानात आला. त्याचा मृत्यू १७१७ मध्ये हिंदुस्थानातच झाला. जवळ जवळ सर्व हिंदुस्थानभर हा गृहस्थ फिरला व त्याने दारा शुको, जयसिंग, औरंगजेब, शहा आलम, गोव्याचे पोर्तुगीज, मद्रासचे इंग्रज यांच्या पदरी नोकरी केली. हिंदुस्थानात त्याने जे पाहिले, ऐकले व अनुभवले त्याचा वृत्तांत त्याने 'Storia Do Mogor' (मोगलांचा इतिहास) या नावाने प्रसिध्द केला. हा ग्रंथ मनुचीने फ्रेंच व पोर्तुगीज अशा दोन भाषांतून वेगवेगळा लिहिला होता.

मराठयांच्या इतिहासाच्या संदर्भात मनुचीचा ग्रंथ अनेक संदर्भ पुरवितो. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांच्या संबंधीच्या अनेक हकीगती मनुचीने आपल्या ग्रंथात दिल्या आहेत.

**३) जीन द थेवेनो :-** थेवेनो सन १६६६ मध्ये हिंदुस्थानांत आला. तो आपल्या प्रवास वृत्तांतामध्ये सुरतेची लूट, शिवाजी महाराजांची आग्रा भेट या विषयी माहिती देतो. परंतु त्याने दिलेली माहिती विश्वसनीय नाही.

**४) फ्रॅकॉय बर्नियर :-** बर्नियर हा फ्रेंच प्रवासी व वैद्य हिंदुस्थानात येऊन गेला. त्याने आपल्या प्रवास वर्णनात शिवाजी महाराजांच्या विविध पराक्रमाविषयी माहिती लिहून ठेवली आहे. बर्नियरने आग्रा, दिल्ली, सुरत व काश्मीरला भेट दिली होती.

**५) ॲबे बार्थलेमी कॅरे :-** इ.स.१६८८ च्या सुमारास शिवकालात हिंदुस्थानात येऊन गेलेला फ्रेंच प्रवासी होय. सुरत, दमण, चौल, राजापूर, इत्यादी ठिकाणी तो गेला होता. त्याने आपल्या भेटीचा वृत्तांत इ.स.१६९९ मध्ये प्रसिध्द केला. या व्दिखंडी वृत्तांतामध्ये शिवाजी महाराजांच्या कार्याविषयीचे अनेक उल्लेख आढळतात. महाराजांच्या सुरतेवरील दोन्ही स्वाऱ्या, आग्रा भेट, त्यांची बारदेसवरील मोहिम, युरोपियन व्यापाऱ्यांविषयीचे त्यांचे धोरण याविषयी कॅरेने दिलेली माहिती साधारणपणे विश्वसनीय आहे. कॅरे हा शिवाजीमहाराजांचा एक चाहता होता. त्याच्या लिखाणात महाराजांविषयीचा आदर स्पष्टपणे जाणवतो.

**६) विल्यम नॉरीस :-** सन १७०० च्या सुमारास इंग्लंडच्या राजाने जुनी ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करुन नवी कंपनी निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार इंग्लिश राजाने नव्या कंपनीस हिंदुस्थानात व्यापारी सवलती मिळाव्यात, म्हणून विल्यम नॉरिस यास मोगल बादशाहाकडे पाठवले. जानेवारी १७०१ मध्ये नॉरिस सुरत बंदरात उतरला. तेथून औरंगाबाद, शहागड, ब्रम्हपुरी, मिरज असा प्रवास करीत तो बादशाह पन्हाळगडास वेढा घालून बसला होता, तिथे पोहोचला. तेथे त्याने बादशाहाची भेट घेतली व नंतर तो मायदेशी निघून गेला. त्याने जो आपला प्रवास वृत्तांत लिहिला आहे, त्यामध्ये बादशाहाच्या छावण्या, त्यांची संरक्षण व्यवस्था, सरदारांचे हेवेदावे, भष्टाचार व मराठयांचा पराक्रम याविषयी माहिती मिळते. पन्हाळगडच्या वेढयाची त्याने स्वतः डोळयानं पाहिलेली हकीगत अत्यंत महत्वाची आहे.

**७) हेन्री ऑक्झींडेन :-** सन १६७४ मध्ये राज्याभिषेकाच्या प्रसंगी ईस्ट इंडिया कंपनीचा प्रतिनिधी या नात्याने हेन्री ऑक्झींडेन रायगडावर हजर होता. शिवराज्याभिषेकाचे विश्वसनीय व तपशीलवार वर्णन त्याच्या लिखाणात सापडते.

## १.७ सारांश

अशाप्रकारे मराठयांच्या इतिहासाची साधने विविध भारतीय तसेच परकीय भाषांतून आढळतात. त्यापैकी काही साधने अचूक व पूर्णतः विश्वसनीय नाहीत. परंतु अनेक माहिती आपल्याला नव्याने सापडते. ही माहिती पडताळून पाहावी लागते. अनेक प्रवासी समकालीन असल्याने त्यांनी दिलेली माहिती महत्वाची ठरते.

## १.८ प्रश्न

१) मराठ्यांच्या इतिहासाविषयी मराठी साधनांचा परामर्श द्या.

२) मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून पर्शियन साधनांचे महत्व विशद करा.

३) मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असलेल्या युरोपियन साधनांचे महत्व स्पष्ट करा.

४) बखर म्हणजे काय? मराठयांच्या इतिहासाचे साधन म्हणून त्या कितपत विश्वसनीय आहेत?

## १.९ संदर्भ

१. डॉ. कुलकर्णी, अ.रा.,ग.ह.खरे (संपादक) 'मराठयांचा इतिहास', खंड १, खंड २ व खंड ३ महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०.

२. डॉ. श.गो.कोलारकर, मराठयांचा इतिहास, नागपूर

३. डॉ. देव प्रभाकर, 'मराठयांचा इतिहास', विद्या प्रकाशन.

४. डॉ. पवार जयसिंग व 'मराठा साम्राज्याचा उदय आणि अस्त, कोल्हापूर.

❖❖❖❖

munotes.in

# २

# सतराव्या शतकाच्या सुरुवातीचा दख्खन : भौगोलिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थिती

**घटक रचना :**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ भौगोलिक परिस्थिती

२.३ राजकीय परिस्थिती

२.४ सामाजिक परिस्थिती

२.५. आर्थिक परिस्थिती

२.६ धार्मिक व सांस्कृतिक परिस्थिती

२.७ सारांश

२.८ प्रश्न

२.९ संदर्भ


munotes.in

## २.० उद्दिष्टे

मराठ्यांच्या उदयापूर्वीची म्हणजेच सतराव्या शतकाच्या सुरुवातीची महाराष्ट्रातील परिस्थिती कशी होती ते समजुन घेणे या प्रकरणाचे उद्दिष्ट आहे. या परिस्थितीतूनच आपल्याला मराठेशाहीची निर्मिती कशी झाली असावी याची कारणे दिसतात. तत्कालीन राजकीय प्रशासन, समाज, आर्थिक स्थिती निश्चितच अशा वळणावर येऊन पोहचली होती की जिथे एखादे राजकीय परिवर्तन घडून येणे आवश्यकच होते. म्हणूनच मराठेशाहीच्या निर्मितीला कारणीभूत ठरलेली परिस्थिती ज्ञात करून घेणे आवश्यक आहे.

## २.१ प्रस्तावना

१७व्या शतकात शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि मराठी सत्तेचा उदय झाला. शिवाजी ने स्वराज्याची स्थापना केली आणि संभाजी, राजाराम ताराबाई यांनी मराठी राज्याचे विजापूर व मोगली हल्यापासून संरक्षण केले. त्यानंतरच्या काळात तर मराठी सत्ता अखिल भारतीय स्वरूपाची बनली. इ.स. १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने

महाराष्ट्रातील रामचंद्रदेव यादव याचा पराभव केला आणि महाराष्ट्रात मुस्लीम राजवट सुरू झाली. त्यानंतर बहामनी सुलतान व नंतर आदिलशहा व निजामशहा यांच्या सत्ता निर्माण झाल्या. जवळजवळ ३०० वर्षे महाराष्ट्रावर इस्लामी सत्ता असल्याने हिंदू धर्माची पिछेहाट झाली होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराज सुरूवातीस जहागिरदार असले तरी नंतर स्वतंत्र छत्रपती म्हणून उदयास आले. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मराठ्यांचा इतिहास हे एक गौरवशाली पर्व आहे.

## २.२ भौगोलिक परिस्थिती

महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३,०६,३४५ चौ.कि.मी. आहे. उत्तरेला गुजराथ आणि मध्यप्रदेश, पूर्वेला मध्यप्रदेश आणि दक्षिणेला आंध्र व कर्नाटक ही राज्ये आहेत. महाराष्ट्राचे ठळक भूरचनात्मक वैशिष्ट्य म्हणजे पश्चिमेकडे असणारी उत्तर दक्षिण सह्याद्री पर्वताची रांग जिची एकूण लांबी ६४० कि.मी. असून समुद्रसपाटीपासून साधारण उंची ८०० ते १००० मीटर आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेला कोकण किनारपट्टी तर पूर्वेला विस्तीर्ण पठार पसरलेले आहे. तापी, गोदावरी, भीमा या प्रमुख नद्या आहेत.

### २.२.१ भौगोलिक परिस्थिती व मराठ्यांचा उदय

मराठ्यांच्या उदयाच्या कारणांचा अभ्यास करताना येथील भौगोलिक परिस्थितीचा खूप मोठा वाटा असल्याचे दिसते. सह्याद्रीच्या घाट माथ्यावर व त्याच्या थोडेसे पश्चिमेकडे महाराष्ट्रातील बरेच गिरिदुर्ग आहे. गिरीदुर्गावर जो नियंत्रण ठेऊ शकेल तोच या प्रदेशाचा राज्यकर्ता होऊ शकणार होता. महाराष्ट्राच्या पठारी भागात वारंवार दुष्काळ, सुपीक जमिनीची कमतरता उपयुक्त खनिजांची कमतरता यामुळे येथील लोकही साधे, किरकोळ शरीरयष्टीचे व सावळे होते. तर कोकणच्या प्रदेशातही दुर्गमता, मुसळधार पाऊस, डोंगराळ भूरचना अशा कारणांमुळे सहजपणे कोणालाही राज्य स्थापन करता आले नाही. यामुळे येथील माणूस देशाच्या मूळ प्रवाहापासून वेगळा राहीला. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या लोकांना आपले जीवन चालवण्यासाठी अत्यंत कष्ट करावे लागत. त्यामुळे काटकपणा, कष्टाळू वृत्ती, निसर्गाच्या सान्निध्यातील स्वतंत्र अस्तित्व याचीच सवय त्यांच्यात निर्माण झाली म्हणूनच जेव्हा मुघल किंवा इतर मुसलमान सत्तांनी या भागात राज्य विस्तारण्याचा प्रयत्न केला, तेव्हा येथील लोकांनी त्यांना विरोध केला व शिवाजी राजांच्या प्रयत्नांना साथ दिली. मराठ्यांच्या अस्तासही उत्तरेकडील भौगोलिक परिस्थिती काही प्रमाणात कारणीभूत ठरली म्हणूनच मराठ्यांचा उदय व ऱ्हास या दोन्ही घटनांवर भौगोलिक परिस्थितीचा निश्चितपणे परिणाम झाला असे म्हणता येते.

## २.३. राजकीय परिस्थिती

सतराव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकात मराठ्यांचा उदय होणे ही एक मोठी ऐतिहासिक घटना मानली जाते. कोणत्याही ऐतिहासिक घटनेला तशी अनुरूप पार्श्वभूमी तयार होणे आवश्यक असते. मराठ्यांच्या उदयाला कारणीभूत ठरणाऱ्या राजकीय परिस्थितीचा मागोवा घेताना अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिण दिग्विजयाच्या काळापासून म्हणजेच १२९४ पासूनच घटनांचा आढावा घेता येतो.

### २.३.१ अल्लाउद्दीन खिलजीची देवगिरीवरील स्वारी १२९४ :-

इसवी सनाच्या तेराव्या शतकात दिल्लीवर तूर्कीवंशाच्या सुलतानांचा अंमल प्रस्थापित झाला, उत्तरेकडे साम्राज्याचा विस्तार होऊ लागल्यावर त्यांचे दक्षिणेकडे लक्ष वेधणे स्वाभाविक होते. यादवांची राजधानी देवगिरीवर इ.स.१२९४ मध्ये झालेले आक्रमण हे मुसलमानी सत्ताधिशांचे दक्षिणेवरील पहिले पाऊल होय. अल्लाउद्दीन खिलजी घराण्याच्या कार्यकाळात अल्लाउद्दीनचा सेनापती मलिक काफूर याने दक्षिणेकडे तीनवेळा मोहिमा काढल्या व दक्षिणेकडील मोठ्या प्रदेशावर राज्य प्रस्थापित केले. खिलजी घराण्याचे राज्य पुढे १३२० पर्यंत उत्तरेत सत्तेवर राहिले. इ.स. १३४७ साली दक्षिणेत बहामनी राज्याची स्थापना झाली.

### २.३.२ विजयनगर व बहामनी राज्यांची स्थापना:-

खिलजीनंतर सुलतान मुहम्मद बीन तुघलकाच्या काळात तुंगभद्रेच्या दक्षिणेकडे विजयनगर राज्याची स्थापना झाली. हरीहर व बुक्क यांनी इ.स. १३३६ मध्ये विजयनगरचा हिंदू राज्याची स्थापना केली. अकरा वर्षानंतर १३४७ मध्ये बहामनी राज्याचाही उदय झाला. बहामनी सुलतान व विजयनगरचे राज्यकर्ते यांच्यात सतत संघर्ष सुरू होते. दरम्यान बहामनी सल्तनतीचे ५ तुकडे झाले व त्यातून १४९० मध्ये वऱ्हाडाची इमादशाही, विजापूरची आदिलशाही १४९० मध्ये, अहमदनगरची निजामशाही १४९०, आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही १५१८ तर विदर्भातील बरीदशाही १४९२ मध्ये स्थापन झाली. या पाचपैकी विजापूर, गोवळकोंडा व अहमदनगर या तीनच सुलतानशाह्या मराठ्यांच्या स्वराज्य निर्मितीच्या काळात अस्तित्वात होत्या. याच सुलतानांच्या चाकरीत पुढे अनेक मराठा घराणी निर्माण झाली, यात प्रामुख्याने वेरूळचे भोसले, सिंदखेडचे जाधव, मुधोळचे घोरपडे, जावळीचे मोरे, फलटणचे निंबाळकर अशा अनेक घराण्यांचा समावेश होतो. या व इतर अनेक घराण्यातील पराक्रमी पुरूषांनी सुलतानांच्या दरबारात आपले वजन निर्माण केले. पण त्यांच्यातील वैमनस्य मात्र कायम राहून पुढे मराठेशाहीच्या अस्ताला कारणीभूत ठरले. दक्षिणेतील सल्तनतीने या प्रदेशातील प्रशासनव्यवस्थेत फारसे बदल न करता कुलकर्णी, देशमुख, देशपांडे हीच रचना कायम ठेवली. त्यामुळे मराठ्यांना प्रशासनाचे प्रशिक्षण मिळू लागले. त्याचा उपयोग पुढे शिवाजी महाराजांना करून घेता आला.

### २.३.३ पोर्तुगीज :-

१४९८ मध्ये भारतात येणारे पोर्तुगीज हे पहिले युरोपियन होते. त्यांनी पुढील पन्नास वर्षात आपल्या वसाहतींची निर्मिती केली. बारदेश, साष्ठी, गोवा हे प्रदेश जिंकून खिस्ती धर्माचा प्रसारही सुरू केला. सत्ता विस्ताराचे त्यांचे धोरण स्थानिक लोकांच्या हिताच्या विरोधात होते. त्यामुळे स्थानिक लोकांशी संघर्ष सुरू होऊन त्यांना आदिलशहा, मुघल व पुढे मराठ्यांसोबत सामना करावा लागला. आपल्या प्रदेशातील मंदीरे नाहिशी करून लोकांचे सक्तीने धर्मांतर करून घेतल्यामुळे समाजातून त्यांना विरोध होऊ लागला. पुढे दीव, दमण आणि मुंबई हे प्रदेशही त्यांनी काबीज केले. नौदल उभारण्याचा प्रयत्न मराठ्यांनी सुरू केल्यावर मराठे व पोर्तुगीज संघर्ष येऊ लागला. पोर्तुगीजांच्या काळात लिहिलेले अनेक वृत्तांत या संदर्भात उपयोगी पडतात.

### २.३.४ जंजिऱ्यांचे सिद्दी :-

पश्चिम किनारपट्टीवर नियंत्रण निर्माण करणारी एक सत्ता म्हणजे जंजिऱ्याचे सिद्दी अफ्रिकेतील ॲबिसिनियामधुन आलेले हे दक्षिणी मुसलमान होय. अत्यंत खडतर समुद्रमार्गाने प्रवास करून

munotes.in

आलेले हे लोक पुन्हा परत गेले नाहीत. कोकण किनारपट्टीवर आपले वर्चस्व ठेवून सिद्दीनीही निजामशहा व आदिलशहाकडे चाकरी केली. म्हणूनच जेव्हा शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न सुरू केला. तेव्हा सिद्दीकडून सातत्याने विरोध झाला.

### २.३.५ विजयनगर राज्याचा अस्त :-१५६५

दक्षिणेत स्थापन झालेले विजयनगरच्या हिंदु राज्याने विस्तृत सत्ता निर्माण केली. राजकीय व आर्थिक बाबतीत आपल्याशी स्पर्धा करणाऱ्या विजयनगरला कायमस्वरूपी नष्ट करण्याच्या हेतुने हुसेन निजामशहाच्या पुढाकाराने चारही इतर सुलतानशाह्यांना आपल्या मदतीस घेऊन विजयनगरच्या विरोधात युद्धात उतरला. यातून २२ जानेवारी १५६५ रोजी तालिकोटचे मोठे युद्ध घडले. यात युद्धात विजयनगरचा पराभव झाला. आणि त्या साम्राज्याचा मोठा प्रदेश सुलतानांच्या ताब्यात गेला. या घटनेमुळे दक्षिणेतील प्रशासन व्यवस्था कोलमडली. सुलतानांचे अत्याचार या प्रदेशात सुरू झाले. मोडकळीस आलेल्या विजयनगरने आपला धर्म, संस्कृती व भाषेचे संरक्षण करण्याचा प्रयत्न आपल्या अधिकाऱ्यांच्या मदतीने केला. त्यामुळे पाळेगार व नायक या अधिकाऱ्याचे मार्फत बंगलोर, तंजावर, मदुरा, या ठिकाणी त्यांचे अस्तित्व कायम राहिले. यांच्याशी पुढील काळात संपर्क निर्माण करून शिवाजी महाराजांनी कर्नाटक येथे दुसरे मराठा राज्य निर्माण केले.

### २.३.६ उत्तरेतील मुघल:-

इ.स.१५२६ मध्ये बाबर, या मुघल राज्यकर्त्याने उत्तर भारतात मुघल सत्तेची स्थापना केली. पुढे हुमायुन व अकबर यांनी मुघल राज्याचा उत्तरेत विस्तार केला. अकबराच्या काळात दक्षिण भारतात सत्ता विस्तारासाठी आक्रमक धोरण स्वीकारले गेले. बादशहा जहांगीर व शहाजहान यांच्या काळात मुघलांचे विजापूर व अहमदनगर या दक्षिणी सत्तांशी संघर्ष सुरु झाले. शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर काही वर्षातच निजामशाही संपली. पुढे शहाजहान बादशहा झाल्यावर त्याने आपला मुलगा औरंगजेब यास दक्षिणेची सुभेदारी दिली. शहाजहानने निजामशाही विरुध्द उघडलेल्या मोहिमेच्या काळात मुघल व निजामशहा यांच्यात झालेल्या युध्दात त्याचा लखुजी जाधव, मलिक अंबर व शहाजी भोसले यांच्याशी संपर्क आला. निजामशाही वाचविण्यासाठी शहाजीराजांनी अत्यंत अवघड परिस्थितीत लढा दिला. त्यामुळे शिवाजीराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या काळात मुघल सत्तेच्या क्षमतेची पूर्ण जाणिव मराठ्यांनी होती.

### २.३.७ मलिक अंबरचे योगदान:-

जहांगिर व शहाजहानने निजामशाहीवर केलेल्या आक्रमणाचा चांदबिबी व मलिक अंबरने प्रतिकार केला होता. तरीही पुढे कार्यक्षम राज्यकर्त्यांच्या अभावाने निजामशाही संपली. खानदेश हा प्रदेश ही मुघलांनी आपल्या साम्रज्यात विलीन केला. निजामशाहीचेही विलिनिकरण तात्काळ करता आले असते. परंतु मलिक अंबर या हबशी सरदाराने निजामशाहीच्या बचावासाठी मोठा लढा दिला. मुर्तजा निजामशाह दुसरा (१६०३) याच्याकाळात निजामशहाची राजधानी दौलताबाद येथे हलविण्यात आली. मलिक अंबरने आपले प्रशासकीय कौशल्य पणाला लावून अनेक महसूल विषयक आणि लष्करी सुधारणा घडवून आणल्या. यामुळे निजामशाही बुडविणे मुघलांना कठिण झाले. याच कालखंडात शहाजी भोसले निजामशाहीत होते. मलिक अंबरकडून गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी चांगलेच आत्मसात केले. थोडक्यात लष्करी डावपेच व प्रशासनाचे तंत्र त्यांनी आत्मसात केले. मालिक अंबर यांनी शहानवाज खान या मुघली सुभेदाराला रोशन गावच्या

लढाईत पराभूत करण्याचा अपयशी प्रयत्न केला होता तेव्हा पासूनच लढाईचे व प्रशासनाचे तंत्र मराठेशाहीच्या उदयाला फायदेशीर ठरले.

### २.३.८ भोसल्यांचा उदय :-

दक्षिण भारतात बहामनी सुलतानांच्या काळापासून स्थानिक मराठ्यांना लष्करी सेवेच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यातूनच वेगवेगळ्या घराण्यांचा उदय होत गेला. भोसले हे असेच एक घराणे या घराण्याचा उदयपूरच्या सिसोदे घराण्याशी जवळचा संबंध होता अशी माहिती अनेक बखरीत आली आहे. वेरूळ येथील धृष्णेश्वराच्या मंदिरातील शिलालेख व कागदपत्रावरून बाबाजी भोसले हे भोसले घराण्यातील पहिले नाव सापडते. तर **शीवभारत मालोजींपासून** माहिती देते. वेरूळची अनुवंशिक पाटीलकी त्यांच्याकडे होती. पुणे जिल्ह्यातील हिंगणी बिराडी आणि दिवळगाव या प्रदेशांची पाटीलकी बाबाजींकडे होती. त्यांनी मालोजी व विठोजीस सैन्यात भरती केले. कालांतराने या दोघांचाही प्रभाव निर्माण झाला.

मालोजींना झालेला ज्येष्ठ पूत्र म्हणजे शहाजी, बिकानेर येथील ग्रंथालयात सापडणाऱ्या जन्मतिथीप्रमाणे शहाजी राजांचा जन्म १८ मार्च १५९४ मध्ये झालेला दिसतो. शहाजीराजे ५ वर्षांचे असताना मालोजीरावांचा मृत्यु झाला. त्यामुळे त्यांचे पालनपोषण आई उमाबाई आणि चुलते विठोजी यांनीच केले. वयाच्या १०व्या वर्षी लखुजी जाधवांची मुलगी जिजाबाई हिच्याशी शहाजींचा विवाह झाला.

### २.३.९ शहाजी भोसल्यांचा उदय :-

१७व्या शतकाच्या सुरूवातीला दक्षिण भारतात निजामशाही व आदिलशाही यांच्यात सतत संघर्ष सुरू होते. त्यातच मुघल बादशहा शहाजहान दक्षिणेत राज्य विस्तार करण्याचा प्रयत्नात होता. अहमदनगरचा वजीर मलिक अंबर याने बराचकाळ मुघलांना प्रतिकार केला. तरीही मुघल बादशहाने आपला निर्धार सोडला नाही. त्यातूनच दि.३१ ऑक्टोबर १६२४ या दिवशी अहमदनगर जवळच्या भातवडी याठिकाणी निजामशाही व मुघल यांच्यात मोठी लढाई झाली. या लढाईत मोगलांचा पराभव झाला या विजयाचे बरेचसे श्रेय शहाजी भोसले यांस मिळाले.

भातवडीच्या युद्धानंतर शहाजीचे निजामशाहीतील वजन वाढू लागले. ही गोष्ट दरबारातील अनेकांना खटकू लागली. प्रत्यक्ष मलिक अंबरलाही शहाजीचा वाढता प्रभाव सहन झाला नाही. त्यामुळे निजामशाही सोडून शहाजी आदिलशाहीत सामील झाला. त्यांस सर लष्कर हा किताब देऊन जहांगिरी ही देण्यात आली. इ.स. १६२६ मध्ये मलिक अंबरचा मृत्यु झाल्याने त्याचा मुलगा फतेहखान निजामशाहीतील वजीर बनला. परंतु फतेहखान वडिलांप्रमाणे कर्तबगार नव्हता. आदिलशहीत १६२७ मध्ये इब्राहीम आदिलशहाचा मृत्यू झाला. त्यानंतर महम्मद आदिलशहा सत्तेवर आला. परंतु शहाजीला योग्य वागणूक मिळणार नाही असे वाटल्याने आदिलशाही सोडून १६२८ मध्ये शहाजी निजामशाहीत परत आले. यास सुमारास लखुजी जाधव मुगलांचा पक्ष सोडून पुन्हा निजामशाहीत दाखल झाले. परंतु परत आल्यावर त्यांच्या निष्ठेवर शंका घेऊन त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेमुळे शहाजी राजे निजामशाही सोडून मुघलांच्या सेवेत रूजू झाले. तेथे त्यांना फक्त पंचहजारी मनसब मिळाली. शहाजी सारख्या महत्त्कांक्षी व्यक्तीला त्यातून समाधान मिळाले नाही. म्हणून ती मनसबदारी सोडून ते पुन्हा एकदा निजामशाहीत परतले. तेव्हापासून पुढे निजामशाहीच्या अस्तापर्यंत त्यांनी मुघलांना लढा दिला. या काळात मुर्तजा निजामशहा या छोट्या सुलतानला बरोबर घेऊन माहूलीच्या किल्ल्यात त्यांनी आश्रय घेतला. परंतु मुघलांनी वेढा देऊन १६३६ मध्ये निजामशाही संपवली. निजामशाहीच्या

अस्तानंतर शहाजी राजे पुन्हा एकदा अदिलशहाकडे चाकरी करू लागले. ते शेवटी १६६४ पर्यंत आदिलशहीतच राहिले. १६३७ पासूनच रणदूल्ला खान आणि अफजलखान यांच्याशी शहाजींचे शत्रूत्व कर्नाटकात हळूहळू वाढू लागले. त्यांच्या कर्तृत्वाने बंगळूर, मदुराई, कावेरी पट्टम, वेल्लारी, श्रीरंगपट्टणम् इ. आदिलशहाच्या अधिपत्याखाली आले. या विजयामुळे शहाजींना नावलौकीकाबरोबर बंगळुरची जहागीरी मिळाली.

## २.४ सामाजिक परिस्थिती

इतिहासकार न्या. महादेव रानडे यांच्यामते १७व्या शतकातील ''मराठ्यांचा इतिहास हा उत्तर भारतातील आर्यवंशीय आणि दक्षिण भारतातील द्रविड लोकांच्या मिश्रणातून तयार झालेल्या दोन्ही वंशीयांचे गुणधर्म असलेल्या लोकांनी घडविलेल्या घटनांचा इतिहास आहे.'' मराठी सत्तेचा उदय या आपल्या ग्रंथात त्यांनी हे मत मांडले आहे. १७व्या शतकातील महाराष्ट्रातील समाज जाती व्यवस्थेचा प्रभाव असणारा होता. ब्राह्मण हे समाजात सर्वोच्च स्तरावर मानले जात असत त्यानंतर क्षत्रिय तर पुढे शेती करणाऱ्या कुणबी लोकांचा समावेश होता. बलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. मुसलमानी आक्रमणानंतर मात्र जाती भेदाची तीव्रता कमी होऊ लागली. ब्राह्मण व क्षत्रिय यांचे समाजातील प्रस्थ कमी झाले. परकीय आक्रमणाचा रेटा त्यांना थांबवता आला नाही. यामुळे क्षत्रिय समाजावरील विश्वास कमी होऊ लागला. व्यापारावरही परिणाम होऊन शेती हाच मुख्य व्यवसाय बनला एकूणच महाराष्ट्रातील सुलतानी राजवटींकडे चाकरी पत्करून अनेक कुटुंबांनी उत्पन्नाचे नविन साधन शोधले.

### २.४.१ सर यदुनाथ सरकार यांचे महाराष्ट्रातील समाजिक समानतेच्या संदर्भातील मत

मराठ्यांच्या इतिहासाचे प्रसिद्ध अभ्यासक सर जदुनाथ सरकार यांनी "Shivaji and his times" या ग्रंथात मराठ्यांच्या सामाजिक स्थितीचे संदर्भ दिले आहेत. त्यांच्या मते, ''१७व्या शतकातील महाराष्ट्रात सामाजिक भेदांची तीव्रता कमी होती. कोणतीही श्रीमंत व्यक्ती अत्यंत श्रीमंत होऊ शकली नाही. तसेच प्रत्येक गरीब माणूस कष्ट करणारा, नितीमत्ता जपणारा, आणि स्वाभिमानी होता. गरीबी हा एक सार्वत्रिक घटक असून त्यामुळे समाजात संघटितपणा निर्माण झालेला दिसतो. महाराष्ट्रातील स्त्रिया कधीच पडद्यामागे राहिल्या नाहीत. कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी महाराष्ट्रीयन स्त्री पुरूषांच्या बरोबरीने शेतीवरील कामात सहभागी होत होती. त्यामुळे समाजात एक मोकळेपणा आलेला दिसतो. भारतातील इतर ठिकाणांच्या तुलनेत महाराष्ट्रातील ही स्थिती निश्चितच वेगळी होती.''

समाजात समानता धार्मिक परिवर्तनामुळे निर्माण झालेली दिसते. याकाळात महाराष्ट्रात भक्ती चळवळीचा प्रसार झाल्यामुळे जातीभेदातील तीव्रता कमी होऊन समाजातील विविध स्तरांमध्ये संघटितपणा येऊ लागला होता. या संदर्भात महाराष्ट्रातील संतांचे योगदान निश्चितच मोठे होते. निरनिराळ्या जमातींमधून आणि व्यवसायातून पुढे झालेले ज्ञानेश्वर व एकनाथ ब्राह्मण, नामदेव शिंपी, तुकाराम कुणबी, नरहरी सोनार, नामदेव शिंपी, गोरोबा, कुंभार, तर रोहिदास चांभार अशा विविध स्तरांतून आलेल्या संतांनी 'देशातील परिस्थितीनुसार आचारधर्म असला पाहिजे' असे विचार मांडुन लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. यवनी राज्यापासून आपल्या धर्माचे रक्षण केले पाहिजे, याची जाणीव त्यांनी करून दिली. स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृती विषयी समाजातील स्वाभिमान त्यांनी पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

भागवतधर्माचा उदय झाल्यामुळे एकेश्वरवाद, बंधुभाव व परमेश्वराची भक्ती यातून 'पंढरपुर' हे क्षेत्र भक्ती चळवळीचे केंद्र बनले. त्यातून निर्माण झालेल्या वारकरी संप्रदायामुळे महाराष्ट्रातील

धार्मिक प्रबोधनाला सार्वत्रिक स्वरूप प्राप्त झाले. यामुळे सहाजिकच सर्वसामान्य लोक हिंदु धर्माचे रक्षण करून संघटित होण्याकडे वळले. अशा समाजाच्या मानसिकतेचा उपयोग शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी निश्चितच खूप मोठा झाला.

### २.४.२ महाराष्ट्रातील ग्रामीण जीवन :-

महाराष्ट्रातील समाज मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातच राहणारा होता. प्रत्येक खेडे हा स्वयंपूर्ण घटक होता. बलुतेदारी पद्धत असल्याने बहुतेकदा कुंभार, सुतार, सोनार असे १२ बलुतेदार असत. वस्तुविनियम पद्धती असल्यामुळे अन्नधान्य व वस्तु यांची देवाण घेवाण करून गरजा भागवल्या जात. गावातील दिवाणी व फौजदारी तंटे, 'गोतसभा' या गावातील ज्येष्ठ व्यक्तींकडून सोडवले जात. याशिवाय महसुल वसुली आणि प्रशासनाचे काम पाटील, कुलकर्णी तसेच देशमुख व देशपांडे यांच्या मार्फत केले जात असे. त्यामुळे सुलतानांच्या दरबारातील सत्ताबदलांचा फारसा प्रभाव ग्रामीण जीवनावर होत नसे. मुसलमानी सत्तेचा प्रभाव बहुतेकदा राजधानीची ठिकाणे, शासकीय कचेऱ्या आणि लष्करी तळांवरच होत असे. तुर्की, हबशी, पठाण इराणी तसेच धर्मांतरीत मुसलमान येथील समाजात सहभागी होण्याचा प्रयत्न करत असत. त्यांच्या हाती सत्ता एकवटलेली असे.

### २.४.३ स्त्रियांची परिस्थिती :-

महाराष्ट्रातील स्त्रियांची परिस्थिती देशातील इतर ठिकाणापेक्षा फारशी वेगळी नव्हती. आपल्या अधिकारांची जाणीव त्यांना कधीच नव्हती. परकीय आक्रमणांमुळे समाजात वावरण्याचे त्यांचे स्वातंत्र्यही कमी होत गेलेले दिसते. सरदारांच्या तसेच उच्च कुलातील स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अधिक निर्बंध होते. त्यामुळे समाजाचा मुख्य प्रवाहापासून त्यांना नेहमीच अलिप्त ठेवले जात असे. तरीही मराठा सरदारांच्या घरातील काही स्त्रियांनी महत्वाच्या भूमिका पार पाडलेल्या दिसतात. जसे की, जिजाबाईंनी शिवाजीराजांच्या मनात राष्ट्राभिमान व धर्मरक्षणाचे बीज पेरले. पुढे येसुबाई व ताराबाई यांनीही कठीण प्रसंगातून मराठ्यांच्या राज्याचे रक्षण केले.

## २.५ आर्थिक परिस्थिती

विजयनगर व बहामनी साम्राज्याच्या काळात दक्षिणेतील आर्थिक स्थिती समृद्ध होती. अनेक परकीय प्रवाशांच्या लेखनातून विजयनगर व बहामनी यांच्या दरबारातील संपन्नतेचे वर्णन आढळते. अब्दुल रजाक याने विजयनगरचे साम्राज्य प्रचंड मोठे आणि समृद्ध असल्याचे नोंदवले आहे. बारबोझा या पोर्तुगीज प्रवाश्याने बहामनी राज्यात गहु, तांदुळ, बाजरी यांचे उत्पादन मुबलक असल्याचे वर्णन करून चौल मार्गे, परदेशातही निर्यात केल्याची नोंद केली आहे. पण नंतर मात्र सुलतानशाह्यांच्या काळात महाराष्ट्रात आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याचे दिसते. महाराष्ट्राचा प्रदेश एकूणच नापीक व डोंगराळ असल्याने येथील शेतकऱ्यांना अपार कष्ट करून जेमतेम कुटुंबाची गुजराण करण्याइतके धान्य प्राप्त होत होते. उदयोग धंद्याच्या संदर्भात शेतीला पूरक तेवढेच उद्योगधंदे वाढले. अशा परिस्थितीत आपली उपजिविका चालवण्यासाठी मुलुखगिरी शिवाय पर्याय नव्हता. महाराष्ट्रातील समाजात जमीनीच्या मालकीला विशेष महत्त्व दिले जात असे. प्रत्येक मराठा सरदाराला स्वत:ची जहागीर देसाई/देशपांडे/पाटील असे पद मिळवण्याचा नेहमीच अभिमान असे. सुलतानांच्या लष्करात मोठ्या पदावर काम करणे सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने मोठी गोष्ट असे, तर त्याहीपेक्षा वतन श्रेष्ठ मानले जाऊन आपल्या वतनासाठी कोणताही त्याग करण्यास मराठे तयार असत. यासंदर्भात जदुनाथ सरकार म्हणतात. ''शिवाजीच्या

munotes.in

उदयापूर्वी महाराष्ट्रातील वतनदारांमध्ये संतत संघर्ष असून शेतकरी मात्र त्यांच्या पिळवणुकीला बळी पडले. नागरी व न्याय प्रशासन खालावले. पुणे जिल्ह्यातील या स्थितीप्रमाणे महाराष्ट्रातील अन्य ठिकाणीही अशीच परिस्थिती होती.''

१६व्या शतकातील महाराष्ट्रात रयतवारी पद्धती अस्तित्वात होती. अशा पद्धतीत जमिनीची मालकी लहान शेतकऱ्यांकडेच रहात असे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये कष्टाळूपणा बरोबरच स्वातंत्र्याची भावना वाढीस लागली.

### २.५.१ दुष्काळ (१६३०-३२) :-

१७व्या शतकाच्या सुरूवातीला दक्षिण भारतातील आर्थिक जिवनावर नैसर्गिक आपत्तींचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. १६३० मध्ये महाराष्ट्र व गुजरात या प्रदेशात सतत २ वर्षे पावसाच्या अभावाने दुष्काळ पडला. अन्न धान्याचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला. त्यातच मोगली आक्रमणे सुरू राहिली. दक्षिणेचा सुभेदार म्हणून राजपुत्र औरंगजेब सुमारे ८ वर्षे दक्षिणेत राहिला. आपला महसुल अधिकारी मुर्शिद कुली खान याच्या मदतीने काही सुधारणा करण्याचा प्रयत्न औरंगजेबाने केला. लोकांना कर्जे देऊन शेतीसाठी प्रोत्साहन दिले होते. पण तरीही सर्व सामान्य शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय होती. संत रामदासांनाही त्या काळातील दुष्काळाचे वर्णन केलेले दिसते. एकूणच महाराष्ट्रातील शेती, उदयोगधंदे आणि व्यापार शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वी अत्यंत खडतर प्रकारचेच होते.

## २.६ धार्मिक स्थिती आणि सांस्कृतिक स्थिती

अल्लाउद्दीन खिलजीच्या कारकिर्दीपासून म्हणजे इ.स. १२९४ पासून दक्षिणेत मुसलमानांचा प्रवेश झाला. तोपर्यंत हिंदूच्या संस्कृतीला आणि हिंदूच्या आत्मसन्मानाला कोणताही धक्का लागला नव्हता. परंतु अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणापासून सर्व परिस्थिती बदलली. अल्लाउद्दीनचा प्रमुख सरदार मलिक कफूर याने ठिकठिकाणी मंदिरे पाडण्याला आणि हिंदूना जबरदस्तीने धर्मांतर करण्यास प्रारंभ केला. दक्षिणेतील हिंदू राज्यांनी या मुसलमानी आक्रमणाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण या प्रयत्नात त्यांना यश लाभले नाही. विजयनगर सारखे महाबलाढ्य साम्राज्यसुद्धा या मुसलमानी आक्रमणा समोर टिकू शकले नाही. मुसलमानी आक्रमक धोरणांचा परिणाम म्हणून दक्षिणेतील भव्य मंदिरे, सुंदर नगरे आणि उत्कृष्ट कलाकृती याचा विध्वंस झाला. जशी दक्षिणेची तशीच महाराष्ट्राची सुद्धा अवस्था झाली. शिवाजी महाराजांचा उदय होण्यापूर्वी धार्मिक अत्याचारांनी परिसीमा गाठली होती. मुस्लिम अत्याचारांपासून या समाजाची सुटका व्हावी. याकरिता प्रयत्न करीत असलेल्या शिवाजी महाराजांनी या परिस्थितीचा पूर्ण अभ्यास केला, मगच त्यांनी आपले पुढील पाऊल पुढे उचलले.

### २.६.१ संतांची कामगिरी :-

मुसलमानी अत्याचारांनी पिडित झालेल्या समाजाला जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य महाराष्ट्रातील संतांनी केले. संतांची कामगिरी पाहत असताना आपल्याला ३ कालखंड दिसून येतात.

१. ज्ञानेश्वर आणि नामदेवाचा कालखंड (१३ ते १४ वे शतक)

२. एकनाथ आणि तुकाराम यांचा कालखंड (१६ ते १७ वे शतक)

३. रामदासांचा कालखंड (१६०८ ते १६८१)

या ३ कालखंडातील संत हे अंधश्रद्धे विरूद्ध लढणारे होते. या संतांनी भक्ती पंथाचा पुरस्कार केला. महाराष्ट्रात त्यांनी सांस्कृतिक जागृती घडवून आणली. १७व्या शतकातील राजकीय जागृती घडवून हिंदू धर्माच्या तत्वज्ञानाला पुन:रूज्जीवन देण्याचे कार्य या काळात निर्माण झालेल्या महानुभाव, वारकरी आणि नाथसंप्रदायाने केले. १५व्या शतकाच्या शेवटी बहामनी साम्राज्याची शकले झाली व ५ मुस्लीम सत्ता निर्माण झाल्या. या काळात महाराष्ट्रातील धर्म, भाषा, कला आणि साहित्य या सर्वच क्षेत्रात मुसलमानी विचारांचा प्रभाव निर्माण झाला. १६व्या शतकाच्या उत्तरार्धात या संबंधात लोकजागृती होऊ लागली आणि तत्कालीन संतांनी सामान्य लोकांना समजतील अशा शब्दांत हिंदू धर्मातील तत्वज्ञानाचा प्रसार सुरू केला. यातूनच भागवत धर्माचा उदय झाला. सामान्य माणसांमध्ये झालेल्या या सांस्कृतिक जागृरूकतेमुळे लोकांमध्ये स्वाभिमान निर्माण झाला. जातीव्यवस्था, अंधश्रद्धा आणि वर्ण व्यवस्थेला दिल्या जाणाऱ्या अवाजवी महत्त्वाविरूद्ध वैचारिक जागृती घडवून ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, सावतामाळी, नरहरी सोनार अशा समाजाच्या विविध स्तरांमधून आलेल्या संतांनी वैचारिक व सांस्कृतिक जागरूकता निर्माण केली. भक्ती मार्ग हा सर्वश्रेष्ठ असल्याचे मत तुकाराम व रामदास अशा संतांनी व्यक्त करून समाजाला नवी दिशा दिली. संत रामदासांनी अध्यात्मापेक्षा सामाजिक आणि राजकीय अन्यायाकडे लक्ष पुरवून अशा अन्यायाविरूद्ध बहुसंख्य हिंदु समाजाने ठामपणे उभे राहिले पाहिजे अशी शिकवण दिली. शिवाजी महाराजांनी आपल्या कार्याची स्फूर्ती रामदासांपासूनच घेतली व स्वराज्यनिर्मितीचा आग्रह धरला.

१६व्या शतकातील संतांनी हे जे मोठे कार्य करून दाखवले त्यास अन्यनसाधारण महत्त्व आहे. अनेक विचारवंतांनी आणि इतिहासकारांनी या चळवळीचे मुल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आपल्याला आढळून येतो. त्यात न्या. रानडे, आणि दांडेकर यांची मते महत्वाची वाटतात. न्यायमूर्ती रानड्यांनी या चळवळीची तुलना युरोपातील प्रोटेस्टंट धर्मसुधारणा चळवळींशी केलेली आपल्याला आढळते. त्यांच्या मते, दक्षिण हिंदुस्थानात ही जी पुनरूज्जीवनाची चळवळ निर्माण झाली ती केवळ वरिष्ठ वर्गापुरतीच मर्यादित नव्हती. या चळवळीचे नेतृत्व संतांनी केले, आणि हे संत न्हावी, सुतार, महार यासारख्या तळाशी असलेल्या जातीतून आणि व्यवसायातून आलेले होते ही विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. प्रा. दांडेकरांनी या संतांच्या कामगिरीची तुलना १७८९ मध्ये फ्रान्स मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. त्यावेळी रूसो, डिडरो यासारख्या विचारवंतांनी जी वैचारिक जागृती घडवून आणली त्यांच्याशी केलेली आढळते. फ्रेंच विचारवंतांनी क्रांतीकरिता जशी अनुकूल भूमिका तयार केली. तशीच अनुकूल भूमिका या महाराष्ट्रातील संतांनी केली. महाराष्ट्रात नवीन विचारांचे बीज त्यांनी पेरले आणि पलिकडे त्याला अमाप पीक आले. संतांनी ही जी अनुकूल भूमिका तयार केली. त्यामुळेच छ.शिवाजी महाराजांना आपले स्वराज्य स्थापन करता आले एकूणच महाराष्ट्राच्या इतिहासात संतांची कामगिरी अजोड अशीच समजली पाहिजे.

## २.७ सारांश

महाराष्ट्रातील राजकीय आर्थिक, सामाजिक परिस्थिती गोंधळाची व अन्यायाची होती अशा पार्श्वभूमिवर समाजाची मानसिकता स्वातंत्र्याकडे वळविण्याची सुरुवात संत मंडळींनी केली व त्या बदलत्या मानसिकतेचा उपयोग स्वराज्य स्थापनेसाठी करण्याचा बाणेदार व यशस्वी प्रयोग शिवाजी महाराजांनी केला व महाराष्ट्रात स्वराज्य निर्मिती शक्य झाली.

## २.८ प्रश्न

१. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातील दख्खनच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाचे वर्णन करा.

२. १७व्या शतकातील दख्खनच्या भौगोलिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीचा आढावा घ्या.

३. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातील दख्खनच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीची चर्चा करा.

४. महाराष्ट्रात १७व्या शतकाच्या सुरूवातीस संतांची कामगिरी आणि राजकीय अव्यवस्था मराठ्यांच्या उदयास कशी कारणीभूत ठरली ते सांगा.

## २.९ संदर्भ

१. कुलकर्णी अ.रा., ग.ह.खरे (संपादक), 'मराठ्यांचा इतिहास', खंड१, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०.

२. कोलारकर, शं.गो., 'मराठ्यांचा इतिहास' (शिवकाळापासून मराठ्यांच्या पाडावापर्यंत) (इ.स. १६०० ते १८१८), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर १०.

३. देशपांडे, प्र. नं. 'मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# ३

# महाराष्ट्र धर्म

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ महाराष्ट्र धर्म संकल्पना आणि अर्थ

३.३ महाराष्ट्र धर्म आणि त्याची ऐतिहासिकता

३.४ महाराष्ट्र धर्म आणि भक्ती विषयी संतांची भूमिका

३.५ स्वराज्याची उभारणी आणि महाराष्ट्र धर्म

३.६ महाराष्ट्र धर्माची तत्वे

३.७ महाराष्ट्र धर्माविषयी विविध मतप्रवाह

३.८ महाराष्ट्र धर्माचा महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीवर झालेला परिणाम

३.९ सारांश

३.१० प्रश्न

३.११ संदर्भ

## ३.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. महाराष्ट्र धर्म ही संकल्पना समजून घेणे.
२. महाराष्ट्र धर्माची ऐतिहासिकता अभ्यासणे.
३. महाराष्ट्र धर्माचा विकास आणि त्याचे महाराष्ट्राच्या जडणघडणीवर झालेले परिणाम अभ्यासणे.

## ३.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून महाराष्ट्र धर्म ही संकल्पना समजून घेताना या संकल्पनेचा उदय आणि विकास कसा होत गेला, याविषयी असलेले वेगवेगळे मतप्रवाह यांचा सखोल मागोवा या प्रकरणाच्या माध्यमातून घेतला आहे. या संकल्पनेचा मुळापर्यंत मागोवा घेतांना त्याची मूळ कल्पना आणि काळाच्या ओघात त्या संदर्भात उदयास आलेले वेगवेगळे

munotes.in

मतप्रवाह आणि त्यांनी केलेले विश्लेषण महत्त्वाचे असून स्वराज्याची उभारणी करण्यासाठी छ. शिवाजी महाराजांना महाराष्ट्र धर्म ही संकल्पना कशी महत्त्वाची ठरली आणि काळाच्या ओघात या विषयी वेगवेगळ्या विचारवंतांनी त्यांच्या आकलनानुसार व संशोधनानुसार त्यांचे विश्लेषण मांडून त्याचा अर्थ बदलून ही संकल्पना कशी विकसित केली याचा आढावा या प्रकरणाच्या माध्यमातून घेतलेला आहे.

## ३.२ महाराष्ट्र धर्म संकल्पना आणि अर्थ

महाराष्ट्र धर्म ही संकल्पना अनेकांनी त्यांच्या पद्धतीने मांडली आहे. त्यामध्ये धर्म आणि प्रांत यांना महत्त्व दिले आहे. परंतु महाराष्ट्र धर्म म्हणजे विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या धर्माविषयीचे विश्लेषण व अर्थ या संकल्पनेत अपेक्षित नाही, तर एकाच भागात राहणाऱ्या विविध जाती, धर्माच्या, पंथाच्या विचारांच्या लोकांनी त्यांच्यावर होणारा अन्याय-अत्याचारा विरुद्ध आवाज उठवून तेथील लोकांचे रक्षण करणे. त्यांना संघटित करून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी कर्तबगार व शूर वीरांनी एकत्रित येऊन कार्य करावे याची पायाभरणी महाराष्ट्रातील संत-महात्म्यांनी केली होती. त्याचे प्रतिक म्हणजे महाराष्ट्र धर्म असा एक बुद्धिवादी अर्थ या संकल्पनेचा लावला गेला आहे. न्या. रानडे, वि. का. राजवाडे, जी. एस. सरदेसाई, सेतुमाधवराव पगडी, सर जदुनाथ सरकार यांनी आपल्या लेखनातून महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा अर्थ मांडताना स्वकर्तुत्वाची जाण व देशभक्ती याची प्रखर भावना म्हणजेच महाराष्ट्र धर्म असे मत व्यक्त केले आहे. या मताला दुजोरा देण्यासाठी त्यांनी चिटणीसांच्या बखरीचा आधार घेतलेला दिसून येतो. मल्हारराव रामराव चिटणीस कृत शिवचरित्र मधील खालील विधानाचा त्यांनी आधार घेतलेला आहे.

“हे राज्य साधून म्लेच्छांचे पारिपत्य करून, महाराष्ट्र रक्षणे, तेव्हा ज्यास जसे आपले होतील तसे करावे. विपरीत दिसल्यास पारीपत्त्य करणे हे”.

वरील विधानाचा अर्थ लावताना महाराष्ट्र धर्माचा मतितार्थ खालील मुद्यातून प्रखरपणे लावता येतो.

१) स्वराज्याची स्थापना करणे

२) मुस्लिम राज्यकर्त्यांचे (जुलमी) पारिपत्य करणे.

३) सर्व मराठ्यांची (महाराष्ट्रात राहणारे लोक) यांची एकी करणे.

४) आपल्या विरोधकांचा समाचार घेणे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी या विधानाचा व्यापक अर्थ लावताना असे म्हटले होते की, ‘शत्रू हतबल किंवा नष्ट न झाला तरी चित्त्याचे युद्ध करावे,’ हा प्रकारही महाराष्ट्र धर्माच्या पालनात अभिप्रेत आहे. ‘चित्याचे युद्ध’ यातून त्याचे गुण-वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसतात. अखंड सावधानता, चपळाई व झडप घालणे म्हणजे महाराष्ट्रधर्म असे विवेचन केलेले आहे. याची प्रचीती छ. शिवाजी महाराजांच्या युद्धानितीमध्ये दिसून येते.

या व्यतिरिक्त महाराष्ट्र धर्म या संकल्पने स्वराज्याची पूर्ण निष्ठा, स्त्रियांचा सन्मान, सर्वांना समान वागणूक आणि जमीनदार व त्यांची खंडकरी कुळे यांच्यातील सलोख्याचे संबंध यांचाही समावेश होतो. डॉ. वि. का. राजवाडे यांनी महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचे विश्लेषण

करताना रामदास स्वामी यांच्या पुढील काव्यपंक्तीचा आधार घेतलेला आहे आणि त्याप्रमाणे वर्तन करणे म्हणजे महाराष्ट्र धर्माचे पालन करणे असे मत व्यक्त केले आहे.

"मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।

ये विषयी न करता तकवा । पूर्वज हसती ।।

आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मेळवावे ।।

महाराष्ट्र धर्म वाढवावे । जिकडे तिकडे" ।।

वरील काव्यपंक्ती वरून महाराष्ट्र धर्माचा अर्थ समर्थ रामदास स्वामी यांनी सांगितलेला आहे आणि तो वि. का. राजवाडे यांनी सुद्धा आपल्या लिखाणाद्वारे मान्य केलेला दिसून येतो. तथापि न्या. रानडे यांनी महाराष्ट्र धर्माचा लावलेला अर्थ वि. का. राजवाडे मान्य करीत नाहीत.

न्या.रानडे यांनी, "भक्तिमार्ग व धर्मसुधारणेची चळवळ म्हणजे महाराष्ट्र धर्म" असे महाराष्ट्र धर्माविषयी आपले विश्लेषण मांडलेले आहे. पुढे महात्मा फुले यांनी याविषयी आपली विद्रोही कल्पना मांडली होती. १८६९ मध्ये महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी पहिला पोवाडा लिहिला होता. त्यातून त्यांनी छ.शिवाजी महाराजांचा स्वराज्य स्थापनेमागचा विचार सांगितलेला होता.

महाराष्ट्र धर्म या संकल्पनेच्या संदर्भात सचिन केतकर यांनी असे म्हटले आहे की, ही संकल्पना रामदास स्वामी यांनी लोकप्रिय केली होती. परंतु ही मूळ संकल्पना 'महिकावतीची बखर' या ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये सापडते त्याची रचना पंधराव्या शतकामध्ये करण्यात आली होती. ही बखर आतापर्यंत सापडलेल्या सर्व बखरींमध्ये अत्यंत जुनाट अशी बखर समजली जाते ही बखर सहा प्रकरणांमध्ये विभाजित असून त्याचे लेखन पुढील प्रमाणे केल्याचे वि. का. राजवाडे यांनी सांगितले आहे. त्यापैकी बखरीची वर्ण उत्पत्ती, पूर्वपरंपरा ही प्रकरण शके १५०० (इ.स. १५७८) च्या आसपास भगवान दत्त नामक व्यक्तीने लिहिले होते, तर राज वंशावळी, निवाडे व हकीकती ही प्रकरणे शके १३७० (इ.स. १४४८) मध्ये केशवाचार्य यांनी लिहिले आहे. या बखरीतील पृष्ठ क्रमांक ५३ वर केशवचार्य यांनी महाराष्ट्र धर्माच्या संदर्भात पुढील वर्णन केलेले आहे.

"सर्व कोकण प्रांतात म्लेछानी आक्रमण करून, येथून चोहीकडे सर्वत्र म्लेछावर्णाखाली पृथ्वी बुडून गेली. वर्णावर्ण ओळख नाहीशी झाली स्वकुळाची वास्तपुस्त कोणाच्या गावी ही राहिली नाही. क्षत्रियांनी राज्याभिमान सांडिला, शस्त्रे सोडिली व केवळ कृषीधर्म स्वीकारून कित्येक निव्वळ कुणबी बनले, कित्येकांनी कारकूनवृत्ती आदरिली, काहीक सेवावृत्ती अंगीकारून निभ्रांत शुद्र ठरले, शाणी कित्येक नष्ट होऊन नामशेष हि राहिले नाहीत. बहुत आचारहीन झाले. गोत्र, प्रवर, कुळस्वामी, कुळगुरू ह्यांची बहुतेकास आठवण हि राहिली नाही. अशी ह्या ३०० वर्षात भ्रष्टता माजली व महाराष्ट्रधर्म अज्जी बुडाला. अश्या संकटसमयी श्रीदेवी कुळस्वामिणी, मालाडचा देसला जो नायकोराव त्याच्या स्वप्नात येऊन, सांगती झाली की, नायकोरावा, उठ, महाराष्ट्रधर्म रक्षिन्याकरिता अठरा पगड जातीचा मेळावा कर, आणि केळव्या पासून मुंबई पर्यंत सर्व गावचे, सर्व जातींचे व सर्व गोत्रांचे खलक जमवून, त्यास केशवाचार्याच्या मुखे महाराष्ट्रधर्म सांगीव."

अशा प्रकारे महाराष्ट्र धर्माच्या संदर्भात केशवाचार्यांनी निरूपण केल्याचा उल्लेख राजवाडे लिखित 'महिकावतीची बखर' भाग-१ प्रस्तावना यामध्ये आहे. थोडक्यात १७ व्या शतकात समर्थ रामदास स्वामी आणि १९ व्या शतकात न्या. रानडे यांनी महाराष्ट्र धर्माचा उच्चार केला तो १५ व्या शतकात केशवाचार्यांनी केल्याचे महिकावतीच्या बखरीवरून दिसून येते.

सचिन केतकर यांच्या महाराष्ट्र धर्मावरील लेखांमधील तरतुदीनुसार अनेक विद्वानांच्यामते महाराष्ट्र धर्माचा वापर आरंभी काळात महाराष्ट्र नावाच्या प्रदेशात अनुसरल्या गेलेल्या वर्णाश्रम धर्माचे केवळ सूचक आहे. तसेच अलीकडील संशोधकांच्या मते विशेषत: प्राची देशपांडे आणि स्टीवर्ट गोर्डन यांनी केलेल्या निरीक्षणावरून महाराष्ट्र धर्म ही संकल्पना नंतरच्या काळातील रचना असल्याचे नमूद केले आहे.

महाराष्ट्र धर्माची व्याख्या करताना ज्येष्ठ विचारवंत सदानंद मोरे म्हणतात, "महाराष्ट्रधर्म या शब्दावर महाराष्ट्रात जितकी चर्चा झाली, तितकी आणखी कोणत्याही शब्दावर झालेली नाही. महाराष्ट्रात राजारामशास्त्री भागवत आणि न्या. रानडे यांनी ही संकल्पना आणली. मग वि. का. राजवाडे यांनी तो शब्द सुधारला. महाराष्ट्राचा राष्ट्रीयधर्म म्हणजे महाराष्ट्र धर्म. महाराष्ट्रातील लोकांचा हा धर्म, तो नुसता कर्मकांडाचा धर्म नाही. महाराष्ट्रात राहणारे ते मराठा, त्यांचा धर्म म्हणजे महाराष्ट्रधर्म. प्रत्येकाला काहीना काही धर्म असतो, महाराष्ट्रातील लोकांचा राष्ट्रीय कर्तव्य अशा अर्थाने तो शब्द वापरला आहे." या व्याखेतून येथील स्थानिक मराठा म्हणजे (महाराष्ट्रात राहणारे) लोकांचा धर्म, त्यांचे आचार विचार, संस्कृती याचा एकत्रित अर्थ दिसून येतो.

त्याच प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र लेखन करणारे ज्येष्ठ इतिहासकार गजानन भास्कर मेहेंदळे म्हणतात, वि. का. राजवाडे यांनी एका प्रस्तावनेत याविषयी विवेचन केले आहे. 'लढाऊ वृत्तीचा हिंदू धर्म म्हणजे महाराष्ट्र धर्म' अशी त्यांनी व्याख्या केली आहे. पुढे ते असे म्हणतात, "मला असं वाटत महाराष्ट्र धर्म हा हिंदु धर्म आहे, त्याच्या पलीकडे काहीही नाही. त्याला अनेक पुरावे आहेत. अनेक पत्रे उपलब्ध आहेत. या सगळ्या पत्रातून महाराष्ट्र धर्म हाच हिंदु धर्म आहे असं लक्षात येतं." तर जेष्ट पत्रकार राजू परुळेकर यांच्या मते, 'मराठा तितुका मेळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा' या रामदास स्वामीच्या संदेशातून ही व्याख्या करण्यात आली आहे, ती अजूनही अबाधित असल्याचे मत ते व्यक्त करतात.

संदर्भ- BBC News मराठी ,२३ जाने. २०२०

उपरोक्त विविध विचारवंतांच्या मतानुसार 'महाराष्ट्र धर्म' या संकल्पनेचे विविध पैलू दिसून येतात.

## ३.४ महाराष्ट्र धर्म आणि भक्ती विषयी संतांची भूमिका

महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते महाराष्ट्राला अनेक थोर संतांची परंपरा लाभलेली असून त्यांनी आपल्या विचार आणि कृतीतून भक्तिमार्गाने मनुष्याच्या उन्नतीला आकार देण्यासाठी तसेच समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरिती ज्या समाजाच्या व्यक्तीच्या विकासाला बाधा आणतात त्याविरुद्ध जागृती निर्माण करून संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा मार्ग सांगितलेला आहे. तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी 'हे विश्वची माझे घर' म्हणजे संपूर्ण विश्वाचा विचार मांडला आणि मराठी भाषेविषयी 'माझ्या मराठीची बोलू कौतुके, अमृतातेही पैजा जिंके' ही महती गाईली. संत ज्ञानेश्वरांनी मातृभाषेचे महत्त्व आणि संपूर्ण विश्वाचे कल्याणाचा ध्यास धरला होता यावरून त्यांच्या उदात्त हेतूची कल्पना येते. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची रचना करून महाराष्ट्राच्या भक्ती चळवळीला तात्विक अधिष्ठान प्राप्त करू दिले होते. पुढे संत एकनाथ महाराजांनी लोकांना अन्यायाविरुद्ध एकत्र येण्याची याचना केली होती. त्यासाठी त्यांनी आपल्या भारूड यांच्या माध्यमातून लोकांमध्ये जागृती केली होती. सतराव्या शतकांमध्ये संत परंपरेचा कळस संत तुकाराम महाराजांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून गाठला होता. त्यांनी भक्ती चळवळीला उत्तुंग भरारी दिली होती. संत तुकारामाच्या अभंगांनी समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य केले होते. न्या. रानडे यांनी संतांच्या कार्याविषयी आपले मत व्यक्त करताना युरोपातील प्रोटेस्टंट चळवळीने जसे सोळाव्या शतकात धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला होता तसेच प्रयत्न भारतामध्ये संत महात्म्यांनी इ.स. १३ व्या ते १७ व्या शतकादरम्यान सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात भक्ती चळवळीच्या माध्यमातून केल्याचे सांगितले जाते. ज्यामध्ये त्यांनी जुन्या रुढी, परंपरा व विचारांना झुगारून नवीन आधुनिक विचारांची कास धरून समाजाचा विकास साधण्यावर भर दिला होता, त्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना त्यांची जात, धर्म, पंथ त्यामध्ये भेदाभेद न करता सर्वांना समानतेची वागणूक देण्यावर भर दिला होता. त्यांनी आपल्या शिकवणुकीतून सामाजिक ऐक्य साधून व्यक्तीचा, समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा विकास साधण्याचा संदेश भक्ती चळवळीतून दिला होता, त्यातूनच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य उभारण्याची पायाभरणी झाल्याचे दिसून येते. तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत म्हणजे संत ज्ञानेश्वरांपासून ते सतराव्या शतकात संत तुकाराम व संत रामदास स्वामी यांच्यापर्यंत सर्वच संतानी समाज प्रबोधन करून महाराष्ट्र धर्माची कास धरण्याची व सामाजिक सलोखा व ऐक्याची शिकवण महाराष्ट्राला दिली होती. त्यातून महाराष्ट्र धर्म आकारास आला होता, याच महाराष्ट्र धर्माला पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकामध्ये स्वराज्याची स्थापना करून महाराष्ट्र धर्माला मूर्त स्वरूप दिले होते.

## ३.५ स्वराज्याची उभारणी आणि महाराष्ट्र धर्म:

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे 'वणवा पेटावा' तसे अचानक स्थापन झाले होते असे ग्रँड डफ यांनी म्हटले होते. परंतु भारतीय इतिहास संशोधकांनी त्याचा अन्वयार्थ समूळ नाकारला होता आणि त्यासाठी भक्ती चळवळीचे दाखले देऊन स्वराज्याची पायाभरणी संत महात्म्यांनी करून दिली होती. त्यामुळे सतराव्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी केल्याचे संशोधनाद्वारे दाखून दिले होते. त्यावेळची दख्खनची सामाजिक- सांस्कृतिक आणि राजकीय स्थिती स्वराज्य स्थापनेस पूर्णपणे प्रतिकूल होती अशा परिस्थितीत महाराष्ट्रामध्ये सामान्य जनतेवर होणारे अन्याय,

munotes.in

धार्मिक अत्याचार, जुलूम जबरदस्तीने धर्मांतर, स्त्रियांवरील अत्याचार यामुळे येथील समाज ग्रासला होता. तो निमूटपणे या अत्याचाराला सामोरे जात होता अशा परिस्थितीत अन्याय अत्याचाराचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न जर कुणी केला तर त्याला होणारी जबर शिक्षा आणि हाल-अपेष्टा यामुळे महाराष्ट्रातील सर्व जाती धर्माच्या लोकांमध्ये भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. अश्या परिस्थितीत येथील संत महात्म्यांनी भक्तिमार्गाच्या माध्यमातून समाजाला एकत्रित आणून त्यांच्यामध्ये ऐक्याची भावना रुजविली होती. त्यासाठी जातिभेद, धर्मभेद, पंथभेद बाजूला सारून महाराष्ट्रधर्म जोपासण्यासाठी व अन्याय अत्याचाराविरुद्ध एकत्रित येण्याची शिकवण दिली होती, त्याला मूर्त रूप देण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करून केले होते. त्यांनी १६७४ मध्ये रायगडावर राज्याभिषेक करून स्वतंत्र राज्याची उभारणी केली होती. स्वराज्यामध्ये अठरापगड जाती, धर्माचे, पंथाचे लोक एकत्रित आणले होते, सर्वांना संरक्षण, समान न्याय, समान अधिकार व स्वराज्यामध्ये स्त्रियांचा मान सन्मान, शेतकरी, कष्टकरी या सर्वांना आपले वाटावे असे स्वराज्य उभारुन त्यांच्या संरक्षणाची हमी दिली होती. ज्या भूमीमध्ये या स्वराज्याची उभारणी केली होती तो प्रदेश महाराष्ट्र या नावाने ओळखला जात होता आणि तिथे राहणाऱ्या लोकांना 'मराठा' संबोधले जात होते. मराठा हा शब्द जातिवाचक नसून त्याला प्रादेशिक पार्श्वभूमी आहे. महाराष्ट्रामध्ये राहणाऱ्या लोकांचा एकच धर्म म्हणजे महाराष्ट्र धर्म असा त्याचा अर्थ सांगितला जातो. प्रसिद्ध इतिहास संशोधक निनाद बेडेकर यांनी महाराष्ट्र या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना असे सांगितले की, महाराष्ट्र हा शब्द प्रादेशिकते पुरता मर्यादित नसून त्यामध्ये 'राष्ट्र' म्हणजे 'देश' या व्यापक संकल्पनेचा समावेश आहे. भारतातील इतर कोणत्याही प्रादेशिक राज्य अथवा भूभागाच्या नावांमध्ये राष्ट्र असा उल्लेख नसल्याचे ते सांगतात, म्हणूनच महाराष्ट्र या नावाला समृद्ध परंपरा आहे त्यामुळे ते असे म्हणतात की, 'अन्यायाविरुद्ध लढणे हाच महाराष्ट्र धर्म होईल' याच अन्याय अत्याचाराचा प्रतिकार करून छत्रपती शिवाजी महाराजांनी विपरीत परिस्थितीत अठरापगड जाती धर्माच्या लोकांना एकत्रित आणून त्यांच्या मध्ये नवचेतना जागृत करून त्यांना स्वराज्य उभारणीच्या कार्यात सहभागी करून परकीय अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी स्वराज्याची उभारणी करून तेथील जनतेचे संरक्षण केले होते.

## ३.६ महाराष्ट्र धर्माची तत्वे

महाराष्ट्र धर्माच्या पाठीमागे संतांची परंपरा व भक्ती चळवळीची पार्श्वभूमी असल्यामुळे त्याला अध्यात्माची जोड होती. त्यामुळे महाराष्ट्र धर्माची तत्वे त्यातून उदयास आलेली दिसून येते. त्यामध्ये प्रामुख्याने चार प्रकारच्या तत्त्वांचा समावेश आहे.

१. देवाची पूजा-अर्चा करणे म्हणजे देवशास्त्र आचरणे.

२. आजूबाजूच्या लोकांची सेवा करणे म्हणजेच देशाचार.

३. कुटुंबाची सेवा करणे म्हणजे कुळाचार.

४. जातीसाठी सेवा करणे म्हणजेच जातीचार.

या सर्व गोष्टी नित्यनियमाने पाळणे हे महाराष्ट्र धर्माचे पर्यायाने येथील जनतेचे कर्तव्य होते. म्हणून भक्तिमार्गाने लोक एकत्रित येऊन धर्माचे पालन करून ईश्वर भक्तीत तल्लीन झाले होते. त्यांच्यात अध्यात्मिक मुल्यांची रुजवण झाल्यामुळे त्यांच्यामध्ये सदाचार निर्माण होऊन सर्वधर्म समभावनाची जाणीव निर्माण झालेली होती. त्यामुळे संतांचे महान विचार आणि शिकवण यातून महाराष्ट्र धर्माची पायाभरणी झाली आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने त्याला मूर्त रूप प्राप्त झाले होते.

## ३.७ महाराष्ट्र धर्माविषयी विविध मतप्रवाह

महाराष्ट्र धर्माचा विचारच छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य स्थापनेमागे असल्याचे मत भारतीय इतिहास संशोधक व विचारवंत यांनी एकोणिसाव्या शतकापासून मांडण्यास सुरुवात केली होती. महाराष्ट्र धर्माच्या संदर्भात विविध विचारवंतांचे भिन्नभिन्न मतप्रवाह व विचारधारा एकोणिसाव्या शतकात उदयास आल्या त्यामध्ये प्रामुख्याने पुढील तीन विचारधारा महत्त्वाच्या असल्याचे मत इतिहास संशोधक डॉ. उमेश बगाडे यांनी 'महाराष्ट्र धर्माची चर्चा' या लेखात नमूद केले आहे.

**न्या. रानडे- भागवत यांची महाराष्ट्र धर्माविषयीची विचारधारा :**

राजारामशास्त्री भागवत आणि न्या. रानडे हे दोघेही उदारमतवादी विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी संतांच्या भक्तीचळवळीचा विचार हा महाराष्ट्र धर्माच्या मागे असल्याचे सांगून संतांच्या अध्यात्मिक आणि सामाजिक ऐक्याचा विचार त्यांनी महाराष्ट्र धर्मात गोवला होता. संतांची शिकवण त्यांचा जातिभेदाचा निषेध, कर्मकांड, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा व अनिष्ट चालीरीती, स्त्रियांना भक्तीचा अधिकार, नैतिक वर्तनावर भर, विविध धर्मात समन्वय या शिकवणुकीचा व प्रागतिक विचाराच्या सूत्रांना त्यांनी अधोरेखित केल्याचे मत डॉ. उमेश बगाडे यांनी 'महाराष्ट्र धर्माची चर्चा' या लेखात नमूद केले आहे. तसेच न्या. रानडे आणि राजारामशास्त्री यांनी महाराष्ट्र धर्माच्या प्रादेशिक कल्पनेला राष्ट्रानिर्माणाची दिशा दिल्याचे डॉ. उमेश बगाडे यांनी त्यांच्या लेखात मांडले आहे. न्या. रानडे यांनी त्यांच्या मराठी सत्तेचा उदय या ग्रंथात समर्थ रामदासस्वामी यांनी १७ व्या शतकात सर्व मराठ्यांनी (महाराष्ट्रात राहणारे लोक) एकत्रित होऊन महाराष्ट्र धर्माची कास धरून त्याचा प्रसार करावा असे सांगून महाराष्ट्र धर्म रूढीवादी किंवा पुराणमतवादी (Orthodox) स्वरूपाचा नसून तो निधर्मी, सुधारणावादी स्वरूपाचा असल्याचे म्हंटले आहे.

**वि. का. राजवाडे यांची महाराष्ट्र धर्माविषयीची विचारधारा :**

ग्रँड डफ याने मराठ्यांचा इतिहास पहिल्यांदा वेगवेगळ्या खंडात लिहून मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचे काम केले होते. परंतु त्याने मराठ्यांच्या इतिहासाचे केलेले चुकीचे विश्लेषण पुराव्यानिशी खोडून काढण्याचे काम भारतीय इतिहास संशोधकांनी केले होते. त्यामध्ये इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे लिखाण अतिशय महत्वपूर्ण समजले जाते. त्यांनी महाराष्ट्र धर्माविषयी आपली विचारधारा मांडलेली आहे. महाराष्ट्रातला जयिष्णू हिंदू धर्म म्हणजे महाराष्ट्र धर्म; स्वराज्य स्थापन करणे, धर्मसंस्थापना करणे, गो-ब्राह्मण प्रतिपालन करणे, मराठ्यांचे एकीकरण करून त्यांचे पुढारीपण करणे असा

कृतिकार्यक्रम म्हणजे महाराष्ट्र धर्म असा महाराष्ट्र धर्माचा अर्थ सांगितल्याचे डॉ. उमेश बगाडे यांनी त्यांच्या लेखात नमूद केले आहे.

डॉ. वि. का. राजवाडे महाराष्ट्र धर्माविषयी आपल्या लेखनात असे नमूद करतात की, महाराष्ट्रधर्म हा ख्रिश्चन किंवा मुस्लीम किंवा जुडाई प्रमाणे नाही, त्याचप्रमाणे तो निव्वळ हिंदु धर्म ही नाही. प्रत्यक्ष आचरणामध्ये महाराष्ट्र धर्माचा अर्थ हिंदू धर्मापेक्षा व्यापक आहे. राजवाडे यांच्या मते महाराष्ट्र धर्म ही तत्वतः राजकीय कल्पना आहे. छ. शिवाजी महाराजांच्या काळामध्ये धर्मसंस्थापना या शब्दात स्वराज्य स्थापना समाविष्ट होती असे ही डॉ. बगाडे यांच्या लेखामध्ये उल्लेखिले आहे.

**म. फुले यांची महाराष्ट्र धर्माविषयीची विचारधारा :**

महात्मा ज्योतिराव फुले यांची विचारधारा विद्रोही स्वरूपाची होती. इ.स. १८६९ मध्ये महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी 'पोवाडा' लिहून त्याद्वारे त्यांच्या स्वराज्या विषयीचा विचार सांगितला होता. छ. शिवाजी महाराजांवर प्रदीर्घ पोवाडा लिहून ते थांबले नाही तर रायगडावर जावून छ. शिवाजी महाराजांच्या समाधीचा त्यांनी जीर्णोद्धार केला होता व पहिली शिवजयंती साजरी केली होती. त्यांच्या विचारधारेत स्वराज्यातील अठरापगड जातीचे लोकांमध्ये छ. शिवाजी महाराजांची प्रतिमा शूद्रातिशूद्रांचा रक्षणकर्ता, शेतकऱ्यांचा तारणहार, पराक्रमी राजा असा उल्लेखसुद्धा महात्मा फुले यांच्या 'कुळवाडीभूषण' पोवाड्यातून मांडलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे जाती-धर्माच्या व पितृसत्ताक पद्धतीच्या जोखडातून म्हणजेच पर्यायाने ब्राह्मणी धर्माच्या गुलामगिरीतून सर्वसामान्यांची मुक्तता करण्याचा विचार महात्मा फुले यांनी मांडला होता. हाच विचार महाराष्ट्र धर्म या संकल्पनेत अभिप्रेत असल्याचे म. फुले यांच्या विचारधारेतून दिसून येते.

महाराष्ट्र धर्माच्या संदर्भात तीन वेगवेगळ्या विचारधारा प्रचलित आहे. त्यामध्ये भिंत जरी असली तरी त्यांनी महाराष्ट्राच्या आत्मिकतेला वळण देण्याचे काम केले आहे असे विचारवंतांच्या व संशोधकांच्या लेखनातून स्पष्ट होते.

## ३.८ महाराष्ट्र धर्माचा महाराष्ट्राच्या जडणघडणीवर झालेला परिणाम

महाराष्ट्राला प्रचंड सांस्कृतिक व ऐतिहासिक आणि वैचारिक वारसा लाभलेला असून साधुसंत तसेच थोर महापुरुषांचा विचार आणि समाजसुधारणा चळवळीतून झालेल्या प्रबोधनामुळे महाराष्ट्रातील समाज जीवन आकाराला आले आहे. वैचारिक प्रबोधनामुळे जातीधर्म, श्रेष्ठ- कनिष्ठ, स्त्री -पुरुष हा भेद कमी करून सामाजिक सलोखा निर्माण करण्याचे कार्य संत महात्म्यांच्या शिकवणुकीतून रुजविण्याचा प्रयत्न झाला. त्याचाच परिणाम म्हणजे पाश्चात्यांची जुलमी राजवट तसेच मुघल सत्ता व त्यांचा झालेला अन्याय अत्याचार यामुळे येथील मराठा समाज म्हणजे महाराष्ट्रातील सर्व जाती धर्माचे लोक यांच्यावर परिणाम होऊन अशा जुलमी राजवटीविरुद्ध एकात्मतेची भावना निर्माण करण्यामध्ये येथील भक्ती चळवळ व त्यांच्या विचारातून आकाराला आलेले व छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य होय. स्वराज्यामध्ये महाराष्ट्र धर्म या संकल्पनेला मूर्त रूप देण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले होते. त्यांनी स्वदेशी व परकीय सत्तांचा बंदोबस्त करून महाराष्ट्रातील जनतेची गुलामगिरी व अन्याय-अत्याचारातून सुटका करून त्यांना स्वतंत्र

राज्य निर्माण करून दिले होते. ज्यामध्ये सर्वांना समान न्याय व मानसन्मानाने वागविले होते व त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना संधी देण्याचे कार्य स्वराज्य मध्ये झालेले होते. समानतेच्या तत्त्वावर उभे राहिलेले स्वराज्य हे आदर्श समाज निर्माण करण्याचे उत्कृष्ट उदाहरण होते. त्याचाच परिणाम येथील सामाजिक -सांस्कृतिक आणि राजकीय जीवनावर पडून महाराष्ट्राच्या विकासाला दिशा देण्याचे व महाराष्ट्राला आधुनिकतेकडे वाटचाल करण्यास महाराष्ट्र धर्मातून एकात्मतेची व समानतेची शिकवण मिळाल्यामुळे, तसेच येथील समाजाची जडणघडण आधुनिक सुधारणावादी विचारांच्या आधारावर झाल्यामुळे, पिढ्या न् पिढ्यातील लोकांनी त्यामध्ये योगदान दिल्यामुळे आजही महाराष्ट्रातील समाज रचनेत एकात्मतेची सर्वधर्मसमभावनाची रुजवण झालेली दिसून येते.

## ३.९ सारांश

महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा उगम व विकास यांचा सखोल आढावा या प्रकरणांमध्ये घेण्यात आलेला आहे. तेराव्या शतकापासून ते एकोणिसाव्या शतकापर्यंत त्यामध्ये उदयास आलेले भिन्न मतप्रवाह आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारणीतून सर्व जाती, धर्म, पंथ, विचार यांना एकत्रित एकाच धाग्यात गुंफण्याचे व त्यांच्यामध्ये एकात्मतेची भावना निर्माण करून तेथील समाजाला स्वाभिमान आणि आधुनिकतेकडे वाटचाल करण्यासाठी भक्कम विचारांची व मूल्यांची रुजवण करून महाराष्ट्राला आकार देऊन स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते. यामुळे येथील समाजात आधुनिक मूल्यांची रुजवण करून सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनाला गतिमानता देण्याचे कार्य महाराष्ट्रधर्म या संकल्पनेतून आकाराला आलेले दिसून येते. म्हणून भक्कम पायाभरणीच्या जोरावर महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होताना दिसत आहे.

## ३.१० प्रश्न

१. महाराष्ट्र धर्म ही संकल्पना संत महात्म्यांच्या तत्वज्ञानातून कशा प्रकारे प्रकट झाली होती?

२. समर्थ रामदास स्वामी यांच्या संकल्पनेतील महाराष्ट्र धर्माला कोणत्या विचारधारेने आपल्या लेखनातून प्रकटीकरण केले होते?

३. महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा महाराष्ट्राच्या जडणघडणीवर काय परिणाम झालेला होता?

## ३.११ संदर्भ

१. न्या. रानडे, मराठी सत्तेचा उदय आणि विकास

२. राजवाडे वि. का., महिकावतीची बखर

३. बगाडे, उमेश, महाराष्ट्र धर्माची चर्चा, लोकसत्ता वर्तमानपत्रातील

❖❖❖❖

# ४

# छत्रपती शिवाजी महाराज आणि विजापूर संबंध

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ शिवाजी राजांचे पूर्वायुष्य

४.३ शिवाजी राजांच्या स्वराज्याला प्रारंभ

४.४ जावळीवर आक्रमण

४.५ कोकणवरील आक्रमण

४.६ अफजलखान प्रकरण

४.७ शिवाजी राजे आणि सिद्दी जोहर

४.८ मराठे विजापूर संघर्ष - १६७२

४.९ सारांश

४.१० प्रश्न

४.११ संदर्भ

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकात शिवाजी राजाच्या नेतृत्वाखाली मराठा सत्तेचा उदय कसा झाला या विषयी माहिती असून त्यांच्या विविध मोहिमा आणि संघर्ष या बद्दलची माहिती मिळते. विजापूरच्या आदिलशहाने अफझलखान, सिद्दी जोहर यासारख्या सरदारांना नव्याने निर्माण झालेल्या स्वराज्यावर पाठवून अवघड आक्रमणे घडवून आणली. या प्रकरणात शिवाजी महाराजांचा कोकणवर विजय, जावळी प्रांतावरील मोहीम, अफजलखानाचा वध, पन्हाळगडचा वेढा अशा विविध घटनांमधून स्वराज्य निर्मिती कशी झाली याचा आपण अभ्यास करणार आहोत.

## ४.१ प्रस्तावना

शहाजी राजांची पहिली पत्नी जिजाबाई हिला संभाजी व शिवाजी अशी दोन अपत्ये झाली. संभाजीचा जन्म १६२३ मध्ये आणि शिवाजी महाराजांचा जन्म १६३० मध्ये झाला. शिवजन्माच्या निश्चित तारखेबद्दल अजूनही मतभेद आहेत. इतिहासकारांनी अनेक साधनांचा अभ्यास करूनही निश्चित तारीख शोधून काढता आलेली नाही. ९१ कलमी बखर, चिटणीस

बखर, शिवदिग्वजय, शिवप्रताप या समकालीन साधनांमध्ये १६२७ हे शिवजन्माचे वर्ष दिले आहे. तसेच इतिहासकार वि. का. राजवाडे, सरदेसाई, सर जदुनाथ सरकार १० एप्रिल १६२७ ही शिवजन्माची तारीख मानतात. मात्र शेजवलकर, वा. सी. बेंद्रे, आपटे, महामहोपाध्याय पोतदार यांच्यामते मात्र १९ फेब्रुवारी १६३०, फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ मध्ये पुणे जिल्ह्यातील शिवनेरी येथे शिव जन्म झाल्याचे मानतात. त्यानंतर पुढे काही काळाने स्वराज्य निर्मितीचा विचार शिवाजी महाराजांनी केलेला दिसतो.

## ४.२ शिवाजी राजांचे पूर्वायुष्य

शिवाजी महाराजांचे बालपण अतिशय अस्थिरतेत आणि धामधुमीत गेले. शिवाजी राजांच्या जन्माच्या वेळी शहाजीच्या जीवनात मोठ्या राजकीय घडामोडी घडून येत होत्या. आदिलशाहीतील कारस्थानांना कंटाळून शहाजींनी निजामशाहीची नोकरी पुन्हा पत्करली होती. शिवाजी राजांच्या जन्माच्या वेळी शहाजी निजामशहाच्या वतीने खानदेशात लढण्यात गुंतलेले होते. याचा फायदा घेऊन आदिलशाही फौजांनी पुण्याच्या जहांगिरीत मोठ्या प्रमाणात लुटालुट केली. त्यानंतर राजकीय स्थिती बदलली आणि त्यात शहाजीने मोगलांचा पक्ष उचलून धरला पण शहाजी मोगलांकडेही जास्त दिवस टिकले नाही. ज्यावेळी फतेखानाने निजामशाही मोगलांच्या घशात घातल्याचे कारस्थान हाणून पाडले आणि नवीन निजामशहास गादीवर बसवले. १६३६ मध्ये शहाजीने मोगल आणि आदिलशाही फौजांसमोर शरणागती स्विकारली. त्यावेळी जिजाबाई आणि शिवाजी राजे यांचा मुक्काम माहुली किल्ल्यावर होता. पुढे शहाजीला आदिलशहाने भीमा आणि निरा या दोन नद्यांच्या दरम्यान जी जहांगिर दिली त्यात पुणे, सुपे, इंदापूर, चाकण असे चार परगणे मोडत होते. ज्यावेळी शहाजी कर्नाटकात गेले त्यावेळी शहाजीने जिजाबाई आणि शिवाजी राजांना पुण्याच्या जहांगिरीत ठेवले. पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्याकरीता म्हणून दादोजी कोंडदेव, कुलकर्णी या चोख आणि दक्ष कारभाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या पालकत्वाखाली शिवाजी राजेचे बालपण गेले.

### ४.२.१ जिजाबाईंचा प्रभाव

शिवाजी राजांचे चरित्र घडविण्यात त्यांची आई जिजाबाई आणि दादोजी कोंडदेव यांचा मोठा वाटा होता. जिजाबाई ही स्वाभिमानी आणि धार्मिक संस्काराने घडलेली स्त्री होती. तिच्या जाणत्या वयापासून तिने पाहिलेल्या सुलतानशाहीच्या विध्वंसक वृत्तीमुळे महाराष्ट्रातील लोकांना गुलामगिरी, अन्याय, अत्याचार स्वीकारावे लागले, असे जिजाबाईंचे मत होते. हिंदू धर्मीयांची अनेक तिर्थक्षेत्र शत्रूच्या हाती पडून नष्ट झाली व अनेक स्त्रियांचाही अपमान झाला. या स्थितीमुळे लहान वयापासूनच त्यांच्या मनात मुसलमानी सत्तांविषयी अढी निर्माण झाली. जिजाबाईंच्या वडीलांचा आदिलशाही दरबारात विश्वासघाताने वध झाल्यानंतर तिच्या मनातील सुल्तानशाहीविरूद्धची चीड खूपच वाढली. तेव्हापासून मराठ्यांच्या प्रदेशाला स्वतंत्र करण्याची प्रेरणा तिच्यात निर्माण झाली. हिच प्रेरणा शिवाजीमध्ये निर्माण करून रामायण, महाभारतातील अनेक स्फुर्तीदायी घटना सांगत शिवाजींच्या मनात स्वातंत्र्य व न्यायप्रियता निर्माण केली. इतिहासकार रानडे यांच्या मते, जिजाबाईंचा प्रभाव शिवाजीराजांची कारकिर्द निर्माण करण्यासाठी कारणीभूत असणारी सर्वात मोठी घटना आहे.

munotes.in

## ४.३ शिवाजी राजांच्या स्वराज्याला प्रारंभ

शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यस्थापनेला प्रारंभ करताना आपल्या जहागीरीच्या आसपासच्या मावळ प्रदेश मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केला. मावळच्या प्रदेशावर आदिलशाही सुल्तानाची नाममात्र सत्ता होती. मात्र खरी सत्ता तेथील देशमुखाची होती. अशा अनेक देशमुखांना आपल्या वर्चस्वाखाली आणून शिवाजी महाराजांनी मावळचा प्रदेश ताब्यात आणला. याच काळात येसाजी कंक, बाजी पासलकर, सुर्याजी काकडे, तानाजी मालुसरे असे अनुयायी शिवाजी महाराजांना मिळाले. १६४६ मध्ये तोरणा,  १६४७ मध्ये राजगड आणि पुरंदर जिंकून शिवाजी महाराजांनी स्वराज्य कार्याचा प्रारंभ केला. सह्याद्रीच्या प्रदेशातील किल्ले जिंकणे स्वराज्यासाठी गरजेचे आहे, या विचाराने विजापुरच्या ताब्यात असलेल्या किल्ल्यांवर आक्रमणे करून त्यातूनच स्वतंत्र राज्य निर्माण करणे हा पर्याय त्यांनी स्वीकारला. तोरणा व राजगडाच्या मोहिमेनंतर कोंढाणा किल्ल्याकडे वळून शिवाजी राजांनी तोही किल्ला जिंकला. कोंढाण्यानंतर पुरंदर हा किल्ला जिंकण्याचे शिवाजी राजांनी ठरवले. तेथील किल्लेदार निळकंठ नाईक ह्यांच्या मृत्युनंतर त्यांची मुले पिलाजी व शंकराजी यात संघर्ष सुरू झाला. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन पुरंदरावर स्वारी करून शिवाजी राजांनी किल्ला ताब्यात घेतला यानंतर ग्रँड डफच्या माहितीन्वये तिकोणा आणि राजमाची हे किल्लेही शिवाजी राजांनी जिंकले. या घटनानंतर आदिलशाही दरबारात शिवाजी राजांच्या वर्तुवणूकीमुळे अस्थिर वातावरण निर्माण झाले. शिवाजी महाराजांना हालचालींना शहाजींचा गुप्त पाठिंबा असणार या विचाराने आदिलशहाने शहाजीला कैद करण्याचा हुकूम दिला.

२५ जुलै १६४८ रोजी शहाजी राजांना कैद झाल्यावर महाराष्ट्रातील परिस्थितीत बदल झाला. फत्तेखान या सरदाराला आदिलशहाने पुणे जहागीरीवर स्वारी करण्याचे आदेश दिले. शिरवळ या ठिकाणी फत्तेखानाचा पराभव करून मराठ्यांनी पहिला विजय संपादन केला. परंतु त्यानंतर मात्र शहाजी राजांच्या सुटकेसाठी शिवाजी राजांना स्वतंत्र प्रयत्न करावे लागले. शहाजींच्या सुटकेसाठी आदिलशहाने कोंढाणा व कर्नाटकातील बंगलोर हे प्रदेश मागितले. हे आदिलशास देऊन शहाजी राजांची सुटका करून घेण्यात आली. त्यानंतर मात्र १६५२ पर्यंत शिवाजी महाराजांनी पुणे, सुपे, चाकण, इंदापूर या जहागीरीसह नव्याने मिळवलेले प्रदेश प्रशासनाखाली आणले. १६५५ नंतर पुन्हा एकदा स्वराज्य निर्मितीचा प्रयत्न सुरू झाला.

## ४.४ जावळीवर आक्रमण

शहाजी राजांच्या सुटकेनंतर सातारा जिल्ह्यातील जावळी या प्रदेशाकडे शिवाजी राजांनी लक्ष दिले. मोरे घराण्यातील दौलतराव मोरे यांचा तेथे अंमल होता. मोरे घराण्यातील कर्त्या पुरूषांना 'चंद्रराव' हा किताब दिला होता. त्यामुळे त्यांना चंद्रराव मोरे याच नावाने ओळखले जात असे. शिवाजीच्या स्वराज्य कार्याच्या सुरूवातीस दौलतराव मोऱ्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीने यशवंतराव या नातलगास दत्तक घेऊन जहागीरीचा ताबा दिला. या प्रकरणात शिवाजी महाराजांनी यशवंतरावास पाठिंबा दिला होता. पण याचा विसर पडून यशवंतराव पुढे शिवाजी राजांच्या मार्गात अडचणी आणू लागला. त्याला धडा शिकवणे आवश्यक होते. या व्यतिरिक्त जावळी मार्गे कोकण व देश या दोन्ही भागात जाण्याची संधी होती. त्यामुळे जावळी ताब्यात आल्यास स्वराज्यात मोठी भर पडणार होती.

जावळीवर आक्रमणाची योजना आखून शिवाजी राजांनी जेधे, बांदल, सिलीमकर अशा देशमुखांना आपल्या हाताशी धरले आणि जावळीच्या प्रदेशावर हल्ला केला. १५ जानेवारी

१६५६ रोजी झालेल्या हल्ल्यात ६ तासांच्या घनघोर युद्धानंतर तो प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात आला. परंतु यशवंतराव मोरे जवळच असलेल्या रायरी किल्ल्यावर पळून गेला. त्यामुळे रायरीला वेढा देऊन सुमारे ३ महिने हा वेढा चालवला. मे १६५६ मध्ये चंद्रराव शरण आला व त्याने शिवाजीचे वर्चस्व स्वीकारल्याचे नाटक केले. पण दरम्यानच्या काळात घोरपड्यांशी शिवाजी विरूद्ध संधान बांधण्याने आता चंद्रावास क्षमा करणे घातक ठरेल या विचाराने २७ ऑगस्ट १६५६ रोजी चंद्रावाला ठार करण्यात आले. आणि लवकरच रायरीचा किल्ला व संपूर्ण जावळी खोरे शिवाजीच्या ताब्यात आले.

**मोऱ्यांचा पाडाव आणि जावळीचे परिणाम**

स्वराज्य प्राप्तीचे ध्येय आपल्या डोळ्यांसमोर शिवाजी राजांनी ठेवले होते. त्यादृष्टीने जावळी विजय अतिशय महत्त्वाचा ठरला. चंद्रराव मोरे सारख्या प्रतिष्ठित व पराक्रमी सरदाराचा पाडाव केल्यामुळे शिवाजी राजेंच्या प्रतिष्ठेत भर पडून आजूबाजूच्या परिसरावर त्यांचा वचक निर्माण झाला. आदिलशाही दरबारातही शिवाजी राजांच्या या पराक्रमाचे पडसाद उमटले. आणि पुढे महमद आदिलशाहाच्या मृत्युनंतर अफजलखानासारख्या सरदाराला शिवाजी राजांचे पारिपत्य करण्यासाठी पाठवण्याची आदिलशाही पुढे गरज निर्माण झाली.

जावळीचा मुलुख ताब्यात आल्याने घाटमाथ्याप्रमाणेच कोकणपट्टीचा काही भाग स्वराज्यात सामाविष्ट झाला. पश्चिम किनाऱ्यांवर जंजिऱ्याचे सिद्दी व गोव्याचे पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. शिवाजी राजांचा राज्यविस्तार समुद्रापर्यंत झाल्याने व परकीय व्यापाऱ्यांशी त्यांचा पहिल्यांदाच संपर्क आला. रायरी, चंद्रगड, सोनगड यासारखे किल्ले स्वराज्यात सामिल झाले. मोऱ्यांच्या पराभवानंतर त्यांचा खजिन्यातील संपत्ती शिवाजी महाराजांच्या ताब्यात आली. याच संपत्तीच्या सहाय्याने प्रतापगड नावाचा भक्कम किल्ला त्यांनी बांधला.

जावळी विजय हा शिवाजी महाराजांचा पहिला मोठा लष्करी विजय होता. या विजयामुळे त्यांच्या जहागीरला एका राज्याचे स्वरूप आले. शिवाजी राजांना आव्हान देणे ही फार सोपी गोष्ट नाही याची जाणीव त्या प्रदेशातील इतर देशमुख व वतनदारांना  झाली. जावळी विजयानंतर शिवाजी राजांनी १६५७-५९ या काळात कर्नाटकावर स्वाऱ्या केल्या. दरम्यानच्या काळात रोहिडा किल्ला जिंकून आपल्या जहांगीरीतील बंडखोरासाठी बंदोबस्त केला.

## ४.५ कोकणवरील आक्रमण

४ नोव्हेंबर १६५६ रोजी महंमद आदिलशहाचा मृत्यु झाला. याच काळात दिल्लीचा बादशहा शहाजहान आजारी झाल्यामुळे त्याचा मुलगा दक्षिणचा सुभेदार औरंगजेब उत्तरेकडे निघून गेला. यामुळे मधल्या काळात कोकण प्रदेश जिंकून घेण्याची संधी शिवाजी महाराजांना मिळाली. जुलै १६५७ मध्ये शिवाजी राजांनी रघुनाथपंत या सरदारास कल्याण, भिवंडी व आसपासचा प्रदेश जिंकण्यासाठी पाठविले. १६५८ च्या सुमारास माहुलीचा किल्ला जिंकून एकूण जिंकलेल्या प्रदेशावर आबाजी सोनदेव या कार्यक्षम अधिकाऱ्याची सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यानंतर सुरगड, घोसाळगड यासारखे किल्ले ही शिवाजी राजांनी जिंकले. यामुळे लवकरच कोकण किनारपट्टीपर्यंत पोहचून आरमार बांधण्याचा विचार शिवाजी राजांनी सुरू केला. स्वराज्याची अशी सुरूवात निश्चितपणे यशस्वी स्वरूपाची होती असे म्हणता येते.

## मराठे विजापूर संघर्ष

१६५५-५९ या काळातील घटनांवरून शिवाजी महाराजांचा स्वराज्य निर्माण करण्याचा ध्यास आणि नियोजन किती निश्चित स्वरूपाचे होते ते लक्षात येते. परंतु त्याच्या यशामुळे आदिलशाही दरबारात अस्वस्थता निर्माण झाली. आदिलशाहीचा कारभार बडी बेगम साहिबा हिच्या हातात आला. अली आदिलशहा या आपल्या अल्पवयीन मुलाच्या नावाने ती राज्य चालवू लागली. तिने शहाजीस सूचना देऊन शिवाजी महाराजांच्या कारवायांवर नियंत्रण घालण्याचे सुचविले. परंतु शिवाजी महाराजांवर माझे नियंत्रण नसून आदिलशाही दरबाराने त्याच्या विरूद्ध कोणती कारवाई करावयाची याचा निर्णय स्वतंत्रपणे घ्यावा असे मत त्यांनी व्यक्त केले. परिणामी आदिलशाही दरबाराने पूर्वीच्या काळातील वाईचा सुभेदार अफझलखान याची नियुक्ती करून शिवाजी महाराजां विरूद्ध मोठी मोहिम उघडली.

## ४.६ अफजलखान प्रकरण

शिवाजी महाराजांच्या वाढत्या हालचारीवर प्रतिबंध करण्यासाठी विजापूर दरबाराने बलाढ्य सरदार अफझलखान यास पाठविण्याचे ठरविले. विजापूर दरबाराने अफझलखानाची शिवाजी महाराजांवर हेतू पुर्वक नेमणूक केली. त्या काळात आदिलशाहीत नाव घेण्यासारखे जे चार-दोन पराक्रमी सरदार उरले होते. त्यामध्ये अफझलखानाचा क्रमांक वरचा होता. शिवाय खान शिवाजी महाराजांचा पूर्वीपासून मत्सर करीत होता. चंद्रराव मोरे प्रकरणात शिवाजी राजांनी जावळीमध्ये जे वर्चस्व निर्माण केले होते, ते खानाच्या मनात सलत होते. संपूर्ण भोसले घराणेच वैरी आहे, अशी खानाची धारणा होती. म्हणूनच शहाजीला कर्नाटकातून पायात बेड्या घातलेल्या अवस्थेत विजापूरला आणण्यामध्ये खानाने पुढाकार घेतला होता. कनकगिरीच्या लढाईत शिवाजी राजांचा भाऊ संभाजी मारला गेला. या दुर्घटनेला खानाची कारवाई कारणीभूत होती. शिवाजी महाराजांनी कर्नाटकात तेरदळ पर्यंत स्वारी केली. हा तेरदळ प्रदेश खानाच्या अंमलाखाली होता. शिवाजी राजांच्या हालचाली शेवटी महागात पडतील याची खानाला खात्री पटली होती. म्हणूनच शिवाजी महाराजांना पकडून आणण्याचा विडा त्याने उचलला.

आदिलशहाने कान्होजी जेधे यांना लिहिलेले फर्मान तसेच तारीख-ए-अली या ग्रंथातील वर्णन, डच पत्रव्यवहार अशा समकालीन साधनांच्या आधारे विजापूर दरबार व अफझलखानाचा अंतस्थ हेतू शिवाजी राजांना कायमस्वरूपी नष्ट करणे हाच होता हे स्पष्ट होते. शिवाजी महाराजांचे पारिपत्य करण्यासाठी विजापूरहून निघालेला अफझलखान तुळजापूर व पंढरपूर मार्गे वाईकडे आला व धर्म क्षेत्रांना उपद्रव दिला, असा उल्लेख आहे. परंतु सेतू माधवराव पगडी यांच्यामते तुळजापूर हे मार्गात नसल्यामुळे या मोहिमेच्या पूर्वीच खानाने त्यावर हल्ला केला असावा असे मत व्यक्त केले आहे. शिवाजी महाराजांच्या राज्यात दहशत निर्माण करणे याच उद्देशाने खानाने तिर्थक्षेत्रावर हल्ले केले असावे, असे म्हटले जाते. वाईकडे जात असताना फलटण जवळ बजाजी निंबाळकर यास पकडून खानाने मोठी खंडणी वसुल केली अशा परिस्थितीत मावळ प्रांतातील आपल्या किल्ल्यांची व्यवस्था लावून शिवाजी महाराजांनी जावळी खोऱ्यात आपला मुक्काम हलवला. जावळीचा प्रदेश हा जंगलमय असून लष्करी हालचालीच्या दृष्टीने वैशिष्टयपूर्ण होता. प्रतापगडावर येऊन शिवाजी महाराजांनी या भौगोलिक स्थितीचा फायदा करून घेण्याचे ठरविले. त्यावेळेस शिवाजी महाराजांजवळ १० हजार पायदळ असावे व १० हजार घोडदळ असावे असा उल्लेख सभासद बखरीत आहे. खानाजवळ १२ हजार स्वार व १० हजार पायदळ असावे. याशिवाय मोठ्या व लहान पहाडी तोफाही असाव्यात असा अंदाज आहे. जावळीचा प्रदेश किती कठीण आहे याची जाणीव खानालाही होती. म्हणूनच कृष्णाजी भास्कर कुलकर्णी या

आपल्या वकिलाला शिवाजी राजांकडे पाठवून त्यास वाईला भेटीस बोलवावे, असे खानाने ठरविले. तसा निरोप घेऊन आपला वकिल त्याने शिवाजी महाराजांकडे पाठविला. खानाच्या विनंतीस मान्यता देऊन पंतोजी गोपीनाथ बोकील या आपल्या वकिलाला शिवाजी महाराजांने निरोप घेऊन खानाकडे पाठविले शिवाजी राजांना अफझलखानाची भेट घेण्याची भिती वाटत आहे अशी माहिती मराठ्यांच्या वकिलाने खानाला दिली. वाईस येण्याऐवजी आपणच जावळीस येऊन भेटल्यास तर बरे होईल, असा प्रस्ताव खानासमोर ठेवण्यात आला. तो स्विकारून खानाने गुरूवार १० नोव्हेंबर यादिवशी प्रतापगडाच्या माचीवर शिवाजी महाराजांची भेट घेण्याचे निश्चित केले.

### अ- भेटीची पूर्वतयारी आणि ऐतिहासिक भेट

अफझलखानाने प्रस्ताव ठरवल्यावर भेटीचा दिवस आणि अटी ठरवण्यात आल्या १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या माचीवर मध्यान्ह वेळी भेटीसाठी ठरवलेल्या मंडपात दोघांनीही भेटावे. दोनपेक्षा अधिक अंगरक्षक बरोबर आणू नयेत दोघांचे प्रत्येकी दहा अंगरक्षक बाणाच्या टप्प्यात उभे राहतील असे ठरविले. दोन्ही नेत्यांना सशस्त्र येण्याची परवानगी दिली. प्रतापगडाच्या माचीवर अलीशान मंडप घालण्यात आला तो उत्तमरित्या सुशोभित करून आतमध्ये गालीचा टाकून बैठक व्यवस्था करण्यात आली. वाईपासून प्रतापगड पर्यतच्या रस्त्यावर दोन्ही बाजूला असलेल्या घनदाट जंगलात शिवाजीने नियोजितपणे सैन्य लपवून ठेवले. तोफांच्या आवाजाची निशाणी ठरविण्यात आली. खान दगा करणार याची कल्पना असल्यामुळे शिवाजी राजांनी स्वरक्षणासाठी चिलखत आणि शिरस्त्राण घातले. हातात पट्टा आणि दुसऱ्या हातात कृपाण म्हणजे लहान तलवार शिवाजी महाराजांनी घेतली. सभासद म्हणतो, हातात एक बिचवा आणि वाघनखे चढविले. जिवा महाला आणि संभाजी कावजी हे दोन हुद्देकरी बरोबर घेतले खानाच्या बरोबरही हुद्देकरी कृष्णाजी भास्कर आणि सय्यद बंडा हा धारकरी होता. शिवाजी महाराजानी हरकत घेतल्यानंतर सय्यद बंडाला सदरेबाहेर पाठविण्यात आले.

शिवाजी महाराज सदरेत प्रवेश करताच खानाने आलिंगन देण्यासाठी हात पसरले. संकट पुढे उभे राहिल्याची खात्री शिवाजी राजांना पटली. ग. ह. खरे म्हणतात त्याप्रमाणे या भेटीत दोघांपैकी कुणाचातरी निकाल लागणार हे ठरलेलेच होते. शिवाजी राजांना बाहुपाशात घेऊन त्याचे मस्तक खानाने दाबून धरले. त्यानंतर खानाने शिवाजी राजांच्या डाव्या कुशीत खंजीर खुपसले यावेळी सावध चित्त असलेल्या शिवाजी राजांनी मोठ्या चपळाईने आपली मान सोडवून घेतली. अंगात चिलखत असल्यामुळे खानाने केलेला वार निष्फळ ठरला. शिवाजी राजांनी आपल्या हातातील तिक्ष्ण तलवार खानाच्या पोटात खुपसून त्याची आतडी बाहेर काढली. 'मारिले! मारिले! दगा दिधला बेगी धावा' असा खानाने आक्रोश केला. खानाचा सेवक कृष्णाजी भास्कर याने शिवाजीराजांवर करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो चुकवून शिवाजी महाराजांनी त्या सेवकाला ठार केले. खान पडल्याचे लक्षात येताच अंगरक्षक धावून आले. सय्यद बंडा शिवाजी राजांवर चवताळून धावून गेला. परंतु जिवामहालाने बंडाला ठार मारले.

प्रतापगडावर गेल्यानंतर शिवाजी महाराजांनी इशारकीचा आवाज करविला. वेगवेगळ्या टापूत मराठ्यांची सेना पूर्व नियोजित संकेतानुसार विखुरलेले होती. इशारकीचा आवाज येताच मराठी सेना सैन्यावर तुटून पडली. कान्होजी जेधे, बाजी सर्जेराव, सिलिंमकर सरदेशमुख, कमळोजी साळूंखे, रामजी पांगेरा यांनी अतुल्य पराक्रम गाजविला. विजापूरी फौज सैरावैरा धावत सुटली. खानाचा मुलगा फाजलखान व मुसेखान प्रतापराव मोऱ्यांच्या साहाय्याने जावळीतून कसेबसे बाहेर पडले.

### ब- अफझलखान प्रसंगाचे महत्त्व

मराठ्यांच्या इतिहासात अफझल प्रसंगाला अनन्य साधारण महत्व आहे. पगडी म्हणतात 'महाराष्ट्र राज्य १० नोव्हेंबर १६५९ रोजी खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले'. खानाच्या वधानंतर युद्धात शिवाजी महाराजांच्या बाजूने पराक्रम गाजविणाऱ्या देशमुखांचा बक्षिसी देऊन गौरव करण्यात आला. त्यांची इनामे त्यांच्याकडेच राहतील असा दिलासा देण्यात आला. खंडोजी घोरपड्यांसारख्या विश्वास घातक्यास शासन करून मावळ भागात शिवाजी महाराजाने जरब निर्माण केली. सारा मावळ प्रांत शिवाजी राजांकडे आदराने पाहू लागला. खानासारख्या बलाढ्य सरदार बळी पडल्याचे वृत्त ऐकून विजापूर दरबाराची झोप उडाली. मोगलांनाही शिवाजी राजांच्या सामर्थ्याची कल्पना आली. मराठ्यांमध्ये तर इतका आत्मविश्वास निर्माण झाला की खानाचा वध करून १८ दिवस लोटतात न तोच त्यांनी पन्हाळ्यासारखा दुर्गम दुर्ग २८ नोव्हेंबर १६५९ रोजी जिंकून घेतला. त्यानंतर विजापूरकरांतर्फे रुस्तुमजमा, फाजलखान आणि अन्य काही सरदार मराठ्यांवर चालुन आले. पण डिसेंबर १६५९ मध्ये त्यांचाही पराभव करण्यात आला.

## ४.७ शिवाजी महाराज आणि सिद्दी जौहर

सिद्दी जोहर या आदिलशाही सरदाराने २ मार्च १६६० रोजी पन्हाळ्याला वेढा दिला. त्याच्याबरोबर फाजलखान, बाजी घोरपडे, भाईखान, सिद्दी मसऊद इत्यादी सेनानी होते. सिद्दी जौहर बरोबर १५००० सैन्य असल्याचा उल्लेख इंग्रजी पत्रांतून सापडतो. राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांनी जौहरच्या मदतीस हेन्री रेव्हिंग्टन यास १ तोफ व दारूगोळा बरोबर देऊन पाठविले होते. सिद्दीचा वेढा पावसाळ्यात ढिला होईल व आपणास त्याच्याशी सलोखा करता येईल हा महाराजांचा अंदाज असावा, पण तो खरा ठरला नाही. याच काळात मुघल सरदार शायिस्तेखान प्रचंड फौज घेऊन मे १६६० मध्ये पुण्यात येऊन दाखल झाला. या घटनेमुळे चिंताग्रस्त झालेल्या शिवाजी महाराजांनी वेढ्यातून निसटण्याचा विचार सुरू केला. जिजाबाईच्या आदेशानुसार नेताजी पालकर व सिद्दी हिलाल यांनी बाहेरून वेढा मोडून काढण्याची शिकस्त केली. परंतु त्यात त्यांना यश आले नाही, असा उल्लेख शिवभारतात सापडतो. अखेरीस जून १६६० मध्ये शिवाजीराजांनी जौहरशी तहाचे बोलणे सुरू केले. त्यामुळे वेढ्याला शिथिलता प्राप्त झाली. मुसळधार पावसाच्या जुलै महिन्यात गुरूवार दि. १२ जुलै १६६० च्या रात्री शिवाजी राजे निवडक लोकांसह पन्हाळ्यातून बाहेर पडले.

वादळी हवा, मुसळधार पाऊस अशा परिस्थित शिवाजी राजांना ४० मैल अंतर कापून विशाळगडाकडे जायचे होते. राजांनी गड सोडल्यावर काही वेळातच सिद्दीच्या लक्षात आले व त्यांनी पाठलाग सुरू केला. गजापूरच्या खिंडीपर्यंत शिवाजी महाराज पोचले. परंतु ५,६ मैलांचे अंतर तोडावयाचे होते. त्यातही आणखी एका संकटाची चाहूल त्यांना लागली. विजापूर दरबारने जसवंतराव दळवी व सूर्यराव सूर्वे या मराठे सरदारांना विशाळगडाला वेढा घालण्याचा हुकूम केला होता. हा वेढा मोडून गडावर प्रवेश करावा लागणार होता. सिद्दी मसुउदची फौज चपळाईने मार्गावर होती. अखेरी बाजीप्रभू देशपांडे यांनी गजापूरच्या खिंडीत मसउदची फैाज रोखून धरण्याचा निर्धार केला त्यानुसार सैन्यास अडविण्यात आले. बाजी प्रभुने पराक्रमाची शिकस्त केली. सुमारे 'प्रहर दीड प्रहर पावेतो फौज खिंड चढो दिली नाही' (९१ कलमी बखर) विशाल गडाचा वेढा फोडून शिवाजी महाराज गडावर पोहचले व इशाऱ्याच्या तोफा वाजवल्या, या आवाजाबरोबरच बाजीप्रभुने प्राण सोडले.

munotes.in

सिद्दी मसऊद ने नंतर विशाळगडासही वेढा दिला. परंतु मराठ्यांनी किल्ला लढवल्यामुळे तो परत फिरला. पुढे २२ सप्टेंबर १६६० रोजी सिद्दी जौहरशी तह करून पन्हाळगड विजापूरच्या स्वाधीन केला. अफझलखान व पाठोपाठ सिद्दी जौहर या दोन बलाढ्य विजापूरी सरदारांना धडाडीने लढा देऊन शिवाजींनी राजापूरच्या इंग्रजांनाही धडा शिकवला. शिवाजी राजांचे हे अभूतपूर्व यश पाहून विजापूर दरबारने मे १६६१ मध्ये मराठ्यांशी तह करून तात्पुरत्या काळासाठी मराठ्यांशी संघर्ष थांबविला.

## ४.८ मराठे विजापूर संघर्ष १६७२ व नंतर

शायिस्तेखानाच्या आगमनापासून मराठ्यांचा मुघल सत्तेशी संघर्ष सुरू झाला. तो सातत्याने पुढील दहा वर्ष सुरु राहिला या संघर्षातील सरशीमुळे मराठ्यांमधील आत्मविश्वास वाढून त्याने आदीलशाही परिसरात पुन्हा हल्ले करण्याचे सत्र सुरू केले. इ.स. १६७२ मध्ये अली आदीलशहाचा मृत्यू आणि रूस्तुम झमनचे बंड यामुळे विजापूर दरबारात अस्थिरता निर्माण झाली अशाच परिस्थितीत पन्हाळा पुन्हा मिळवावा म्हणून १६७३ मध्ये मराठ्यांनी पन्हाळ्यावर हल्ला करून तो जिंकला व पुढील काही महिन्यात परळी, सातारा, हुबळी बालघाट अश्या सर्व प्रदेशांवर आपला वचक बसविला.

विजापूर दरबारचा पठाण बहलोलखान याने दरबारावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले व मराठ्यांना लढा देण्यास सुरूवात केली. यातूनच प्रतापराव गुजर आणी बहलोल खान यांच्यात १६७३ मध्ये विजापूर पासून ३६ मैलांवर असलेल्या उमराणी या ठिकाणी युद्ध झाले. या युद्धात बहलोलच्या माघरीनंतर प्रतापरावांनी तह करून त्याची सुटका केली. या घटनेमुळे शिवाजी राजांनी प्रतापरावांच्या चुकीच्या निर्णयावर त्यांची निर्भत्सना केली. अपमान व दु:ख या संमिश्र भावनांमधून प्रतापरावांनी २४ फेब्रु. १६७४ रोजी केवळ सहा सहकार्यांना बरोबर घेऊन कोल्हापूर जवळील नेसरी येथे बहलोलच्या छावणीवर हल्ला केला. या हल्ल्यात ते धारातीर्थी पडले. या घटनेने मराठा सत्तेची मोठी हानी झाली व शिवाजी महाराजांनाही दु:ख झाले. हंबीरराव मोहीते यांस सेनापती पद देऊन त्यांनी विजापूर विरूद्धचा लढा सुरू ठेवला. पुढे मुघल व विजापूर यांच्यात संघर्ष सुरू झाल्यामुळे मराठे व विजापूर संघर्ष संपुष्टात आला.

## ४.९ सारांश

मराठ्यांच्या राज्यनिर्मितीच्या कार्याची सुरुवात आदिलशाही प्रदेशांतून झाल्यामुळे पहिला संघर्षही आदिलशाही विरुध्द झाला. या संघर्षात तुटपुंज्या सामुग्री व सैन्यासह अत्यंत नियोजन पूर्वक धाडसी पध्दतीने आदिलशाही विरुध्द मराठ्यांनी विजय मिळवला. मराठेशाहीचा उदय होण्यास या धाडसी विजयांचा मोठा परिणाम झालेला दिसतो. आदिलशाहीच्या आक्रमतेला शिवाजी महाराजांनी धाडसाने तोंड देऊन मराठेशाहीचे अस्तित्व टिकवले.

## ४.१० प्रश्न

१) शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील जावळी प्रकरणाचे महत्त्व सांगा.

२) जावळी प्रकरणाच्या विशेष संदर्भात मराठे - विजापूर संबंधाचे परिक्षण करा.

३) अफझलखान प्रसंगाच्या विशेष संदर्भासह मराठे व विजापूर यांच्यातील संघर्षाची माहिती द्या.

४) इ.स.१६४८-१६६० या कालखंडातील मराठे व विजापूर यांच्या संबंधांचा आढावा घ्या.

## ४.११ संदर्भ

१. डॉ. देशपांडे प्र. न. ‘मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष’ स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००१.

२. डॉ. देव प्रभाकर, ‘मराठ्यांचा इतिहास’ विद्याप्रकाशन

३. डॉ. पवार जयसिंगराव, ‘मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त, अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

४. डॉ. कोलारकर शं. गो. ‘मराठ्यांचा इतिहास’

❖❖❖❖

munotes.in

# ५

# छत्रपती शिवाजी महाराज आणि मुघल संबंध

**घटक रचना :**

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ मुघल मराठे संबंध १६६०

५.३ शिवाजी महाराज व शायिस्तेखान

५.४ सुरतेची लुट - १६६४

५.५ मिर्झा राजे जयसिंग व शिवाजी महाराज

५.६ आग्रा भेट व सुटका - १६६६

५.७ मुघल मराठा संघर्ष - १६६७-७०

५.८ मुघल मराठा संघर्ष - १६७१-७४

५.९ शिवाजी महाराज : एक अलौकिक व्यक्तीमत्व

५.१० सारांश

५.११ प्रश्न

५.१२ संदर्भ

munotes.in

## ५.० उद्दिष्टये

मराठेशाहीचे स्थानिक तसेच दिल्लीच्या मुघल सत्तेशी अनेक संघर्ष झाले. या संघर्षातून मराठ्यांचे स्वराज्य निर्माण झाले. सुरूवातीपासून विजापूरच्या आदिलशाहाशी संघर्ष करून मराठ्यांनी जहांगिरी व्यतिरिक्त काही प्रदेश मिळवला होता. परंतु तो वाढवणे गरजेचे असल्याने दक्षिणेत उतरलेल्या मोगल सत्तेशीही संघर्ष करणे अटळ होते. या संघर्षाचा आढावा घेऊन त्यातून स्वराज्यनिर्मिती छ. शिवाजी राजांनी कशी केली हे समजून घेणे गरजेचे आहे. जावळीवरील आक्रमण व अफजलखान प्रकरणानंतर शिवाजी महाराज स्वराज्य निर्मिती करू शकेल, असा विश्वास सगळ्यांमध्ये निर्माण झाला. इ.स. १६४९ पासून शिवाजी राजांच्या कारकिर्दीच्या अखेरीपर्यंत मुघल व मराठे यांच्यातील संबंध तणावाचे राहिले. या संबंधीचे परिक्षण आपण या पाठात करणार आहोत.

## ५.१ प्रस्तावना

दक्षिणेत सुभेदार म्हणून आल्यावर औरंगजेबाने आदिलशाही मुलुखावर हल्ले करण्याचे धोरण स्वीकारले. त्याच्या सुभेदारीच्या पहिल्या काही वर्षात मुघलांना दुखवायचे नाही हे धोरण शिवाजी महाराजांनी स्वीकारले. त्यामुळे १६५७ मध्ये मुघल सैन्य औरंगजेबाच्या नेतृत्वाखाली बिदर, कल्याण व कोकणातील निजामशाही किल्ले घेण्यासाठी आले होते, त्यावेळेस शिवाजी राजांनी आपला प्रदेश सुरक्षित कसा राहिल, यावर अधिक लक्ष दिले. याच वर्षी मोगल बादशाह शहाजहान आजारी पडल्याचे वृत्त समजल्यामुळे औरंगजेब हाती घेतलेली मोहिम लवकर उरकून उत्तरेकडे निघून गेला. याच दरम्यान मुघल व मराठे यांचा पहिला संघर्ष ३० एप्रिल १६५७ या दिवशी झाला. जुन्नरच्या मुगल ठाण्यावर हल्ला करून शिवाजी महाराजांनी येथील छावणीची लूट केली. तर जून मध्ये अहमदनगरच्या किल्ल्यावर हल्ला करून औरंगजेबाला आश्चर्यकारक धक्का दिला. पुढे ५ जून १६५९ रोजी औरंगजेबाने स्वतःस 'बादशहा' म्हणून जाहीर करून घेतले. या काळात औरंगजेबाचे अभिनंदन करण्यासाठी शिवाजी राजांनी आपला वकील पंताजी गोपीनाथ यास दिल्लीकडे पाठवले. बादशहानेही शिवाजी राजांसाठी मानाची वस्त्रे पाठवून सख्य जोडण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीही शिवाजी महाराजांनी उत्तर कोकणची स्वारी केल्यामुळे हा सलोखा बादशहा औरंगजेबाबरोबर फार काळ टिकला नाही.

## ५.२ मुघल - मराठे संबंध १६६०-६६

१६५९ मध्ये शायिस्तेखान यांस दक्षिणेची सुभेदारी देण्यात आली. मुघल दरबारात बादशहाचा मामा म्हणून त्यांस विशेष प्रतिष्ठा होती. बादशहा म्हणून सत्तेवर आल्यावर औरंगजेबाने शायिस्तेखानची दक्षिणेकडे नेमणूक करण्याची काही विशिष्ट कारणे होती.

अफजलखानासारख्या बलाढ्य सरदाराविरूद्ध प्रचंड विजय मिळवल्याने शिवाजी राजांचे नेतृत्व सामर्थ्यशाली बनत जाईल व काही काळाने तो मुघल साम्राज्यालाही जड होईल, अशी भिती औरंगजेबाला वाटत होती. तेव्हा त्याचा बंदोबस्त करण्यासाठी मातब्बर सरदाराची नेमणूक करणे गरजेचे होते. दिल्लीची सत्ता मिळवण्याआधी शिवाजी महाराजावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य औरंगजेबाने आदिलशहाकडे सोपवले होते, परंतु त्यास ते जमले नाही. दक्षिणेतील ही नाजूक परिस्थिती हाताळण्यासाठी अनुभवी सरदाराची गरज आहे, हे जाणवल्याने औरंगजेबाकडून शायिस्तेखानची नियुक्ती करण्यात आली. पूर्वी शायिस्तेखानाने औरंगजेबास गोवळकोंड्याच्या स्वारीत सहाय्य केले होते. त्यामुळे शायिस्तेखानास दक्षिणेकडील राजकारणाचाही अनुभव होता. शायिस्तेखान हा शूर सेनापती, अनुभवी शासक आणि मोठा मुत्सद्दी होता. म्हणूनच त्याची नेमणूक शिवाजी राजांच्या विरुद्ध करण्यात आली.

## ५.३ शिवाजी महाराज व शायिस्तेखान

२८ जानेवारी १६६० रोजी शायिस्तेखान मोठ्या सैन्यासह अहमदनगरकडे निघाला. सुमारे १४ दिवसानंतर तो अहमदनगर येथे पोहचला. या वेळेला शिवाजी राजे मिरज येथे होते. सूपे, बारामती या प्रदेशांमार्गे खानाचे सैन्य शिरवळ पर्यंत येवून पोहचले. आपल्या सैन्याचे दळणवळण तुटु नये म्हणून सैन्याच्या तुकड्या ठिकठिकाणावर ठेवण्याची खबरदारी खानाने घेतली होती. शिरवळहून सासवड मार्गे मे १६६० मध्ये शायिस्तेखान पुण्यात आला. परंतु पुण्याच्या भोवतालचा प्रदेश ओसाड झाल्यामुळे मुघली सैनिकांना व जनावरांना आवश्यक असणाऱ्या

साहित्याचा तुटवडा निर्माण होऊ लागला. परिणामी शायिस्तेखानाने जून महिन्यात पुण्यातील तळ हलवून जवळच असणाऱ्या चाकण येथे मुख्य तळ प्रस्थापित केला.

२१ जून १६६० ला शायिस्तेखानाने चाकणच्या किल्ल्यास वेढा दिला. हा किल्ला लहान गढी प्रमाणे असून त्याचा आकार चौकोनी होता. चार टोकांवर चार आणि मध्ये १ असे भक्कम बुरूज होते. किल्याभोवती सुमारे ३० फुट खोल व १५ फूट रूंद असा खंदक होता. खंदकाच्या बाहेर संरक्षक भिंत होती. तर प्रत्येक बुरूजावर तोफा होता. फिरंगोजी नरसाळा हा या भक्कम किल्ल्याचा किल्लेदार होता. वेढा घातल्यानंतर पुढील दोन महिने पावसाळ्यामुळे फारसे यश मिळाले नाही. पण नंतर मात्र तटाच्या भिंती सुरूंगाने उडवून मुघलांनी किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. तेव्हा झालेल्या लढाईत फिरंगोजीने आपल्या सहकाऱ्यांसह पराक्रमाची शर्थ केली. त्याने प्रभावीत झालेल्या शाहिस्तेखानाने फिरंगोजीला मुघलांची चाकरी देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यास प्रतिसाद न देता फिरंगोजीने किल्ला लढवला. एक किल्ला जिंकण्यासाठी लागलेले ३-४ महिने पाहून शाहिस्तेखान आश्चर्यचकित झाला.

**कारतलबखानचा पराभव :-**

शाहिस्तेखानाच्या या मोहिमेच्या दरम्यान पन्हाळगडाच्या वेढ्यांतून सुटून शिवाजी महाराजांनी आपले लक्ष मुघलांच्या ताब्यात असलेल्या कल्याण प्रांताकडे वळवले. उत्तर कोकणातील कल्याण व भिवंडी हे महत्त्वाचे प्रदेश होते. शाहिस्तेखानानेही हा प्रदेश जिंकण्यासाठी कारतलबखान या सरदारची नियुक्ती केली होती. कारतलब खान हा शूर सेनानी असून त्याला या प्रदेशाची माहिती होती. त्यांच्याबरोबर काही रजपूत सरदारही होते. या मोहिमेची बातमी शिवाजी राजांना राजगडावर असताना मिळाली. त्यावेळेस कारतलबखानला या प्रदेशात येण्यापासून थांबवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पुण्याहून निघालेले मुघली सैन्य लोहगडमार्गे बोर घाटातून कोकणात उतरू लागले. ही वाट डोंगर दऱ्यांची असल्याने तेथेच मुघलांना अडवण्याची योजना शिवाजी राजांनी आखली. दाट जंगल, खडतर रस्ते पार करीत हे सैन्य उमराखिंडीत आले. अशावेळी पूर्वी ठरवल्याप्रमाणे नेताजी पालकरने मुघली सैन्याची वाट अडवली. तसेच मागे फिरण्याचा मार्गही रोखून धरला. अवघड ठिकाणी मुघलांना अडकवून मराठे सैनिकांनी हल्ला केला. त्यावेळेस शरणागती पत्करल्याशिवाय दूसरा मार्ग नव्हता म्हणून कारतलबखानाने आपल्या जवळील युद्ध साहित्य, मौल्यवान समानसुमान हत्ती व घोडे देऊन आपली सुटका करून घेतली. या घटनेनंतर त्याला पुण्यात परत यावे लागले. खानाचा हा पराभव खूप मोठा होता. या घटनेमुळे आत्मविश्वास वाढलेल्या मराठ्यांनी उत्तर व दक्षिण कोकणात आपले नियंत्रण वाढवण्याचा प्रयत्न केला.

**शाहिस्तेखानावरील छापा:-**

चाकणच्या विजयानंतर सुमारे २ वर्ष शाहिस्तेखान पुण्यात तळ ठोकून होता. परंतु त्याच्यावर हल्ला करून पराभूत करणे मराठ्यांना शक्य नव्हते. लाल महालात मुक्काम ठोकून खानाने आपल्या फौजा विविध प्रदेशात पाठविल्या होत्या. मराठी प्रदेशांची लूट कडून सामान्यांवर अत्याचार सुरू होते. शाहिस्तेखान स्वतः पुणे सोडून जाईल याची अपेक्षा नव्हती. त्यामुळे लाल महालात शिरून रात्रीच्यावेळी शाहिस्तेखानावर हल्ला करून त्याला ठार करून मुघली सैन्यात गोंधळ उडवून द्यायचा असे शिवाजी महाराजाने ठरविले. आपल्यातील योजकता, चपळाई आणि धाडस दाखवून शाहिस्तेखानाच्या छावणीवर छापा घालण्याची तयारी मराठ्यांनी केली. सिंहगडावरून ४०० निवडक सैनिक घेऊन ६ एप्रिल १६६३ या दिवशी हल्ला करण्याचे निश्चित केले. मराठा सैन्य ५ एप्रिलला सिंहगडावरून निघाले. एक दिवसाचा प्रवास करून रात्रीच्या वेळी पुण्यात आले. आपण पाहऱ्यासाठी गेलो असून आता परत येत आहोत, असे सांगून

पुण्यात प्रवेश केला. लाल महालाची बारीक सारीक माहिती असल्यामुळे योग्य ठिकाणावरून प्रवेश करणे कठीण गेले नाही. तो रमजानचा महिना असल्यामुळे उपास सोडून सर्व सैनिक विश्रांती घेत होते. महालाच्या मागील बाजूस पाकगृह होते. तेथील बंद केलेला कच्चा दरवाजा मराठ्यांनी फोडण्यास सुरूवात केली. त्याच मार्गाने आत शिरून स्वयंपाकगृहातील आचाऱ्यांना ठार करून चिमणजी देशपांडे आणि बापूजी यांच्या पाठोपाठ आणखी २०० लोक आत घुसले. शिवाजी महाराज थेट खानाच्या खोलीपर्यंत पोहचले. तोपर्यंत सुरू झालेल्या आरडा ओरड्यामुळे खान सावध झाला होता. त्यांने आपली तलवार उचलून पुढे जाईपर्यंत शिवाजी महाराजांच्या हल्ल्याने त्याची बोटे तुटली. तेवढ्यात मेणबत्त्या विझवून अंधार झाला आणि खान निसटला. मराठे सरसकट कत्तल करत सुटले. यात शाहिस्तेखानचा मुलगा अबुल फतेहखान व काही स्त्रीया मृत्युमुखी पडल्या. मराठ्यांचेही १६ लोक मृत्यु पावले तर ४० जखमी झाले. इतर सैनिकांना या घटनेचा पत्ता लागेपर्यंत शिवाजी महाराज आपल्या सैन्यासह बाहेर पडले. या घटनेचा मोठा धक्का शाहिस्तेखानला बसला व त्याने ८ एप्रिलला पुणे सोडण्याचा निर्णय घेतला. यातूनच शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा मोठेपणा दिसून येतो. यानंतर ताबडतोब शाहिस्तेखानची बंगाल मध्ये बदली करुन औरंगजेबाने शहजादा मुअज्जम यांस दक्षिणाच्या सुभेदारीवर नेमले.

## ५.४ सुरतेची लूट (१६६४)

शाहिस्तेखानाच्या घटनेनंतर शिवाजी राजांनी आणखी एक धाडसी योजना आखली. या योजनेनुसार सुरत ही मुघल साम्राज्यातील महत्त्वाची व्यापारी पेठ लुटून संपत्ती मिळवणे हा हेतू होता. सुरत हे गेल्या ३ वर्षात मुघली साम्राज्यातील वाहतुकीचे मोठे बंदर होते. तसेच इंग्रज व डच यांसारखे परकीय व्यापारी ही तेथे होते. मुघलांच्या आश्रयामुळे हे पाश्चात्य वखारवाले उन्मतपणे वागत असत. या संपन्न शहराला संरक्षण अवस्था मात्र अपुरी होती. म्हणूनच येथील व्यापारी पेठ लुटण्याचे धाडस मराठ्यांनी केले. आपल्या सैन्यासह राजगडाहून निघून सुमारे ३०० मैलाचा प्रवास करून ५ जानेवारी १६६४ रोजी शिवाजी महाराज आपल्या सैन्यासह सूरतेजवळ आले. ही बातमी तेथील सुभेदार इनायत खान यांस मिळाली. सुरतेत आल्यानंतर शिवाजी महाराजांनी आपला दूत इनायत खानाकडे व व्यापाऱ्याकडे पाठविले. परंतु शिवाजी महाराजांच्या मागणीकडे इनायत खानाने पूर्णतः दुर्लक्ष केल्यामुळे मराठा सैनिकांनी सुरतेवर आक्रमण करण्याचे ठरविले. शहराचा बंदोबस्त करण्याची क्षमता नसलेला इनायत खान स्वतः किल्ल्याच्या आश्रयाला गेला. त्यामुळे मराठ्यांना शहर लुटणे सहज शक्य झाले.

दि.६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सुरतेत प्रवेश करून शिवाजींनी हाजी सईद बेग, हाजी कासीम आणि बहरजी बोहरा या धनाढ्य व्यापाऱ्यांना भेटीस बोलावून खंडणीची मागणी केली ती न स्वीकारल्यामुळे मराठी सैनिकांनी लुटालुटीस सुरूवात केली. दिनांक ६ ते १० जानेवारी पर्यंत मराठा सैन्य धनिकांच्या हवेल्या खणून काढून धन गोळा करत होते. यात २८ शेर मोती, हिरेमाणके इ. मिळाले ते किती प्रमाणात मिळाले याची तर मोजदादच होऊ शकली नाही. याचवेळी इनायत खानाने कपटाने शिवाजी राजांवर मारेकरी पाठवला. पण त्याचा कट यशस्वी होऊ शकला नाही. औरगांबादहून मुघलांचे सैन्य सूरतच्या संरक्षणासाठी येत असल्याची बातमी मिळाल्यानंतर १० जानेवारीला मराठे सुरतेतून बाहेर पडले. याकाळात इंग्रज आणि डच वखारवाल्यांनी मात्र स्वसंरक्षणासाठी प्रतिकार केला. त्यामुळे त्यांना न दुखवता शिवाजी महाराज सुरत मधून बाहेर पडले. ही बातमी औरंगजेबाला लाहोर येथे समजली. त्यानंतर शिवाजीचा पक्का बंदोबस्त करणे आवश्यक आहे. या विचाराने औरंगजेबाने मिर्झा राजा जयसिंग या थोर सेनापतीची नियुक्ती केली.

## ५.५ मिर्झा राजे जयसिंग व शिवाजी महाराज

शिवाजी महाराजांच्या वाढत्या सामर्थ्याचा बंदोबस्त करण्यासाठी जयसिंग व दिलेरखान या आपल्या दोन विश्वासु, अनुभवी व पराक्रमी सरदाराची औरंगजेबाने शिवाजी महाराजांच्या विरूद्ध नेमणूक केली. दाउदखान, कुतूबुद्दिन, सृजनसिंग तोफखान्यासाठी निकोलास् मनुची तसेच इतर सेनानाही मिर्झा राजे जयसिंग यांच्याबरोबर पाठवण्यात आले. जयपुरच्या कच्छवा रजपूत कुलातील मिर्झा राजा जयसिंग हा थोर सेनापती होता. गंभीर, कुशाग्र बुद्धीमत्ता असणारा प्रचंड अनुभवी आणि अत्यंत पराक्रमी असलेल्या कोणत्याही प्रकारच्या लढ्यात हमखास विजय प्राप्त करून देणारा हा बादशहा औरंगजेबाचा अत्यंत निष्ठावंत सेवक होता. युद्धकलेत निपुण तितकाच राजकारणातही प्रविण होता. त्याच्या या गुणांमुळेच औरंगाजेबाने पूर्ण विश्वासाने दक्षिणेच्या स्वारीची जबाबदारी त्याच्याकडे दिली.

प्रचंड फौज, मातब्बर हिंदू व मुसलमान सरदार व अद्यावत शस्त्रास्त्रे घेऊन जयसिंग ९ जानेवारी १६६५ रोजी नर्मदा नदी ओलांडून १० फेब्रुवारी रोजी औरंगाबाद येथे पोहचला. आपली स्वारी करण्यासाठी त्याने औरंगजेबाकडून तीन मागण्या मान्य करून घेतल्या. दक्षिणेच्या सुभ्यातून लागतील तेवढे पैसे खर्च करण्यासाठी मुभा त्याने मागून घेतली. दुसरी मागणी म्हणजे दक्षिणेतील मोगल किल्लेदारांनी जयसिंगाचे हुकूम पाळले पाहिजे व कैद्यांची व्यवस्था केली पाहिजे. मोगल फौजेतील अधिकाऱ्यांच्या रजा वगैरे मंजूर करण्याचा अधिकार आपल्याला मिळाला पाहिजे, ही जयसिंगाची तिसरी मागणी होती. औरंगजेबाने या मागण्या मान्य केल्या. अशा प्रकारे दक्षिणेच्या स्वारीचे तिन्ही संपूर्ण अधिकार प्राप्त करून घेऊन जयसिंगाने शिवाजी महाराज विरूद्ध काळजीपूर्वक हालचाली करण्यासाठी सुरूवात केली.

### अ) मोहिमेची सुरूवात :-

शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची भौगोलिक माहिती काळजीपूर्वक जमा करून दक्षिणेतील राजकारणाचा जयसिंगाने बारकाईने अभ्यास केला. शिवाजी महाराजांचे शत्रू ओळखून त्यांच्याशी संधान बांधण्याचीही सुरूवात झाली. जावळीचे मोरे, जव्हारचा राजा यांना जयसिंगाने आपल्या गोटात ओढले. पोर्तुगीज, डच व इंग्रज वखारवाल्यांनी शिवाजी महाराजाला कोणतेही साहाय्य करू नये म्हणून खास आदेश पाठवले त्यानंतर विजापुरच्या आदिलशहावर नजर ठेवण्यासाठी काही अफगाणांना तेथे पाठवून दिले. कल्याणच्या उत्तरेकडील कोळी, वतनदार तसेच अफजलखानाचा मुलगा फझलखान अशा सर्वांना एकत्र आणून शिवाजी महाराजाला एकटे पाडण्याचे राजकारण जयसिंग याने यशस्वीपणे केले. या संदर्भातील तपशील त्याने औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रांमधून मिळतो. या पत्रांचा संग्रह 'हफ्ता अंजुमन' या नावाने प्रसिद्ध आहे. दि.३ मार्च रोजी पुणे या ठिकाणी येऊन पुढील ३ महिने युद्धाची तयारी व प्रत्येक हालचालीची बारकाईने आखणी जयसिंगाने केली. पुण्याला आल्यानंतर जयसिंगाने आपली ठाणी मजबूत करण्यावर प्रथम भर दिला. शिवाजी महाराजाच्या स्वराज्यात या सुमारास पुणे, कोल्हापूर, सातारा, कुलाबा या जिल्ह्यातील काही परगणे होते. महत्वाचे किल्लेही शिवाजी राजांच्या ताब्यात नव्हते. पन्हाळा विजापूरकरांना परत दयावा लागणार होता. या लहान स्वराज्याची नाकेबंदी करण्यासाठी जयसिंगाने ठिकठिकाणी मोगल सरदार पाठवून कडे निर्माण केले. काही तुकड्या शिवाजी महाराजांना मुख्य किल्ल्याकडे पाठवून त्यांनी आजूबाजूचा प्रदेश बेचिराख करावा असा आदेश दिला. औरंगजेबाने जयसिंगास कोकण भागात प्रथम चाल करावी अशी सूचना दिली. परंतु ती नाकारून पुण्याजवळच छावणी करणे कसे हितावह आहे, हे त्याने बादशहाला कळविले आणि सासवड याठिकाणी त्याने तळ ठोकला. त्याची कारणमिमांसा करताना जयसिंग बादशहा

औरंगजेबास लिहितो 'सासवड हे शिवाजीचे पुरंदर आणि इतर इलाखे यांना लागून आहे. विजापूरच्या प्रदेशालाही ते जवळ पडते.' सर्व बाजूने कडेकोट बंदोबस्त झाल्यानंतर मोगलांनी पुरंदरवर वेढा दिला. वेढ्याचे अधिपत्य दिलेरखान यांच्याकडे देण्यात आले.

दिलेरखानचा पुरंदरचा वेढा चालू असताना मोगल फौजेच्या तुकड्यांनी साऱ्या स्वराज्यात धुमाकूळ घालण्यास सुरूवात केली. रोहिडा, तुंग, तिकोणा, लोहगड आणि शिवाजी महाराजांची राजधानी असलेला राजगड या किल्याभोवतीचा मुलूख जाळून उदध्वस्त करण्याचा उपक्रम मोगलांनी सुरू केला. मराठ्यांना दहशत बसावी आणि त्याचप्रमाणे पुरंदरच्या किल्ल्यात अडकून पडलेल्यांना कोठूनही रसद मिळू नये, असा दुहेरी हेतू मोगलांच्या या हालचाली मागे होता.

**ब) मराठ्यांचा प्रतिकार :-**

पुरंदर गड हा समुद्र सपाटीपासून ४५६४ फूट उंच असून त्याचे दोन भाग आहेत. एक भाग म्हणजे बालेकिल्ला आणि दुसरी म्हणजे माची पुरंदर या माचीतून सरळ वर जो डोंगर आला आहे, त्यालाच बालेकिल्ला म्हणतात. यास बळकट तटबंदी असून एकच मुख्य दरवाजा होता. पुरंदरला लागूनच दुसरा किल्ला आहे. त्याला वज्रगड अथवा रूद्रमाळा म्हणत याची उंची देखील पुरंदर इतकीच आहे. दोन्ही गडांमध्ये फक्त एक खिंड आहे. तिला भैरवखिंड म्हणत. वज्रगडाहून माची प्रदेशावर ताबा ठेवता येतो. पुरंदरचा मराठा किल्लेदार कोण होता हे ज्ञात नाही परंतु शिवाजीने मुरारबाजी प्रभू यांस यावेळी गडाच्या संरक्षणासाठी पाठविले होते.

दिलेरखानास या वेढ्यातील वज्रगडाचे महत्त्व समजले होते. वज्रगड आणि पुरंदरच्या दरम्यान उत्तरेच्या बाजूने दिलेरखानाने आपले अफगाण सैन्य ३००० सैन्यासह कीरतसिंह त्याच्या उजव्या बाजूस राजा नरसिंग गौर, करण राठोड, जगतसिंह, सय्यद मुकबूल, नीर आतीश, आतीश खान, दिलेरचे पुतणे गैरत आणि मुजफर हे होते आणि याशिवाय जातीने जयसिंग आणि दिलेरखान मोर्च्यावर उभे होते. गडाची मोर्चेबंदी करून गडावर चढाई करण्यामध्ये बहालिया पठाण, रजपूत बुंदले आणि मुघल सैनिक भाग घेत होते. गडावरील मराठे सैनिक देखिल प्रखर प्रतिकार करत होते. तोफा, बंदूक आणि मोठेमोठे दगड यांच्या साहाय्याने गडकरी हल्ले परतवीत होते. दिलेरखानाची धडपड चालली होती. मुघलांच्या तीन प्रचंड तोफा अब्दुलला खान, फतह लष्कर आणि हाहेली (माहेली) या जास्तीत जास्त उंच ठिकाणावर चढवून वज्रगडाच्या व तटबंदीवर मारा करण्याची परंतु मराठ्यांच्या किल्ल्यावरून होणाऱ्या माऱ्या पुढे हे काम जवळ-जवळ अशक्य होते. काही काळाने मुघली तोफांच्या माऱ्याने बुरुज कोसळला. आणि तटाच्या खिंडारावर मुघली सैनिक घुसले. मराठी सैनिकांनी चांगलीच झुंज दिली. दुसरे दिवशी मुघली फौजांनी शिड्यांच्या साहाय्याने किल्ल्याच्या आतील बाजूस घुसण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मोठा निकराचा संग्राम घडून आला. मराठे सैनिकांना शरण जाण्याशिवाय गत्यंतर उरले नव्हते. वज्रगडांवर मुघली निशाण चढले.

एप्रिलच्या मध्यास दिलेरखानाने पुरंदरच्या माचीस वेढा घातला. खंदक आणि मोर्चे खडकाळ भागापर्यंत नेले. मराठी सैनिकांनी कीरतसिंहाच्या मोर्च्यावर रात्रीचा हल्ला केला. परंतु तो त्याने परतवून लावला. पुरंदरचा वेढा तीव्रतेने लढवला जात होता. जयसिंगाने माचीलगतच्या डोंगरावर धमधमे बांधून तोफा वरती चढवून मारा करण्याची योजना आखली, माचीवरील दोन बुरूजांपैकी एकास काळा बुरूज आणि दुसऱ्यास सफेद बुरूज म्हणत. मुघल सैनिकांनी बांधलेल्या धमधम्यावरून या प्रचंड बुरूजावर हल्ला करण्याचे ठरविले. परंतु मराठ्यांनी त्यांचा पहिला प्रयत्न हाणून पाडला. बरेच मुघल सैनिक कामास आले. जयसिंहाचा लष्करी अधिकारी भूपत सिंह हाही कामास आला. तेव्हा दिलेरखानाने सफेद बुरूजाखाली सुरूंग लावण्यासाठी खंदक

खोदण्यास सुरूवात केली. मराठे सफेद बुरूजावरून त्याचा प्रतिकार करीत होते. तेव्हा अचानक तटावरती साठवलेल्या दारूगोळ्याचा स्फोट झाला आणि सफेद बुरूजाला मोठे खिंडार पडले. ८० मराठी सैनिक त्यात ठार झाले. मुघली मोर्चे, सफेद बुरूजापर्यंत सरकले. त्यानंतरच्या दोन दिवसांत मुघली तोफांच्या माऱ्यापुढे काळा बुरूजही मराठ्यांना सोडावा लागला. अशा तऱ्हेने पुरंदरची माची दिलेरखानाच्या ताब्यात गेली.

## क) मुरारबाजीचा पराक्रम :-

माची घेतल्यानंतर दिलेरखान बालेकिल्ल्याच्या सर दरवाज्यावर चढाई करण्याचा तयारीत होता. तेव्हा मुरारबाजीने ७०० निवडक लोकांचे पथक घेऊन दिलेरखानाच्या पाच हजार पठाण सैनिकांवर हल्ला चढविला. मराठ्यांनी ५०० पठाणांना कंठस्थान घातले. शिवाय बहलिया पायदळाचे कित्येक लोक मारले. लढत लढत तो दिलेरखानाच्या छावणी जवळ आला. त्याचे हे अद्वितीय शौर्य पाहून खानाने त्यास जीवदान आणि मुघली चाकरी देण्याचे वचन दिले परंतु त्याने स्पष्टपणे नाकारले आणि तो आता दिलेरखानावरच घाव घालणार एवढ्यात दिलेरखानाच्या एका बाणाने त्याचे शिर धडावेगळे झाले. मुरारबाजी पडला.

मुरारबाजीच्या मृत्युनंतर मुघल सैन्याचा संचार स्वराज्याच्या विविध भागात होऊ लागला व लुटालूट सुरू झाली. तसेच कोंढाणा घेण्याचा पुढचा प्रयत्नही सुरू झाला. अशा वेळेस शिवाजी राजांनी आपल्या मुत्सद्यांशी चर्चा करून मिर्झाराजे जयसिंह यांच्याशी तह करण्याचा निर्णय घेतला यातूनच १३ जून १६६५ या दिवशी पुरंदरच्या पायथ्याशी मराठ्यांनी मुघलांशी तह केला.

## ड) पुरंदरचा तह व त्यातील अटी पुढीलप्रमाणे :-

१. पुरंदरचा तहान्वये शिवाजीं महाराजांनी औरंगजेबाला २३ किल्ले व त्या किल्ल्याखालील ४ लाख होनांचा वार्षिक उत्पन्न देणारा मुलुख द्यावा. या २३ किल्ल्यात स्वरांज्यातील प्रमुख किल्ल्यांचा समावेश होतो. १) अंकोला २) कर्नाळा ३) कोंढाणा (सिंहगड), ४) कोहोज ५) खिरदुर्ग (सागरगड) ६) तिकोना ७) तुंग ८) नंगगड ९) नरदुर्ग १०) पळसगड ११) पूरंदर १२) प्रबळगड (मुरजन) १३) भंडारगड १४) मनरंजन १५) मानगड १६) मार्गगड १७) माहुलीगड १८) रुद्रमाळ १९) रोहिडा २०) लोहगड २१) वसंतगड २२) विसापूर २३) सोनगड

२. शिवाजी राजांकडे १२ किल्ले आणि त्याखालील १ लाख होन उत्पन्न असणारा प्रदेश रहावा.

३. शिवाजी राजांनी आपला मुलगा संभाजीला ५,००० स्वरांनिशी मोघलांची सेवा करण्याकरीता मुघल दरबारात पाठवावे.

४. विजापूरचा प्रदेश शिवाजी महाराजांनी जिंकून घेतल्यास शिवाजी महाराजाने मोगल बादशहाला तीन लाखाच्या वार्षिक हप्त्यात मुघलांना ४० लाख होन द्यावे.

५. दक्षिणेकडील युद्धात मोघलांनी शिवाजीं महाराजांना काही कामगिरी सांगितल्यास ती शिवाजी महाराजांने प्रामाणिकपणे करावी.

## पुरंदरच्या तहाचे महत्त्व :-

शिवाजी महाराजांच्या मोघलांशी असलेल्या संबंधात ‘पुरंदरचा तह’ या घटनेला ऐतिहासिक महत्त्व आहे. मिर्झा राजे जयसिंग यांनी औरंगजेबाला सुचनेनुसार शिवाजी महाराजांना पराभूत

करून पकडण्याची आवश्यकता होती. पण प्रत्यक्षात शिवाजीं महाराजांना पुरंदरचा तह स्वीकारण्यास लावून आग्राला भेट देण्याचा प्रस्ताव जयसिंगाने का दिला, याबाबत इतिहासकारांचे मत भिन्न आहे. या मोहिमेपूर्वी अफजलखान व शाहिस्तेखान यांना जे शक्य झाले नाही ते जयसिंगाला शक्य झाले. त्यामुळे त्याच्या या मोहिमेला महत्त्व आहे. जयसिंगाच्या प्रचंड सामर्थ्यासमोर शिवाजी महाराजांना माघार घ्यावी लागली, ही वस्तुस्थिती आहे. पुरंदरच्या तहामुळे मोठा असा प्रदेश शिवाजी महाराजांना मोगलांना द्यावा लागला. यामुळे या तहाला महत्त्व आहे. मुघल-मराठा संघर्ष हा शायिस्तेखानाच्या मोहिमेपासून सुरू झाला होता. या मुघल मराठा संघर्षाच्या काळात जयसिंगाची स्वारी झाली व शिवाजी महाराजांना पराभव स्वीकारावा लागला आणि मुघलांचे स्वामीत्व काही काळ मान्य करावे लागले. पण याही परिस्थितीत शिवाजी महाराजांनी मोघलांची मनसबदारी स्वतः स्वीकारण्याचे टाळले व आपल्या ऐवजी राजपुत्र संभाजीला मुघल मनसबदार बनवले. पुरंदराच्या तहात मांडलेल्या विविध मुद्यांवरून जयसिंगाची मुत्सद्देगिरी दिसून येते.

**विजापूर मोहिम :-**

मराठ्यांच्या शरणागतीनंतर जयसिंगाने आदिलशाही विरूद्ध मोहिम हाती घेतली. तहातील अटींप्रमाणे शिवाजी महाराजास विजापूरी आक्रमणात सहभागी होणे आवश्यक होते. पुरंदरच्या लढ्याच्यावेळी शिवाजी महाराजास मदत करून दक्षिण मुघलांपासून वाचविणे शक्य आहे, ही दूरदृष्टी आदिलशाही मुत्सद्यांमध्ये नव्हती उलट या अवघड परिस्थितीत आदिलशाही वजीर इखलासखान याने लखम सावंताला हाताशी धरून कुडाळवर आक्रमण केले व मराठ्यांना राजापूरपर्यंत मागे हटवले. पुरंदरच्या तहानंतर मराठ्यांनी तो प्रदेश परत मिळवला.

आदिशाहीवरील आक्रमणापूर्वी जयसिंगाने अनेक आदिलशाही सरदारांना फितवले व मोहिम सुरू केली. फलटण, ताथवडा हे विजापूरी किल्ले मराठ्यांनी मुघलांना मिळवून दिले. परंतु विजापूरवर आक्रमणाच्या तयारीत असता आदिलशाहाने निकराचा लढा सुरू केला. विजापूर परिसरातील ४ ते ५ मैलांचा प्रदेश उद्ध्वस्त करून शत्रूला जेरिस आणले व मुघल फौजांचा दणदणीत पराभव केला. या मोहिमेवर अपयश नजरेत येताच शिवाजी महाराजास पन्हाळगडाच्या मोहिमेतील पाठवून मुघल सरदरांमधील शिवाजी महाराज विरूद्धचा असंतोष कमी करण्याचा प्रयत्न जयसिंगने केला. परंतु पन्हाळगडाची मोहिम यशस्वी होवू शकली नाही. याच काळात नेताजी पालकर आदिलशहाला जावून मिळाला. फेब्रुवारी मार्च १६६६ दरम्यान विजापूरी सरदारांनी फोंडा, कुडाळ, बांदा हे प्रदेश जिंकून शत्रुंना हतबल केले.

या मोहिमेच्या दरम्यान शिवाजी राजांना औरंगजेबाची भेट घेण्यासाठी जयसिंगाने उत्तरेत पाठविण्याचा विचार केला व त्यानुसार औरंगजेबास पत्रही पाठविले. औरंगजेबाच्या संमतीने दि.५ मार्च १६६६ रोजी शिवाजीराजे संभाजीसह आग्रास निघाले.

## ५.६ शिवाजी महाराजांची आग्रा भेट व सुटका

शिवाजी महाराज मागे आग्रा भेटीस निघाल्यावर त्यांच्या अनुपस्थितीत मातोश्री जिजाबाई या व्यवस्था पाहणार होत्या. १२ मे १६६६ मध्ये बादशहाचा ५० वा वाढदिवस होता. त्या निमित्ताने आग्र्याला उपस्थित राहून संभाजीसाठी शिवाजी महाराज मनसबदारी स्वीकारणार होते. शिवाजी महाराज ११ मे रोजी आग्रा येथे पोहचले. आग्रा भेट सुरूवातीपासूनच विचित्र घटना घडल्याने बरीच गाजली. शिवाजी महाराज ठरलेल्या वेळेच्या अगोदर आग्राच्या वेशीवर येवून पोहचले. साहजिकच शिवाजी महाराजांचे स्वागत करायला तेथे रामसिंग नव्हता. तेव्हा शिवाजी

महाराजांच्या राहण्याची आणि उतरवण्याची व्यवस्था कुठे केली आहे, हे कळु न शकल्याने गोंधळास सुरूवात झाली. दुसऱ्या दिवशीही रामसिंग व शिवाजी महाराज यांची भेट झाली नाही व त्याने आपल्या मुन्शीस शिवाजी महाराजास आणण्यासाठी पाठविले. दिवाण-ए-आम मधील दरबार संपून दिवाण–ए-आम खासच्या दरबाराची सुरूवात झाली होती. गडबडीत शिवाजी राजांना दरबारात उपस्थित राहण्यासाठी उशीर झाला. रामसिंग शिवाजी राजांना घेऊन दरबारात आला. रिवाजाप्रमाणे शिवाजी महाराज व संभाजी राजे बादशहा औरंगजेबला नजराणे दिले. परंतु त्यांनी शिवाजी महाराजाला ५ हजारी मनसबदार जसवंतसिंगच्या मागच्या पंक्तीत उभे केले. तसेच 'खिलत' वाटप करत असतानाही शिवाजी राजांना वगळण्यात आले, ही गोष्ट शिवाजी राजांना अपमानास्पद वाटली. त्यामुळे त्यांचा संताप अनावर झाला. नंतर रामसिंगाने जेव्हा शिवाजी महाराजाला बादशहासाठी कुर्निसात करायला खुणावले तेव्हा शिवाजी महाराजाने मोठ्या आवाजात आपली नाराजी व्यक्त केली. दरबारातील सर्व उपस्थितांचे लक्ष शिवाजींच्या हालचालींनी वेधून घेतले. बादशहाने मुद्दाम आपला अपमान केला आहे असा समज होऊन रागाने शिवाजी महाराज दरबार सोडून गेले. ही गोष्ट बादशहाला आवडणे शक्य नव्हते म्हणून औरंगजेबाने शिवाजी महाराजांना नजरकैद केले आणि त्यांच्या निवासस्थानी चौकी व पहारे बसवले.

## शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका :-

''बादशहा आपल्याला सोडणार नाही'' हे लक्षात आल्यावर शिवाजी राजांनी आग्र्याहून सुटण्याचा बेत निश्चित केला. यासाठी आपल्या सहकार्यांच्या मदतीने बारीकसारीक गोष्टींचा अभ्यास करून त्यांनी एक योजना आखली ही योजना अत्यंत धाडसी व तितकीच धोक्याची होती. आजारी असल्याचे सोंग घेऊन शिवाजींनी दानधर्म करण्याची इच्छा व्यक्त केली. दररोज मिठाई व इतर चीज वस्तुंनी भरलेले पटारे त्यांच्या निवास स्थानातून बाहेर पडू लागले. सुरूवातीचे काही दिवस या पेटाऱ्यांची कसून तपासणी होऊ लागली. पण मिठाई शिवाय येथून काही दिले जात नाही, अशी खात्री पटल्यावर पहारेकऱ्यांची नजर कमी झाली. याच संधीची वाट पाहणाऱ्या शिवाजींनी संभाजीसह पेटाऱ्यातून दि. १९ ऑगस्ट १६६६ रोजी सुटका करून घेतली.

पूर्वी ठरवलेल्या योजनेनुसार निराजी रावजी आग्र्याच्या वेशीवर शिवाजी राजांना आपल्या सहकार्यासमवेत भेटले व लवकरच तुफानी वेगाने २४ तासात २०० मैलांचे अंतर संपवून आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने आग्र्यातून बाहेर पडले. पुढे मथुरा, वाराणसी, प्रयाग, गोंडवन, हैद्राबादच्या मार्गाने शिवाजी महाराज दक्षिणेत उतरले. २० नोव्हें १६६६ मध्ये ते रायगडावर येऊन पोहचले.

## शिवाजी महाराजांच्या आग्रा सुटकेचा परिणाम :-

मराठ्यांच्या इतिहासात शिवाजी राजांची आग्र्याहून सुटका ही एक फार महत्त्वाची घटना समजली जाते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला त्यामुळे जीवनदान मिळाले. खुद्द औरंगजेबाच्या डोळ्यादेखत मोगलांच्या राजधानीतून सर्वांच्या डोळ्यात धूळ फेकून शिवाजी महाराज निसटल्यामुळे शिवाजी महाराजांची व मराठ्यांची प्रतिष्ठा एकदमच आकाशापर्यंत पोहचली. त्यामुळे मराठ्यांची शत्रुंना स्वाभाविकच मोठा वचक निर्माण झाला आणि औरंगजेबाच्या फजितिला आता पारावार राहिला नाही. शिवाजी महाराजाला कैद करून त्यांना ठार मारण्याचा औरंगजेबाचा डाव अशी रितीने पार उधळला गेला. मराठ्यांच्या इतिहासातील ही क्रांतीकारी

घटना होती असे म्हटले जाते. शिवाजी महाराजांची आग्रा भेट ही मुघलांची कुटिलराजनिती, रजपुतांचा राजकीय दृष्टीतील कमकुवतपणा व दूरदृष्टीचा आभाव दाखविते.

## ५.७ मोगल-मराठा संघर्ष (१६६७-७०)

जयसिंगाच्या सामर्थ्यामुळे शिवाजी महाराजांना मोघलांसमोर शरणागती पत्करावी लागली. पुरंदरच्या तहानंतर शिवाजी महाराज औरंगजेबाच्या भेटीकरिता आग्र्याला गेले आणि तेथून अत्यंत धाडसाने स्वतःची सुटका करून घेतली. स्वराज्यात आल्यानंतर मुघलांशी युद्ध करण्याची शक्ती मराठ्यांकडे नव्हती हे ओळखून शिवाजींनी मोघलांशी मित्रत्वाचे धोरण स्वीकारले. कारण स्वराज्यातील शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीमुळे त्यांना सवड हवी होती. त्याचप्रमाणे विजापूर आणि जंजिऱ्याच्या सिद्दीला नामोहरम् करून आपली सत्ता बळकट करण्याची संधी त्यांना हवी होती. मुघल बादशहा औरंगजेब याची शिवाजी महाराजांनमुळे जयसिंगावर गैरमर्जी झाली होती. म्हणून दक्षिणेचा सुभेदार म्हणून बादशहाने जयसिंगाच्या जागी शहजादा मुअज्जम याची सुभेदार म्हणून नेमणूक केली. पुरंदरच्या कराराप्रमाणे शिवाजी राजांनी ४ नोव्हें. १६६७ रोजी संभाजीला मनसबदार म्हणून पाठवले. औरंगजेबाला मुअज्जमच्या वर्तणूकीवर शंका येऊन तो मराठ्यांना जाऊन मिळाला. असे त्याला वाटत होते. त्यामुळे मोघलांच्या मराठ्यांशी संघर्ष होणार हे अटळ होते. औरंगजेबाचे धार्मिक धोरण, लष्कराची कपात, आर्थिक प्रश्न यामुळे समस्या निर्माण झाल्या होत्या. त्याचा फायदा घेण्याचे मराठ्यांनी ठरवले व पुरंदराच्या तहान्वये जे २३ किल्ले मोगलांना द्यावे लागले होते, ते परत घेण्याच्या दृष्टीने शिवाजी राजांनी आपल्या हालचालींना प्रारंभ केला.

### कोंढाणा जिंकून घेतला

कोंढाणा किल्ला अतिशय अवघड व लष्करीदृष्ट्या महत्त्वाचा किल्ला होता. पण कोंढाणा जिंकणे ही सोपी गोष्ट नव्हती. हा किल्ला जिंकण्याची कामगिरी शिवाजी महाराजांनी तानाजी मालुसरे व त्याचा भाऊ सूर्याजी यांच्यावर सोपवली ४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजीने साहाय्याने ३०० सैनिकांसह किल्ल्यात प्रवेश केला व किल्ला जिंकून घेतला. पण या लढाईत दुर्दैवाने तानाजी ठार मारला गेला. उदयभान राठोड या मुघल सरदाराने कडवा प्रतिकार केला परंतु दोन्ही पराक्रमी सरदारांचा अंत झाला.

कोंढाणा जिंकल्यानंतर ८ मार्च रोजी निळोपंताने पुरंदरचा किल्ला जिंकून घेतला. तसेच उत्तर कोकणातील कल्याण, भिवंडी, माहुली, लोहगड, कर्नाळा, रोहिडा इ. प्रदेश मे व जून १६७० मध्ये लागोपाठ जिंकून घेतले.

### सुरतेची दुसरी लूट १६७० :-

३ व ४ ऑक्टोबर १६७० रोजी शिवाजी महाराजांनी दुसऱ्यांदा सुरत लुटली. दख्खनचा सुभेदार मुअज्जम आणि मातबर सरदार दिलेरखान यांच्यात निर्माण झालेल्या बेबनावाचा फायदा घेऊन मराठ्यांनी सुरतेवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. कल्याणहून १५,००० ची फौज घेऊन शिवाजी महाराज सुरत येथे आले. शहराच्या रक्षणास केवळ ३००ची कुमक होती. इंग्रज, डच, फ्रेंच वखारवाल्यांनी आपल्या मालाच्या सुरक्षिततेची योजना आधीच आखली होती. त्यांचा प्रदेश वगळून शिवाजी राजांनी मोठमोठे वाडे व बाजारपेठ लुटली. नवल शाहू व हरिसाहू या धनिकांकडून सुमारे १३ लाखांची संपत्ती मिळाली. एकूण ६६ लाखांची लूट करून शिवाजी महाराज ५ ऑक्टोबर रोजी दुपारी सुरत सोडून बागलाणच्या मार्गे परत निघाले. या लूटी नंतर

सुमारे महिनाभर सुरतेतील व्यवहार सुरळीत होऊ शकले नाहीत. व पुढे १६७२, १६७३, १६७९ इतक्या वेळा सुरतेमध्ये मराठ्यांच्या स्वारीच्या अफवा पसरल्या व व्यापाऱ्यांनी पळापळ केली. या सर्वांचा परिणाम म्हणजे भरभराटीस आलेले हे व्यापारी शहर हळूहळू रिकामे होऊ लागले.

बागलाणमार्गे मराठे परत येतानाचे वृत्त कळताच मुअज्जमने दाऊदखानास शिवाजी महाराजांच्या पाठलागावर पाठविले. इखलास खान हा दाउदखानाच्या सैन्यात आघाडीवर होता. त्याने मराठ्यांचा पाठलाग करून मराठा सैन्याला गाठले. दहा हजार मराठा सैन्यावर वणी जवळ दिंडोरी येथे हल्ला केला. मोठे युद्ध झाले. इखलासखान व संग्रामखान जखमी होऊन पडले. तेवढ्यात दाउदखान त्याच्या मदतीस आला. मराठ्यांच्या बाजूने प्रतापराव गुजर, व्यंकोजी दत्तो लढत होते. मराठ्यांनी मुघलांच्या तोफखान्यावर हल्ला केला व त्यांचा प्रमुख अब्दुल मोहमंद्ला पराभूत करून तोफखान्याचे निशाण व घोडे काबीज केले. १७ ऑक्टोबरला दाउदखानाने माघार घेतली. तर मराठे कोकणकडे निघून गेले. पुढील आठवड्यात मोरोपंतांनी त्याच परिसरातील त्र्यंबकगड जिंकला.

## ५.८ मुघल - मराठा संघर्ष १९७१-७४

इ.स. १६७० च्या डिसेंबर महिन्यात शिवाजीराजांनी खानदेश व वऱ्हाडची लूट केली. तसेच ब्ऱ्हाणपूर पासून ८ मैलांवरील बहादुरपुरा हे ठिकाण लुटले. मोरोपंत व शिवाजी राजांनी मिळून साल्हेरच्या किल्ल्याला वेढा घातला. मुघली किल्लेदार फतहउल्लाखान हा पहिल्याच दिवशीच्या हल्ल्यात ठार झाला. ५ जानेवारी १६७१ रोजी मराठ्यांनी किल्ला जिंकला. औरंगजेबाने दाऊदच्या मदतीस महाबतखान या सरदारालाही पाठविले. बागलाणचा पूर्ण प्रदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली गेला होता. दाऊदखान मुल्हेरकडे वळला. त्याचा पाठलाग करून मुल्हेर, चौरगड व होलगड ही ठिकाणेही मराठ्यांनी काबीज केली. सुरत लुटीनंतरच्या या घटना औरंगजेबाच्या दृष्टीने चिंताजनक होत्या. म्हणून त्याने गुजरातच्या सुभेदार बहादूरखानास दक्षिणेकडील व्यवस्थेसाठी पाठविले. तसेच महाबत खानास मुख्य सेनापती म्हणून नेमले. परंतु दोघांमध्ये मतभेद निर्माण झाल्यामुळे दाऊद खानास उत्तरेस बोलविण्यात आले.

अ) साल्हेरचा लढा १६७१च्या ऑक्टोबर मध्ये बहादूरखान व दिलेरखानाने साल्हेरच्या किल्ल्याला वेढा दिला. अमरसिंह चंद्रावत यास किल्ला जिंकण्याची कामगिरी देऊन दिलेरखान खळगड घेण्यास तर बहादूरखान दक्षिणेकडे निघाला. शिवाजीराजांनी मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांना मुघलांविरूद्ध पाठविले. मुघल - मराठे सैन्यात मोठी लढाई झाली. इखलासखानाचा पाडाव, अमरसिंहाचा मृत्यु झाला. सूर्यराव काकडे हा मराठ्यांचा मोठा सरदार युद्धात मृत्यूमुखी पडला. मुघलांचा पराभव झाला. फेब्रुवारी १६७२ मध्ये प्रतापरावाने मुल्हेरचा किल्लाही जिंकून घेतला. मुघलांवर लागोपाठ मिळवलेल्या मोठ्या विजयामुळे मराठ्यांच्यातील आत्मविश्वास वाढला. या घटनेनंतर बहादूरखान यास दक्षिणचा सुभेदार म्हणून नियुक्त करण्यात आले तर दिलेरखान पुणे परिसराकडे वळाला. दरम्यानच्या काळात मराठ्यांनी शिवनेरी किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. परंतु तो यशस्वी ठरला नाही. याच काळात मराठ्यांचा विजापूरशी संघर्ष सुरू झाला. या परिस्थितीत बहादूरखानाने वऱ्हाड तर दिलेरखानाने कोकणात उतरण्याचा प्रयत्न केला. परंतु तोही सफल ठरला नाही. यानंतर औरंगजेबानी दिलेरखानास उत्तरेत बोलावून घेतले. तर बहादुर खानानेही मराठ्यांशी लढाई करण्याचे धोरण तात्पुरते बाजूले ठेवले.

**मुघल मराठा संघर्षाचे अंतिम पर्व १६७४-८० :**

अनेकवर्षे संघर्ष होऊनही मराठे मुघलांचे वर्चस्व मान्य करण्यास तयार नव्हते. उलट मुघलांच्या नवीन नवीन मोहीमांना धाडसाने प्रतिकार करून शिवाजी महाराजांच्या प्रभावी नेतृत्वाखाली मराठ्यांनी मुघलांशी संघर्ष करून स्वराज्याचे स्वातंत्र्य टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. असे असले तरीही बादशहा औरंगजेबही मराठ्यांचे स्वराज्य स्वीकारण्यास व शिवाजी राजांना स्वतंत्र प्रशासक मानण्यास तयार नव्हता. याच अधिकृत छत्रपतीपदासाठी शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी राज्यभिषेक करून घेतला व मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याची घोषणा केली. सर्वत्र राजा म्हणून शिवाजीराजांना मान्यता मिळाली होती. परंतु मुघलांशी संघर्ष करण्याचे धोरण मात्र पक्के होते. राज्यभिषेकानंतर झालेल्या खर्चाची भरपाई करण्यासाठी सात हजार सैन्यासह मराठ्यांनी पेडगांव येथे असणाऱ्या बहादुरखानच्या तळावर हल्ला करून सुमारे १ कोटी रूपयांची व २०० घोड्यांची लूट आणली. याचवेळी औरंगजेबाने दिलेरखानास परत दक्षिणेत पाठविले. ऑक्टोबरमध्ये धरणगाव लुटले तर १६७५ मध्ये मुघलांनी कल्याणची लूट केली.

मराठ्यांशी झालेल्या आजपर्यंतच्या मोहिमांमध्ये अपयश आल्यामुळे बहादूरखानाने मराठ्यांशी तह करण्याचे ठरविले. अटींवर विचारही सुरू झाला. परंतु जुलै १६७५ मध्ये शिवाजी महाराजांनी फोड्यांचा किल्ला जिंकून घेतल्यामुळे त्यांना बहादूरखानशी तहाची आवश्यकता वाटली नाही. यामुळे निर्माण झालेल्या तणावातून विजापूर दरबारातील वजिर खवासखान यास हाताशी धरून बहादूर खानाने शिवाजी महाराजा विरूद्ध मोहिम सुरू करण्याचे ठरविले. परंतु याच काळात खवासखानाचे उच्चाटन झाल्यामुळे हा प्रयत्नच फसला. उत्तर कोकणात उतरून मराठ्यांची नाकेबंदी करण्याचा प्रयत्नही बहादूरखानाने करून पाहिला. परंतु तोही फसला औरंगजेबाने खानाची चांगलीच कानउघडणी केली.

**संभाजी राजांचे मुघलांशी संगनमत :-**

दिलेरखानाने विजापूरशी राजकारणात भाग घेऊन तेथील मत अनुकूल करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यास यश आले नाही. या दरम्यान विजापूरवर आक्रमण करण्याच्या तयारीत असतानाच मुघलांच्या दृष्टीने एक उत्साहवर्धक घटना घडून आली. छ. शिवाजी महाराजांचे पूत्र संभाजी दिलेरखानास येऊन मिळाला (१३ डिसेंबर १६७८) दिलेरखानाने त्याचे स्वागत केले. बादशहाने सात हजारांची मनसब आणि राजा हा किताब संभाजी राजास पाठविला.

संभाजीच्या मदतीने दिलेरखानाने साताऱ्याजवळच्या भूपाळगडची मोहिम काढली व गड जिंकला. भूपाळगडाच्या बचावासाठी शिवाजी महाराजांनी १४००० ची कूमक पाठविली पण त्यापूर्वी किल्ला मुघलांच्या ताब्यात गेला. यानंतर विजापूरची मोहिम सुरू करण्यात आली. परंतु त्यात अपयश येऊ लागल्यामुळे त्याने मिरज व पन्हाळ्याकडे मोहिम वळविली. तिकोटा व अथणी येथे दिलेरखानाने प्रजेवर भयंकर अत्याचार केले. त्याचा परिणाम संभाजींच्या मनावर झाला तसेच आपणास कैद करण्याचा हुकूम बादशहा कडून आल्याने संभाजी राजास समजले. त्यातूनच २० नोव्हेंबर रोजी संभाजी राजे मुघलांचा पक्ष सोडून पन्हाळ्यास परत आला व शिवाजी राजांची भेट घेतली. दरम्यानच्या काळात मराठ्यांच्या लुटालुटींच्या मोहिमा सुरूच होत्या या घटने नंतर दिलेरखानाने पन्हाळगडावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी ठरला नाही. अशा तऱ्हेने संभाजी राजाला स्वतःच्या बाजूने वळवून मराठ्यांची नाकेबंदी करण्याचा दिलेरखानाचा प्रयत्न फसला. मराठ्यांच्या विविध सरदारांनी नाशिक, बागलाण, धरणगाव या सगळ्या प्रदेशावर पुन्हा आपले वर्चस्व निर्माण करून मुघलांना औरंगबाद पर्यंत माघार घेण्यास

लावून जेरिस आणले. अखेरीस १६७८च्या अखेरीस मुघल बादशहाने मुअज्जम व दिलेरखानास उत्तरेस बोलावून घेतले.

शायिस्तेखानापासून बहादूरखानपर्यंत औरंगजेबाने पाठविलेल्या अनेक मुघल सरदारांना मराठ्यांनी पराभूत करून पाठविले होते. आपला प्रदेश, आपली संपत्ती, लोक व धर्म यांचे संरक्षण करून अखेरपर्यंत शिवाजी महाराजांनी मुघलांशी लढा दिला. त्यामुळे मराठ्यांचे पारिपत्य ही मुघल बादशहा औरंगजेबाची कायमस्वरूपी महत्त्वाकांक्षा होती. ती पूर्ण करण्यासाठीच तो अखेरपर्यंत प्रयत्न करत राहीला. परंतु त्यास यश आले नाही. सततच्या मोहिमा, दगदग, कौटुंबिक कलह यामुळे आजारपण येऊन छ. शिवाजी महाराजांचा ४ एप्रिल १६८० रोजी रायगडावर मृत्यू झाला.

## ५.९ शिवाजी महाराज :- एक अलौकिक व्यक्तीमत्त्व

भारतीय इतिहासात १७व्या शतकातील मराठ्यांचा उदय ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी छ. शिवाजी राजांनी स्वराज्य स्थापनेचा संकल्प केला. तेव्हापासून अविरतपणे पुढील ३५ वर्षे त्यांनी स्वराज्याची स्थापना, दृढीकरण व विस्तार या ध्येयांना वास्तवात आणण्यासाठी खर्च केली. स्वराज्यनिर्माण केल्याशिवाय आपल्या प्रदेशातील लोकांना स्वतंत्रपणे जगता येणार नाही, याची त्यांना खात्री होती. म्हणूनच धर्म, पंथ, जाति यांचे भेद न मानता प्रत्येकाने स्वराज्य निर्मितीच्या कार्यात सहभागी झाले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. आपल्या समवयस्क आणि समध्येयी लोकांतून अनेक गुणी माणसे अचूकपणे हेरून त्यांच्यात स्वराज्याची प्रेरणा छ. शिवाजी महाराजांनी निर्माण केली. स्वतःच्या विचारांमधून आणि वर्तनातून आपल्या बद्दल लोकांच्यात विश्वास निर्माण करून एका समान ध्येयाने समाजाला त्यांनी प्रेरित केले. जातिभेद, पंथभेद व आर्थिक विषमता यापेक्षाही राष्ट्रकार्य मोठे आहे, याची जाणीव त्यांनी समाजाला करून दिली. त्यासाठी समर्थ लष्कर, घोडदळ, शिस्तबद्ध सैनिक नौदल याची निर्मिती त्यांनी आपल्या हिंमतीवर केली. किल्ल्यांचे महत्त्व ओळखून किल्ल्यांचे बांधकाम, डागडूजी व संवर्धन करण्यावर त्यांचा भर असे.

किल्ले व प्रदेश मिळवल्यावर त्याचे प्रशासन करण्याचे प्रशिक्षण त्यांना लहानपणापासून मिळाले होते. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील छ. शिवाजी महाराज एक कुशल प्रशासक होते. एखादा मुलुख काबीज केला की तेथील प्रशासन व्यवस्था लावून आपल्या राजवटीची वैशिष्ट्ये ते दाखवून देत असत. राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी कार्यक्षम प्रशासकांची गरज असते, या विचाराने प्रशासनात नेमणूका करताना गुण व निष्ठा हाच प्रमुख निकष लावला जात असे.

छ. शिवाजी महाराजांचे समकालीन इतर राजांमध्ये न सापडणारे वैशिष्ट म्हणजे धार्मिक सहिष्णुता, नियुक्ती करताना, अधिकार पद देताना किंवा दान धर्म करताना आचरणातील सचोटीला ते महत्व देत असत. मशीद, कुराण व स्त्रीया यांचा अवमान आपल्या सैनिकांनीही कधी करता कामा नये, या बद्दल ते जागरूक असत.

शिवकाळाचे वेगळेपण ज्याप्रमाणे पराक्रम, प्रशासन, शिस्त, सहिष्णुता न्याय यात दिसते. तसेच बौद्धिक प्रगतीतही दिसते ‘शिवभारत’, ‘राधामाधव विलास चंपू’, ‘दंडनिती’ ‘राज्यव्यवहार कोष’ ‘आज्ञपत्रे’ इ. समकालीन लेखन यांचे साक्षीदार आहे. कलेच्या क्षेत्रात फार प्रगती झाली नसली तरीही स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा हा राजा दीर्घकाळ टिकणारे एतद्देशियांचे असे राज्य निर्माण करणारा ठरला की, ज्यामुळे त्यांची तुलना नेपोलियनशी केली जाते. म्हणूनच जदुनाथ

munotes.in

सरकार म्हणतात त्याप्रमाणे, साम्राज्याचे विघटन होते, राजघराणी नष्ट होतात, पण लोकनेत्या शिवाजी महाराज सारख्या एखाद्या राजाची आठवण मात्र मानवजातीला चिरंतन प्रेरणा देत रहाते.

## ५.१० सारांश

मुघल साम्राज्यासारख्या मध्यवर्ती सत्तेशी निकराचा लढा देऊन निर्माण केलेल्या छोट्या स्वराज्याचे रक्षण करुन छ. शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. त्यांच्या जीवनकाळातच हे राज्य दृढ प्रशासनाच्या पायावर स्थिर झाले. छ. शिवाजी महाराज्यांच्या मृत्युनंतरही मराठ्यांचे राज्य स्थिर राहीले व खुद्द मुघल बादशहा औरंगजेबाने अथक प्रयत्न करुनही पुढील शतकभर मराठेशाही टिकून राहिली.

## ५.११ प्रश्न

१) शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीच्या विशेष संदर्भासह मुघल संबंधाची सविस्तर माहिती द्या.

२) पुरंदर तहाच्या विशेष संदर्भात मुघल-मराठा संबंधाची चर्चा करा.

३) १६६०-७० या कालखंडातील मुघल मराठे संबंधाचा आढावा घ्या.

४) टिपा लिहा.

१. शायिस्तेखान प्रकरण

२. शिवाजी महाराजांची आग्रा भेट

## ५.१२ संदर्भ

१) कुलकर्णी, अ.रा., खरे ग.ह., ‘मराठ्यांचा इतिहास’ खंड पहिला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, २००६.

२) डॉ. देशपांडे, प. नं. ‘मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष’ ‘स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे द्वितीय आवृत्ती २००१.’

❖❖❖❖

munotes.in

# ६

# छत्रपती शिवाजी महाराजांचा युरोपीयन सत्तांशी संबंध

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ छत्रपती शिवाजी महाराज व पोर्तुगीज संबंध

६.३ छत्रपती शिवाजी महाराज व डच संबंध

६.४ छत्रपती शिवाजी महाराज व इंग्रज संबंध

६.५ इ.स.१६६१ ते इ.स. १६७४ या काळातील इंग्रज मराठा संबंध

६.६ छत्रपती  शिवाजी महाराज व फ्रेंच संबंध

६.७ सारांश

६.८ प्रश्न

६.९ संदर्भ

## ६.० उद्दिष्ट्ये

१. छत्रपती शिवाजी महाराजांचे पोर्तुगीज आणि डचांरोबरचे संबध समजून घेणे.

२. छत्रपती शिवाजी महाराजांचे इंग्रज व फ्रांस सत्तांबरोबरचे संबंध समजून घेणे.

## ६.१ प्रस्तावना

ई.स. १४५३ मध्ये कॉन्स्टटीनोपलचा पाडाव झाल्यानंतर युरोपातून पूर्वेकडील देशामध्ये जाणारा खुष्कीचा मार्ग बंद झाला होता, त्यामुळे युरोपीयन देशांनी नवीन सागरी मार्गांचा शोध घेण्याची मोहीम हाती घेतली होती. याच मोहिमेतून इ.स. १४९८ मध्ये पोर्तुगीज खलाशी वास्को-दि-गामा याने सागरीमार्गाने प्रवास करून भारताच्या भूमीवर येण्याचा पहिला मान मिळविला होता व युरोपियनांना भारतात येण्याचा मार्ग दाखविला होता. त्यानुसार याच सागरी मार्गाने प्रवास करून पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज  व्यापारी भारतात आले होते. परकीय व्यापारी भारतात व्यापार करण्याच्या उद्देशाने आले होते, त्यांनी भारताच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये आपल्या वखारी स्थापन केल्या व्यापार करत असताना त्या परकीय सत्तांचा स्थानिक सत्तांशी संबंध व संघर्ष झाला त्यामध्ये मराठे, मुघल, आदिलशहा व कुतुबशहा, हैदरअली यांचा समावेश होता. कोकणच्या प्रदेशात छत्रपती



munotes.in

शिवाजी महाराजांचे वर्चस्व निर्माण झाल्यामुळे पश्चिम समुद्रकिनारपट्टीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा युरोपियनांशी संबंध व संघर्ष झालेला होता. पश्चिम किनारपट्टीवरून उर्वरित भागावर होणाऱ्या व्यापारावर मराठ्यांना नियंत्रण ठेवणे शक्य झाले होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा संबंध पोर्तुगीज, डच, इंग्रज, सिद्दी व फ्रेंच या परकीय सत्तांशी येण्यास सुरुवात झाली. स्वराज्याची उभारणी करण्यासाठी शिवाजी महाराजांना सागरीमार्ग सुरक्षित करण्यासाठी व परकीय सत्तांशी सामना करण्यासाठी सामर्थ्यशाली आरमार उभारण्याची अवश्यकता वाटत होती. त्यानुसार त्यांनी पोर्तुगीज अभियंत्याच्या साह्याने कोकणातील कल्याण-भिवंडीच्या परिसरात आरमाराची उभारणी करण्याचा निर्णय घेतला. आरमाराची उभारणी झाल्यानंतर परकीय सत्ताधीशांशी सामना करण्यासाठी व साग्रीमार्गाच्या सुरक्षेसाठी जलदुर्ग उभारण्याचे ठरविले व आपल्या हयातीत सिंधुदुर्ग, विजयदुर्ग किल्ल्याची निर्मिती करून स्वराज्याच्या सागरी सीमा सुरक्षित केल्या होत्या. युरोपीय सत्तांनी व्यापाराबरोबर हळूहळू राजकीय सत्ता स्थापन करण्यासाठी हालचाली सुरु केल्या होत्या. त्यामध्ये भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील गोवा, दीव, दमण, वसई हे प्रदेश पोर्तुगीजांनी आपल्या अधिपत्त्याखाली आणले होते. पोर्तुगीजांच्या पाठोपाठ डच, फ्रेंच, इंग्रज यांनी व्यापारासाठी पश्चिम किनारपट्टीवर आपल्या वखारी स्थापन केल्या होत्या.

स्वराज स्वराज्याची स्थापना व विस्तार करताना छत्रपती शिवाजी महाराजांना स्वकीय व परकीय सत्ताधीशांबरोबर संघर्ष करावा लागलेला होता त्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचा संबंध पोर्तुगीज, डच, इंग्रज व सिद्दी या परकीय सत्तांबरोबर आलेला होता. त्यापैकी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून स्वराज्याचा विस्तार करताना त्यांचा संबंध हा पोर्तुगीजांशी आलेला होता.

## ६.२ छत्रपती शिवाजी महाराज व पोर्तुगीज संबंध

पोर्तुगीजांनी भारतामध्ये आल्यानंतर इ.स. १५१० मध्ये गोवा येथे आपली वसाहत स्थापन केलेली होती त्याचप्रमाणे उत्तर कोकणातील वसई या ठिकाणावरही त्यांचे वर्चस्व होते. भारताच्या पश्चिम सागरी किनारपट्टीवर पोर्तुगीजांचे वर्चस्व असल्यामुळे त्यांचा मराठ्यांशी नेहमीच संपर्क आलेला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज तंत्रज्ञानाच्या साह्याने इसवी सन १६५७ ते १६५९ या कालावधीत आरमारातील पहिले वीस लढवू जहाजे तयार केलेली होते या आरमाराची उभारणी त्यांनी कल्याण- भिवंडी या बंदरामध्ये केलेली होती. याच आरमाराचा भविष्यामध्ये उपयोग आपल्या विरोधात होईल या भीतीने गोव्याचे व्हाईसरॉयने छत्रपती शिवाजी महाराजांकडे पोर्तुगीज तंत्रज्ञावर दडपण आणून त्यांना परत बोलावले होते. पोर्तुगीज- मराठा संघर्षाचे अनेक वेगवेगळे कारणे दिलेली आहेत त्यामध्ये मराठ्यांनी फोंड्यावरती आक्रमण केले त्यावेळेस पोर्तुगीजांनी आदिलशहाच्या वर्चस्वाखालील फोंडा किल्ल्याच्या किल्लेदारास गुप्तपणे दारूगोळा पुरविलेला होता जेणेकरून मराठ्यांचे वर्चस्व जर पोर्तुगीजांच्या सीमेवर जवळ वाढले तर त्याचा परिणाम पोर्तुगीज सत्तेला होऊ शकतो, म्हणून त्यांनी आदिलशहाला मदत केलेली होती. पोर्तुगीज- मराठा संबंध बिघडण्याचे अजून एक महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे पोर्तुगीजांचे धार्मिक धोरण, पोर्तुगीज आपल्या वर्चस्वाखालील प्रदेशातील हिंदू लोकांवर ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती करत होते त्यातून त्यांनी धर्मांतराची मोहीम सुरू केलेली होती. या विषयी डॉ. पिसुर्लेकर असे म्हणतात की, 'राजाचा धर्म तोच प्रजेच्या धर्म' हे तत्व

गोव्यातील राजकारणामध्ये शिरले होते. त्यानुसार कायदे करण्यात आले आणि पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखालील प्रदेशांमध्ये ख्रिस्ती धर्मांतराची मोहीम मोठ्या प्रमाणामध्ये राबविण्यात आलेली होती. त्यातून मराठे आणि पोर्तुगीज यांच्यातील संघर्ष हा विकोपाला केलेला होता. यासंदर्भामध्ये इ. स. १६६७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांना धडा शिकविण्यासाठी बारदेश्वर स्वारी केलेली होती. या स्वारीच्या दरम्यान मराठ्यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातील अनेक गावे लुटून ती बेबिचराक केलेली होती. जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्या तीन क्रिस्ती धर्मपदेशकांना पकडून यमसदनास पाठवले होते, अनेकांना पकडले होते मराठ्यांच्या प्रखर आक्रमणामुळे पोर्तुगीजांचा टिकाऊ लागला नाही. मराठ्यांना रोखून प्रतिकार करणे त्यांना शक्य झाले नाही, मराठ्यांबरोबरचा संघर्ष आपणास अधिक महागात पडेल हे ओळखून पोर्तुजांनी मराठ्यांशी तह करण्याचे ठरविले होते. त्यानुसार डिसेंबर १६६७ मध्ये पोर्तुगीजानी आपला वकील **पादरी गोन्सालो** याला रायगडावर पाठविले होते. शिवाजी महाराजांबरोबर झालेल्या तहानुसार पोर्तुगीजांनी लखम सावंत, केशव नाईक या मराठ्यांचे शत्रू असलेल्या बंडखोरास आश्रय न देण्याचे मान्य केले. त्यानुसार इ.स. १६६८ मध्ये लखम सावंत व केशव नाईक यांना पोर्तुगीजांनी गोव्याबाहेर हाकलून दिले होते. शिवाजी महाराजांनी बारदेश वरील स्वारीत पकडलेल्या कैद्याना मुक्त केले. यावरून मराठ्यांचा पोर्तुगीजांवर असलेला वचक जबरदस्त असल्याचे दिसून येते. त्यानुसार मराठ्यांनी नेहमीच पोर्तुगीजांना आपल्या धाकामध्ये ठेवलेले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे चोहोबाजूंनी वेगवेगळ्या शत्रूंनी वेढलेले होते अशा परिस्थितीमध्ये वेगवेगळ्या शत्रूंशी लढण्यासाठी त्यांना काही वेळेस परकीय सत्ताधीशांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावे लागलेले होते त्यातच कोकण आणि पश्चिम सागरी किनारपट्टीच्या परिसरावर पोर्तुगीजांचे वर्चस्व असल्यामुळे पोर्तुगीजांच्या बरोबर मैत्री संबंध प्रस्थापित करणे हे छत्रपती शिवाजी महाराजांना महत्वाचे वाटत होते, परंतु पोर्तुगीजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विस्तारवादी धोरणाला पूर्ण पाठिंबा दिलेला नव्हता. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व सिद्धी यांच्या संघर्षामध्ये सिद्ध्यांना पाठिंबा दिलेला होता. इ.स. १६५९ मध्ये मराठ्यांनी दंड राजापूरास वेडा घातला त्यावेळी पोर्तुगीजांनी सिद्धीस धान्य व दारुगोळा पुरविला होता. या संदर्भात डॉ. पिसुर्लेकर लिहितात की, 'सिद्धी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामधील संघर्षात पोर्तुगीजांचा ओढा जसा सिद्धीकडे होता त्याचप्रमाणे आदिलशहा व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संघर्षामध्ये पोर्तुगीजांनी गुप्तपणे आदिलशहास मदत केलेली होती. परंतु शिवाजी महाराजांच्या भीतीमुळे ते उघडपणे मदत करण्यास धजत नसत. यावरून असे दिसते की मराठा आणि पोर्तुगीज संबंध छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीमध्ये फारसे चांगले नव्हते, परंतु ते वाईटही नव्हते. वेळप्रसंगी पोर्तुगीजांनी मराठ्यांना मदत केल्याचेही दिसून येते. प्रामुख्याने इंग्रज- मराठा संघर्षामध्ये पोर्तुगीजांनी मराठ्यांना मदत केल्याचे पोर्तुगालच्या व्हाईसरॉयने केलेल्या नोंदीनुसार दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेच्यालुटी दरम्यान परतीचा मार्ग पोर्तुगीजांच्या प्रदेशातून निवडला होता तसेच पोर्तुगीजांचा मराठ्यांना पाठिंबा मिळेल या हेतूने त्यांनी या मोहिमेची आखणी केलेली होती. मुघलांच्या हे जेव्हा लक्षात आले त्यावेळेस मुघल सरदार लोदीखान याने पोर्तुगीजांच्या वसईच्या परिसरावर हल्ले चढविले होते तेव्हा त्यांना मोगलांशी तह करावा लागलेला होता. इ.स. १६६५ च्या मिर्झाराजांच्या मोहिमेच्या काळात पोर्तुगीजांना त्यांच्याशी सलोख्याचा तह करावा होता तसेच आग्र्याहून सुटकेच्या

घटनेनंतर मात्र शिवाजी महाराजांच्या सहसाची बातमी पोर्तुगालच्या राजास कळताच त्यांनी **शिवाजी महाराजांची तुलना सिजर व अलेक्झांडरशी** केलेली दिसून येते. काही बाबतीमध्ये पोर्तुगीज व मराठ्यांचे संबंध यामध्ये बाधा आलेली होती, त्याला कारण होते कोकणातील छत्रपती शिवाजी महाराजांचे विरोधक लखम सावंत व केशव नाईक यांना पोर्तुगीजांनी आश्रय दिलेला होता म्हणून त्यांना धडा शिकविण्यासाठी १६६७ मध्ये मराठ्यांनी बारदेश वर स्वारी केलेली होती. १९ मे ते २२ नोव्हेंबर १६६७ या काळात बारदेश मधील अनेक गावे लुटून ख्रिस्ती धर्म उपदेशकांवर मराठ्यांनी हल्ले केल्याची नोंद डच यांनी केलेली आहे. इ.स. नोव्हेंबर १६६८ मध्ये मराठ्यांनी गोव्यात जाऊन उठाव घडून पोर्तुगीजांची सत्ता संपुष्टात आणण्याची धाडसी योजना आखली परंतु ती यशस्वी झाली नाही. मुघलांशी या काळात अटीतटीचा संघर्ष सुरू झाल्यामुळे मराठ्यांनी पोर्तुगीजांशी तह केला.

मराठे व पोर्तुगीज यांच्यामध्ये दिनांक १० फेब्रुवारी, १६७० मध्ये जो तह घडून आणलेला होता या तहातील तरतुदी खालीलप्रमाणे होत्या.

१. पोर्तुगीजांनी बंडखोर देसाईना आश्रय व संरक्षण देऊ नये.
२. लखम सावंत व केशव नाईक या बंडखोरांना गोव्याबाहेर घालून द्यावे.
३. मराठे व पोर्तुगीज यांनी परस्परांच्या लुटलेल्या जहाजांची नुकसान भरपाई द्यावी मोघलांच्या जहाजांप्रमाणे मराठ्यांच्या जहाजांनाही सवलती द्याव्यात.

मराठे - सिद्धी यांच्या संघर्षात पोर्तुगीजांनी मराठ्यांच्या बाजूने सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता परंतु पोर्तुगीजांच्या दुटप्पी धोरणामुळे त्यांना कायमचा धडा शिकविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी पुढे मोरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने चौल, कारंजे व मुंबईपासून ते दमण, बलसाड पर्यंतचा पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखालील प्रदेश लुटला. पुढे रामनगरचे कोळी राज्यही मराठ्यांनी जिंकले. रामनगरचा राजा दमणच्या प्रदेशातून चौथाई वसूल करत होता, रामनगरचे राज्य आता आपण जिंकल्यामुळे दमन प्रदेशातून आपणास चौथाई मिळावी अशी मागणी शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांकडे केली परंतु पोर्तुगीजांनी चौथाई देण्यास टाळाटाळ केलेली होती. पोर्तुगीजांच्या मराठ्यांविषयीच्या दृष्टी धोरणाचा राग येऊन त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी गोव्यावर स्वारी करण्याचा निर्णय घेतलेला होता. त्यासाठी फोंड्याजवळ मानाजी अनंत यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे सैन्य जमा झालेले होते. छत्रपती शिवाजी महाराज गोव्यावर आक्रमण करणार ही बातमी ऐकून पोर्तुगीजांना प्रचंड धक्का बसलेला होता. दरम्यानच्या काळामध्ये इ.स १६८० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन झाल्यामुळे महाराजांची गोव्यावर स्वारी करण्याची योजना ही रद्द झालेली होती.

## ६.३ छत्रपती शिवाजी महाराज व डच संबंध

भारतामध्ये आलेल्या युरोपीय सत्तांमध्ये सर्वप्रथम पोर्तुगीज आले होते, त्यानंतर डच्यांचे भारतामध्ये आगमन झालेले होते. पोर्तुगीज व डच एकमेकांना स्वतःचे प्रतिस्पर्धी समजत असत. इ.स. १६४९ च्या सुमारास डचांनी वेंगुर्ले येथे आपली वखार सुरू केली व तेथे किल्लाही बांधला. इ.स. १६६३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी डचांच्या

वर्चस्वाखालील कुडाळवर स्वारी केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोल्हापूर-कुडाळ मार्गे दक्षिण कोकणात प्रवेश केला होता. इ.स. मे १६६३ मध्ये शिवाजी महाराजांच्या सैन्यांनी आपल्या १४००० सैन्यानिशी वेंगुर्ले, सावंतवाडी, कुडाळ ही डचांच्या ताब्यातील शहरे लुटली होती. त्यानंतर शिवाजी महाराजांनी फेब्रुवारी, १६६५ मध्ये बसनूरची स्वारी ३ मोठ्या गलबत्याच्या व ८५ शिवाडे असलेले आरमार घेऊन स्वत: तारवातून जावून केली होती. या संदर्भात डच कंपनीचा रेसिडेंस कळवितो की, ' शिवाजी महाराजांची कृत्ये थक्क करणारी, बुद्धिमत्तेची द्योतक, त्यांचा मार्ग शोधणे फारच कठीण होते, त्यांचे आरमार कानडी प्रदेशात निघून गेले हे समजण्यास डचांना बरेच दिवस लागले. यावरून शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याच्या युद्ध तंत्राचा अचूक अंदाज येतो. या स्वारीचा डचांच्या व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला. डचांच्या वर्चस्वाखालील शहरे लुटल्यामुळे त्यांच्यात महाराजांविषयी दहशत निर्माण झाली होती. त्यानंतर वेन्गुर्ल्यामध्ये शिवाजी महाराजांच्या सरदारांनी डचाना मित्रत्वाने वागविल्याचे डच रेकॉर्ड मधील दिनांक ३१ जानेवारी १६७५ च्या एका पत्रातून समजते. वा.सी. बेंद्रे या इतिहासकारांनी छ.शिवाजी महाराजांच्या कर्नाटक स्वारीच्या वेळी पुलीकतचे डच व फ्रेंच यांचेकडून २ लक्ष होन प्रत्येकी मागितले होते. त्यावेळी देवनापट्टनचे डच मोठ्या थाटामाटात छ. शिवाजी महाराजांना भेटावयास आले होते. त्यावेळी महाराजांनी त्यांना २ महिने आपल्या छावणीत अडकुन ठेवले होते. त्यांचेकडून मोठी द्रव्य प्राप्ती झाल्यानंतर सोडण्यात आले होते.

डच वकील हर्बर्ट डी जॉगर असे लिहितो की, 'हिंदू राजे एखाद्या माणसाची योग्यता ठरवतात ती त्याच्या बाणेदारपणा, रुबाब, त्याचा बोलबाला, नावलौकिक, लोकप्रियता व श्रीमंती यावरूनच' परंतु या त्याच्या मतामध्ये पूर्ण सत्यता दिसत नाही. मराठ्यांनी श्रीमंतीपेक्षा व्यक्तीचे कार्य, कर्तुत्व आणि प्रामाणिकपणा याला महत्व दिलेले दिसून येते.

इतिहासकार शेजवलकर डच कागदपत्राच्या आधारे असे लिहितात की, डचांचे वकील शिवाजी महाराजांच्या तंबूत आले तेव्हा छ.शिवाजी राजे जनार्धनपंत वकील व त्याचा भाऊ रघुनाथपंत  याना बरोबर घेऊन तंबूत आले. त्यानंतर महाराजांनी डचांची मानवंदना स्वीकारली. डच वकिलांनी आपल्या व्यापाराच्या हकीकती, अडचणी, गार्हाणी, तक्रारी व गैरसोई विषयी दुभाष्कामार्फात कळविले. त्यावे छ. शिवाजी महाराजानी पूर्वी दिलेली आश्वासने तशीच चालू राहतील असे सांगितले. दोन्ही बाजूची बोलणी झाल्यानंतर डच वकीलाला शिवाजी महाराजांच्या वकिलांकडून  कोरोमंडळच्या किनारपट्टीवर व्यापार करण्याच्या सवलती आणि अभयपत्रे दिली होती. तो जाण्यास निघाला तेव्हा शिवाजी महाराजांनी डच गवर्नरला भेट म्हणून खास वस्तू जॉगर या वकिलाकडे देण्यास संगीतल्या व जाता येताना महाराजांच्या घोडस्वारांनी त्यास मानवंदना दिली होती. यावरून छ. शिवाजी महाराजांनी डचाबरोबर सलोख्याचे संबंध निर्माण केले होते.

## ६.४ छत्रपती शिवाजी महाराज व इंग्रज संबंध

नोव्हेंबर १६५९ मध्ये शिवाजी महाराजांनी आदिलशहाचा बलाढ्य सरदार अफजल खान याचा वध केला होता, त्यानंतर जानेवारी १६६० मध्ये शिवाजी महाराजांचा इंग्रजांशी पहिल्यांदा संबंध आला तो राजापूरच्या वखारीमध्ये. इंग्रजांनी १६४९ मध्ये कोकणातील राजापूर येथे आपली वखार स्थापन केलेली होती या वखारीत राजापूरच्या परिसरामध्ये



munotes.in

अफजलखानाच्या मालकीची तीन जहाजे आलेली होती इंग्रजांनी या जहाजांना संरक्षण दिले होते. अफजलखानाच्या वधानंतर शिवाजी महाराजांनी या तीनही जहाजाची मागणी इंग्रजांकडे केलेली होती. जानेवारी १६६० मध्ये मराठ्यांच्या सैन्याने राजापूर, कुडाळ प्रदेशावर आक्रमण केलेले होते. दौरोजी या शिवाजी महाराजांच्या अधिकाऱ्याने इंग्रजांकडे अफजलखानाच्या तीन जहाजांची मागणी केलेली होती परंतु इंग्रज अधिकारी हेन्री रेविंग्टन याने ती देण्यास टाळाटाळ केलेली होती. अफजलखानाच्या तीन जहाजांपैकी एक जहाज इंग्रजांनी बळकावले तर इतर दोन जहाजांवरील लोकांना त्यांनी मराठ्यांच्या विरुद्ध भडकावले होते त्यामुळे गौरवजी या मराठा अधिकाऱ्याने गिफर्ड या इंग्रज प्रतिनिधी व इंग्रजांचा दलाल बाबाजी याला अटक करून खारेपाटणच्या किल्ल्यावर कोंडले होते. त्यावेळी राजापूरच्या वखारीचा प्रमुख हेन्री रेविंग्टन यांनी शिवाजी महाराजांना पत्र पाठवून अटक केलेल्या व्यक्तीची सुटका करण्याची मागणी केलेली होती, त्यामोबदल्यात सिद्धीच्या दंडराजापुरीवरील मोहिमेत मराठ्यांना मदत करण्याचे आश्वासन दिलेले होते. भविष्यातील राजकारणात राजापूरकर इंग्रजांचा फायदा होईल या हेतूने महाराजांनी इंग्रजांचे सर्व कैदी सोडून देण्याचा आदेश आपल्या अधिकाऱ्यांना दिलेला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा इंग्रजांशी दुसरा संघर्ष अफजलखानाच्या वधानंतर २ मार्च १६६० मध्ये सिद्धी जोहरने पन्हाळ्याच्या किल्ल्यास वेढा देऊन शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्याचा निर्धार केला होता त्यावेळी छ. शिवाजी महाराजांचे वास्तव्य पन्हाळ्याच्या किल्ल्यावरच होते. या संघर्षात राजापूरकर इंग्रजांनी सिद्धी जोहरला मदत केलेली होती. राजापूर वखारीचा प्रमुख अधिकारी हेन्री रेविंग्टन व त्याच्यासोबत इतर अधिकारी स्वतः पन्हाळगडावरती आलेले होते एक तोफ व ५० तोफगोळे घेऊन त्यांनी पन्हाळ्याच्या किल्ल्यावर मराठ्यांच्या विरोधामध्ये तोफांचा वापर कसा करावा याचे प्रशिक्षण त्यांनी आदिलशहाच्या फौजेला दिलेले होते. सिद्धी जोहरने प्रशिक्षण घेतल्यानंतर मराठ्यांच्या विरोधामध्ये त्याचा वापर केलेला होता. पन्हाळ्याच्या किल्ल्यावर इंग्रजी निशाण फडकून हेन्री रेविंग्टन याने पन्हाळ्यावर तोफ डागली होती. त्यामुळे सिद्धी जोहर चांगलाच खुश झालेला होता. इंग्रजांच्या या कृतीचा छत्रपती शिवाजी महाराजांनी योग्यवेळी समाचार घेण्याचे निश्चित केले होते. सध्या त्यांनी सर्वप्रथम पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुखरूपपणे बाहेर पडण्याला प्राधान्य दिले होते त्यानुसार योजना आखलेली होती. त्यानुसर ते पन्हाळ्याच्या किल्ल्यातून सुखरूपने बाहेर पडले होते. पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुटका झाल्यानंतर मार्च १६६१ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रजांच्या राजापूर वखारीवर हल्ला केला व ही वखार पूर्णपणे उध्वस्त केली होती. या वखारीचा प्रमुख हेन्री रेविंग्टन व त्याचे इतर साथीदार यांना कैद केले होते. या वखारीत २५,००० ची लुट मराठ्यांना मराठ्यांना मिळालेली होती. अशा पद्धतीने सिद्धी जोहरला मदत करणाऱ्या इंग्रजांना मराठ्यांनी चांगलाच धडा शिकवायला होता. मराठ्यांनी राजापूर वखारीवर केलेल्या हल्ल्याच्या संदर्भामध्ये इंग्रज कंपनीचा रेसिडेंट अन्द्रीव्ह्ज याने हेन्री रेविंग्टनला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले होते की, 'कंपनीच्या मालाचे रक्षण केले म्हणून ही कैद प्राप्त झाली नसून पन्हाळ्याच्या वेढ्यात इंग्रजांचा बावटा फडकावून तोफेचे गोळे उडविल्याबद्दल हे प्रायश्चित आहे.' अशा पद्धतीने सिद्धी जोहरला मराठ्यांच्या विरोधात मदत करणाऱ्या राजापूरच्या इंग्रजांना छत्रपती शिवाजी महाराजांनी चांगलाच धडा शिकविला होता.

## ६.५ इ.स.१६६१ ते इ.स. १६७४ या काळातील इंग्रज मराठा संबंध:

इ.स. १६६४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेची पहिली लुट केलेली होती या प्रसंगी इंग्रजांनी त्यांच्या सुरत येथील वखारीच्या संरक्षणाची तयारी केलेली होती परंतु या लुटीचा हेतू युरोपीय सत्तांना त्रास देणे हा नव्हता त्याची खबरदारी मराठ्यांनी घेतलेली होती. या लुटीच्या माध्यमातून मात्र इंग्रज, फ्रेंच व डच व्यापाऱ्यांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरतेची लुट ही मराठ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना होती. सुरतेचा मोगल सभेदार इनायतखान याने सुरत शहराचे संरक्षण करण्याऐवजी किल्ल्यात जाऊन आश्रय घेतलेला होता. इंग्रजांनी मात्र आपल्या वखारीचे संरक्षण करण्याची तयारी केलेली होती. इंग्रज वखारीचा प्रमुख जॉर्ज ऑक्सिडंट यांनी ६ जानेवारी १६६४ रोजी आपल्या २०० सैनिकांचे सुरतेच्या रस्त्यावरून संचलन केले होते. सुरतमध्ये इंग्रजांनी मराठ्यांशी लढण्याचे धैर्य दाखवल्याचे दिसून येते. मराठ्यांनी केलेल्या सुरत लुटीत इंग्रजांचे १००० पौंडचे नुकसान झालेले होते. मराठ्यांनी इंग्रजांचा प्रतिनिधी स्मिथ त्याला पकडले व ३०० रुपये दंड घेऊन त्याची सुटका केली. या लुटीदरम्यान मराठ्यांनी सुरतेचा श्रीमंत व्यापारी हाजी सैद बेग याचा वाडा फोडून त्यातून संपत्ती मिळवली व वाड्याला आग लावण्याचा प्रयत्न केला, पण इंग्रजांनी त्याला विरोध केला कारण याच वाड्याजवळ इंग्रजांची वखार होती. वाड्याला आग लागून ती जर धडकली तर आपल्या वखारीचेही नुकसान होईल असे इंग्रजांना वाटत होते. त्यावेळी इंग्रज व मराठा सैन्यांमध्ये चकमक उडाली होती त्यात काही सैनिक हे मरण पावले होते छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रज वखारीकडे या लुटीच्या दरम्यान दुर्लक्ष केलेले होते. त्याचप्रमाणे सुरतेच्या दुसऱ्या लुटीच्या दरम्यान इ.स. १६७० मध्ये इंग्रज व्यापाऱ्यांनी मराठे आपली वखार लुटणार नाही याची काळजी घेतली होती.

त्यासाठी वखारीच्या संरक्षणाची चांगली व्यवस्था केली होती. छ. शिवाजी महाराजांचा आपल्या वखारीस त्रास होऊ नये म्हणून इंग्रजांनी आपले प्रतिनिधी त्यांच्याकडे पाठवून नजरानाही दिला होता. या लुटीत शिवाजी महाराजांनी इंग्रजांना त्रास दिला नाही असे सुरत येथील इंग्रज दप्तरातील रेकॉर्डवरून दिसून येते.

सुरत लुटीमधून इंग्रजांनी चांगलाच धसका घेतलेला होता, कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी जरी परकीय सत्तांना या लुटीदरम्यान कोणतीही इजा केली नसली तरी सुद्धा त्यांच्या दहशतीमुळे परकीय सत्ताधीशांनी मराठ्यांच्या शक्तीचा व युक्तीचा प्रचंड धसका घेतलेला होता. या दोन लुटीमुळे सुरत बेसुरत झाले होते. या शहरातील व्यापार चांगलाच मंदावलेला होता. आपल्या व्यापाराच्या सुरक्षिततेसाठी आणि शिवाजी महाराजांच्या सुरत लुटीचा फटका बसू नये म्हणून इंग्रजांनी सुरत ऐवजी मुंबईत आपली वखार स्थलांतरित केलेली होती व छत्रपती शिवाजी महाराजांची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न केलेला होता. मुंबईतील मुख्य वखार आणि मुंबई बेटाच्या संरक्षणासाठी शिवाजी महाराजांशी सलोख्याचे संबंध असणे त्यांना गरजेचे वाटत होते. इ.स. १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी कल्याण-भिवंडीचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. या प्रदेशातून इंग्रज लाकूडफाटा आणत असत यावर मराठ्यांनी बंदी घातली होती. त्यामुळे शिवाजी महाराजांशी प्रत्यक्ष वाटाघाटी करून सवलती मिळवाव्यात व राजापूरला वखार सुरू करण्यास परवानगी घ्यावी असा विचार इंग्रजांनी केला होता. त्यासाठी इंग्रजांनी आपला प्रतिनिधी स्टीफन हॉसस्टिक याला छ. शिवाजी महाराजांशी बोलणी करण्यासाठी मार्च १६७२ मध्ये महाराजांकडे पाठविले होते. छ. शिवाजी महाराज व स्टीफन हॉस्टिक यांची भेट मे १६७२ मध्ये झालेली

होती. स्टीफन हॉसस्टिक याने छ. शिवाजी महाराजांसाठी खास लंडन बोटीने आणलेल्या मौल्यवान नजरांना भेट दिल्या होत्या. छ. शिवाजी महाराज व स्टीफन हॉसस्टिक यांच्या भेटीत उभयतांमध्ये वाटाघाटी होऊन इंग्रजांना राजापूरला पुन्हा वखार उघडण्यास आपण सहानुभूती दाखवू असे आश्वासन छ.शिवाजी महाराजांनी दिले परंतु या भेटीतून इंग्रजांच्या पदरात फारसे काही पडले नाही.

पुढे इ.स. १६७३ मध्ये मराठ्यांनी हुबळी येथील इंग्रजांची वखार लुटली आणि ८००० होनांचा मुलुख मिळवलेला होता. राजापूर व हुबळी येथील इंग्रजांच्या वखारीतून लुटून मराठ्यांनी इंग्रजांची केलेली नुकसान भरपाई मिळवण्यासाठी मुंबईकर इंग्रजांनी थॉमस निकल्स याला शिवाजी महाराजांच्या भेटीसाठी रायगडावर पाठवलेले होते तीन जून १६७३ रोजी शिवाजी महाराज व थॉमस निकल्स यांची भेट झाली या भेटीमध्ये थॉमस निकल्सने हुबळी येथील इंग्रज वखारीच्या लुटीचा विषय काढला तेव्हा हुब्लीची लुट नेमकी कोणी व केव्हा केली हे माहीत नसल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे शिवाजी महाराजांनी सांगितले. आपल्या प्ररदेशातून लाकूड फाटा पुरवठ्याबाबत सवलती देण्याचे आश्वासन मात्र त्यांनी इंग्रजांना दिलेले होते.

जून १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करण्याचा निश्चय केलेला होता या समारंभाचे औचित्य साधून आपल्या व्यापारासाठी खास सवलती मिळविण्यासाठी इंग्रजांनी आपला प्रतिनिधी हेन्री ऑक्सिडेंट यास छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगी रायगडावर पाठवलेले होते. राज्याभिषेक प्रसंगी तो रायगडावर उपस्थित होता राज्याभिषेकाचे वर्णन त्यांनी आपल्या रोजनिशीमध्ये करून ठेवलेले आहे. राज्याभिषेकानंतर १२ जून १६७४ रोजी शिवाजी महाराज व हेन्ड्री ऑक्सिडेंट यांची भेट झाली, या भेटीत हेन्री ऑक्सिडेंट याने छत्रपती शिवाजी महाराजांना खास नजरांना भेट म्हणून दिले. भेटीमध्ये महाराजांनी इंग्रजांना स्वराज्यात व्यापार करण्याची आणि राजापूर दाभोळ, चोळ, कल्याण येथे वखारी उघडण्याची परवानगी दिली होती.

इ.स.१६७५ मध्ये इंग्रजांनी राजापूर येथे पुन्हा वखारीची स्थापना केली. १६७४ च्या शेवटी मराठ्यांनी खान्देशातील धरणगाव येथे इंग्रजांची वखार लुटली त्यावेळी त्यावेळी वखारीचा प्रमुख सॅम्युअल ऑस्टिन (धरणगाव वखारीचा प्रमुख) याने नुकसान भरपाईसाठी शिवाजी महाराजांच्या भेटीसाठी ६ सप्टेंबर १६७५ रोजी रायगडावर आला होता. शिवाजी महाराजांनी या संदर्भात आपल्या सेनापतींकडून कोणतीही माहिती न मिळाल्याचे सांगून नुकसान भरपाई देण्याचे नाकारले. मार्च १६, १६७५ मध्ये दक्षिण कोकणच्या मोहिमेवर असताना शिवाजी महाराजांनी राजापूरला भेट दिली. इंग्रजांनी त्यांना २०० होणांचा नजराना दिला, परंतु शिवाजी महाराज व इंग्रज संबंध फार दिवस चांगले राहू शकले नाही. मराठ्यांच्या विरोधात इंग्रज सिद्दींना सातत्याने मदत करत असे तसेच त्यांच्याकडे तोफांची मागणी करूनही इंग्रजांनी ती मागणी जाणीवपूर्वक टाळली होती. त्यामुळे इंग्रजांचा बंदोबस्त करण्याचा निर्णय शिवाजी महाराजांनी घेतला. इंग्रज व सिद्धींना शह देण्यासाठी ऑगस्ट १६७९ मध्ये खांदेरी बेटावर तटबंदी बांधण्यास सुरुवात केली, शिवाजी महाराजांचा अधिकारी मायनाक भंडारी यांच्या देखरेखीखाली काम सुरू होते. मराठ्यांना मिळणारी रसत तोडण्याचा इंग्रजांनी प्रयत्न केला इंग्रज व मराठा आरमारांमध्ये चकमकी सुरू झाल्या, मराठ्यांचा आरमार प्रमुख दौलत खान याकडे २० गुराबांचे आरमार होते, तर मुंबईहून

केगविनच्या नेतृत्वाखाली रिवेंज फ्रिग्रेट हे मोठे जहाज व सात गलबते निघाली. कल्याण मार्गे मराठ्यांचे सैन्य निघाल्याचे कळताच इंग्रजांनी जानेवारी १६८० मध्ये खांदेरीहून आपले आरमार काढून घेतले तसेच सिद्दींचा इंग्रजांना मदत करण्याचा प्रयत्न मराठ्यांनी हाणून पाडला. खांदेरी बेटावर तटबंदी बांधण्याचे राजांनी सुरू केल्यावर इंग्रजांनी प्रथम मराठ्यांना अडकाठी केली पण मराठ्यांचे आक्रमक स्वरूप पाहून इंग्रजांनी शिवाजी महाराजांची  खांदेरी वरची मालकी मान्य केली.

## ६.६ **छत्रपती  शिवाजी महाराज व फ्रेंच संबंध**

फ्रेंचांनी भारतामध्ये पहिली वखार १६६८ मध्ये राजापूर येथे उघडली त्यानंतर मिरज, तेलचरी आणि मसुलीपट्टम येथे फ्रेंचाच्या वखारी उघडण्यात आल्या होत्या. मराठे व फ्रेंच यांचे संबंध येण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मराठ्यांना सातत्याने भासणारी तोफा व बंदुकांची कमतरता होय. यामुळेच सिद्धींना जिंकणे मराठ्यांसाठी दुरापास्त होऊ लागले. १६७०  मध्ये शिवाजी महाराजांनी दुसऱ्यांदा सुरतेची लूट केली त्या लुटी वेळेस मराठ्यांकडून कसलाही त्रास फ्रेंच वखारीस होणार नाही असे आश्वासन दिले होते. फ्रेंच वखारीच्या शेजारीच असलेल्या काशनगरच्या राजाच्या वाड्यात मोठ्या प्रमाणात संपत्ती असल्याचे शिवाजी महाराजांना समजले होते. या वाड्यात प्रवेश करण्यास फ्रेंचांनी वाट द्यावी अशी मागणी शिवाजी महाराजांनी केली आणि या मागणीनुसार मराठ्यांना फ्रेंचांनी वाट करून देऊन मराठ्यांना मदत केली.

सुरतच्या फ्रेंच वखारीचे अधिकारी बारॉ व ब्लोव यांनी फ्रेंच प्रधान कोलबेर याला लिहिलेल्या पत्रात दिलेल्या माहितीनुसार चोल बंदर फ्रेंचांना विकत देण्यासंबंधी बारॉ याने १६७२ मध्ये शिवाजी महाराजांची गुप्तपणे चर्चा केली होती, परंतु पुरेशा पैशाच्या अभावी फ्रेंचांना हे बंदर विकत घेता आले नाही. कर्नाटक मोहिमेच्या बारॉ काळात पॉंडिचेरीचा गव्हर्नर फ्रॅंकाय मार्टिन याने वखार उघडण्याच्या परवानगी बरोबरच संरक्षणाचे आश्वासन शिवाजी महाराजांकडून मिळवले फ्रेंच अधिकारी  आणि शिवाजी महाराज यांच्यात असणाऱ्या मैत्रीमुळे  पौंडेचेरीचा परवाना मराठ्यांनी फ्रेंचांना दिला परंतु असे असले, तरीही राजाविषयीच्या संकल्पनेत शिवाजी महाराज फ्रेंच अधिकाऱ्यांच्या दृष्टीने येत नव्हते तरीही व्यापार व राजनीतिक संबंध लक्षात घेऊन फ्रेंचांनी मराठ्यांशी मैत्रीचे धोरण कायम ठेवले होते.

कर्नाटकातील विजयानंतर कारोमंडल किनाऱ्यावरील इतर ठाण्यांबरोबर पौंडेचेरी ही मराठ्यांच्या अंमलाखाली आली फ्रेंच वखारीला परवाना देताना शिवाजी महाराजांनी मराठ्यां तर्फे दैनंदिन व्यवहारावर देखरेख ठेवण्यासाठी आपले दोन अधिकारी पौंडेचेरी येथे पाठवले होते. मराठे कर्नाटकात येण्यापूर्वी शेरखान लोधी व नासिरुद्दीन मोहम्मद यांच्या संघर्षात हस्तक्षेप करून शेरखानची बाजू घेऊन फ्रेंचांनी देशातील अंतर्गत घडामोडीत हस्तक्षेप केला होता. कर्नाटक मोहिमेत मराठ्यांकडून पराभूत झालेला आदिलशाही सुभेदार शेरखान लोधी याच्याशी फ्रेंच गुप्तपणे संधान साधतात असे मराठ्यांचे फ्रेंचांविषयी मत बनले होते परंतु नंतर फ्रेंच यांनी आपले धोरण बदलले आपला व्यापार व संपत्ती सुरक्षित ठेवणे हेच आपले उद्दिष्ट ठेवले होते.

## ६.७ सारांश

सतराव्या शतकात युरोपियन व्यापाऱ्यांचे आरमारावर वर्चस्व होते छत्रपती शिवाजी महाराजांनी कोकण प्रदेश काबीज केल्यावर त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली की सिद्धी इंग्रज पोर्तुगीज डच या परकीय लोकांपासून स्वराज्यात धोका आहे म्हणून छत्रपती महाराजांनी आरमाराची आवश्यकता वाटू लागली आणि याच कार्यासाठी महाराजांनी १६५७ ते १८५८ सालापासून आरमार बांधणीस प्रारंभ केला होता. छत्रपती शिवरायांनी आरमारा संबंधी योग्य ती कारवाई योग्य ती सावधगिरी आणि यंत्रणा ठेवली होती यासाठी सिंधुदुर्ग विजयदुर्ग सुवर्णदुर्ग आणि इतर जलदुर्ग बांधत त्यांची मजबुती ही केली होती त्याचा त्या मजबुतीचा हेतू म्हणजे आरमाला आरमाराला संरक्षण मिळावे आणि परकीय सत्तांपासून परकीय सत्तांवर वचक राहावा एक हातात तागडी व एका हातात बंदूक घेऊन आलेले हे परकीय व्यापारी विश्वास ठेवण्याच्या लायकीचे नाहीत संधी मिळताच ते आपल्या देशात पाय बसतील याचा त्यांना अंदाज होता शिवाजी महाराजांच्या काळात अनेक छोटी-मोठी आरमारी युद्धे झाली त्यात परकीय सत्ता पोर्तुगीज इंग्रज डज व जंजिरेकर सिद्धी यांच्या अनेक जहाजांचा पराभव हा मराठ्यांच्या आरमाराने केला ज्या काळात महाराष्ट्रात अभियांत्रिकी किंवा स्थापत त्याचं पद्धतशीर शिक्षण देणाऱ्या संस्था नव्हत्या राजकीय दृष्ट्या कशाचीच खात्री देता येत नव्हती दुर्ग बांधणीत वेगवेगळे प्रयोग करून पाहण्यात की स्वस्तता तर नव्हतीच पण आर्थिक पाठबळही अपूर्णच होतं अशावेळी स्वकीय आणि परकीय शत्रूंशी सामना करत शिवाजी महाराजांचे असे अद्वितीय शास्त्रीय पायावर अवलंबून असणारे दुर्ग बांधणीचे प्रयोग चालू होते, स्वराज्यामध्ये आरमाराची उभारणी आणि स्वराज्याच्या संरक्षणासाठी जलदुर्ग बांधण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले होते, त्यामुळे त्यांना भारतीय आरमाराचे जनक म्हंटले जाते.

## ६.८ प्रश्न

१. छत्रपती शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्यातील संघर्षाचे विश्लेषण करा?

२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठे आणि डच यांच्यातील संबंधाचे वर्णन करा?

३. छत्रपती शिवाजी महाराज आणि इंग्रज यांच्यातील संघर्षावर सविस्तर चर्चा करा?

## ६.९ संदर्भ

१. खोबरेकर वि.गो., महाराष्ट्राचा इतिहास –मराठा कालखंड भाग-१ शिवकाळ

२. कुलकर्णी अ.रा., मराठ्यांचा इतिहास, खंड-१

३. रानडे, महादेव गो., मराठी सत्तेचा उदय

४. सरकार, जदुनाथ, शिवाजी अँड हीज टाइम्स

५. कोंडेकर,ए. वाय., मराठ्यांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

❖❖❖❖



munotes.in

# ७

# शिवराज्याभिषेक आणि त्याचे महत्त्व

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये

७.१ प्रस्तावना

७.२ शिवराज्याभिषेक

७.३ शिवराज्याभिषेकाची गरज

७.४ शिवराज्याभिषेकाचा सोहळा

७.५ शिवराज्याभिषेकाचे महत्त्व

७.६ छ. शिवाजी महाराजांचा दुसरा राज्याभिषेक

७.७ सारांश

७.८ प्रश्न

७.९ संदर्भ

## ७.० उद्दिष्ट्ये

१. शिवराज्याभिषेकाचे सोहळा व घटनाक्रम समजून घेणे.

२. शिवराज्याभिषेकाचे ऐतिहासिक महत्त्व समजून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

महाराष्ट्र धर्माची कल्पना ओळखीची वाटत असली तरी त्याची नेमकी व्याख्या करण्याचा प्रयत्न करताना अनेक अडचणी उभ्या राहतात. १०० वर्षांच्या काळात महाराष्ट्र धर्माची कल्पना एक वादाचा विषय बनला आहे. ऐतिहासिक संदर्भात मात्र याचा अर्थ वेळोवेळी कसा बदलत गेला, हे मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करताना लक्षात येते.

## ७.२ शिवराज्याभिषेक

शिवाजी महाराजांनी अतुल पराक्रम करून अविश्रांत मेहनत घेऊन स्वराज्याचे स्वप्न साकार केले. त्यांच्या या उज्ज्वल कामगिरीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी राज्याभिषेकाची आवश्यकता होती. मराठी स्वराज्य अस्तित्वात आले, हे जरी खरे असले तरी त्याला स्वातंत्र्य, सार्वभौम सत्तेचे स्वरूप अजून मिळाले नव्हते. राज्याभिषेकामुळे राज्यात सुराज्य अवतरले होते.



munotes.in

मध्ययुगीन सनातनी सरंजामशाही, राज्याची जुलमी चौकट मोडून पडली होती. अत्याचार थांबले होते.

मोगल दरबार आणि अदिलशाही दरबार शिवाजी महाराजांना राजा मानायला तयार नव्हते. इतकेच काय मोगल दरबारी आणि आदिलशाही दरबारी असलेले मराठी सरदारही, शिवाजी महाराजांना राजा मानायला तयार नव्हते. मराठी मुलखातील रयतेने मात्र शिवाजी महाराजाला केव्हाच आपला राजा मानले होते. रीतसर विधिवत राज्याभिषेक झाल्याखेरीज एखाद्याला 'राजा' म्हणून संबोधले जात नाही, यात सत्यता होती. कौटिल्याचे अर्थशास्त्र या राजनीतीवरच्या ग्रंथामधून 'राजा' व 'राज्य' या संकल्पनांची चर्चा झालेली होती. स्वतंत्र राज्य अस्तित्वात येऊन उपयोगास नव्हते. त्यास सार्वभौमत्व रीतसर, विधिवत घोषित होणे आवश्यक होते.

## ७.३ शिवराज्याभिषेकाची गरज

लोकांनी राजा म्हणून ज्याला स्वीकारलेले होते, त्या ''छत्रपती शिवाजींनीही'' आता रीतसर राज्याभिषेक समारंभ साजरा करावा व राज्याभिषिस्त राजा बनावे, अशी मागणी होऊ लागली. राजकीयदृष्ट्या स्वराज्याचे स्वतंत्र अस्तित्व घोषित करणे आवश्यक होते. मुख्यतः शिवाजी राजांनी राज्याभिषेक समारंभास संमती दिली. या राज्याभिषेकानंतर महाराष्ट्रातील वतनदार, जहागीरदार, सरंजामदारांनी लोकांच्या या राजाला 'राजा' म्हणून मान्यता दिली नव्हती. परंतु त्यांना या सार्वभौम सत्तेचे श्रेष्ठत्व मानावे लागणार होते. प्रचलित धार्मिक परंपरेनुसार राजा हा अभिषिक्त असावा लागतो. राज्याभिषेकामुळे मराठी स्वराज्याच्या अस्तित्वाला तसेच न्यायव्यवस्थेला, प्रशासनाला, प्रशासनाने केलेल्या करारांना मान्यता प्राप्त होणार होती. मराठी सैन्याला एक वेगळा अर्थ प्राप्त होणार होता.

### ७.३.१ स्वतंत्र राजेपणाची गरज :

मराठी माणसाच्या मनात केवळ स्वराज्य, स्वधर्म व संस्कृती याबद्दल जिद्द निर्माण करणे आवश्यक होतेच, परंतु त्याचबरोबर देवगिरीच्या यादवानंतर मराठ्यांना राजा राहिला नव्हता. सर्व मराठे नावाचे राजे होते. प्रत्यक्षात शहाजी राजे भोसले हे मुसलमानांचे पाईक होते. असे राज्य अथवा राज्यपद महाराजांना नको होते. त्यामुळेच त्यांनी स्वतःला राज्याभिषेक करून घेण्याचे ठरविले.

### ७.३.२ बंडखोर जहागिरदार या कल्पनेस विरोध :

शिवाजी महाराज हे शहाजी राजांच्या जहांगिरीचे वारसदार असून त्यांनी निर्माण केलेल्या राज्यास आदिलशाही, कुतुबशाही, मोगलशाही, पोर्तुगीज, इंग्रज हे मान्य करण्यास तयार नव्हते. तो जहांगिरदारांचा बंडखोर पुत्र आहे. लुटारू आहे असे उल्लेख केले जात. या सर्वांना आळा घालता यावा याकरिता महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला.

### ७.३.३ मुस्लीम सत्तांना इशारा :

गेली ३०० वर्ष मुस्लीम सत्ताधीश मराठ्यांवर सत्ता गाजवित होते. या सत्ताधीशांना इशारा द्यावयाचा होता की, आता हिंदूचे राष्ट्र निर्माण झाले व त्यांना राजा मिळाला आहे. येथून पुढे त्यांच्यावर जुलूम आणि अन्याय केला जाणार नाही, अन्याय करणाऱ्यास शासन केले जाईल, असे यातून सिद्ध करायचे होते.

**७.३.४ न्यायालयीन अडचणीचे निवारण :**

शिवाजी राजे राज्याभिक्षिक्त नसल्याने त्यांना ब्राह्मण लोकांचे खटले तसेच न्यायदान, शिक्षा, कर वसुल करणे याचा अधिकार नाही, असे समजले जाई. याकरिता महाराजांना वारंवार ब्राह्मण सभेकडे किंवा पंडितरावांची मदत घ्यावी लागे. या अडचणी दूर करण्यासाठी राज्याभिषेकाची आवश्यकता होती.

**७.३.५ एक संस्कार म्हणून आवश्यक :**

राज्याभिषेक हा प्रामुख्याने धार्मिक सोहळा असून या संस्काराने महाराजांच्या कर्तबगारीला धर्म शास्त्रीय बैठक मिळणार होती. शिवाय असे संस्कार झाल्याशिवाय जनता महाराजांना राजे मानण्यास तयार नव्हती.

**७.३.६ प्रजाजनांवर छाप :**

उत्सव  सर्वांनाच आवडतो. या राज्याभिषेक प्रसंगी मोठ्या प्रमाणावर आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करून सर्व जनतेवर महाराजांना छाप पाडायची होती. शिवाय जनतेचा पाठिंबा त्यांना मिळवायचा होता.

## ७.४ शिवराज्याभिषेकाचा सोहळा

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, शनिवार, तारीख ६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्याचे ठरविण्यात आले. जानेवारीतच गागाभट्टांसह काशीचे काही पुरोहित मंडळी डेरेदाखल झाली. सारा रायगड समारंभाच्या तयारीत गुंतला. अगदी शास्त्रोक्त पद्धतीने आणि धार्मिक परंपरेनुसार संपूर्ण समारंभ करण्याचे ठरले. उपनयन संस्कार, विवाह संस्कार आदि पुन्हा केले गेले. राज्याभिषेकापूर्वी राज्यातील देवस्थानांना विधिवत भेटी दिल्या.

महाराजांनी प्रथम गणेश पूजन व स्वस्तिक पूजन करून मंडपाच्या महादेवीवर पंचामृतांनी भरलेल्या सुवर्णरंजत, कुंभांनी त्यांना स्नान घातले. त्यानंतर वेदीवरील आसनावर त्यांना विधीपूर्वक बसविण्यात आले. कित्येक नवरत्नादि सुवर्णकमळे व नाना सुवर्ण फुले करून सुसज्ज केले. वस्त्रे, महादाने इ. दाने केली गेली. सिंहासनास अष्टखांब सुवर्ण जडित केले. अष्टखांबी अष्टप्रधान मंडळ उभे राहिले. छत्र जडावाचे, मोतीलग झालरीचे करून मस्तकावरी धरिले. छत्रपती नावाने घोषणा चालल्या होत्या. अभिषेक झाल्यानंतर आसनावर महाराज, सोयराबाई, युवराज संभाजी यांना बसविण्यात आले. वाद्यांच्या गजरात, तोफा डागण्यात आल्या व सोळा सुहासिनींनी आणि सोळा कुमारिकांनी महाराजांना सोन्याच्या ताटातून पंचारती केली.

यानंतर महाराज घोड्यावरून गडावरील देवतांचे दर्शन घेण्यासाठी गेले. काही अंतरावर सुवर्ण अलंकारांनी सजविलेल्या गजराजांवर माहुत स्वतः सेनापती हंबीरराव मोहिते तर मोर्चेल धरून मोरोपंत होते. त्यानंतर महाराजांवर फुलांची वृष्टी करण्यात आली. महाराजांनी देवदर्शनानंतर कुलदैवत व मातोश्रींना वंदन केले व राज्याभिषेक संपला.

**आपली प्रगती तपासा**

१) छत्रपती शिवाजी महाराजांना स्वतःस राज्याभिषेक करून घेणे गरजेचे का वाटले ? ते स्पष्ट करा.

## ७.५ शिवराज्याभिषेकाचे महत्त्व

### राजकीय महत्त्व

राजकीय दृष्ट्या राज्याभिषेकामुळे सत्तेचे केंद्रीकरण झाले. महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या सत्तेचा उदय झाला व त्यामुळे हिंदवी स्वराज्याची स्थापना खऱ्या अर्थाने झाली.

काही उर्मठ मराठा सरदार अजूनही मुघलांकडे व बिजापूर राज्यकर्त्यांकडे आपली कामगिरी बजावीत होते. त्यामुळे छ. शिवाजी महाराजांना कमी लेखत होते. परंतु राज्याभिषेकामुळे छ. शिवाजी महाराजांना कायदेशीर अधिकार प्राप्त झाले व या सरदारांना त्यांना एक राज्यकर्ता म्हणून महत्त्व द्यावे लागले.

राज्याभिषेकाच्या वेळी छ. शिवाजींनी स्वतःला देशमुख घराण्यांपेक्षा स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध केले. छ. शिवाजींनी स्वतःला आजूबाजूच्या प्रदेशांच्या राज्यकर्त्यांबरोबर स्वतःची प्रस्थापना केली. १६७७ मध्ये छ. शिवाजी महाराजांनी बाजी मुधोळकर देशमुखांना पत्र लिहिले ज्यात, त्यांनी स्वतःला स्वतंत्र घोषीत करून कुतुबशहांच्या गोवळकोंड्या बाबत स्वतःच्या समान हक्कांचा शिक्कामोर्तब केला.

राज्याभिषेक झाल्यानंतर लगेचच छ. शिवाजी महाराजांनी भिमा नदीच्या तीरावर असलेल्या मुघलांच्या छावणीवर मोहिम काढली. त्यानंतर त्यांनी खानदेश व बिरार पर्यंत मजल मारली. या मोहिमेवर जाताना धारंगगाव येथे असलेली इंग्रजांची वखार जाळून टाकली.

या सगळ्याचा असा अर्थ स्पष्ट झाला की, एका हिंदू राज्यकर्त्यांने आपले राज्य स्वीकारून धर्माप्रमाणे राज्याला सुरूवात केली व लोकांचे रक्षण केले.

राज्याभिषेक झाल्यानंतर छ. शिवाजी महाराजांना संपूर्ण न्यायालयीन अधिकार प्राप्त होऊन ते योग्य प्रकारे न्यायनिवाडा करू शकले. इतिहासकार जी.एस.सरदेसाईच्या मते, बिजापूरचे सुलतान व गोवळकोंड्याच्या राज्यकर्त्यांनी छ. शिवाजींच्या राजेपदाला मान्यता दिली. कारण त्यामुळे मुघलांच्या दख्खन मोहिमेवर अडथळा निर्माण करणे शक्य झाले.

### सामाजिक महत्त्व :

राज्याभिषेकामुळे समाजात एक योग्य दिशा दाखविणे शक्य झाले. विविध स्तरावरील लोकांच्या मनात एक नव चैतन्य निर्माण झाले. लोकांना आता त्यांचा राजा मिळाला होता व राजाही आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी निर्भिडपणे कार्य करू शकत होता. राज्याभिषेकाच्या वेळी छ. शिवाजींनी आपण धर्म व न्यायाने राज्य करू असे आश्वासन लोकांना दिले.

### प्रशासकीय व घटनात्मक महत्त्व :

राज्याभिषेकामुळे प्रशासकीय दृष्ट्या शिवाजी महाराजांच्या मराठा स्वराज्याला घटनात्मक, सार्वभौम स्वरूप प्राप्त झाले. छ. शिवाजींनी आपली राजमुद्रा व्यवहारात आणली. अशा प्रकारे राज्याभिषेकामुळे प्रशासकीय व घटनात्मक महत्त्व प्राप्त झाले.

**नव्या कालखंडाची सुरुवात :**

राज्याभिषेकाच्या समारंभाच्या वेळी शिवाजींनी नव्या कालखंडाची व नव्या कालगणनेची घोषणा केली. त्यादिवसापासून ''राज्याभिषेक शक'' अशा नव्या कालगणनेला सुरूवात झाली. शक सुरु करणे म्हणजे नवे युग सुरु करणे. मराठा स्वराज्यात राज्यभिषेकाने नवे युग सुरु झाले होते.

राज्याभिषेकानंतर छ. शिवाजींनी तांबे व सोन्याची नाणी काढली. त्याला ''शिवराई'' म्हणत. छ. शिवाजींच्या आदेशावरून बाळाजी आवजी यांनी ''लेखनप्रशस्ती'' असा ग्रंथ लिहून दरबारातील फारशी शब्दांना मराठी प्रतिशब्द या ग्रंथात दिले होते. यामुळे दरबारी भाषा आता मराठी भाषा झाली होती. याशिवाय त्यांच्या सर्व मंत्र्यांना संस्कृत किताब देण्यात आला होता.

## ७.६ छत्रपती शिवाजी महाराजांचा दुसरा राज्याभिषेक

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा पार पडत असतानाच जिजाबाईंची प्रकृती बिघडली. शेवटी राज्याभिषेकाच्या १२व्या दिवशी म्हणजेच १८ जून १६७४ या दिवशी त्यांचे देहावसान झाले. रायगडावर दु:खाची छाया पसरली. वातावरण एकदम बदलले. तशातच काशीच्या एका तांत्रिक गोसावींपैकी 'निश्चलपुरी' नावाच्या गोसावीने राज्याभिषेकात अनेक चुकांवर तोंडसुख घेतले. तांत्रिक पद्धतीच्या राज्याभिषेकावर सर्व विधी कसे साग्रसंगीत आणि यथासांग होतात, असे म्हणत वैदिक पद्धतीचा हा राज्याभिषेक राजांनी करून घेतला हे चुकीचे झाले, असेही तो उघडपणे बोलू लागला.

सगळ्याविधी कुयोग व कुमुर्हूर्ते झाल्याने अनेक संकटे येतात असे तो म्हणू लागला. प्रत्यक्ष राज्याभिषेकाच्या तांत्रिक देवदेवतांचे पुजन झाले नाहीच, स्थानदेवता, गृहदेवता, न पुजल्यामुळे त्या नाराज झाल्या व त्यांना संतुष्ट करण्यासाठी पुन्हा एकदा राज्याभिषेकाचा विधी करावा, असे बोलले जाऊ लागले. फेब्रुवारी १६७४ ला प्रतापराव गुजरांचा मृत्यु झाला. तसेच इ.स. मार्च १६७४ ला राणी काशीबाईंचा मृत्यु झाला. तो अपशकून म्हणून राज्याभिषेकाशी जोडला गेला. राज्याभिषेक समारंभातच युवराज संभाजींच्या गळ्यातील मोत्यांच्या कंठातून दोन मोती निखळले. हा प्रसंग अपशकून मानला गेला. याशिवाय तलवारीची पूजा करताना तलवार म्यानातून पडणे, मंत्री दत्ताजी त्र्यंबक यांचा पाय घसरणे अशा गोष्टींना निश्चलपुरीनी अपशकुन व देवतांचा रोष असे दाखवून दिले.

अशा प्रकारे इ.स. २४ सप्टेंबर १६७४ रोजी दूसरा तांत्रिक राज्याभिषेकाचा विधी झाला. देवतापुजन झाले. कलश स्थापना झाली, मेरूयंत्र चित्रित केले. मंडप व स्तंभ अलंकृत करण्यात आले. सिंहासनावरील सिंह मात्रांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. शिवशजलांनी राजाचा अभिषेक केला. 'शक्ती संजीवनी' व 'राजराजेश्वरी' मंत्राची विद्या राजाला दिली गेली. त्यानंतर राजाने पर्वतप्राय अन्न बलीमंत्राने अभिष्ठित करून ठेवले होते. बलीमंत्राने दान दिले. शेवटी मंत्राच्या उदघोषात राजा सिंहासनाधिष्ठीत झाला. हा विधी एका दिवसातच उरकला. याही वेळी भरपूर दानधर्म केले गेले.

## ७.७ सारांश

राज्याभिषेकामुळे मराठी स्वराज्याच्या अस्तित्वाला न्यायव्यवस्थेला, प्रशासनाला, मराठी सैन्याला, औपचारिक मिळाली. अंदाधुंदी जुलमी राजवट संपली. कायद्याचे राज्य आले.

महाराष्ट्र धर्म चळवळ पुढे वाढत जाऊन इ.स. १६८९-१७०७ या मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या काळात मराठी माणूस झपाटून गेला होता. शर्थीचे प्रयत्न करून व कोणतीही किंमत देऊन स्वराज्याचे रक्षण करण्याचा निश्चय त्यांनी केला. राष्ट्राच्या जीवनात असे अग्नीपरिक्षेचे प्रसंग क्वचितच येतात. परंतु जेव्हा ते येतात, तेव्हा त्यांचे वेगळेपण स्वयंसिद्ध असते.

## ७.८ प्रश्न

१. छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावर टीप लिहा.

२. छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकास कारणीभूत असलेली कारणे स्पष्ट करा.

३. छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व घटनात्मक महत्त्व विशद करा.

४. छ. शिवाजी महाराजांच्या पहिल्या राज्याभिषेकाचे टीकात्मक परिक्षण करा.

## ७.९ संदर्भ

१. रानडे, एम.जी., राईज ऑफ दी मराठा पॉवर अॅन्ड अदर ऐसेस, १९६१.

२. सरकार, जदुनाथ, शिवाजी अॅन्ड हिज टाईम्स, ओरियन्ट लाँगमन, बॉम्बे, १९५२.

३. सरदेसाई, जी.एस., न्यु हिस्टरी ऑफ मराठास, खंड-I, मुन्शीराम मनोहरलाल पब्लिशर्स, बॉम्बे, १९८६.

४. पगडी, सेतू माधवराव, छत्रपती शिवाजी, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# ८

# छत्रपती शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहिम

**घटक रचना :**

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ मोहिमेची पूर्व - पिठीका

८.३ कर्नाटक मोहिमेची कारणे

८.४ मोहिमेच्या काळातील घटना

८.५ मोहिमेचे परिणाम

८.६ सारांश

८.७ प्रश्न

८.८ संदर्भ

## ८.० उद्दिष्ट्ये

१. कर्नाटक मोहिमेची कारणे व स्वरुप अभ्यासणे.

२. कर्नाटक मोहिमेतील घटना व परिणाम समजुन घेणे.

## ८.१ प्रस्तावना

इ.स. १६७४ च्या राज्यभिषेकानंतर मराठ्यांच्या तिजोरीवर बराच ताण पडला होता. परिणामी मराठा फौजेच्या फलटणींनी विविध ठिकाणी हल्ले सुरू केले होते. आदिलशाही कोकण परिसरात संघर्ष सुरू होतेच. अशा परिस्थितीत दक्षिण भारतातील सत्तेच्या समिकरणांमध्ये बदल सुरू झाले. आदिलशाही दरबारातील कलह, उत्तरेतून मुघली आक्रमणाचे संकट, कुतुबशाहीत वाढणारे हिंदू कारभाऱ्याचे वर्चस्व यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय हालचालींना वेग आला व त्यांनी कुतुबशाहीकडून आलेला मैत्रीचा प्रस्ताव मान्य केला. समकालीन पत्र संग्रहावरून कर्नाटक स्वारी मागे बरीच कारणे समजून घेता येतात. मुघलांच्या भीतीने मराठ्यांबरोबर उघड तह किंवा मैत्री करणे शक्य नव्हते. त्यामुळे वेगळ्या मार्गाने आदिलशाही प्रदेशातील कुतुबशाहीचा मुलुख आपण परत मिळवित आहोत, व शिवाजी महाराजास महसुलाच्या रूपाने पैसा गोळा करण्याची संमती देत आहोत असे कुतुबशहाने भासविले. शिवाजी महाराजांनी मालोजी घोरपडे यांना लिहिलेल्या पत्रावरून आदिलशाहीतील पठाणांचा बंदोबस्त करणे हा स्वारीचा एक प्रमुख हेतु असल्याचे दिसते.

राज्यभिषेकानंतर छ. शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहिमेची योजना आखली. यामागे त्यांचे बरेच हेतू होते. या मोहिमेतून पुन्हा एकदा त्यांच्या राजकीय व लष्करी कौशल्याचा प्रत्यय येतो.

दक्षिण भारतातील सर्वाधिक यशस्वी राजा म्हणून त्यांचा लौकिक सार्थ ठरला. छ. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील पुन्हा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून कर्नाटक मोहिमे बद्दल सांगता येते. मराठा राज्याच्या भावी दृढीकरणाच्या दृष्टीने टाकलेले हे पाऊल कसे यशस्वी झाले, ते समजुन घेणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

शिवराज्याभिषेकानंतर दिग्विजयी मोहीम आखण्याची गरज भासली. आर्थिक समस्या हा नेहमीचा प्रश्न असला तरी राजकीय परिस्थिती, लष्करी सिध्दता तेवढीच महत्त्वाची होती. दक्षिणेतील राजकीय स्थिती, कुतुबशाहीचा सत्ता विस्ताराचा प्रयत्न छ. शिवाजी महाराजांची किर्ती व वाढणारा प्रभाव या सर्व कारणांमुळे कर्नाटक मोहिमेची आखणी झाली.

## ८.२ मोहिमेची पूर्वपिठीका

कर्नाटकची भूमी नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असणारी सुवर्णभूमी म्हणून ओळखली जात असे. तर पूर्व किनाऱ्यावरील मद्रासचा प्रदेश अनेक शतकांपासून व्यापार केंद्र असणारा होता. येथील धार्मिक संस्थाने अत्यंत श्रीमंत परंतु राजकीय सत्ता तितकीच दुर्बल होती. अशा भूमीचा प्रदेश सामर्थ सत्ताधिशाच्या हातात असावा, या हेतूने आदिलशाही दरबारातील पठाण व दक्षिणी मुसलमान त्यांच्यातील संघर्ष आणि कुतुबशाही समोर असणारे मुघली आक्रमणाचे संकट या दोन्हींचा फायदा कर्नाटकवर नियंत्रण स्थापन करण्यासाठी करावा हा छ. शिवाजी राजांचा प्रयत्न होता.

विजयनगरच्या अस्तानंतर अनेक छोटे मोठे संस्थानिक निर्माण झाले होते. त्यांना पाळेगार व नायक असे म्हटले जात असे. तंजावर, मदुरा, म्हैसुर व वेल्लोर येथील नायक एकमेकांशी सतत संघर्ष करित असत. आदिलशहालाही उत्तरेत सत्ता विस्तार करण्याची संधी न मिळाल्यामुळे दक्षिणेत अर्कोट, कर्नूल, वेल्लोर अशाच ठिकाणी आपले नियंत्रण निर्माण केले. १२ जानेवारी १६७६ मध्ये व्यंकोजीने तंजावर जिंकले आणि तेथे स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्याचे व मदुरेच्या नायकाचे संबंध तणावाचे होते. शेरखान लोदी हा वालिगंडपूर वर नियंत्रण ठेवून होता. विजापूरी सुभेदार नासिर मुहम्मद हा जिंजीचा प्रशासक असून फ्रेंचांकडून पराभूत झाला होता.

शेरखान लोदी आणि नासिर मुहम्मद यांच्यातील संघर्षामुळे कुतुबशाहीने शेरखानाच्या विरोधात नासिर मुहम्मदशी सख्य निर्माण केले. मादण्णा या गोवळकोंड्याच्या प्रधानाच्या डोक्यात मात्र छ. शिवाजी राजांच्या मदतीने कर्नाटक जिंकण्याचा विचार होता. दक्षिणचा प्रदेश पठाणांच्या व मुघल सुभेदारांच्या नियंत्रणातून मुक्त करण्याचा त्याचा विचार होता.

## ८.३ कर्नाटक मोहिमेची कारणे

दक्षिणेतील राजकीय अस्थिरता हे जरीही छ. शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमचे एक महत्त्वाचे कारण असले तरीही त्या व्यतिरिक्त पुढील गोष्टीही त्यांच्या स्वारीस कारणीभूत होत्या.

१) आदिलशाही दरबारातील परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत होती. दक्षिणी मुसलमान आणि अफगाणी पठाण यांच्यातील वाढता संघर्ष खवासखानाच्या हत्येस जबाबदार ठरला. पुढे खिज्रखान या अल्पवयीन आदिलशहाच्या समर्थकासही दरबारी कारस्थानांना बळी पडावे लागले. बहालोलखान आणि मुघल सुभेदार बहादूरखान यांच्यातील संघर्षामुळे मोडकळीस आलेल्या आदिलशाहीवर अधिकच कठीण प्रसंग आला या संकटातून छ. शिवाजी राजांच्या मोहिमांकडे लक्ष देणे आदिलशहास अशक्य होते.

२) दक्षिणचा मुघल सुभेदार बहादूरखान यांच्याशी छ. शिवाजी महाराजांचा संपर्क येऊन राजांनी हुशारीने त्याच्याशी संधान बांधून संभाजीसाठी ६००० ची मनसब मिळविली. या दरम्यान मुघलांचा आदिलशाही संपविण्याचा प्रयत्न होता व त्या पासून त्यांना छ. शिवाजी महाराजास लांब ठेवायचे होते. कर्नाटक मोहिमेसाठी हा योग्य काळ होता. या जाणीवेने छ. शिवाजी राजांनी निराजी रावजी या आपल्या वकिलास बहादूरखानाकडे पाठविले आणि आपले तटस्थतेचे धोरण कायम ठेवण्याचा निर्णय कळविला.

३) राज्याभिषेक आणि इतर मोहिमांमुळे मराठ्यांना खजिना रिक्त झाला होता. याच दरम्यान कर्नाटकच्या समृद्ध प्रदेशाची माहितीही मिळत होती. मराठ्यांच्या मोहिमेसाठी एक अनुकूल घटना या काळात घडली. ती म्हणजे रघुनाथपंत हणमंते हा व्यंकोजीचा सल्लागार शिवाजीराजांना येऊन मिळाला. उत्तरेत सुरत किंवा इतर कोणताही प्रदेश तेवढा समृद्ध नव्हता, म्हणूनच कर्नाटककडे लक्ष वळले.

४) व्यंकोजी, छ. शिवाजीराजांचा सावत्र भाऊ शहाजीराजांच्या कर्नाटक येथील जहागिरीत वास्तव्यास असून आदिलशहाच्या दरबारातील सरदार होता. आपल्या वडीलांच्या जहागिरीतील काही हिस्सा आपणही घेऊन नवीन किल्ले बांधून उत्तरेतील शत्रुविरूद्ध भक्कम मोर्चे बांधणी करावी, हा स्वारीमागचा एक महत्त्वाचा हेतू होता.

५) मादण्णा पंडित, कुतुबशहा अबुल हसन याचा चतुर वजीर असून त्यांच्याच सल्ल्याने कुतुबशहाने छ. शिवाजी राजांची भेट घेऊन कर्नाटक प्रांतातील विविध प्रदेश जिंकून आपल्या राज्यात समाविष्ट करण्याची व त्यासाठी छ. शिवाजी राजांची मदत घेण्याची योजना आखली. मराठ्यांच्या दृष्टीने या मोहिमेचा सर्व खर्च कुतुबशहाकडून मिळणार असल्याने मिळालेल्या प्रदेशाचा ताबा कुतुबशहाकडे देण्याची त्यांची तयारी होती.

## ८.४ मोहिमेच्या काळातील घटना

प्रल्हाद निराजी या आपल्या वकिलास कुतुबशहाकडे पाठवून त्याच्यामार्फत मादण्णा व कुतुबशहा यांच्याशी बोलणी छ. शिवाजी राजांनी प्रत्यक्ष भेटीपूर्वीच केली. जानेवारी १६७७ मध्ये रायगड सोडण्याआधी शिवाजीराजांनी आपल्या प्रदेशाच्या प्रशासनाची घडी नीट बसवली. मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, दत्ताजी त्रिबंक आणि युवराज संभाजी यांच्यावर जबाबदारी सोपविली. या सर्व कर्तबगार कारभाऱ्यांनी चोख प्रशासनाचे अश्वासन दिल्यावरच मोहिमेची सुरूवात झाली.

**गोवळकोंड्यात प्रवेश :**

फेब्रुवारी १६७७ मध्ये मराठा सैन्याने हैदराबादमध्ये प्रवेश केला. मादण्णा अकण्णा आणि राज्यातल्या काही ज्येष्ठ लोकांनी छत्रपती शिवाजी राजांचे स्वागत केले. शहरात उत्तम सजावट करण्यात आली होती. रस्त्यावर दुतर्फा छ. शिवाजी राजांच्या दर्शनासाठी लोकांनी गर्दी केली होती. मराठ्यांचे सुमारे ५०,००० सैन्य शिस्तबद्ध पद्धतीने नगरात प्रवेशले. छ. शिवाजी राजांवर पुष्पवृष्टी करून लोकांनी आपले प्रेम व आदर व्यक्त केला. स्त्रीयांनी पंचारती ओवाळून शुभेच्छा दिल्या, छ. शिवाजी राजांनीही जमलेल्या लोकांवर सोन्या चांदीची फुले उधळली आणि महत्त्वाच्या नागरिकांचा गौरव केला. कुतुबशहाच्या राजधानीत झालेला हा यशस्वी प्रवेश पुढील मोहिमेच्या दृष्टीने निश्चित खूप महत्त्वाचा ठरला.

**शिवाजी महाराज व कुतुबशहा :**

छत्रपती शिवाजी महाराज व कुतुबशहा यांच्या बैठकीतून तहाची कलमे ठरविण्यात आली. ती पुढीलप्रमाणे -

१) कुतुबशहाने मराठ्यांना मोहिमेचा खर्च म्हणून ३००० होन रोज किंवा साडेचार लाख रूपये महिना, ५००० सैन्य आणि त्यांचा सेनापती बरोबर द्यावा.

२) मराठ्यांना आवश्यक ती तोफखान्याची मदत करावी.

३) या बदल्यात शहाजीराजांचा प्रदेश वगळता ठरलेले सर्व प्रदेश मराठ्यांनी कुतुबशहास द्यावेत.

४) मुघल व विजापूर या शत्रुंविरूद्ध मराठ्यांनी कुतुबशहास मदत करावी व त्याबदल्यात शहाने दरवर्षी १ लाख होनांची रक्कम द्यावी. मराठ्यांनी आपला एक वकिल कुतुबशहाच्या दरबारी ठेवावा. तहातील ही कलमे मान्य करून मार्च १६७७ मध्ये शिवाजीराजांनी पुढील मोहिमेची सुरूवात केली. कर्नूलवर पहिली स्वारी करून त्यांनी पाच लाख होनांची वसुली केली. बारा ज्योर्तिलिंगांपैकी एक श्री शैल्य मल्लिकार्जुनाचे दर्शन घेऊन जिंजी व वेल्लोरची मोहिम सुरू केली.

**जिंजी व वेल्लोर मोहिम :**

तिरूपती, पेड्डापोलम व मद्रास मार्गे, मराठा सैन्य जिंजी पर्यंत पोहचले. नासिर मुहम्मद खान जिंजीचा मुघल सुभेदार होता. त्याने अर्धा लाख वार्षिक उत्पन्नाच्या जहागिरीच्या बदल्यात १३ मे १६७७ रोजी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात दिला. फारसे परिश्रम न घेता एक महत्वाचा किल्ला छ. शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला. रायाजी नलगे यास जिंजीचा कारभारी नियुक्त करून २३ मे रोजी ते वेल्लोर कडे निघले. अब्दुला खान हा हबशी सरदार वेलोरचा किल्लेदार होता. अत्यंत अभेदय असा हा किल्ला त्याने सुमारे चौदा महिने लढविला. किल्ल्याचे वर्णन करताना सभासद म्हणतात. 'तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाही. कोटात जीत पाणियाचा खंदक, पाणियास अंत नाही. असे उदकात दहा हजार सुसरी, कोटाचे फांजिया वरून दोन गाडिया जोडून जावे ऐशी मजबुती, पडकोट तरी चार चार फेरियावरी फेरे, ये जातीचा कोट" या किल्ल्याची जबाबदारी रघुनाथपंत आणि आनंदराव यांच्यावर सोपवून छ. शिवाजी महाराज शेरखान लोदीच्या पाठलागावर निघले. अकलनाथक जंगलाचा आश्रय घेतलेल्या शेरखानाने मराठ्यांना प्रतिकार केला. परंतु मराठ्यांनी त्यास पराभूत करून बरीच लूट मिळविली. २० हजार होनांची खंडणी देण्याचेही मान्य केली. अशा मोहिमांच्या काळात जिंकलेला प्रदेश व किल्ले कुतुबशहाला देणे आवश्यक होते. परंतु त्याकडे मराठ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे गोवळकोंड्यातून दिला जाणारा खर्च थांबला. यामुळे आर्थिक अडचण निर्माण झाल्यामुळे मराठ्यांनी किनारपट्टीच प्रदेशातून वसूलीची सुरूवात केली.

**छ. शिवाजी महाराज व व्यंकोजी राजे :**

जुलै, १६७७ मध्ये तिरूमलवाडी जवळ शिवाजी महाराज व व्यंकोजी राजे यांची भेट झाली. सुरूवातीचे दिवस एकमेकांना भेटी व मेजवन्या देण्यामध्ये गेले. त्यानंतर छ. शिवाजी राजांनी मुख्य विषय मांडला. शहाजी राजांच्या दक्षिणेकडील संपत्तीचा वाटा, पैसे, जडजवाहीर किंवा प्रदेशाची निम्मी वाटणी मागितली. त्यानंतर व्यंकोजीनेही महाराष्ट्रातील प्रदेशाची मागणी केली. परंतु वडिलांची जहागीर केवळ ४०,००० होन वार्षिक उत्पन्न देणारी होती व आता जे काही आहे

ते शिवाजीराजांनी स्वतः निर्माण केले आहे. त्यामुळे त्यावर व्यंकोजीचा हक्क असण्याचा प्रश्नच येत नाही, असे उत्तर त्यांनी दिले. व्यंकोजी राजांनीही तंजावरही प्राप्ती वडिलांच्या मृत्युनंतर झाली असून त्यावर शिवाजीचा अधिकार नाही, असे उत्तर दिले. या परिस्थितीतून संघर्षाशिवाय पर्याय नसल्याचे लक्षात आल्याने एका पहाटे व्यंकोजी छ. शिवाजी राजांच्या छावणीतून निसटले. तंजावरचे चार मंत्री व एका व्यापाऱ्याला ओलीस ठेवून छ. शिवाजी राजांनी जनार्दन हणमंते यांस तंजावरच्या मोहिमेवर पाठविले. दरम्यान बंगलोर, होस्कोट आणि कोलार हे प्रदेश जिंकले.

म्हैसूर व मदुरेच्या नायकाच्या मदतीने व्यंकोजीने मराठ्यांच्या सैन्यावर हल्ला करण्याचे ठरविले. १६ नोव्हेंबर १६७७ रोजी त्यांने संताजी भोसलेच्या नेतृत्वाखालील मराठ्यांवर हल्ला करून त्यांचा पराभव केला. परंतु नंतर वलीगंडपूर येथे व्यंकोजीच्या सैन्याला अचानक गाठून संताजीने त्यास पराभूत केले. हंबीरराव मोहिते यांनीही व्यंकोजीला पराभूत केल्यामुळे रघुनाथपंत हणमंते यांच्यामार्फत संपर्क साधून व्यंकोजीने तह केला. या तहातील अटी पुढीलप्रमाणे -

१) जिंजी, इतर किल्ले व म्हैसुर छ. शिवाजीराजांकडे राहील.

२) तंजावर व आसपासचा ७ लक्ष होनांचा मुलुख व्यंकोजीच्या ताब्यात राहील. त्या बदल्यात सहा लक्ष होन मराठ्यांना देण्याचे त्याने मान्य केले.

३) बंगलोर, होस्कोट हे प्रदेश व्यंकोजीची पत्नी दिपाबाई हिस जहांगिरी म्हणून देण्यात येतील.

या तहानंतर मराठ्यांनी पार्टो नोव्हा व अर्काट आपल्या वर्चस्वाखाली आणले. जानेवारी १६७८ मध्ये म्हैसुर मार्गे परत येताना कोप्पळ, गदग, बंकापूर इत्यादी ठिकाणे काबीज केली. त्यातच श्रीरंगापट्टणवरही आक्रमण करून तेथील लूट केली. वेळगांव जिल्ह्यातून परत येताना बेलवली या ठिकाणी स्थानिक देसाई सावित्रीबाईचा विरोध दडपून तिचा पराभव करून करून एप्रिल १६७८ मध्ये छ. शिवाजीराजे पन्हाळगडास परत आले व तेथून रायगडवर पोहचले. अशा पद्धतीने कर्नाटक मोहिमेची सांगता झाली.

कर्नाटकची स्वारी एकूणच यशस्वी झाल्यामुळे महाराजांची किर्ती सर्वदूर पसरली. बराच मोठा प्रदेश किल्ले आणि संपत्तीची प्राप्ती झाल्यामुळे दक्षिणेकडील ही मोहिम दिग्विजय ठरली. जिंकलेल्या प्रदेशांची योग्य व्यवस्था लावून संताजी भोसले यास सुभेदार तर रघुनाथपंत हणमंते यांना सल्लागार म्हणून नियुक्त करून दक्षिणेत एक नवीन राज्यचं महाराजांनी निर्माण केले. सुरतच्या कागदपत्रात पुढील उल्लेख सापडतो, 'अगदी अल्पकाळात विनाविरोध सुरतेपासून कन्याकुमारी पर्यंतच्या मुलखाचा स्वामी होण्यास वेळ लागणार नाही.' कर्नाटक मोहिमेबाबत आणखी एका इंग्रजी पत्रातील उल्लेख पहा, 'स्पेनमध्ये सिझर ज्याप्रमाणे आला, त्याने पाहिले आणि जिंकले त्याप्रमाणे कर्नाटकात छ. शिवाजी महाराज आले, त्यांनी पाहिले आणि जिंकले'. थोडक्यात राज्याभिषेकानंतर दक्षिण हिन्दूस्थानात मोठा विस्तार करुन छ. शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याची इमारत पक्की केली.

## ८.५ मोहिमेचे परिणाम

छ. शिवाजी महाराज व कुतुबशहा यांच्यातील सलोखा संपुष्टात येऊन बराच मोठा खर्च, दारूगोळा व सैन्य पाठवूनही त्यास कोणतीच विशेष प्राप्ती झाली नाही यामुळे संतापलेल्या कुतुबशहाने विजापूरशी संधी करण्याचा निर्णय घेतला. या दरम्यान मुघल बादशहा औरंगजेबानेही आदिलशहा व छ. शिवाजी महाराजास आपल्या प्रदेशातून जाण्याची अनुमती दिल्यामुळे कुतुबशहाच्या विरोधात मोहिम उघडली. दिलेरखान यास दक्षिणेकडे पाठविण्यात आले. मराठ्यांच्या दृष्टीने प्रदेश व संपत्तीची प्राप्ती जिंजी सारख्या अभेद्य किल्ल्यावर नियंत्रण, फ्रेंच, नायक व पाळेगारांवरील नियंत्रण आणि सर्वात मोठे म्हणजे मराठ्यांच्या मुत्सद्देगिरीचा प्रचंड

विजय, स्वतंत्र सत्ताधीश म्हणून छ. शिवाजी राजांचा सन्मान, विरोधकांवर नियंत्रण अशा अनेक गोष्टी साध्य करण्यात यश मिळाले. या मोहिमेनंतर काही काळातच राजपुत्र संभाजी दिलेरखानाला जावून मिळाल्यामुळे मुघलांचा उत्साह काही काळ वाढला, परंतु त्यांचा फारसा उपयोग झाला नाही. अंतर्गत दुहीने ग्रस्त झालेल्या आदिलशाहीकडे मुघलांचा मोर्चा वळला. छ. शिवाजीराजे व संभाजी राजे यांच्यात पुन्हा एकदा दिलजमाई झाली. छ. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील ही शेवटची सर्वांत मोठी व यशस्वी मोहिम मराठ्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारी ठरली.

## ८.६ सारांश

कर्नाटक मोहीम ही राज्याभिषेकानंतर दिग्विजयासाठी काढलेली मोहिम असून त्यात अनेक उद्धिष्टे पूर्ण झाली. शिवाजी महाराजांच्या काळातील ही अखेरची मोठी मोहीम होती. परंतु यामुळे संपूर्ण दक्षिण भारतात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. मराठा स्वराज्य स्थापन करण्याचा उद्देश पूर्ण झाला. मुघल, आदिलशहा व इतर शत्रुंचा पाडाव करुन मराठा राज्य एका निश्चित पायावर उभे राहिले.

## ८.७ प्रश्न

१. कर्नाटक मोहिमेची पार्श्वभूमी सांगून मराठ्यांच्या दृष्टीने मोहिमेचे फलित स्पष्ट करा.

२. खालील घटनेचे शिवाजीराजांच्या जीवनात असलेले महत्त्व स्पष्ट करा. १) कर्नाटक मोहिम

३. टिप लिहा : मराठ्यांची कर्नाटक स्वारी

## ८.८ संदर्भ

१. कुलकर्णी, अ.रा. खरे, ग.ह. मराठ्यांचा इतिहास खंड पहिला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००६.

२. कोलारकर, शं.गो. 'मराठ्यांचा इतिहास', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर १०.

३. सरदेसाई, गो. स., 'मराठी रिसायत' खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४. नवीन संदर्भासह संपादित केलेली आवृत्ती '' १९८८.

४. डॉ. देव प्रभाकर, 'मराठ्यांचा इतिहास' विद्या प्रकाशन.

५. कुलकर्णी, अ. रा., खरे ग. ह. 'मराठ्यांचा इतिहास' खंड पहिला शिवाजी आणि शिवकाल (१६००-१७०७), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०.

६. कोलारकर, शं. गो. 'मराठ्यांचा इतिहास'.

७. पिसुर्लेकर, पां. स. पोर्तुगिज - मराठे संबंध अर्थात पोर्तुगिजांच्या दप्तरातील मराठ्यांचा इतिहास, पुणे विद्यापीठ, पुणे १०६०.

८. Hatalkar V. G. Relations between the French and Marathas (1668-1815), Bombay 1969.

❖❖❖❖

# ९

## छत्रपती संभाजी महाराजांची कारकीर्द

**घटक रचना :**

९.० उद्दिष्ट्ये

९.१ प्रस्तावना

९.२ छत्रपती संभाजी महाराजांचे राज्यारोहण

९.३ छत्रपती संभाजी महाराज यांच्या मुघलांविरुद्ध मोहिमा

९.४ छत्रपती संभाजी महाराजांचे जंजिऱ्याच्या सिद्दींविरुद्ध संघर्ष

९.५ छत्रपती संभाजी महाराज आणि इंग्रज संबंध

९.६ छत्रपती संभाजी महाराज आणि पोर्तुगिज संबंध

९.७ छत्रपती संभाजी महाराजांचा वध

९.८ सारांश

९.९ प्रश्न

९.१० संदर्भ

munotes.in

## ९.० उद्दिष्ट्ये

सदर प्रकरणाचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्यारोहणा विषयी सविस्तर माहिती घेणे.
२. छत्रपती संभाजी महाराज यांचा परकीय सत्तेविषयीच्या संबंधाचा आढावा घेणे.
३. छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातील मुघल- मराठे संघर्षाचा अभ्यास करणे.

## ९.१ प्रस्तावना

छत्रपती संभाजीराजे हे छत्रपती शिवाजी महाराज आणि सईबाई यांचे थोरले चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. त्यांचा जन्म १४ मे १६५६ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. लहानपणापासूनच रणांगणावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू त्यांना मिळाले. संभाजी महाराज अत्यंत देखणे व शूर होते. तसेच ते अनेक भाषात विद्याविशारद व अत्यंत धुरंधर राजकारणी होते. संभाजीराजे नऊ वर्षांचे असताना शिवाजी

महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी सोबत नेले होते. त्यामुळे मोगल दरबारातील घडामोडी आणि राजकारण त्यांना लहानपणीच कळले होते. छत्रपती संभाजी महाराजांचे राजब्रीदवाक्य पुढीलप्रमाणे होते.

**“श्री शंभो शिवजातस्य मुद्रा धौरीव राजते**

**यंदकसेविनी लेखा वर्तते कस्यनोपरी”**

[ अर्थ: छत्रपती शिवरायांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांची ही राजमुद्रा जणू काही स्वर्ग तेजाने तळपत आहे. आकाशा प्रमाणे अमर्याद आहे. या राजमुद्रेच्या आश्रयास प्रत्येक माणूस, प्रत्येक प्राणीमात्र महाराजांच्या छत्रछायेखाली असेल. छत्रपतींच्या या राजमुद्रेपेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही.]

संभाजी महाराज एक पराक्रमी, शूर, मुत्सद्दी, दूरदर्शी व कर्तव्यदक्ष व्यक्ती होते हे त्यांनी दाखवून दिले आहे.

## ९.२ छत्रपती संभाजी महाराजांचे राज्यारोहण

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली होती. छत्रपती संभाजी महाराजांना केवळ ३३ वर्षांचे आयुष्य लाभले होते. १६५६-१६८९ इतक्या कमी वयात शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण तर केलेच पण स्वराज्याचा विस्तारदेखील घडवून आणला होता. आपल्या युद्ध कौशल्य आणि धाडसामुळे शत्रूच्या काळजात धडकी भरविण्याचे महान कार्य छत्रपती संभाजी महाराजांनी अल्पावधीत केले होते, परंतु दुर्दैवाने संभाजी महाराजांचे खरे चरित्र समाजासमोर आणले गेले नाही. बालपणापासूनच त्यांना कौटुंबिक समस्यांचा सामना करावा लागला होता. वयाच्या अवघ्या दोन वर्षाचे असताना त्यांची आई सईबाईचा मृत्यू झाला होता. त्यानंतर त्यांचा सांभाळ जिजाऊ मासाहेबांनी केला होता. लहानपणी त्यांना रामायण, महाभारतातील कथा सांगून त्यांच्या बालमनावर योग्य ते संस्कार करण्याचे काम जिजाऊसाहेबांनी केले होते. छत्रपती संभाजीचे अनेक भाषांवर प्रभुत्व होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीच्या वेळी संभाजीराजे अवघ्या नऊ वर्षे वयाचे होते. आग्रा येथून शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याचा वापर करून आपली सुटका केली होती. त्यावेळी पुत्र संभाजीला वाटेत मथुरा येथे एका विश्वासू ब्राह्मणाच्या घरी ठेवले होते. तेथेच त्यांनी संस्कृतचे पठण केले आणि पुढे संस्कृत भाषेत वयाच्या चौदाव्या वर्षी “बुद्धभूषण” ग्रंथ लिहिला होता. जवळपास एक ते दीड वर्ष ते मथुरेत राहिल्याचे इतिहासकार सांगतात. त्याचवेळी छत्रपती शिवाजी महाराज सुखरूपपणे रायगडावर पोहोचल्यानंतर त्यांनी रायगडावर संभाजी महाराजांच्या नावाने श्राद्धसुद्धा घातले होते आणि त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःच्या मुलाच्या जिवितासाठी जिवंतपणी त्यांचे श्राद्ध घालून शत्रूला चकवा दिला होता. मथुरा येथील वास्तव्यामध्ये कवी कलश याबरोबर त्यांची भेट होऊन तिचे रुपांतर घट्ट मैत्रीत झाले, जी मैत्री शेवटपर्यंत अभेद्य स्वरूपाची राहिली होती. छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यु १६८० मध्ये झाला. सोयराबाईने षडयंत्र रचत आपल्या १० वर्ष्याच्या राजारामला सिंहासनावर बसविले. ज्यावेळी संभाजी महाराजांना ही गोष्ट समजली, त्यावेळी

त्यांनी आपली सावत्र आई सोयराबाईचे बंधू हंबीरराव मोहिते यांच्याशी हातमिळवणी केली आणि त्यांच्या मदतीने रायगडावर विजय मिळविला व सोयराबाईला कैद केले. त्यानंतर १६ जानेवारी १६८१ मध्ये संभाजीराजांचा स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून राज्याभिषेक झाला. संभाजी महाराजांना दुर्देवाने अत्यल्प कारकीर्द मिळाली होती, परंतु त्या अत्यल्प कारकिर्दीत त्यांनी देदीप्यमान यश संपादन केले.

छत्रपती संभाजी महाराज्यांचे अष्टप्रधान मंडळ

**कुलमुखत्यार (सर्वोच्च प्रधान)- कवी कलश**

१] सरसेनापती – हंबीरराव मोहिते

२] पेशवा - निळोपंत पिंगळे

३] चिटणीस – बाळाजी आवजी

४] न्यायाधीश – प्रल्हाद निराजी

५] डबीर – जनार्दन पंत

६] दानाध्यक्ष – मोरेश्वर पंडितराव

७] सुरनीस – आबाजी सोनदेव

८] वाकेनवीस – दत्ताजी पंत

९] मुजुमदार - अण्णाजी दत्तो

छत्रपती संभाजी महाराजांनी सतत युद्ध मोहिमा काढून शत्रूला जेरीस आणले होते. यासाठी त्यांना हंबीराव मोहिते या सेनापतीचे सक्रिय साहाय्य लाभले होते. त्यांचा पराक्रम व युद्धनीतीमुळे मुघलशाही, आदिलशाही, निजामशाही, पोर्तुगीज, सिद्धी या प्रमुख सत्तांनी त्यांनी जेरीस आणले होते व मराठी सत्तेचे संरक्षण करून तिचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला होता. इसवी १६८७ मध्ये मुघलांविरुद्ध वाई या ठिकाणी झालेल्या लढाईत सेनापती हंबीरराव मोहिते यांना वीरगती प्राप्त झाली होती. या लढाईत मराठयांचा विजय झाला होता, परंतु पराक्रमी सेनापती हंबीरराव मोहिते यांना वीरगती प्राप्त झाल्यामुळे पुढे अनेक मराठा सरदारांनी संभाजी महाराजांची साथ सोडलेली होती. परिणामी १६८९ मध्ये कोकणातील संगमेश्वर येथे फंदफितुरीने औरंगजेबाच्या सैन्याने संभाजी महाराजांना व कवि कलश यांना कैद करून त्यांचे हाल हाल करून वध केला होता. अत्यंत निर्दयपणे औरंगजेबाने संभाजी राजांचा वध करून मराठा सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु शेवटपर्यंत त्याला त्यामध्ये यश मिळाले नाही. शेवटी १७०७ मध्ये त्याचा अहमदनगरच्या छावणीत मृत्यू झाला आणि मराठी सत्ता नष्ट करण्याचे स्वप्न अपूर्णच राहिले.

छत्रपती संभाजी राजांच्या नऊ वर्षाच्या देदीप्यमान कारकिर्दीमध्ये अनेक इतिहासकारांनी विविध मते मतांतरे करून त्यांचे व्यक्तिमत्व मांडण्याचा प्रयत्न केला. युद्धपराक्रम, युद्धनीती, प्रचंड साहस आणि शौर्याच्या जोरावर एकाच वेळी अनेक शत्रूंचा सामना करून मराठा

सत्तेचे खऱ्या अर्थाने संरक्षण केले. त्याविषयी य.ग.भावे या इतिहासकाराने त्यांच्या "From the Death of Shivaji to the Death of Aurangazeb the Critical Years" या पुस्तकामध्ये संभाजी महाराजांच्या ९ वर्षाच्या नेतृत्वाविषयी असे म्हटले होते की, त्यांचे नऊ वर्षाचे नेतृत्व हे सर्वांनाच प्रेरणादायी होते. अत्याचार, अन्यायाचा प्रतिकार करण्याची हिंमत आणि शौर्य संभाजी महाराजांच्या बलिदानातून सिद्ध होते. ब्रिटिश इतिहासकार डेनिस किनकेड असे लिहितो की, "संभाजीला औरंगजेबाने इस्लामचा स्वीकार करण्याचे सांगितले होते, परंतु त्यांनी नकार दिला. संगमेश्वर येथे कैद केल्यानंतर त्यांना अहमदनगर येथील बहादूरगडावर औरंगजेबाच्या समोर उभे केले असता त्यांना पुन्हा इस्लामचा स्वीकार करण्याचे सांगितले, परंतु नकार देताच त्यांची जीभ छाटण्यात आली."

## ९.३ छत्रपती संभाजी महाराजांच्या मुघलांविरुद्ध मोहिमा:

छत्रपती संभाजी महाराज हे त्यांचे शौर्य आणि पराक्रम याविषयी परिचित आहेत. त्यांच्या शौर्य, पराक्रम आणि धाडस व युद्धकौशल्य याचा प्रत्यय त्यांनी जानेवारी १६८१ मध्ये मुघलांविरुद्ध पुकारलेल्या मोहिमांवरुन दिसून येतो. त्यांनी मुघल सुभेदार बहादुरखान याला आव्हान दिले. त्यासाठी त्यांनी मराठी फौजा तीन दिशेने रवाना केल्या. पहिले आक्रमण सुरतेवर, दुसरे खानदेश आणि तिसरे औरंगाबादवर होते. या आक्रमणातून संभाजी महाराजांनी गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचा अवलंब करून मुघलांना आक्रमणाचा अंदाज येण्याच्या अगोदर बुऱ्हानपूर, सुरत आणि औरंगाबाद या मुघलांच्या मुलुखावर आक्रमण करुन त्यांना मराठयांच्या स्वराज्यावर वाकडी नजर केली तर काय होऊ शकते, याची जाणीव करून देणे आणि मुघलांच्या मनात धडकी भरविण्यासाठी तसेच या भागातील मराठी जनतेला संरक्षणेची हमी आणि विश्वास देण्यासाठी या मोहिमा आयोजित केल्या होत्या. केवळ मुघली प्रदेशातून लूट मिळवणे हा या आक्रमणाचा उद्देश दिसून येत नाही. औरंगजेबाने १६८२ मध्ये मराठयांवर हल्ला केला. जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यांमध्ये औरंगजेबाच्या सैन्याचा समावेश होत होता. तरीही संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला. मराठयांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंझारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा वेढा होईल. औरंगजेबाच्या सरदारांची अशी अपेक्षा होती की तो किल्ला काही तासांतच शरणागती पत्करेल पण मराठयांनी असा चिवट प्रतिकार केला की, तो किल्ला जिंकण्यासाठी त्यांना तब्बल साडेसहा वर्षे लढावे लागले.

## ९.४ छत्रपती संभाजी महाराजांचे जंजिऱ्याच्या सिद्दींविरुद्ध संघर्ष

संभाजी महाराजांनी आपली दुसरी महत्त्वाची युद्ध मोहीम जंजिऱ्याचे सिद्दींविरुद्ध काढली होती. पश्चिम किनारपट्टीवर त्यांची मातब्बर सत्ता होती. सिद्दींच्या आरमाराचा प्रभाव सर्वांपेक्षा जास्त होता. कोकणामध्ये सिद्दींनी स्वराज्यातील जनतेला आपल्या उपद्रवामुळे छळवणूक चालवली होती. त्याचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी, जंजिऱ्याच्या अभेद्य किल्ल्यातील त्यांचे अस्तित्वच नष्ट करण्याची मोहिम आखली होती. या मोहिमेसाठी त्यांनी आपला विश्वासू सरदार कोंडाजी फर्जंद यांना जबाबदारी दिली होती. कोंडाजीने ही मोहीम फत्ते करण्यासाठी अबिसिनियन सिद्दींबरोबर बरोबर मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यात यश मिळवले होते आणि संभाजी महाराजांबरोबर त्यांचे वैर असल्याचे भासविण्याचा यश

संपादन केले होते. सिद्दींबरोबरच्या वास्तव्यातून त्यांनी जंजिऱ्यावर हल्ला करण्याची पूर्ण योजना आखली होती. किल्ल्यांमध्ये प्रवेश करून तो जिंकण्यासाठी व्यूहरचना पूर्ण केली होती, परंतु शेवटच्या क्षणी कोंडाजीची योजना अयशस्वी झाली आणि त्यांना पकडण्यात आले. योजना यशस्वी झाली असती, तर जंजिऱ्याचा सिद्दी यांचे साम्राज्य खालसा करून जंजिरासारखा अभेद्य सागरी किल्ला मराठयांच्या ताब्यात आला असता. दुर्दैवाने कोंडाजीची योजना फसल्यामुळे संभाजीराजांना या मोहिमेतून माघार घ्यावी लागली होती. संभाजी महाराजांनी सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी तीन वेळा मोहिमा आखल्या होत्या.

**पहिली मोहीम:** उंदेरी येथे राहून सिद्दींनी मराठयांच्या प्रदेशात लूट करण्यास सुरवात केली. संभाजीराजांनी सप्टेंबर १६८१ मध्ये उंदेरी बेटावर हल्ला केला. इंग्रजांनी सिद्दींना मदत केल्यामुळे संभाजीराजांना माघार घ्यावी लागली.

**दुसरी मोहीम :** डिसेंबर १६८१ मध्ये संभाजीराजांनी शहजादा अकबराला बरोबर घेऊन जिंजी किल्ल्यास वेढा दिला होता. सतत पंधरा दिवस तोफांचा भडीमार केला, परंतु समुद्र खवळलेला असल्यामुळे किल्ल्यावर आक्रमण करणे अवघड जात होते. तसेच मुघल सेनापती हसनअली खान याने कल्याण-भिवंडी वर हल्ला केला. संभाजी राजांना याची खबर लागताच त्यांनी जंजिऱ्याच्या मोहिमेची जबाबदारी दादोजी व विसाजी रघुनाथ यांच्यावर सोपवली. पावसाळ्यामुळे मराठयांना वेढा उठवावा लागला.

**तिसरी मोहीम :** सिद्दीनी मराठयांचे काही प्रदेश व किल्ले पुन्हा जिंकून घेतले. ऑगस्ट १६८२ मध्ये जैतपुरच्या खाडीत मराठयांनी सिद्दींना अडचणीत आणले, परंतु मुघलांच्या आक्रमणामुळे संभाजीराजांना ही मोहीम अर्धवट सोडावी लागली.

## ९.५ छत्रपती संभाजी महाराज आणि इंग्रज संबंध:

छत्रपती शिवाजी महाराजांपासून मराठयांचे इंग्रजांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध असल्याचे इतिहासकारांचे मत आहे. वा. सी. बेंद्रे यांच्या मते, संभाजी महाराजांनासुद्धा इंग्रजांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध पाहिजे होते, परंतु इंग्रजांची कुटील नीती व दुटप्पीपणा त्यांना पसंत नव्हता. इंग्रज, पोर्तुगीजसारखे धार्मिक बाबतीत कट्टर वृत्तीचे नव्हते. तरीसुद्धा संभाजीराजांनी इतर परकीय सत्तांचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रजांना साहाय्य करण्याचे व धरून ठेवण्याचे धोरण स्वीकारावे लागले. स्वराज्याच्या प्रदेशात इंग्रजांकडून होणारा त्रास थांबवण्यासाठी त्यांनी इंग्रजांना समज देण्यास सुरुवात केली होती. कारण इंग्रजांना छत्रपती संभाजीराजांच्या आक्रमक धोरणाची भीती वाटत होती तसेच इंग्रज सिद्दींना मराठयांच्या विरोधात मदत करत होते. त्यामुळे संभाजी महाराजांनी राजापूरच्या खाडीजवळ सैन्य पाठवून इंग्रजांना समज दिली होती. त्यांनी सिद्दींना मदत देण्याचे थांबवले नाही तर मुंबईकर स्वारी करतील. असे केवळ सांगितले नाही तर राजापूरची वखार लुटून मराठयांनी मुंबईजवळची कुलाबा, कारंजा, सोपारा, एलिफंटा ठाणी जिंकल्यामुळे इंग्रजांना मराठयांची भीती वाटत होती. इसवी १६८४ मध्ये इंग्रज व मराठे यांच्यात मैत्री करार झाला होता.

**इंग्रज-मराठा करारातील प्रमुख अटी**

१. भारतात इंग्रजांनी पूर्वपरवानगीने वाटेल तिथे वखारी स्थापन कराव्यात.

२. इंग्रजांना मराठा राज्यातील कोणत्याही व्यक्तीला गुलाम किंवा ख्रिश्चन करण्यासाठी विकत घेता येणार नाही.

३. इंग्रज आयात करतील त्या मालावर २.५% जकात मराठयांना देतील व निर्यात करतील त्याला जकात राहणार नाही.

४. मोगल मराठा युद्धात जर इंग्रजांचा माल असलेले जहाज मराठयांच्या हाती लागले तर इंग्रजांचे माल मराठयांनी इंग्रजांना परत करावा. इंग्रजांनी पकडलेल्या जहाजात मराठयांचा माल आढळल्यास तो त्यांनी मराठयांना परत करावा.

इंग्रज - मराठा करारामुळे त्यांचा संबंध मजबूत झाले. मोगलांना शह देण्यासाठी इंग्रजांना मराठयांशी मैत्री करण्याशिवाय पर्याय नव्हता. संभाजी महाराजांच्या पदापर्यंत इंग्रज-मराठा संबंध मैत्रीपूर्ण होते. (कोंडेकर, २००४)

## ९.६ छत्रपती संभाजी महाराज - पोर्तुगीज संबंध

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेब बादशहाने दक्षिणेची मोहीम आखून मराठयांचे पारिपत्य करण्याचा निर्धार केला होता. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठयांचे संरक्षण करण्यासाठी संभाजीराजांनी बाह्यशत्रूंशी मैत्रीपूर्ण धोरण आखले होते. गोव्याच्या पोर्तुगीजांनी मराठयांविरुद्ध आघाडी उघडावी यासाठी बादशहा औरंगजेबाने दबाव आणला. मैत्रीपूर्ण धोरणाचा एक भाग म्हणून त्यांनी आपला एक वकील पोर्तुगीज गव्हर्नरकडे मैत्री करार करण्यासाठी पाठविला होता, परंतु पोर्तुगीजांनी मान्यता दिली नाही. या मैत्री न होण्याचे कारण म्हणजे गोव्याच्या किनारपट्टीवरील असलेले अंजदीव हे प्रसिद्ध सागरी बेट यावर दोघांनाही आपले वर्चस्व हवे होते.

संभाजी महाराजांनी आरमाराच्या दृष्टीने अंजदीव बेटावर तटबंदी करून किल्ला बांधण्याचे ठरवले होते. या बेटावर संभाजीराजांनी किल्ला बांधला तर पोर्तुगीजांच्या सागरी वाहतुकीस धोका निर्माण होण्याच्या भीतीने दोघांमध्ये करार होऊ शकला नाही. याचा फायदा मोगल बादशहा औरंगजेबाने घेण्याचे ठरविले व संभाजी महाराजांच्या विरुद्ध पोर्तुगीजांना भडकावण्याचे काम केले अशा वेळी छत्रपती संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांवर आक्रमण करण्याचे धोरण स्वीकारले. यासाठी त्यांनी निळो मोरेश्वर यांना पोर्तुगीज प्रदेशांवर हल्ले करण्याचे आदेश दिले. त्याचा परिणाम असा झाला की, पोर्तुगिजांच्या प्रदेशातील चेंबूर, तळोजा, कोळवे, माहीम, सोपारा ही ठिकाणे व काही किल्ले जिंकून घेतली. चौलचा किल्ला मात्र मराठयांना जिंकता आला नाही. जवळपास सहा महिने मराठयांनी या किल्ल्याला वेढा दिला होता. पोर्तुगीजांनी मराठयांच्या ताब्यातील फोंडा किल्ल्यावर हल्ला केला. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीतील फोंड्याची लढाई अतिशय महत्त्वपूर्ण होती. फोंड्याचा किल्लेदार येसाजी कंक व त्याचा मुलगा कृष्णाजी कंक यांनी केवळ शंभर सैनिकांसह हा किल्ला निकराने लढा देऊन सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु पोर्तुगीजांनी तोफांचा भडीमार करून किल्ल्याला भगदाड पाडून आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी संभाजी महाराजांना याची वार्ता कळताच सहाशे सैनिकांसह त्यांनी फोंड्याच्या किल्ल्यामध्ये प्रयाण केले. मराठयांच्या सैनिकांनी किल्ल्याच्या आतील व बाहेरील बाजूने

munotes.in

पोर्तुगीज सैनिकांना कोंडीत पकडले. अखेरीस पोर्तुगीज व्हाईसरॉयने हा वेढा उठवून गोव्याकडे पलायन केले. मराठयांनी पोर्तुगीजांवर प्रचंड विजय मिळवला.

### जुवे बेटावरील स्वारी

छत्रपती संभाजी महाराज फोंडाच्या विजयानंतर परत रायगडावर जातील अशी पोर्तुगीजांची समजुत होती, परंतु संभाजीराजांनी परत जाण्याचा बहाणा करून गोव्याच्या सावटी व बारदेश प्रांतावर स्वारी करण्याचा सरदारांना हुकूम केला. त्याच दिवशी संभाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्या तुकडीने जुवे बेटात ओहोटीची संधी साधून हल्ला केला. दोन्ही सैन्यामध्ये संघर्ष होऊन मराठयांनी हे बेट जिंकले. त्यामध्ये दीडशे पोर्तुगीज सैन्य ठार झाले. पोर्तुगीज व्हाईसरॉयने स्वतः किल्ला लढविण्याचा प्रयत्न केला, परंतु मराठयांच्या पराक्रमापुढे त्याला पलायन करावे लागले. तो जखमी अवस्थेत गोव्याकडे निघून गेला.

### मराठयांची गोव्यावर स्वारी

पोर्तुगीजांना कायमचा धडा शिकविण्यासाठी संभाजी महाराजांनी जुवे बेटानंतर १६८३ मध्ये पोर्तुगिजांच्या बारदेश व साष्टी या ठाण्यांवर हल्ले केले. त्यामध्ये पोर्तुगीजांचे खूप हाल झाले. संभाजी महाराजांनी आपले मुख्य लक्ष पोर्तुगीजांची राजधानी असलेल्या पणजी - गोव्यावर आक्रमण करण्याची तयारी केली होती. त्यांच्या फौजा गोव्याच्या जवळपास मांडवी नदी पर्यंत आल्या. मराठयांच्या फौजांनी गोव्यामध्ये पोर्तुगीजांना जेरीस आणले. त्याचवेळी मोगलांनी मराठयांच्या प्रदेशावर हल्ले करून धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली अशा वेळी एकाच वेळेस दोन शत्रूंचा सामना करून त्यामध्ये मराठयांचे नुकसान होऊ नये म्हणून संभाजी महाराजांनी गोव्याची मोहीम अर्धवट सोडून पोर्तुगिजांशी तह करण्याचे ठरविले. या तहाच्या वाटाघाटीची जबाबदारी संभाजीराजांनी कवी कलश व शहजादा अकबर यांना देऊन ते स्वराज्यात मोगलांच्या बंदोबस्तासाठी आले. पोर्तुगिज - मराठे यांच्यातील तहाच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या-

१. संभाजीराजांनी पोर्तुगीजांचे जिंकलेले प्रदेश व किल्ले परत करावेत.

२. मराठयांना दमनाच्या चौथाईचा हक्क मिळावा.

३. एकमेकांच्या प्रदेशात काही नियमांनुसार व्यापार करावा.

४. एकमेकांची पकडलेली जहाजे व युद्धकैदी परस्परांना परत करावेत.

परंतु मार्च १६८४ मध्ये पोर्तुगीज वकील रायगडावर संभाजी महाराज यांच्या भेटीसाठी आला असता या करारामध्ये नवीन अटींच्या समावेश करण्याचे ठरवले. त्यावर एकमत न झाल्यामुळे हा तह झाला नाही. उलट मराठी पोर्तुगीज यांचे संबंध पुन्हा बिघडले.

## ९.७ छत्रपती संभाजी महाराजांचा वध

मुघल बादशहा औरंगजेबाने मराठयांचे राज्य नष्ट करण्यासाठी दख्खनची मोहीम हाती घेतली होती. संभाजी महाराजांच्या कणखर नेतृत्वामुळे व पराक्रमापुढे त्यांना यश मिळाले नाही. इसवी १६८८ पर्यंत मुघलांना मराठयांची राजधानी आणि कोकणच्या प्रदेशात शिरकाव करता आला नाही. अनेक लढायांमध्ये मुघल - मराठे यांच्यात लढाया होऊन

त्यामध्ये निर्णायक विजय प्राप्त झाला नव्हता. इसवी १६८८ मध्ये मराठयांचा सेनापती हंबीरराव मोहिते वाईजवळच्या मुघलांशी झालेल्या लढाईमध्ये तोफेचा गोळा लागून ठार झाले. त्यानंतर अनेक मराठा सरदारांनी संभाजी महाराजांची साथ सोडली. काहींनी संभाजी महाराजांसोबत गद्दारीसुद्धा केली होती. परिणामी १ फेब्रुवारी १६८९ मध्ये कोकणातील संगमेश्वर येथे संभाजी महाराज, कवी कलश व इतर साथीदार मुक्कामास असल्याची खबर गणोजी शिर्के यांनी मुघल सुभेदार मुखरब खान याला देऊन घनदाट जंगलातील वाट दाखवली होती. त्यानुसार तो कोल्हापूर मार्गे कोकणात उतरला. मुघलांनी प्रचंड फौजेसह मराठी मुलुखांवर हल्ले करून ती उध्वस्त करून तेथे आपला अंमल सुरू करण्यास सुरुवात केली अशा परिस्थितीत काही मराठा वतनदारांनी आपले वतन मुघलांपासून संरक्षण मिळवण्यासाठी संभाजी महाराजांची साथ सोडली. त्यामध्ये कोकणातील नागोजी माने, सावंतवाडीचे खेम सावंत यांनी मुघलांशी जवळीकता साधली. गनोजी शिर्के यांनीसुद्धा मुघलांना सहकार्य करण्याची भूमिका घेतली. त्यातून त्यांनी संभाजी महाराजांविरुद्ध बंड पुकारले. ते बंड मोडून काढण्यासाठी कवी कलश त्यांवर चाल करून गेला, परंतु शिर्क्यांच्या प्रतिकारामुळे त्याला खेळणा किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला. संभाजी महाराजांना ही वार्ता समजताच कवी कलशाच्या मदतीसाठी निवडक सैन्यासह शिर्क्यांवर चालून गेले व त्यांची बंडाळी मोडून काढली. शिर्क्यांचा पराभव करून संभाजी महाराज खेळणा गडावर गेल्याची नोंद जेधे शकावलीमध्ये आहे. त्यानंतर १ फेब्रुवारी १६८९ रोजी कवी कलश व संभाजी महाराज खेळण्याहून राजगडाला जात असताना वाटेत संगमेश्वर येथे मुक्काम केला. मुकरबखानाला गुप्तहेरांकडून संभाजीराजांच्या मुक्कामाची बातमी समजताच त्याने गुप्तहेरांच्या मदतीने संगमेश्वर गाठले. प्रचंड फौज घेऊन दोन हजार घोडेस्वार, एक हजार पायदळ व हत्ती घेऊन मुकरबखान संभाजी महाराजांवर चालून आला. शिर्क्यांच्या घातामुळे संभाजी महाराज पकडले गेले. अचानक केलेल्या हल्ल्यामुळे गाफील असलेले संभाजी महाराज व कवी कलश यांना मुकरबखानाने कैद करून बहादूरगडावर औरंगजेबाच्या छावणीत नेले. सभासद बखरीतील वर्णनानुसार, औरंगजेबाने संभाजी महाराजांबरोबर बोलणी करण्यासाठी आपला विश्वासू अधिकारी पाठवला होता. त्यानुसार तीन मागण्या पुढील प्रमाणे होत्या.

१. संभाजी महाराजांनी सर्व किल्ले बादशहास द्यावे.

२. सर्व संपत्तीची माहिती बादशाला द्यावी.

३. संभाजी महाराजांना कोण-कोणते अधिकारी आतून मिळाले आहेत ते सांगावे.

संभाजी महाराजांनी सर्व मागण्या फेटाळल्या. परिणामी औरंगजेबाने त्यांचा अनन्वित छळ करून अत्यंत हालअपेष्टा व क्रूर पद्धतीने त्यांचा वध केला. मोगल इतिहासकार खाफीखान याने वर्णन करतांना असे म्हंटले आहे की, “१५ फेब्रुवारी १६८९ रोजी त्यांना औरंगजेबाच्या समोर हजर करण्यात आले. बादशाहाला मानवंदना देण्यासाठी त्यांनी आपली मान झुकवली नाही. उलट, बादशहाच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे टाळले. त्यामुळे चिडलेल्या औरंगजेबाने आज्ञा केली की, संभाजीराजांच्या डोळ्यात तापलेली सळी फिरवून त्याला नवी दृष्टी द्यावी.” तथापि डोळे काढल्यानंतरही संभाजी महाराज बादशहासमोर समोर झुकले नाही. १७ फेब्रुवारी १६८९ रोजी रात्री ही घटना घडली. दुसऱ्या दिवशी कवी कलश यांची जीभ छाटण्यात आली. औरंगजेब बादशहाने या दोघांचा प्रचंड छळ करून,

शेवटी ११ मार्च १६८९ रोजी त्यांच्या शरीराचे तुकडे करून त्याचा वध केला व गावागावांमधून प्रेते नगारे वाजत मिरवण्यात आली. त्यांच्या शरीराला अंत्यसंस्कार न देता ते इतरत्र फेकण्यात आले होते. वा. सी. बेंद्रे यांचे लिखाणानुसार, संभाजी महाराजांचे डोके वडूच्या लोकांनी जमा करून त्यास तुळापूर येथे संगमावर अग्नी दिला. महाराज्यांचे वृंदावन वढू बुद्रुक येथे आहे असा अस्सल पुरावा वा. सी. बेंद्रे यांनी पुणे जमाव वडु बुद्रुक रुमाल नंबर ११९३ मधून मिळाला. त्याचप्रमाणे १४ जानेवारी १७१९ मध्ये धनकवडीच्या कुलकर्णी यांच्या कागदपत्रात सापडलेल्या पुराव्यानुसार, "संभाजीराजे धरून आणिला आहे आणि मोजे वळु कोरेगावात मारीला मग त्याचा लेक साहूराजा व बायका आपल्या जाळीत ठेवली" यावरुन छत्रपती संभाजी महाराजांची समाधी वढू बुद्रुक येथेच असल्याचा पुरावा सापडतो. याला पुष्टी देण्यासाठी पेशवा दप्तरानुसार दिनांक १८ जानेवारी १७१५ च्या कागदात वृंदावनाच्या जागी नंदादीप, धूप नैवेद्य कराव्यास इनाम जमीन दिल्याचा उल्लेख आहे. (शाहू दप्तर, रुमाल नं. ११) पुढे शाहू महाराजांनी मोगलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर त्यांनी आपल्या वडिलांचे वृंदावन बांधले.

## ९.८ सारांश

छत्रपती संभाजी महाराज यांची अल्प कारकीर्द अखंड भारतवासीयांसाठी प्रेरणादायी होती. आपल्या अवघ्या नऊ वर्षाच्या कारकिर्दीत अनेक लढायांमध्ये त्यांनी स्वतः शौर्य व पराक्रम गाजवून मुघल, पोर्तुगीज, सिद्दी, इंग्रज यासारख्या शत्रूंना आपल्या कुशल कर्तबगारीने व पराक्रमाने जेरीस आणले होते. कला-साहित्य, युद्धकला, मुत्सद्देगिरी आणि धिप्पाड शरीरयष्टीमुळे त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व आजही भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे. औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूला सुद्धा त्यांच्या पराक्रमाची दखल घ्यावी लागली होती. औरंगजेबाला ९ वर्षेपर्यंत झुंझत ठेवले. शेवटी १ फेब्रुवारी १६८९ रोजी मुकारब खान [शेख निझाम] या मुघल सरदाराने संगमेश्वर येथे संभाजी महाराजांवर अचानक हल्ला करून त्यांना पकडले. औरंगजेबाने हालहाल करून ठार मारले; पण या कसोटीच्या क्षणी संभाजी महाराजांनी दाखविलेला स्वाभिमान, धर्मनिष्ठा व बाणेदार वृत्ती यामुळे सर्व मराठयांची छाती गर्वाने फुलून आली. एक गौरवशाली हौतात्म्य संभाजी महाराजांच्या वाट्यास आले.

सिंहासमान आयुष्यभर लढणारा तो वीर फसला गेला तो स्वकीयांकडून, ज्याला शत्रूचे भय कधीच वाटलं नाही, त्याला आपल्याच माणसांनी फुटकळ विलोभनापयी फसवलं, त्या महाराजांची विटंबना औरंगजेबाने केली. त्याची कल्पनासुद्धा करवत नाही. त्यांची विदूषकाचे कपडे घालून मिरवणूक काढली, जीभ कापण्यात आली, डोळे सुद्धा काढले पण इतकं सगळं होऊनही तो छत्रपती औरंगजेबापुढे नमला नाही. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानातून मराठयांना स्वराज्य रक्षणाची प्रेरणा मिळाली.

## ९.९. प्रश्न

१. छ. संभाजी महाराजांचे मराठयांच्या इतिहासातील स्थान स्पष्ट करा.

२. छ. संभाजी महाराज व मुघल यांच्यातील संघर्षाचे वर्णन करा.

## ९.१० संदर्भ

१. बेंद्रे, वा. सी., छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र

2. कोंडेकर,ए.वाय. (२००४), मराठयांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. Rajadhyaksha, Abhijit (2022), An article on ‘The Maratha’s : Sambhaji Raje Bhosale

४. पगडी, सेतू माधवराव, हिंदवी स्वराज्य आणि मोगल

५. कुलकर्णी. अ.रा. शिवकालीन महाराष्ट्र

६. देशमुख, प्रशांत, (२००१) मध्ययुगीन भारताचा इतिहास, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

❖❖❖❖

munotes.in

# १०

# मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध

**घटक रचना :**


१०.० उद्दिष्ट्ये

१०.१ प्रस्तावना

१०.२ संभाजी महाराजांच्या वधाचा परिणाम

१०.३ छत्रपती राजाराम महाराज यांचे राज्यरोहण

१०.४ छत्रपती राजाराम महाराज यांचा मुघलांविरुद्धचा संघर्ष

१०.५ सेनापती संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांची कामगिरी

१०.६ छत्रपती राजाराम महाराज यांचा मृत्यू

१०.७ महाराणी ताराबाईचे नेतृत्व

१०.८ महाराणी ताराबाई यांची कामगिरी

१०.९ महाराणी ताराबाईंची योग्यता

१०.१० सारांश

१०.११ प्रश्न

१०.१२ संदर्भ


## १०.० उद्दिष्ट्ये

१. छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रूर वधाचा स्वराज्यावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२. मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्ध काळाचा आढावा घेणे.

३. छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई यांच्या कामगिरीचा अभ्यास करणे.

४. सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करणे.

## १०.१ प्रस्तावना

इसवी सन १६८९-१७०७ हा कालखंड हा मराठयांच्या इतिहासात **मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालखंड** म्हणून ओळखला जातो. या कालखंडामध्ये मराठयांच्या स्वराज्यावर अस्मानी संकट कोसळले होते. मुघल बादशहा औरंगजेबाने स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांची कैद करून त्यांचा अत्यंत क्रूर पद्धतीने वध केला होता. ज्या क्रूर पद्धतीने स्वराज्याच्या छत्रपतीचा छळ करून, त्यांचा अपमान करून त्यांचा वध केला; या वधाचा परिणाम मराठी मुलखातील लोकांवर पाडण्यासाठी औरंगजेबाने त्यांच्या शरीराचे तुकडे करून त्यांच्या प्रेताची मिरवणूक काढून गावागावात वाद्यांच्या गजरात फिरवली होती. लोकांनी औरंगजेबाचा प्रतिकार करण्याचे धाडस करू नये म्हणून अत्यंत क्रूर पद्धतीने स्वराज्याच्या छत्रपतींची विटंबना केली गेली, परंतु मराठयांनी अत्यंत धैर्याने या प्रसंगाला सामोरे जाऊन छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांच्या कुशल नेतृत्वाखाली व सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांसारख्या मातब्बरांनी स्वराज्याचे रक्षण केले होते. औरंगजेबासारखा बलाढय शत्रूने मराठयांचे स्वराज्य मिळविण्याचा चंग बांधला होता, परंतु मराठयांचे स्वराज्य नष्ट करण्याच्या नादात त्याला स्वराज्यात गाडण्याची नामुष्की मुघलांवर आली होती. अशा या देदीप्यमान स्वातंत्र्यलढयाचा सविस्तर आढावा या प्रकरणांमध्ये घेण्यात आला आहे.

## १०.२ छत्रपती संभाजी महाराजांच्या वधाचा परिणाम

छत्रपती संभाजी महाराजांचा वध इसवी सन १६८९ मध्ये करण्यात आला. त्यानंतर पुढील पंचवीस वर्षे मराठयांचा मुघलांशी संघर्ष चालू होता. याविषयी इतिहासकार गो.स. सरदेसाई असे लिहितात की, "मोगल - मराठयांचे पंचवीस वर्षे चाललेले हे युद्ध मराठयांच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे". हे स्वातंत्र्ययुद्ध औरंगजेबाच्या मृत्युपर्यंत म्हणजे इसवी सन १७०७ पर्यंत चालले होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठयांनी प्रखरपणे मुघलांचा सामना करण्याचा निर्धार केला. शत्रूंचा बंदोबस्त करणे, संभाजी महाराजांच्या वधाचा बदला घेण्यासाठी शत्रूवर सूडाने पेटून उठणे, महाराजांच्या क्रूर वधाचा बदला घेण्यासाठी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून, स्वराज्याच्या रक्षणासाठी प्राणपणाने संघर्ष करण्यासाठी एकत्रित येण्याचा चंग बांधला होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली सर्व मराठी सरदार एकत्रित येऊन मुघलांवर तुटून पडले होते. परिणामी मुघलांच्या प्रचंड फौजफाटा आणि दडपशाहीला मराठयांनी तितकाच प्रतिकार करत स्वराज्याच्या रक्षणाची जबाबदारी घेतली होती. छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रूर वधाचा परिणाम स्वराज्यातील जनता व पराक्रमी सरदार यांच्यावर होऊन कठीण काळात आपल्या स्वराज्याच्या संरक्षणासाठी झालेला हा अतुलनीय संघर्ष असल्याचे इतिहासकार लिहितात.

munotes.in

## १०.३ छत्रपती राजाराम महाराजांचे राज्यरोहण

छत्रपती राजाराम महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे द्वितीय सुपुत्र होते. त्यांच्या आईचे नाव सोयराबाई होते. त्यांचा जन्म १६७० मध्ये राजगड किल्ल्यावर झाला. राजाराम राजे हे शांत व धीरगंभीर प्रकृतीचे होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या वधाचा वेळी त्यांचे वय अवघे १९ वर्षाचे होते. छत्रपती संभाजी महाराजांना मुघलांकडून कैद झाल्यानंतर महाराणी येसूबाई व मंत्रिमंडळाने मराठयांच्या राजगादीला वारस म्हणून राजाराम राजेंना छत्रपती म्हणून घोषित केले. यावरून असे दिसून येते की, संभाजी महाराजांच्या नंतर मुघलांचा समज होता की मराठयांचे राज्य आपल्या ताब्यात येईल, परंतु मराठयांनी राजाराम महाराज छत्रपती झाल्याची घोषणा करून मुघलांविरुद्धचा संघर्ष त्यांच्या नेतृत्वाखाली चालू ठेवला. औरंगजेबला जेव्हा ही बातमी कळाली की, राजाराम राजेंना स्वराज्याचे छत्रपती घोषित केले, त्यावेळी औरंगजेबाने आपला विश्वासू सरदार झुल्फिकारअली खान याला रायगड जिंकण्यासाठी व मराठयांच्या नव्या छत्रपतीला कैद करण्यासाठी पाठवले. २५ मार्च १६८९ रोजी झुल्फिकारअली खानाच्या सैन्याने रायगडाला वेढा दिला, त्यावेळी संभाजी महाराजांची पत्नी राणी येसूबाई यांनी सर्व मराठा सरदारांना मुघलांच्या आक्रमणापासून स्वराज्याच्या राजधानीचे संरक्षण करण्यासाठी एकत्रितपणे संघर्ष करण्यासाठी आव्हान केले व महाराणी येसुबाई यांनी स्वराज्याचे छत्रपती राजाराम महाराज यांना काही निवडक सरदारांसह रायगडाहून सुरक्षितपणे बाहेर पडण्याची सूचना केली. जर मोगलांनी रायगड जिंकला तर सर्वच मुघलांचे कैदी होतील अशा परिस्थितीतील शत्रुला चकमा देऊन छत्रपती राजाराम महाराज यांना खंडोबल्लाळ, खंडेराव दाभाडे, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांच्यासह रायगडाहून पलायन करण्याची योजना आखली आणि त्यात ते यशस्वी झाले. झुल्फिकारअली खानाने रायगडाचा वेढा मजबूत करण्यासाठी शहाजादा मुअज्जमला पत्र लिहून अधिक सैन्य व दारूगोळा पाठविण्याची मागणी केली. तथापि, औरंगजेबाला पुन्हा बातमी कळाली की, मराठयांचे छत्रपती प्रतापगडावर सुरक्षित आहे तेव्हा त्याने इतकादखानास प्रतापगडाला वेढा घालण्याचा आदेश दिला. एप्रिल १६८९ मध्ये प्रतापगडाला वेढा पडताच राजारामाने प्रतापगड सोडून पन्हाळा गडाचा आश्रय घेतला, परंतु पुन्हा सुरक्षिततेच्या कारणास्तव त्यांनी पन्हाळगडाचा आश्रय सोडला. मराठा सरदारांनी विचारपूर्वक निर्णय घेऊन अतिशय सुरक्षित स्थळी छत्रपतींना हलवण्यासाठी महाराष्ट्राबाहेर कर्नाटकात जिंजीच्या किल्ल्यात आश्रय घेण्याचे ठरवले. त्यानुसार, छत्रपती राजाराम महाराज आपल्या निवडक सरदारांसह जिंजीच्या किल्ल्यात आश्रय घेतला. ‘राजाराम चरित्रम्’ या केशव पंडित यांच्या ग्रंथात तसेच ‘मार्टिनच्या रोजनिशीत’ व ‘मासिरे-ए-आलमगिरी’ या ग्रंथात ही जिंजीच्या प्रवासाचे वर्णन केलेले आहे. पन्हाळा ते जिंजी हा सहाशे किलोमीटरचा प्रवास राजारामांनी आपल्या निवडक सरदारांसह केला. त्यामध्ये प्रल्हाद निराजी, रुपाजी भोसले, नाईक, खंडोबल्लाळ, चिटणीस नीळकंठ मोरेश्वर पिंगळे इत्यादींचा समावेश होता. सर्वत्र नाकेबंदी असतानाही राजाराम महाराजांनी जिंजीकडे यशस्वी पलायन करून मुघलांना चकमा दिला. अशा परिस्थितीत औरंगजेबाने झुल्फिकारअली खानास प्रचंड सैन्य देऊन जिंजीला वेढा देण्यासाठी पाठवले. मुघल सैन्यास जिंजीच्या वाटेत अनेक हल्ल्यांना तोंड द्यावे लागले. शेवटी सप्टेंबर १६९० मध्ये त्याने जिंजीला वेढा दिला.

## जिंजीचा वेढा आणि राजाराम महाराजांची मुत्सद्देगिरी

जिंजी हे दक्षिणेतील महत्त्वाचे ठिकाण आहे. सध्याच्या तामिळनाडू राज्यात आहे. भारताच्या पूर्व किनारपट्टीवरील जिंजी हे मराठयांच्या राजधानीचे ठिकाण होते. जिंजीच्या किल्ल्यामध्ये मराठयांचे छत्रपती राजाराम महाराज यांनी आश्रय घेतला. हा किल्ला तीन टेकडयांवर वसलेला असून त्याच्या सभोवतालची तटबंदी मजबूत होती. झुल्फीकार खानाने जिंजीच्या किल्ल्यावर तोफांचा मारा केला, परंतु किल्ल्याला काही हानी पोहोचली नाही. मुघलांनी किल्ल्याला वेढा दिलेला होता. हा लढा सतत आठ वर्षे चालला होता. अशा परिस्थितीत स्वराज्याच्या छत्रपतीच्या रक्षणासाठी सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी तीस हजाराच्या फौजफाटा घेऊन बाहेरून मुघल फौजेवर हल्ला चढवून त्यांच्या सैन्याला जेरीस आणले होते. त्यांची रसद बंद केली. रसद बंद केल्यामुळे मुघल फौजेवर उपासमारीची वेळ आली. अशावेळी झुल्फिकारअली खानाने जिंजीची पकड ढिली करून तडजोडीची भूमिका घेतली. छत्रपती राजाराम महाराजांनी खानाबरोबर तहाची बोलणी सुरू करण्याचे दर्शविले. त्यामुळे खान बेसावध राहीला. या संधीचा फायदा घेऊन छत्रपती राजाराम महाराज जिंजीतून प्रयाण करून विशालगडावर १६९८ मध्ये सुखरूप पोहोचले. मराठयांच्या इतिहासात जिंजीच्या मोहिमेला अतिशय महत्त्व आहे. कारण छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीच्या सहाय्याने स्वराज्याची पुर्नप्रतिष्ठापना केली. छत्रपती राजाराम महाराजांनी जवळपास सात ते आठ वर्ष जिंजीच्या किल्ल्यातून स्वराज्याचा कारभार चालविला.

जिंजीमध्ये वास्तव्यास असतांना त्यांनी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली. छत्रपती राजाराम महाराजाचे अष्टप्रधान मंडळात पुढील प्रमाणे आहे.

पेशवा – निळो मोरेश्वर पिंगळे

प्रतिनिधी – प्रल्हाद निराजी

सेनापती – संताजी घोरपडे

अमात्य - जनार्दनपंत हणमंते

हुकुमतपन्हा – रामचंद्रपंत बावडेकर

सचिव – शंकराजी मल्हार नरगुंदकर

पंडितराव - श्रीकराचार्य कालगावकर

मंत्री - रामचंद्र त्रिंबक पुंडे

सुमंत – महादजी गदाधर

न्यायाधीश – बाळाजी सोनदेव

संदर्भ (सरदेसाई, स्थिरबुद्धी राजाराम)

वरील यादीत प्रतिनिधी आणि हुकुमतपन्हा ही दोन अधिकारपदे छत्रपती राजाराम महाराजांनी अष्टप्रधानात नव्याने सुरू केली. निळोपंत पिंगळे यांना प्रधान पदावर नेमल्यानंतर प्रल्हाद निराजी यांना देण्यायोग्य मोठे पद शिल्लक राहिले नाही तेव्हा त्यांच्यासाठी प्रतिनिधी हे नवीन पद योजनेत आले. हुकूमतपन्हा हे अधिकार पदही नव्याने सुरू झाले. सचिवपद शंकराजी मल्हार नरगुंदकर यांना दिले होते पण ते फार लवकर निधन पावले. त्यांच्या जागी शंकराजी नारायण यांना सचिवपद मिळाले. (सरदेसाई, स्थिर बुद्धी राजाराम) चिटणीसपद खंडोबा यांच्याकडे कायम चालू ठेवले. याशिवाय आणखी काही मातब्बर व्यक्तींना छत्रपती राजाराम महाराजांनी त्या व्यक्तींच्या कामगिरी पाहून किताब व अधिकार पदे दिली. परसोजी भोसले यांना गोंडवन, वराड, नागपूर इत्यादी प्रदेशांचा अमल दिला तसेच त्यांना सेनासाहेबसुभा असे पदही मिळाले. परसोजी भोसले हे नागपूरकर भोसले यांचे पूर्वज होत. परसोजीप्रमाणेच आणखी एक शूर सरदार सिधोजीराव निंबाळकर यांना गोदावरीच्या काठचा सुभा दिला. गुजरातच्या भागात खंडेराव दाभाडे यांना नेमून सेनाधुरंधर हे पद दिले. बुबाजी पवार यांना विश्वासराव हा किताब व विश्वासराई सरंजाम दिला. त्यांचे बंधू केरोजी पवार यांना सेनाबारासहस्त्री किताब देण्यात आला. [संस्थान देवास, पवार घराण्याचा इतिहास – मा.वी.गुजर] छ.राजाराम महाराजांच्या आज्ञापत्रातील नोंदीनुसार, छत्रपती जिथे जातील तिथे राजधानी होती. म्हणून राजाराम महाराजांच्या काळात मराठयांची राजधानी फिरती होती असे म्हटले जाते. आणिबाणीच्या परिस्थितीतसुद्धा छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या विश्वासू सरदारांच्या व मुत्सद्देगिरीच्या जोरावर स्वराज्याचा कारभार कार्यक्षम व प्रभावीपणे चालविला होता. परंतु मार्टिन असे लिहितो की, 'झुल्फीकार खानाकडे जिंजी ताबडतोब सर करण्याचे सामर्थ्य होते, परंतु त्यांनी तसा प्रयत्न न करता त्याने जिंजीचा वेढा लांबणीवर टाकला होता. छत्रपती राजाराम महाराज व झुल्फिकारखान यांच्यातील गुप्त करारानुसार, औरंगजेब बादशहाच्या पश्चात गोवळकोंड्याचा प्रदेश झुल्फीकार खानाने घ्यावा व विजापूरचा प्रदेश छत्रपती राजाराम महाराजांनी घ्यावा. त्यानुसार जिंजीचा वेढा दीर्घकाळ रेंगाळत ठेवला होता. राजाराम महाराजांची झुल्फिकारअली खानाबरोबर झालेल्या गुप्त कराराची बाहेरील मराठा सरदारांना कल्पना नव्हती. त्यामुळे त्यांनी प्राणपणाने संघर्ष करून मुघली सैन्याला जेरीस आणले होते. हे जेव्हा मराठा सरदारांना कळाले, तेव्हा संताजी घोरपडे महाराजांवर रुसून जिंजीहून काही कोस दूर गेले होते. तसेच बहिर्जी घोरपडे व यचाम्मा नाईक राजाराम महाराजांवर राग धरून होते. नंतर राजाराम महाराजांनी संताजीची समजूत घालून त्याचा रुसवा घालवला होता. तसेच संताजीस भेटून त्याच बक्षीस देऊन त्यांचे तात्पुरते समाधान केल्याचे मार्टिन यांच्या लिखाणातून दिसून येते. [ खोबरेकर,२००६ ]

## १०.५ सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांची कामगिरी

छत्रपती राजारामाच्या कारकीर्दीत मुघल-मराठा संघर्ष तीव्र स्वरूपाचा होता. अनेक ठिकाणी दोन्ही सैन्यांमध्ये चकमकी झाल्या होत्या. स्वराज्यावर आलेल्या संकटाच्या काळात मराठा सरदारांनी दाखवलेला पराक्रम अतुलनीय स्वरूपाचा होता. या संदर्भात सेतुमाधवराव पगडी लिहितात की, 'सुदैवाने स्वराज्याला या वेळी अगदी योग्य अशा नेत्यांचा लाभ झाला. रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, परशुराम पंतप्रतिनिधी, मानाजी शिंदे, हणमंतराव निंबाळकर यासारखी पराक्रमी व

मुत्सद्दी सरदार स्वराज्याला लाभल्यामुळे बलाढ्य मुघल फौजेला प्रतिकार करून मुघलांना व बादशाह औरंगजेबाला **'सळो की पळो'** करुन सोडले होते. अशा या सरदारांपैकी सेनापती संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांची कामगिरी अतुलनीय स्वरूपाची होती.' मराठयांच्या इतिहासात या कामगिरीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

### संताजी घोरपडे यांचा पराक्रम

संताजी घोरपडे हे छत्रपती राजारामाच्या कारकीर्दीत मराठा साम्राज्याचे **'सरसेनापती'** होते. संताजीने धनाजी जाधवबरोबर सतरा वर्षे मुघल सैन्याशी निकराचा लढा दिला होता. गनिमी काव्याच्या युद्ध तंत्राचा पुरेपूर वापर करून मुघल सैन्याला हैराण करून सोडणारे संताजी व धनाजी हे मुघलांचे कर्दनकाळ ठरले होते. संताजी घोरपडे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील भाळवणी येथे इसवी सन १६४५ मध्ये झाला. छत्रपती संभाजीराजांच्या वधानंतर मराठयांचे स्वराज्य नष्ट होण्याच्या मार्गावर होते. अशा परिस्थितीत छत्रपती राजाराम महाराजांनी सरसेनापती म्हणून संताजी घोरपडे यांची नेमणूक करुन स्वराज्याच्या रक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर दिली होती. संताजी घोरपडे यांची स्वराज्यसेवा १६८९ ते १६९७ दरम्यानच्या काळात होती.

संताजी घोरपडे हे गनिमी काव्याच्या युद्धतंत्रात अतिशय तरबेज होते. याची प्रचिती मुघलांना अनेकदा आली होती. इसवी सन १६९१ मध्ये त्याने २५ हजार सैन्यानिशी औरंगाबादमार्गे बुऱ्हानपूरवर हल्ला करून प्रचंड लूट मिळवली होती. त्यानंतर त्याने सुरतेला वेढा देऊन सुरत लुटण्याचा प्रयत्न केला, परंतु तसे न करता त्याने खानदेश मार्गे सातारा येथे आला. इसवी सन १६९५ मध्ये त्याने मुघलांचे महत्त्वाचे ठाणे असलेले खटाव जिंकून घेतले. विद्युत वेगाने चढाई करून, शत्रुच्या छावणीवर अचानक हल्ला करून, पुन्हा घनदाट जंगलाच्या सहाय्याने दुसऱ्या ठिकाणी पलायन करण्यामध्ये संताजीचा हातखंड होता. संताजीच्या हल्ल्याचा मुघलांनी धसका घेतला होता. खुद्द औरंगजेबसुद्धा संताजी व धनाजीच्या आक्रमणापुढे हतबल झाला होता. त्याचे अनेक मातब्बर सरदार संताजी - धनाजी समोर शरणागतीला आले होते.

औरंगजेब बादशहाने हिम्मतखान नावाच्या सरदाराला त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवले होते. संताजीने हिम्मतखानावर अचानक हल्ला करून त्याला ठार केले. त्यानंतर इसवी सन १६९५ मध्ये दोड्डेगिरी म्हणजे आत्ताचे कर्नाटकावर स्वारी करून कासिमखान या मुघल सरदाराला धडा शिकविण्यासाठी दोडडेगिरीच्या गडी मध्ये त्याला कोंडून ठेवले होते व गडीला बाहेरून वेढा देऊन त्याची पूर्ण रसद बंद केली होती. उपासमार होऊन मुघल सैन्य मृत्युमुखी पडले होते. मुघल सरदार कासीमखान मरण पावला. या विजया मधून मराठयांना प्रचंड लूट मिळाली. संताजी घोरपडे यांच्या पराक्रमामुळे मुघलांची दाणादाण उडाली होती. सर्वत्र संताजी-धनाजीचा दरारा वाढला होता. या लढाईमध्ये संताजी घोरपडेंच्या पराक्रमाविषयी सेतुमाधवराव पगडी असे म्हणतात की, **'दोड्डेगिरीची लढाई म्हणजे संताजीच्या विजयाचा कळस होता.'** यावरून संताजी - धनाजीच्या पराक्रमाची व त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी केलेल्या त्यागाची प्रचिती येते. कठीण काळात स्वराज्याचे रक्षण करण्यामध्ये संताजी- धनाजी या सरदारांचा सिंहाचा वाटा होता. चिटणीसांच्या बखरीमध्ये संताजी - धनाजीच्या गनिमीकाव्याच्या युद्धतंत्राविषयी वर्णन केलेले आहे, 'मराठे

यांनी आज या ठायी तर उद्या वीस-पंचवीस कोसावर जावे. पुन्हा एकाएकी येऊन छापा घालावा. पातशहाची ठानी असतील ती उठवावी, मुलुख मारावा. अशा रीतीने त्यास चैन पडू देऊ नये. मोगलांचे घोडे पाण्यावर आले असता, पाणी न पीत त्यास मोगली लोकांनी म्हणावे, ते **पाण्यात संताजी व धनाजी दिसतो की काय?** रात्री, दिवसा कोणीकडून येतील, काय करतील याचा थांगपत्ता लागत नसे. मोगलाई फौजेत आठही प्रहर भय बाळगीत पातशहासी बहुदा आश्चर्य जहाले की, हे मराठे आदमी नव्हता भूतखाना आहे.' (संदर्भ: मल्हार रामराव चिटणीस कृत थोरले राजाराम यांचे चरित्र)

संताजी - धनाजीच्या पराक्रमाविषयी अनेक इतिहासकारांनी लिहिले आहे. त्यामध्ये मुघल इतिहासकार खाफीखान यानेसुद्धा संताजी धनाजी विषयी लिहिले आहे की, 'मराठे सरदारात संताजी घोरपडे हे प्रमुख होते. समृद्ध शहरांवर हल्ला करून त्यांचा नाश करणे आणि नामांकित सेनानीवर तुटून पडणे यात त्यांची खूपच प्रसिद्धी झाली. ज्याला ज्याला संताजीशी मुकाबला करण्याचा आणि लढण्याचा प्रसंग आला, त्याच्या नशिबी खालील तीन पैकी एक परिणाम ठरलेला असे. एक तर तो मारला जाई किंवा जखमी होऊन संताजीच्या कैदेत सापडे किंवा त्याचा पराजय होई आणि त्याचे सैन्य आणि बाजारबुणगे गारद होत. आपण जिवानिशी सुटलो हाच आपला पुनर्जन्म झाला असे त्यास वाटे. म्हणून त्याच्याशी युद्ध करण्यास बादशाहाच्या प्रतिष्ठित सरदारांपैकी एकही तयार होत नसे. जगात धडकी भरून सोडणारी फौज घेऊन तो कुठेही पोचला की व्याघ्राप्रमाणे असलेल्या अनुभवी योद्ध्यांची हृदय कंपायमान होत. (संदर्भ: खाफीखान पृष्ठ ३९९-३)

छत्रपती राजाराम महाराजांचा संताजी घोरपडेवर प्रचंड विश्वास होता. तो सार्थ करत संताजींनी आपल्या स्वकर्तुत्वाने मुघलांना जेरीस आणले होते. जिंजीच्या किल्ल्यामध्ये आश्रयास असताना संताजी-धनाजी यांनी बाहेरून झुल्फिकार खानाच्या सैन्यावर हल्ला करून त्यांना जिंजीचा वेढा ढिला करण्यास भाग पाडले होते. संताजीच्या अंगी धाडस होते. दोडडेगिरी आणि बसवपट्टन येथे मिळालेला दणदणीत विजय संताजीच्या यशाचा परमोच्च बिंदू होता. या विजयानंतर त्यांनी ८ मे १६९६ रोजी जिंजी येथे फौज घेऊन आले होते. जिंजीच्या किल्ल्यात त्यांनी राजाराम महाराज यांची भेट घेतली. या भेटीत दोघांमध्ये मतभेद निर्माण झाले व संताजी नाराज होऊन जिंजीहून दूर ठिकाणी निघून गेला. नाराजीचे कारण स्पष्ट झाले नाही. जेधे शकावलीमध्ये फक्त एवढाच उल्लेख आहे की, 'चैत्रमासी राजारामाच्या दर्शनास संताजी घोरपडे गेला. जेष्ठ मासी बिघडोन कंची [कांजीवरम] अलिकडेच भांडण झाली.' इतिहासकार जयसिंगराव पवार यांनीसुद्धा संताजी व राजाराम महाराज यांच्यातील वादाविषयी असे म्हटले आहे की, 'जहागिरी देण्याच्या राजाराम महाराजांच्या नीतिला संताजीने विरोध केला असावा. कारण जहागिरीची प्रथा शिवाजी महाराजांनी बंद केली होती. त्याचप्रमाणे मुघलांविषयी नरमाईचे धोरणसुद्धा त्याला मान्य नव्हते. संताजीला असे वाटत होते की, मराठयांच्या हाती गवसलेले असदखान, झुल्फिकारखान, शहजादा कामबक्ष यांना वान्दिवाशला जाण्याची वाट मोकळी करून दिल्याबद्दल त्याला राजाराम महाराजांचा राग येणे स्वाभाविक होते. या रागातून वीस हजारांची फौज घेऊन संताजी जिंजीहून बाहेर पडला होता.' याविषयी भीमसेन सक्सेना असे म्हणतो की, 'धनाजी जाधवाने राजारामास भासविले की, संताजीचा जोर खूप वाढला आहे. तो शूर व कुशल शिपाई आहे. तो स्वतंत्र होण्याच्या मार्गावर आहे. त्याला ठार मारले पाहिजे. स्वाभाविकच राजारामाने संताजीचे पारिपत्य करण्याचा विचार केला आणि त्यांनी

धनाजी जाधव, अमृतराव निंबाळकर, हनुमंतराव, घोरपडे इत्यादी मराठा सरदारांना घेऊन संताजी वर चालून गेले. उभयतांमध्ये कांचीपुरमजवळ आयेवारकुट्टी येथे प्रचंड लढाई झाली. या लढाईमध्ये संताजीने छत्रपती राजाराम महाराजांचा पराभव करुन मराठा सेनापतींना कैद केले. धनाजी जाधवांनी रणांगणातून पळ काढला. अमृतराव निंबाळकर कैद होऊन पुढे त्यास हत्तीच्या पायाखाली देण्यात आले. लढाईच्या दुसऱ्या दिवशी संताजी आपले हात बांधून राजाराम महाराजांसमोर उभा राहिला आणि आपल्या हातून घडलेल्या अपराधाविषयी महाराजांची क्षमा मागून मी तुमचा सेवक असल्याचे सांगितले व आपण मला जी आज्ञा कराल त्याप्रमाणे मी वागेन असे सांगून राजाराम महाराजांना जिंजीच्या किल्ल्यात सुखरूपपणे पोचविण्याची व्यवस्था केली. ही घटना जून १६९६ मध्ये घडल्याचे खोबरेकर यांनी त्यांच्या ग्रंथात नमूद केले आहे.

संताजी व राजाराम महाराज संघर्षाची चर्चा संपूर्ण दक्षिणेत सुरू झाली होती. कारण छत्रपतीच्या एका सरदाराने छत्रपतीचा पराभव केलेला होता आणि त्यांना कैद केले होते. याचा फायदा घेण्यासाठी झुल्फीकार खानाने बादशहाच्यावतीने संताजीला मोठे इनाम देऊ केले. एवढेच नव्हे तर खुद्द बादशहाने संताजीस बारा हजारी उमराव करण्याचे आश्वासन दिले, परंतु संताजीने ही प्रलोभने धुडकावली. संताजीचे महात्म्य यातून दिसून येते. जर संताजी या प्रलोभनांना आतून बळी पडला असता तर मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध संपुष्टात येऊन, मराठयांच्या छत्रपतीला मुघलांनी कैद करून मराठा साम्राज्य ताब्यात घेतले असते. असे असताना छत्रपती राजाराम महाराजांनी संताजीला सेनापती पदावरून दूर केले. त्याचबरोबर त्यांच्या सैन्यातील अनेकांना आपल्या बाजूने वळवले. येथून संताजीला उतरती कळा लागली होती. त्यातच धनाजी जाधवांनी संताजीचा बिमोड करण्याचा चंग बांधला होता. मराठा सरदारांमधील अंतर्गत वाद मिटविण्यात छत्रपती राजाराम महाराज यांची मुत्सद्देगिरी कमी पडल्याचे इतिहासकारांचे मत आहे. जर हा अंतर्गत वाद मिटवला असता तर संताजी घोरपडेसारखा अत्यंत पराक्रमी सेनापती मराठयांनी गमावला नसता.

### बेदनुरची राणी चेन्नम्माचे मराठयांना सहाय्य

छत्रपती राजारामाने स्वराज्यातून दूरवर सुरक्षित स्थळी आश्रय घेण्याचे निश्चित केले. त्यासाठी त्यांनी त्या वेळच्या कर्नाटकातील जिंजीच्या किल्ल्याची निवड केली व आपल्या निवडक सेनापतींना बरोबर घेत मजल दर मजल प्रवास करत जिंजीच्या दिशेने आगेकूच सुरू केली होती. मुघल बादशहाला याची खबर लागताच त्यांनी छत्रपती राजारामाचा पाठलाग करण्याचे आदेश दिले. तुंगभद्रेपर्यंतचा प्रवास करेपर्यंत मराठयांच्या लक्षात आले की, मुगल सैन्य पाठलाग करत आहेत. अशावेळी बहिर्जी घोरपडे (संताजीचा धाकटा भाऊ) यांनी राजाराम महाराजांना आपल्या खांद्यावर उचलून तुंगभद्रा नदी ओलांडली. मुघलांच्या सैन्याला चकमा देत मराठयांच्या छत्रपतीचे मार्गक्रमण चालू होते. वेशांतर करून मराठे सरदार व छत्रपती बेदनुरपर्यंत पोहोचले होते. बेदनूरच्या हद्दीत गेल्यावर मुघलांपासून संरक्षण करण्यासाठी बेदनुरची राणी चेन्नम्मा हिने राजाराम महाराजांना सुरक्षितपणे आश्रय दिला व त्यांचे मुघलांपासून संरक्षण केले. औरंगजेब बादशहाला याची बातमी कळताच त्याने मुगल सेनानी जाननीसारखान याला पाठवले. राणीने मराठयांना सहकार्य करून अत्यंत सुरक्षितपणे अंबूर या मराठयांच्या प्रांतात पोहोचवले. बेदनूरच्या राणीने मराठयांना सहकार्य केल्यामुळे तिला धडा शिकविण्यासाठी मुघल सेनापतीने बेदनुरला वेढा दिला.

त्यावेळी बेदनूरच्या राणीच्या मदतीसाठी संताजी घोरपडे यांनी आपल्या सैन्यासह मुघल सैन्यावर हल्ला चढवला. या सर्व प्रकरणात राणीने मुघलांना खंडणी देऊन परत पाठवले व राजाराम महाराजांना सुरक्षितपणे आपल्या राज्यातून जाण्यासाठी सहकार्य व संरक्षण दिले होते. बेदनुरची राणी चेन्नम्मा हिच्या सहकार्यामुळे मराठयांचे छत्रपती सुरक्षितपणे जिंजीपर्यंत पोहोचू शकले. त्यामुळे बेदनुरच्या राणीचे सहकार्य हे मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धात अतिशय महत्त्वाचे ठरते. त्यामुळे छत्रपती राजाराम महाराज मुघलांच्या हाती लागू शकले नाही. अन्यथा स्वराज्यावर विपरीत परिणाम झाला असता.

**संताजी घोरपडे यांचा वध**

मराठयांच्या अंतर्गत यादवीमुळे संताजीसारख्या अत्यंत पराक्रमी सरदाराचा दुर्दैवी अंत झाला. संताजी व धनाजी यांच्यातील वितूष्ट वाढत गेल्यामुळे तसेच हे प्रकरण छत्रपती राजाराम महाराजांना व्यवस्थित हाताळता आले नाही. जिंजीची मोहीम संपवून छत्रपती राजाराम महाराज स्वराज्यात आले. संताजीने साताऱ्यामध्ये आल्यावर शिंगणापूरच्या शंभू महादेवाच्या डोंगराचा आश्रय घेतला होता. कारण धनाजी जाधवाने त्याच्या सैन्याचा पुरता बिमोड केला होता. संताजीला एकाच वेळी धनाजी जाधव आणि अंतर्गत शत्रू व मुघल सरदार गाजीउद्दिनखान फिरोजजंग यानेसुद्धा बादशहाच्या हुकूमानुसार आपल्या फौजेनिशी संताजीचा पाठलाग केला. याविषयी मुघल इतिहासकार खाफीखान लिहितो की, “एकीकडून बादशाही फौज व दुसरीकडून धनाजी जाधव यांची फौज यांनी संताजीला मृत्यूच्या जाळ्यात पकडले होते.” संताजी घोरपडे शंभू महादेव डोंगरातील निवासस्थानात आषाढ महिन्यात जून १६९७ मध्ये (१५ ते १८ जूनच्या दरम्यान) जवळच्या ओढयावर संताजी पहाटेच्या अंघोळीसाठी आले असता आधीच दबा धरून बसलेल्या नागोजी माने याने गाफील अवस्थेत असलेल्या संताजी घोरपडे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. त्यावेळी ते देवपूजा करीत होते व पूर्वेकडे तोंड करून डोळे मिटवून सूर्याला नमस्कार करीत होते. अत्यंत दुर्दैवी पद्धतीने गाफील अवस्थेत संताजीवर हल्ला करून त्याचा वध करण्यात आला. त्यांच्या या वधाच्या संदर्भात अनेक तर्कवितर्क केले जातात. कारण याचा पूर्ण संशय धनाजी जाधवांवर जातो. त्यांचे अंतर्गत वैमनस्य होते. जुलै १६९७ रोजी औरंगजेबाचा सरदार लुत्फुल्लाखान याने संताजीच्या वधानंतर नागोजीला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले होते की, “तुम्ही निश्चय करून आमचे दौलतीचे अस्त्रे करून हुजूर येऊन रुजू झाला व दुश्मनासही दूर केला. संताजीचा पळावयाचा रस्ता तुम्ही बंद केला. त्यास पळून जाऊ दिले नाही जेणेकरून तुम्ही सरकारची नोकरी एकनिष्ठेने करून चांगली बजावली. तुमची विनंती मान्य झाली आहे. तुमचे अपराध क्षमा होऊन पादशहाची मेहेरबानी व इनायत होऊन येईल.” यावरून असे दिसून येते की, संताजीच्या वधासाठी मुघलांनी नागोजी माने यांना लालूच दाखविली होती. त्यामुळे फितूरने व लालसेपोटी त्याने हे कृत्य केले असावे. असे इतिहासकार लिहितात. सेतू माधवराव पगडी यांच्या मते, अशा या श्रेष्ठ सेनापतीचा मृत्यू एका आणीबाणीच्या प्रसंगी घडून यावा ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. संताजीचा वध हे मराठेशाहीला बसलेला मोठा धक्का होता.

## धनाजी जाधव यांची कामगिरी

छत्रपती राजाराम महाराजांच्या व महाराणी ताराबाई यांच्या काळात म्हणजे १६९७ ते १७०७ मध्ये ते मराठा साम्राज्याचे सरसेनापती होते. मराठयांच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात ज्या दोन कर्तबगार सेनापतींनी मुघलांना सळो की पळो करून सोडले होते ते संताजी व धनाजी होते. आपल्या गनिमी काव्याच्या युद्धतंत्र्याच्या साहाय्याने त्यांनी बलाढय मुघल सेनापतींना जेरीस आणले होते. इतकेच नव्हे तर आपल्या दहशतीने त्यांनी मुघल सेनापतींच्या मनात धडकी भरवली होती. धनाजी जाधव हे सिंदखेडच्या लखुजीराव जाधव या पराक्रमी घराण्यातील होते. त्यामुळे जाधव घराण्याच्या पराक्रमाची शौर्यगाथा पुढे नेण्याचे कार्य धनाजी जाधव यांनी केले होते. आपल्या अंगी असलेल्या प्रचंड शौर्य, धाडस व युक्तीच्या जोरावर त्यांनी आणीबाणीच्या प्रसंगी मराठेशाहीचे रक्षण करण्याची मोठी जबाबदारी अतिशय धैर्याने पेलली होती. त्यामुळे संताजी- धनाजी या जोडगोळी शिवाय मराठयांचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. धनाजी जाधव यांचा जन्म १६५० च्या आसपास सिंदखेडराजा येथे जाधव घराण्यात झाला होता. त्यांचा संबंध थेट छत्रपतीच्या राजघराण्यांशी येतो. माँसाहेब जिजाऊंच्या सानिध्यात त्यांचे संगोपन होऊन त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची आदर्श कारकीर्द बघितली होती. तसेच थोरल्या महाराजांचे गनिमी काव्याचे तंत्र व छत्रपती संभाजी महाराजांचे विद्युतवेगाने शत्रूवर करावयाच्या चढाईचे तंत्र अवगत केले होते.

## धनाजीचे कार्यकर्तृत्व

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात इ.स. १६९७ मध्ये सेनापती संताजी घोरपडे यांचा वध झाल्यानंतर राजाराम महाराजांनी धनाजी जाधवांना मराठयांचे सर सेनापती पद बहाल केले.

संताजी- धनाजी या जोडीने संभाजीराजांच्या वधानंतर खऱ्या अर्थाने मराठयांच्या राज्याचे संरक्षण केल्याचे दिसून येते. इसवी सन १६९२ मध्ये मुघल फौजांनी जिंजीच्या वेढयादरम्यान आजूबाजूच्या प्रदेशात धुमाकूळ घातला होता. तेव्हा धनाजी जाधवांनी इस्माईल खान या मुघल सरदारांवर हल्ला करून त्याची दाणादान उडवली होती. वेल्लोरच्या वेढयादरम्यान धनाजी व संताजी यांनी जुल्फीकार अलीखानवर चालून आल्याची वार्ता कळताच त्याने वेढा उठविला. त्यामुळे केवळ संताजी - धनाजीचे नाव जरी कळाले, तरी मुघल सेनापतींच्या मनात धडकी भरून त्यांनी त्यांचे वेढे अधूरे सोडल्याचे दिसून येते. कालांतराने संताजी - धनाजी यांच्यातील अंतर्गत संघर्षातून राजाराम महाराजांना संताजी घोरपडे यांना गमवावे लागले. त्यामुळे मराठा साम्राज्याची जबर हानी झाली. जिंजीच्या वेढयानंतर राजारामाचे स्वराज्यात आगमन झाले. त्यावेळी संताजी - धनाजीचे अंतर्गत वादाचा फायदा घेण्याचे औरंगजेबाने ठरवले. त्याची प्रचिती मुघलांनी साताऱ्यातील अजिंक्यतारा किल्ल्याला वेढा दिला होता. रुस्तम खानाला धडा शिकविण्याचे काम संताजी - धनाजीने केले होते. अचानक योजना करून त्यांनी रुस्तमखानावर हल्ला केला आणि त्याला जखमी केले. त्याला युद्ध कैदी बनवले. पंधरा दिवस किल्ल्याला वेढा देऊन दीड हजार मुघल सैनिक मारले. शेवटी खानाने प्रचंड धनसंचय देऊन आपली सुटका केली. सेनापती धनाजी जाधवाच्या कर्तबगारीची सुरुवात

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हयातीत सुरू झाली होती असे असले तरी धनाजी जाधवांच्या कर्तबगारीने त्यांना अतिउच्च शिखरावर पोहोचविले ते छत्रपती राजाराम आणि महाराणी ताराबाईंच्या कारकिर्दीत. माँसाहेब जिजाऊंच्या संस्कारात तयार झालेला पराक्रमी सरदार होता. राजकारणात वाऱ्याची दिशा पाहून आपले धोरण ठरविणारा मुत्सद्दी सेनापती म्हणजे धनाजी जाधव होता. मराठयांच्या स्वातंत्र्य युद्धाचा कालखंड जर विचारात घेतला तर इ.स. १६८९ ते १७०७ या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात अखंडपणे स्वराज्याच्या रक्षणासाठी सतत लढाया व मोहिमा करणाऱ्या सरदारांपैकी धनाजी जाधव यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. संताजी घोरपडेंच्या निधनानंतर त्यांना सरसेनापती पद मिळाले होते. धनाजी जाधव यांनी प्रचंड अनुभव, मुत्सद्देगिरी आणि पराक्रम यामुळे कठीण परिस्थितीत मराठयांचे स्वराज्य संरक्षित करण्याचे महत्त्वाचे कार्य केले होते. मुघल राजपुत्र मुअज्जम याने पन्हाळ्या किल्ल्याला ऑक्टोबर १६९२ मध्ये वेढा दिला होता तो १६९४ पर्यंत चालला होता. या काळात मुअज्जमने किल्ल्याच्या तटबंधी भोवती जी काही मोर्चे बांधणी केली होती, ती १६९७ मध्ये धनाजी जाधवांनी हल्ला करून उध्वस्त केली. १६९२ पासून मराठयांनी आपल्या लष्करी मोहिमा वेगाने सुरू ठेवल्या होत्या. ऑक्टोबर १६९२ मध्ये संताजी - धनाजीने बेळगाव नजीकचे अनेक किल्ले जिंकले होते व बेळगाव शहराला वेढा दिला होता.

डिसेंबर १६९२ मध्ये जिंजीला मुघलांच्या वेढयातून मुक्त करण्यासाठी धनाजी - संताजीने आपल्या विशाल सैन्यासह मद्रासच्या भागात मोहिमा चालविल्याने मुघलांना जेरीस आणले होते. जिंजीचा वेढा खिळखिळा करून आजूबाजूच्या प्रदेशावर आक्रमण करून तो स्वराज्याला जोडण्याचे काम त्यांनी केले होते. १६९३ मध्ये पुन्हा स्वराज्यात येऊन मुघलांच्या वेगवेगळ्या मोहिमांमध्ये समाचार घेण्याचे काम चालू होते. संताजी - धनाजी यांचा पराक्रम सर्वोच्च शिखरावर असताना "सेनापती" पदावरून त्यांच्यात मतभेद वाढत गेले. शेवटी संताजीचा वध झाला. त्यानंतर स्वराज्याची संरक्षण भिंत लढवण्याचे काम धनाजी जाधव यांवर पडले. संताजीसारखा पराक्रमी वीर गेल्यानंतर तितक्या तोडीचा पराक्रमी योद्धा धनाजीच्या रूपाने स्वराज्याकडे होता. "सरसेनापती" पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर धनाजी जाधव यांनी फलटणच्या मैदानात मुघली सरदार रणमस्तखान यांचा पाडावा केला. त्यावेळी छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांचा योग्य सन्मान केला होता. त्याची नोंद इतिहासात आहे. ती अशी होती की, "वर्तमान छत्रपतीस कळल्यावर जाधवराव यास भेटून बहुमान वस्त्रे, भूषणे देऊन "जयसिंगराव" हा किताब दिला." इसवी सन १६९८ नंतर म्हणजे छत्रपती राजाराम महाराजांचे स्वराज्यात आगमन झाल्यानंतर मराठयांचा आत्मविश्वास अधिक वाढला होता. धनाजी जाधव यांना सरसेनापती पद दिल्यानंतर त्यांनी आपल्या मातब्बर सरदारांच्या मदतीने मुघल मुलखात मोहिमा काढल्या होत्या. त्यामध्ये येसाजी कंक व खंडोजी दाभाडे यांनी बागलानमध्ये, नेमाजी शिंदे व विश्वासराव पवार यांनी खानदेशात, परसोजी भोसले यांनी वऱ्हाडात, तर खुद्द धनाजी जाधव आणि हनुमंतराव निंबाळकर यांनी महाराष्ट्राबाहेर आपल्या सैन्याच्या हालचाली सुरू ठेवल्या. धनाजी जाधव व नेमाजी शिंदे यांनी बुऱ्हाणपुर, नंदुरबार ही शहरे लुटली, उत्तरेचे प्रवेशद्वार समजले जाणारे माळवा प्रांतात लुटमार केली. मुघल सैन्याला हैराण करण्याचे काम चालवले होते. मराठयांनी मुघली मूलखांवर आक्रमण करून गेलेले किल्ले आपल्या पराक्रमाने पुन्हा जिंकून घेतले होते. त्यामध्ये केवळ राजगड आणि पुरंदर हे दोनच किल्ले मुघलांच्या

ताब्यात होते. कोकणामध्ये कान्होजी आंग्रे यांचे आरमारी वर्चस्व वाढत होते. त्यामुळे सिद्दींना पायबंध घालण्यात त्यांना यश येत होते. १६९९ मध्ये कान्होजी आंग्रे यांनी प्रचंड तयारीनिशी सिद्दी, पोर्तुगीज व मुघल यांच्या संयुक्त फौजांचा पराभव करून रायगडचा किल्ला आणि आजूबाजूचा प्रदेश काबीज केला होता. यावरून असे दिसून येते की, सर्वत्र मराठयांच्या पराक्रमाचा डंका पिटत होता आणि मुघलांची पीछेहाट होत होती. स्वतः धनाजी जाधव यांनी १३ मे १६९९ ला पिठूरच्या गढीला वेढा दिला होता. तेथील देशमुखांनी सात दिवस गडी लढवली. शेवटी धनाजीने देशमुखाला कैद करून त्याकडून चाळीस हजार रुपये चौथाई वसूल केली होती.

**छत्रपती राजाराम महाराजांची अयशस्वी स्वारी**

साताऱ्याच्या अजिंक्यतारा किल्ल्यामध्ये मुगल - मराठा यांच्या झुंज चालू असताना राजाराम महाराजांनी आपल्या फौजा जमा करण्याचे आदेश दिले होते. फेब्रुवारी १७०० मध्ये राजाराम महाराजांनी बादशहाच्या छावणीवर हल्ला करून संभाजी महाराजांची पत्नी राणी येसूबाई व मुलगा शाहू यांची सुटका करावी अशी योजना आखली. सर्व प्रमुख मराठा सरदारांचा व मुत्सद्यांचा विचार घेऊन ते बादशावर चालून गेले. रात्रीच्या वेळी छापा टाकला. दोन टोळ्या करून हल्ला करावा. तसेच स्वतः राजाराम महाराजांनी गुप्तपणे शाहू महाराजास हस्तगत करावे ही योजना होती, परंतु औरंगजेब बादशहा त्यावेळी साताऱ्याच्या छावणीत होता. शाहू महाराजसुद्धा त्यांच्या छावणीत होते. त्यामुळे ही योजना निष्फळ झाली. त्यानंतर राजाराम महाराजांनी गंगातीरी आंबड, पैठण, बीड इत्यादी शहरे लुटली व खंडण्या वसूल करून पुण्यास येण्यासाठी निघाले. वाटेत काही ठिकाणी बादशाही हल्लेखोरांकडून हल्ले करण्यात आले होते, परंतु ते निपटून ते सुखरूपपणे पुण्यात पोहोचले होते.

## १०.६ छत्रपती राजाराम महाराज यांचा मृत्यू

छत्रपती राजाराम महाराज पुण्यामध्ये काही दिवस वास्तव्य करून ते सिंहगडावर गेले. सिंहगडावर वास्तव्यात असताना त्यांना हलका ताप आला. छातीच्या विकाराने त्यांना रक्ताच्या उलट्या होऊन ते २ मार्च १७०० रोजी कालवश झाले. मृत्यू समयी त्यांचे वय 30 वर्षांचे होते. त्यांचे कुटुंबीय पन्हाळगडावर होते. सिंहगडावर रामचंद्रपंत हजर होते. त्यांनी विठोजी राजे भोसले यांच्या वंशातील जीवाजी राजे बावीकर यांनी त्यांचा अंत्यविधी केला. (खोबरेकर, २००६)

छत्रपती राजाराम महाराज यांनी अत्यंत कठीण काळात स्वराज्याचे नेतृत्व केले. जवळपास १०-११ वर्षाची त्यांची कारकीर्द होती. यापैकी बरेच वर्षे त्यांचे वास्तव्य जिंजीस होते. तेथून त्यांनी मराठयांच्या स्वराज्याचा कारभार चालवला होता. छत्रपती राजारामाने राणी येसूबाई व शाहूराजे यांची सुटका करण्याचा निष्फळ प्रयत्न केला होता. वतनदारांना जहागिरी देऊन त्यांचे सहकारी मिळवले होते. जहागिरी देण्याची त्यांची योजना सफल झाली होती. या संदर्भात इंग्रज प्रवासी विल्यम नॉरीस १७०१ मध्ये असे लिहितो की, "मोठ-मोठे मोगल सरदार मराठी मुलखात प्रवास करण्यास धजावत असे. कारण मराठयांनी गनिमी काव्याच्या युद्धतंत्राने अचानक हल्ले करून शत्रूला जेरीस आणले होते. मराठयांचा

प्रचंड दरारा व धाक मुघल सैन्य व सेनापतींना वाटत होता. एखादा मुलुख जिंकावा व जहागिरी म्हणून तो त्यांनीच लाटावा. हा प्रघात छत्रपती राजाराम महाराजांनी सुरू केल्यामुळे मराठयांनी नंतरच्या काळात दिल्लींचे राजकारण केले होते." परंतु त्यातच त्यांचा विनाशाची बीजे पेरली गेल्याचे इतिहासकारांचे मत आहे.

## १०.७ महाराणी ताराबाईंचे नेतृत्व

महाराष्ट्रातल्या कर्तृत्ववान स्त्रियांमधील एक अभिमानाचे व गौरवाचे महापर्व म्हणून त्यांची ओळख आहे. तत्कालिन कवि गोविंद यांनी महाराणी ताराबाई यांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे,

"दिल्ली झाली दीनवाणी। दिल्लीशाचे गेले पाणी।

ताराबाई रामराणी। भद्रकाली कोपली॥

ताराबाईच्या बखते। दिल्लीपतीची तखते।

खचो लागली तेवि मते। कुराणेही खंडली॥

रामराणी भद्रकाली। रणरंगी कृद्ध झाली।

प्रलयाची वेळ आली। मुघल हो सांभाळा॥"

महाराणी ताराबाईने आपल्या पतीच्या निधनानंतर स्वराज्य रक्षणाची जबाबदारी आपल्या स्वतःच्या खांद्यावर घेतली होती. ताराबाई या सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या होत्या. आपल्या पिताप्रमाणे त्यांच्या अंगी प्रचंड पराक्रम आणि धैर्य होते. त्यांचा प्रत्यय मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या आणीबाणीच्या परिस्थितीत आला होता. इसवी सन १७०० मध्ये छत्रपती राजारामांचे निधन झाल्यानंतर मराठयांच्या राजगादीला छत्रपती नव्हते. अशावेळी १० मार्च १७०० रोजी महाराणी ताराबाईनी आपला मुलगा धाकटे शिवाजी यांचे राज्यरोहण करून त्यांना स्वराज्याचे छत्रपती घोषित केले. त्यांच्यावतीने स्वतःच्या हातात राज्यकारभार घेतला. महाराणी ताराबाईंचा जन्म अत्यंत पराक्रमी घराण्यात झाला होता. वयाच्या ८ व्या वर्षी त्यांचा विवाह राजाराम महाराजांशी झाला होता. छत्रपती राजाराम महाराजांनी स्वराज्याची सुभे हाती घेतल्यानंतर मुघलांनी त्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. आपल्या विश्वासू सेनापतीच्या मदतीने त्यांनी कर्नाटकातील जिंजीच्या किल्ल्यात आश्रय घेतला. त्यावेळी महाराणी ताराबाई त्यांच्याबरोबर होत्या. राजकारणातील व युद्धकलेतील शिक्षण त्यांना त्यांच्या वडिलांच्या सानिध्यात राहून प्राप्त झाले होते. तसेच छत्रपतींच्या घरची सून झाल्यानंतर त्यांना स्वराज्याचा कारभार कशा पद्धतीने चालतो, कठीण परिस्थिती स्वराज्याचे रक्षण छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व नंतर छत्रपती राजाराम महाराज यांनी कशा पद्धतीने केले याचा अनुभव त्यांनी रायगड व जिंजीच्या किल्ल्यातील वास्तव्यादरम्यान घेतला. त्याचा उपयोग त्यांना त्यांच्या पतीच्या निधनानंतर झाला. छत्रपती राजारामाच्या मृत्यूनंतर स्वराज्यावरील संकट अतिशय गंभीर वळणावर येऊन ठेपले होते. अशा कठीण परिस्थितीत पतीच्या निधनानंतर दुःख व्यक्त करीत बसण्यापेक्षा स्वराज्य रक्षणाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेऊन वयाच्या

२५व्या वर्षी महाराणी ताराबाईने शस्त्रे हातात घेऊन घोडयावर बसून रणमैदानात उतरल्या होत्या.

## १०.८ महाराणी ताराबाईची कामगिरी

महाराणी ताराबाईने छत्रपती राजारामाच्या मृत्यूनंतर सर्व जबाबदारी स्वतःकडे घेतली होती आपल्या विश्वासू सरदारांच्या मदतीने मुघलांशी संघर्ष करण्याची व्यूहरचना तयार केली. त्यामध्ये खालील डावपेचांचा समावेश होता.

१] औरंगजेब बादशहाच्या छावणीभोवती सतत गिरटया घालणे व जेव्हा संधी मिळेल त्यावेळी हल्ले करणे. तसेच रसद मिळविण्यासाठी निघालेल्या औरंगजेबाच्या छावणीतील पथकांवर हल्ले करणे.

२] स्वराज्यातील सर्व किल्ल्यांचे रक्षण करणे, चिवटपणे किल्ला लढविणे व मुघली सैन्याला किल्ला सहजासहजी जिंकू न देणे, जास्तीत जास्त दिरंगाई करून मुघल सैन्याला जेरीस आणणे.

३] मुघल सैन्याला आपला पाठलाग करण्यास भाग पाडणे व अनुकूल परिस्थिती बघून अचानक त्यांच्यावर हल्ला करणे.

४] दक्षिणेकडील मुघल मूलुखावर आक्रमण करून त्यांच्याकडून चौथाई वसूल करणे, मुघली प्रदेशातून लूट मिळवणे, मुघल सैन्यात सतत गनिमी काव्याच्या युद्धकलेचा वापर करून लपून-छपून हल्ले करून त्यांची यंत्रणा खिळखिळी करणे.

५] स्वराज्याच्या बाहेरील प्रदेशात आपला वावर वाढविण्यासाठी माळवा आणि गुजरातच्या भागात जाऊन आपला संचार वाढवणे.

६] त्याचप्रमाणे नागपूरचे गोंडराजे, बुंदेलखंडातील बुंदेल, कर्नाटकातील गुलबर्गा, विजापूरभागातील बेरड जमातीच्या सरदारांचे सहकार्य मिळवणे.

यासारख्या धोरणाचा अवलंब करून मुघलांचा सामना करण्याचे धाडसी धोरण महाराणी ताराबाई यांनी आखले होते.

महाराणी ताराबाईंनी रामचंद्र पंत अमात्य, धनाजी जाधव, परशुराम पंतप्रतिनिधी, शंकराजी नारायण या विश्वासू सरदारांच्या मदतीने स्वराज्य रक्षणाचे कार्य केले. औरंगजेब बादशहाने मराठयांच्या ताब्यातील किल्ले जिंकून घेण्याचा धडाका चालविला होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या हयातीत मुघलांनी साताराच्या किल्ल्याला वेढा दिलेला होता. हा वेढा ८ डिसेंबर १६९९ ते २३ एप्रिल १७०० पर्यंत म्हणजे ४ महिने १८ दिवस चालला होता. अखेर २४ एप्रिल १७०० रोजी परशुराम पंतांनी व सुभानजी भांडवलकर या सातारा किल्लेदाराने मुघलांशी तहाची बोलणी सुरु करून वाटाघाटीस मान्यता दिली. अखेर किल्ला २४ एप्रिल १७०० रोजी मुघलांच्या ताब्यात देण्यात आला. मुघलांनी किल्ल्याचे नामकरण ‘आजमतारा’ असे केले. सर जदुनाथ सरकार साताऱ्याच्या वेढयासंबंधी असे लिहितात की, किल्ल्यास संपूर्ण वेढा घालणे हे मुघलांना जमले नाही. शेवटपर्यंत मराठे किल्ल्यातून बाहेर पडत नव्हते तर बाहेरचे आतमध्ये जाऊ शकत नव्हते. उलट मुघल सैन्य



munotes.in

कोंडल्यासारखे झाले होते. कारण मराठयांचे काही सैन्य किल्ल्याच्या आतून मुघलांचा सामना करत होते तर किल्ल्याबाहेर महाराणी ताराबाईंच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्य घिरटया घालत होते. शेवटी फितुरीने हा किल्ला मुघलांच्या स्वाधीन करण्यात आला. त्याचप्रमाणे परळी आणि पन्हाळ्याचा किल्लासुद्धा मराठयांनी शेवटपर्यंत शर्थीने लढविला. गनिमी काव्याच्या युद्धतंत्र्याने मुघलांना सळो की पळो करून सोडले होते. शेवटी किल्ला देण्यासाठी मोठ्या रकमेची मागणी करण्यात आली. पन्हाळ्याचा किल्ला मुघलांच्या स्वाधीन देण्यासाठी ५५ हजार रुपये घेऊन किल्लेदाराने किल्ला मुघलांना दिला.

महाराणी ताराबाई यांनी मुघलांविरुद्ध आपले धोरण ठरवितांना मुघलांच्या मुख्य फौज एका-एका किल्ल्यावर अडकवून ठेवायची व मराठयांच्या सैन्याला दक्षिणेकडील मुघली प्रदेशात धुमाकूळ घालण्यास पाठवायच्या. पावसाळा तोंडावर आल्यावर मुघलांशी वाटाघाटी करून प्रचंड रक्कम घेऊन किल्ला  मुघलांच्या ताब्यात द्यायचा. पावसाळ्याच्या दिवसात मुघली सैन्याचे प्रचंड हाल होत असे. त्यांची पाठ फिरताच मराठे तो किल्ला पुन्हा जिंकून घेत असे. मुघलांजवळ मनुष्यबळ कमी असल्यामुळे मुघल किल्ल्यात तुटपुंजे सैन्य ठेवत असे. त्याचा फायदा घेऊन मराठे  हल्ला करून ते किल्ले पुन्हा ताब्यात घेत असे. ग्रँड डफ यांनी या  युद्धतंत्राचे वर्णन करताना असे म्हटले होते की, “मराठयांचे सामान म्हणजे थोडीशी कांदा – भाकरी, घोंगडी एवढे ते काय असे. रात्री कुठे उतरले तर ते घोड्यांचे लगाम हातात धरूनच घोंगडी पसरून त्यावर काही वेळ अंग टाकून राहत असे.” यावरून अत्यंत तुटपुंज्या सामानासह मराठी सैन्य आपल्या युद्ध मोहिमा करत असे. बादशहाच्या फौजेला त्यांचा पाठलाग करणे कठीण जात असे. मराठा सैन्य चपळ असल्यामुळे ते सुस्त मुघल सैन्यावर हल्ला करून लुट व खजिना मिळवत असे. औरंगजेब बादशाहने मराठयांना शह देण्यासाठी मराठयांचे किल्ले काबीज करण्याचा सपाटा चालवला होता. अशावेळी महाराणी ताराबाईने मुघली प्रदेशात मोहिमा सुरू केल्या होत्या.इसवी सन १७०२ मध्ये मराठयांनी महाराणी ताराबाईच्या मार्गदर्शनाखाली माळवा, गुजरात, कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू इत्यादी प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. त्यात त्यांना यश आले. १७०३ मध्ये मराठयांनी ३५ हजाराची फौज गुजरात मध्ये घूसवली होती. नेमाजी शिंदेच्या नेतृत्वात मराठयांनी भोपाळ शहराला वेढा दिला होता. सततच्या लढायांमुळे मुघल सैन्य कंटाळले होते. याचा फायदा मराठयांनी घेतला. मुघलांनी जिंकलेले मराठयांचे प्रदेश पुन्हा जिंकण्यास सुरुवात केली. औरंगजेब बादशाहने दक्षिणेत आपली संपूर्ण शक्ती पणाला लावल्यामुळे उत्तरेत दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे राजपूत, जाट, बुंदेल, शीख यांनी मुघालांविरुद्ध बंडाळी केली. औरंगजेबाला आपले साम्राज्य त्यांच्या डोळ्यादेखत कोसळत असताना तो ते पाहू शकत नव्हता. त्यातून तो आजारी पडला. नैराशाच्या स्थितीत असतानाच अखेरीस २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगरच्या छावणीत औरंगजेबाचा मृत्यू झाला व  दीर्घकाळ चाललेल्या मुघल - मराठा संघर्षाचा अस्त झाला. या स्वातंत्र्ययुद्धात छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई यांच्या कर्तृत्वाची कसोटी लागली होती.

## १०.९ महाराणी ताराबाईंची योग्यता

इसवी सन १६८९ ते १७०७ या कालखंडात मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध लढले गेले. छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराजांनंतर मराठयांच्या हालचालींना मोठा वेग प्राप्त झाला होता तो महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वात. त्यांनी सेनापतींच्या नेमणुका आणि

त्यांच्यात करायचे बदल, राज्यातील खेडीपाडी संघटित करणे, मुघल प्रदेशात स्वाऱ्यांची योजना इत्यादी विषय आपल्या हाती घेऊन त्यांच्यावर विशेष लक्ष केंद्रित केले. मराठा राज्याच्या कारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि स्वातंत्र्यलढयाचे नेतृत्व केले ही बाब मराठयांच्या इतिहासातील एक असामान्य घटना आहे. त्याचप्रमाणे अखंड हिंदुस्थानातील लोकांना अभिमानास्पद व स्फूर्तीदायी वाटणारी आहे. मराठयांच्या स्वातंत्र्य युद्धातील एक रणरागिनी म्हणून त्यांचे कार्यकर्तृत्व देदीप्यमान असे आहे. महाराणी ताराबाई तेजस्वी आणि तडफदार होत्या. महाराणी ताराबाई हे मराठयांच्या इतिहासातील एक विलक्षण पर्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज ते पानिपत हा फार मोठा कालखंड त्यांनी बघितला रणांगणावर कधीही हार न मांडणाऱ्या महाराणी ताराबाईंना कौटुंबिक कलहात मात्र हार पत्करावी लागली. या स्वातंत्र्ययुद्धात संताजी - धनाजी यांच्या पराक्रमामुळे व महाराणी ताराबाईंच्या पराक्रमामुळे संपूर्ण मुघल साम्राज्याला हतबल व्हावे लागले होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाची किंमत मुघलांना मोजावी लागली. अत्यंत खडतर काळात महाराणी ताराबाईने मराठयांच्या राज्याचा कारभार पाहिला. शौर्य, पराक्रम, जिद्द, धाडस या गुणांमुळे औरंगजेबासारख्या प्रचंड शक्तिशाली बादशहाला मराठी मातीत गाढण्याची किमया महाराणी ताराबाईच्या नेतृत्वाखालील मराठयांनी केली आणि मराठयांचे स्वराज्य गिळंकृत करण्याची इच्छा घेऊन औरंगजेब दक्षिणेत आला होता. शेवटपर्यंत त्याला मराठयांनी झुंजवत ठेवले. परंतु मराठयांचे राज्य त्याला नष्ट करता आले नाही. औरंगजेबाच्या मृत्यूने २५ वर्षे चाललेले मराठयांचे स्वातंत्र्ययुध्द संपुष्टात आले, परंतु त्यासाठी छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, सेनापती धनाजी घोरपडे व इतर अनेक महत्त्वाच्या वीरांना बलिदान द्यावे लागले होते.

## १०.१० सारांश

वेगवेगळे विखुरलेले मराठी लष्कर संताजी आणि धनाजी या दोन सेनानीच्या नेतृत्वाखाली आणि महाराणी ताराबाई यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय कमी वेळात एकवटले. छत्रपती राजाराम महाराजांनी स्वतःच्या हिम्मतीवर धडाडीने एखादी गोष्ट केली नसेल, परंतु त्यांनी सरदार व मुत्सद्यांचा योग्य उपयोग करून घेतला. परिस्थितीमुळे त्यांनी अनेकांना वतने दिली. राजाराम महाराज शांत स्वभावाचे व स्थिर बुद्धीचे होते. त्यांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाईने मराठी राज्याची धुरा सांभाळली. मराठयांना धुळीस मिळवण्याच्या ईर्षेने आपल्या अफाट सामर्थ्यानिशी दक्षिणेत उतरलेल्या औरंगजेबाला मराठयांनी आपल्या पराक्रमाने दख्खनच्या मातीत गाडले. जवळपास २५ वर्ष चाललेल्या मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा शेवट हा मुघल बादशाह औरंगजेबाच्या मृत्यूने झाला. औरंगजेबाच्या मृत्यूबरोबरच मराठयांचे मुघलांबरोबर सुरू असलेले युद्ध संपले. या युद्धाची आणि साम्राज्याची चिंगारी पेटवली ती राष्ट्रमाता जिजाऊ या एका स्त्रीने आणि या युद्धाचा शेवट झाला तो महाराणी ताराराणीच्या नेतृत्वात हा एक विलक्षण योग म्हणावा लागेल. यानंतर मराठयांचे स्वराज्य नष्ट करण्याची भाषा यापुढे मुघलांनी काढली नाही. या स्वातंत्र्ययुद्धातून मराठयांच्या पराक्रमाचा, गनिमी काव्याच्या युद्धतंत्र्याचा आणि त्यांच्या शौर्याचा इतिहास लिहिला गेला. संकट कितीही मोठे असो त्याचा सामना धैर्य आणि संयमाने केला आणि हार न मानता संकटाचा शेवटपर्यंत सामना केल्यास बलाढ्य शत्रूलासुद्धा नमविता येते. हे मराठयांनी या स्वातंत्र्ययुद्धातून दाखवून दिले.

## १०.११ प्रश्न

१. मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धातील सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करा.

२. छत्रपती राजाराम आणि जिंजीच्या किल्ल्यातून चालविलेल्या स्वराज्याच्या कारभाऱ्याचे विश्लेषण करा.

३. मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धातील महाराणी ताराबाईंचे महत्त्व विषद करा..

## १०.१२ संदर्भ

१. खोबरेकर,वि..गो. (२००६), महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड – भाग १ शिवकाळ (१६३०-१७०७), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

२. कोंडेकर,ए. वाय., (२००४), मराठयांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. बेंद्रे,वा.सी., छत्रपती राजाराम महाराज

४. सरकार, जदुनाथ, शिवाजी अँड हीज टाइम्स.

५. पगडी, सेतू माधवराव, मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध (खाफीखानाचे साधनग्रंथ)

६. पवार, जयसिंगराव, महाराणी ताराबाई.

❖❖❖❖

munotes.in

# ११

# छत्रपती शाहू आणि महाराणी ताराबाई संघर्ष

**घटक रचना :**

११.० उद्दिष्ट्ये

११.१ प्रस्तावना

११.२ छ. शाहूंची सुटका

११.३ छ. शाहूंचे महाराष्ट्रात आगमन

११.४ छ. शाहूंना महाराणी ताराबाईंचा विरोध

११.५ छ. शाहू - ताराबाई संघर्ष व खेडची लढाई

११.६ राजपुत्र शाहूंचा राज्याभिषेक

११.७ छ. शाहूंपुढील अडचणी व बंदोबस्त

११.८ कोल्हापूर राज्यातील क्रांती व महाराणी ताराबाईंची कैद

११.९ सारांश

११.१० प्रश्न

११.११ संदर्भ

## ११.० उद्दिष्ट्ये

१. औरंगजेबाच्या मृत्युनंतरच्या मराठ्यांच्या परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. छ.शाहू - महाराणी ताराबाई संघर्षाचा आढावा घेणे.

३. छ.शाहूंपुढील समस्या व त्या सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न समजून घेणे.

## ११.१ प्रस्तावना

छत्रपती घराण्यातील शेवटचे कर्तबगार पुरूष म्हणून शाहू महाराजांकडे पाहिले जाते. शाहू महाराजांच्या मातोश्री येसूबाई व शाहू महाराज मोगलांच्या कैदेत होते. जवळपास १७-१८ वर्ष त्यांना कैदेत घालवावी लागली. मात्र बादशहा औरंगजेबाच्या मृत्युनंतर मोगल-मराठा युद्ध संपुष्टात आले. दरम्यानच्या काळात औरंगजेबाचा मुलगा आजमशहा याने १४ मार्च १७०७ मध्ये स्वतःला बादशहा म्हणून घोषित केले व मराठ्यांविरूद्ध सुरू असणारे युद्ध बंद करून आपला

भाऊ शहा आलमचा बंदोबस्त करण्यासाठी उत्तरेकडे निघाला. या घटनाक्रमातूनच मोगलांमधील अंतर्गत कलह, मराठ्यामधील अंतर्गत कलहास सुरूवात झाली. पुढे छत्रपतींची परिस्थिती कमजोर बनल्याने पेशवाईचा उदय झाला.

## ११.२ छ.शाहूंची सुटका

शाहू महाराज हे छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र होते. त्यांचे जन्म नाव शिवाजी असे होते. त्यांच्या मृदु व सौजन्यशील स्वभावामुळे त्यांना शाहू असे संबोधण्यात येऊ लागले. संभाजी महाराजांच्या वधानंतर मोगलांनी रायगड किल्ल्यास वेढा दिला. स्वराज्यावर अत्यंत दुर्धर प्रसंग कोसळला. अनेक किल्ले, ठाणी मोगलांच्या ताब्यात गेली. छत्रपती राजाराम महाराज यांना संरक्षणासाठी जिंजीला जावे लागले. अशा कठीण परिस्थितीत महाराणी येसूबाईंनी रायगडास वेढा घालून बसलेल्या झुल्फिखारखान या मोगल सेनापतीशी सामोपचाराच्या वाटाघाटी करून रायगड त्यांच्या ताब्यात दिला व आपला मुलगा शाहू व स्वतःस मोगलाची कैद स्वीकारली.

शाहू महाराज राजकैदी असल्यामुळे त्यांना मोगलांच्या छावणीत चांगली वागणूक मिळत होती. त्यांना वार्षिक तनखा ठरवून दिला होता. सन्मानाचा भाग म्हणून मनसबही देण्यात आली होती. घरच्या माणसापैकी एक समजून ममतेने वागणूक दिली जात असे.

२० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेब बादशहाचा मृत्यु झाला. औरंगजेबाच्या मृत्युने मोगलांचे मराठ्यांशी चालू असलेले प्रदीर्घ युद्ध संपले. ही बातमी औरंगजेबाचा पुत्र आजमशहास समजली तो त्वरेने अहमदनगरला आला. व त्यांनी ईदचा मुहूर्त साधून १४ मार्च १७०७ रोजी स्वतःस बादशहा म्हणून घोषित केले.

आपला मोठा भाऊ शाहाआलम याचा विरोध मोडून काढल्याशिवाय आपल्याला निरंकुश सत्ता लाभणार नाही. याची खात्री आजमशाहास होती. म्हणूनच त्यांनी मराठ्यांबरोबर सुरू असणारे युद्ध बंद करून तो घाईघाईने दिल्लीकडे जाण्यास निघाला. याच सुमारास छत्रपती संभाजींचा मुलगा शाहू व त्यांची आई महाराणी येसूबाई मोगलांच्या कैदेत होती. दिल्लीच्या रोखाने जात असताना झुल्फिकार खान व काही मुत्सद्यांच्या सल्ल्यानुसार आजमशहाने शाहूची ८ मे १७०७ रोजी सुटका केली. मात्र महाराणी येसूबाई व अन्य कैद्यांची सुटका केली नव्हती.

शाहू महाराजांच्या सुटकेबाबत इतिहासकारांनी वेगवेगळी मते मांडली आहेत.

काही इतिहासकारांच्या मते, ''झिनतउन्नीसाच्या सल्ल्यावरून शाहूची सुटका करण्यात आली.''

काही इतिहासकारांच्या मते, ''झुल्फिकार खान व शाहू महाराज यांचे घनिष्ठ संबंध होते, तसेच शाहू महाराजांबद्दल त्यांच्या मनात आदर होता व तो सतत आजमशाहाला शाहूला सोडून देण्यासाठी आग्रह करत होता पुढे आजमशाहनेही समती दर्शविल्याने शाहू महाराजांची सुटका झाली.''

खाफी खान लिहतो. ''शिवाजी महाराजांचा नातू राजा शाहू यांच्या बरोबर झुल्फिकारखानाचे खास आणि घनिष्ठ संबंध होते. पूर्वीपासूनच तो शाहूच्या सर्व कारभाराकडे आस्थापूर्वक लक्ष देत होता. झुल्फिकारखानाने आजमशहाला विनंती करून शाहू महाराज आणि त्यांचे काही सोबती यांना मुक्त करविले.''

munotes.in

भीमसेन सक्सेना लिहतो, ''संभाजा महाराजांचा मुलगा राजा शाहू याला आलमगीर बादशहाच्या कारकिर्दीत नजरकैदेत ठेवण्यात आले होते. त्याला नंतर झुल्फिकारखानाच्या हवाली करण्यात आले होते. त्याला उघड उघड निरोप देणे हे इष्ट वाटले नाही म्हणून आजमशहाच्या इशाऱ्याने, राजा शाहू हा काही सहकाऱ्यांना बरोबर घेऊन, दोराजवळ मोगल छावणी होता, तेथून पळाला, त्यांने दक्षिणेची वाट धरली.'' भीमसेन हा औरंगजेबाचा दरबारी लेखक होता.

बुऱ्हाणपूरच्या छावणीत झुल्फिकार खानाने आजमशाहाला असे सांगितले होते की जर शाहू महाराजांची सुटका केली तर मराठ्यांमध्ये दुही निर्माण होईल व त्याचा फायदा मोगलांना होईल. या कारणामुळे सुटका झाली असावी असे काही इतिहासकारांचे मत आहे.

## ११.३ शाहूंचे महाराष्ट्रात आगमन

शाहू महाराजांनी आपली सुटका झाल्यानंतर त्यांच्या आगमनाची वार्ता देणारी पत्रे अनेक मराठा सरदारांना लिहिली. त्यांच्या सुटकेनंतर त्यांच्या सोबत सर्वप्रथम मोरोपंत सबनीस, महादजी कृष्ण जोशी ही मोजकी मंडळी होती. त्यांचे महाराष्ट्रात आगमन होताच अनेक मराठा सरदारांनी त्यांचे स्वागत केले. नर्मदा पार करून बऱ्हाणपूरपासून शाहू महाराज पश्चिम खानदेशातील बीजगड येथे आले. बीजगड उर्फ बढवाणी हे नर्मदेच्या दक्षिणेस लहानसे संस्थान होते. या लहानशा संस्थानाने मोगलांबरोबर संघर्ष सुरू ठेवला होता. या संस्थानातील मोहनसिंह रावळ ह्यांने शाहू महाराजांचे समर्थन केले. त्याचबरोबर अमृतराव कदमबांडे, सुजनसिंह रावळ, बोकील, पुरंदरे हे सरदारही शाहू महाराजांना येऊन मिळाले. जुलै १७०७ पर्यंत महाराज खानदेशात होते. याच कालावधीत परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर, रूस्तुमराव जाधव व चिमणाजी दामोदर हे बलाढ्य सरदार शाहू महाराजांच्या गटात दाखल झाले. या कालावधीत शाहू महाराजांची स्थिती पुष्कळ बरी झाली. त्यानंतर ते अहमदनगरला आले व राज्यावरील आपला हक्क परत मिळावा अशी त्यांनी भूमिका घेतली व आपणच मराठा राजवंशाचे वारसदार आहेत, असे जाहीर केले.

## ११.४ शाहूंना महाराणी ताराबाईचा विरोध

शाहू महाराजांचे महाराष्ट्रात आगमन झाल्यानंतर शाहू-ताराबाई यांच्यामध्ये वारसा हक्कावर संघर्ष होणार हे निश्चित होते. त्या पाठीमागे पार्श्वभूमीही तशी होती. ही पार्श्वभूमी समजून घेतानाच आपणास महाराणी ताराबाई शाहू महाराजांना का विरोध करत होती हे स्पष्ट होते.

महाराणी महाराणी ताराबाई शाहू महाराजांना का विरोध करत होत्या त्या बाबतीतील विधाने पुढील प्रमाणे आहेत.

१. छत्रपती राजारामाच्या मृत्युनंतर (मार्च १७००) औरंगजेबाच्या मृत्युपर्यंत (फेब्रुवारी १७०७) पर्यंत मराठ्यांची सत्ता मी सांभाळली.

२. औरंगजेबासारख्या सामर्थ्यशाली शत्रूशी झुंज देऊन मराठी सत्तेचे संरक्षण करत मी माझे कर्तृत्व सिद्ध केले.

३. राजारामाच्या मृत्युनंतर माझा मुलगा दुसरा शिवाजी याच्या नावाने साताऱ्याहून मी राज्यकारभार पाहिला.

४. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्युनंतर शिवाजी महाराजांनी निर्माण केलेलं राज्य संपुष्टात आले आहे. त्यामुळे माझा मुलगा दुसरा शिवाजी याचाच राजगादीवर हक्क आहे. हा हक्क हिरावून घेण्याचा अधिकार शाहूला नाही.

५. छत्रपती शिवाजी महाराजांची इच्छा संभाजी ऐवजी आपला कनिष्ठ पुत्र राजाराम यालाच स्वराज्याचा वारस नेमण्याची होती. हा ही मुद्दा उपस्थित करून विरोध दर्शवीला होता.

महाराणी ताराबाईने शाहू महाराजांना विरोध दर्शविण्यासाठी उपस्थित केलेले मुद्दे टिकण्यासारखे नव्हते.

रायगड मोगलांच्या ताब्यात जात असताना केवळ राजारामांना वाचविण्यासाठी नाईलाजास्तव येसूबाईने शाहूमहाराजासह मोगलांची कैद स्वीकारली होती.

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी संभाजी महाराजानाच पट्टाभिषेक (यूवराजाभिषेक) झाला होता. त्यामुळे संभाजी महाराजांचे पुत्र शाहू महाराज यांचा राज हक्क आहे हे सिद्ध होते.

मोगलसुध्दा शाहू महाराजांनाच छत्रपतींचे वारस मानत होते. पर्यायाने त्यांचा राजहक्क आहे हे सिद्ध होते.

स्वतः राजाराम महाराजांनीही खऱ्या अर्थाने शाहू महाराजांचा राजहक्क आहे हे मान्य केले होते.

वरील सर्व माहितीचा आधार घेता महाराणी ताराबाईचा विरोध कायदेशीर टिकणारा नव्हता. हे या ठिकाणी आपण विचारात घेणे गरजेचे आहे.

मात्र महाराणी ताराबाईने राजारामाच्या मृत्युपासून सात वर्ष अव्याहतपणे औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूशी लढा देऊन स्वराज्याचे संरक्षण केले होते. महाराणी ताराबाईंच्या प्रखर लढ्यामुळे व कुशल मुत्सद्देगिरीमुळे मोगलांना मागे हटावे लागले होते. जे राज्य सतत सात वर्ष अविश्रांत परिश्रम करून जतन केले ते सहजासहजी शाहू महाराजांच्या हातात देणे महाराणी ताराबाईला मान्य नव्हते म्हणूनच तिने शाहू महाराजांच्या गादीवरील हक्क अमान्य केला व त्यांच्या विरूद्ध संघर्ष करण्यासाठी आपली बाजू बळकट करण्यास सुरूवात केली. परिणामी दोहोत संघर्ष होणार हे निश्चित झाले होते. त्यातूनच हा संघर्षाचा प्रसंग उद्‌भवला.

## ११.५ शाहू - ताराबाई संघर्ष व खेडची लढाई

महाराणी ताराबाईने शाहू महाराजांच्या विरोधात उभे केलेले मुद्दे न टिकल्याने हतबल न होता कोणत्याही परिस्थितीत सत्ता न सोडण्याचा निर्णय घेतला. यासाठी तिने कोणत्याही मराठा सरदाराने शाहूला मदत करू नये असे सांगण्यास सुरूवात केली. याही पुढे जावून महाराष्ट्रात आलेला शाहू हा खरा शाहू नसून तो तोतया शाहू आहे असे घोषित केले. या वातावरणामुळे महाराष्ट्रातील जनतेमध्ये गोंधळ निर्माण झाला.

मात्र पंचवीस वर्ष दक्षिणेत मोगल छावणीत वावरत असलेले अनेक मराठा सरदार व सेवक शाहू महाराजांना ओळखत होते. त्यांनी शाहू महाराजांची बाजू घेतली. परिणामी महाराष्ट्रात मराठ्यांमध्ये दोन गट निर्माण झाले. एक शाहू महाराजांचा गट तर दुसरा महाराणी ताराबाईचा गट.

शाहू महाराजाबरोबर संघर्ष करण्यासाठी महाराणी ताराबाईने राज्यातील सर्व सरदारांना एकत्र केले होते. या सरदारामध्ये परशुरामपंत प्रतिनिधी, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचीव, निळकंठ मोरोपंत पिंगळे पेशवे, सेनापती धनाजी जाधव, खंडो बल्लाळ चिटणीस हे प्रमुख सरदार होते. या सर्वांना आपल्या बरोबर एकनिष्ठ असल्याच्या शपथा घ्यायला लावल्या या कलह प्रसंगी मराठा सरदारांची स्थिती अत्यंत नाजूक होती.

अशा परिस्थितीत शाहू महाराजांचा हक्क नाकारून महाराणी ताराबाईने त्यांच्या विरोधात लढा देण्याची तयारी दर्शविली शाहू महाराज-महाराणी ताराबाई यांच्यातील संघर्ष अटळ होता. महाराणी ताराबाईने आक्रमक होऊन आपला सेनापती धनाजी जाधव यास फौजेसह शाहूमहाराजांविरूद्ध मोहिम काढण्यास आज्ञा केली.

खेडची लढाई : महाराणी ताराबाईच्या आज्ञेनुसार धनाजी जाधवाने शाहू महाराज विरूद्ध मोहिम काढण्याचा निर्णय घेतला. या मोहिमेसाठी आपल्या सोबत परशुराम त्रिंबक याला घेतले. या काळात शाहू महाराजांचा मुक्काम अहमदनगर या ठिकाणी होता. महाराणी ताराबाईचे सैन्य आपल्याविरूद्ध चाल करून येत असल्याचे समजल्यानंतर शाहू महाराज पुण्याच्या दक्षिणेस असलेल्या खेड या गावी जाऊन तेथे आपला लष्करी तळ दिला. धनाजी जाधव व परशुराम त्रिंबक शाहूचा पाठलाग करत होते. ते टप्प्याटप्प्याने खेडपर्यंत आले. शाहू महाराज खूप मुत्सद्दी होते. त्यांनी आपल्या गटात धनाजी जाधवाला घेण्यासाठी एक योजना तयार केली. त्यांची योजना यशस्वी झाल्याने धनाजी जाधव शाहू महाराजांना येऊन मिळाला.

अशा कठिण प्रसंगी खचून न जाता परशुराम त्रिंबक यांनी शाहू महाराजांच्या विरोध लढण्याचा निर्णय घेतला. १२ ऑक्टोबर १७०७ रोजी परशुराम त्रिंबक व शाहू महाराज यांच्या फौजा खेड येथे समोरा-समोर आल्या. परशुराम त्रिंबक शर्थीने लढले मात्र सेनापतीने दोन वेळा रणमैदान सोडल्याने प्रतिनिधीचा पराभव झाला. खेडच्या लढाईत शाहू महाराजांना निर्णायक विजय मिळाला.

खेड विजया नंतर आपल्या सेनेचे सेनापतीपद धनाजी जाधवाकडे सोपविले. तर खंडो बल्लाळास चिटणीसपदी नियुक्त केले. खेड विजयाने शाहू महाराज व त्यांच्या सहकाऱ्यामध्ये आत्मविश्वास वाढला. स्वराज्याचा मार्ग एका अर्थाने शाहू महाराजांना खुला झाला.

## ११.६ राजपुत्र शाहुचा राज्याभिषेक

खेड विजयाने शाहू महाराजांचा आत्मविश्वास वाढला होता. म्हणूनच त्यांनी आक्रमक धोरण स्वीकारून स्वराज्यातील महत्त्वाचे किल्ले जिंकण्यास सुरूवात केली. रोहिडा, तोरणा, रायगड, चंदन - वंदन हे किल्ले शाहू महाराजांने ताब्यात घेतले. मावळ भागावर प्रभुत्व निर्माण केल्यानंतर शाहू महाराज साताऱ्याच्या दिशेने निघाले.

शाहू महाराज साताऱ्याच्या दिशेने येत आहे हे समजताच महाराणी ताराबाईने साताऱ्याच्या संरक्षणाची जबाबदारी परशुरामपंतावर सोपवून स्वतः पन्हाळ्याचा आश्रय घेतला. परशुरामपंताने लढा देण्याची तयारी केली. तेव्हा शेख मिरा सातारा किल्ल्याचा किल्लेदार होता. त्यांनी शाहू महाराजांचे सामर्थ्य पाहून त्याना शरण गेला. परिणामी सातारा किल्ला शाहू महाराजांच्या ताब्यात आला. शाहू महाराजांनी ताबडतोब परशुरामपंतांना कैद केली. जानेवारी १७०८ मध्ये शाहू महाराजांनी मोठ्या थाटात सातारा शहरात प्रवेश केला. तेव्हा पासून साताऱ्याच्या किल्ल्यावर दर शनिवारी चौघडा वाजवण्याची प्रथा सुरू झाली.

सातारा विजय शाहू महाराजांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला. या विजयानंतर त्यांनी १२ जानेवारी १७०८ मध्ये स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला. व आपल्या राजधानीचे ठिकाण सातारा निश्चित केले. राज्याभिषेकानंतर राजधानी साताऱ्याहून छत्रपती शाहूमहाराजांच्या राज्यकारभार सुरू झाला.

राज्याभिषेकानंतर शाहू महाराजांनी आपले अष्टप्रधानमंडळ जाहीर केले.

बहिरोपंत पिंगळे - पेशवे

धनाजी जाधव - सेनापती

नारो शंकर - सचिव

बाळकृष्ण वासुदेव हणमंते - आमात्य

गदाधर प्रल्हाद - प्रतिनिधी

होनाजी अनंत - न्यायाधिश

पेशवा बाळाजी विश्वनाथ - मुतालिक 'सेनाकर्ते' किताब

महादजी गधाधर - सुमंत

नेमाजी शिंदे - मानाची पदे व किताब

परसोजी भोसले - मानाची पदे व किताब

हैबतराव निंबाळकर - मानाची पदे व किताब

## ११.७ शाहूंपुढील अडचणी व बंदोबस्त

खेडच्या लढाईत महाराणी ताराबाईचा जरी पराभव झाला असला तरी महाराणी ताराबाईने सुरू केलेला शाहू महाराजांबरोबरचा संघर्ष समाप्त झाला नव्हता. उलट पन्हाळा येथे आपले सत्ता केंद्र निर्माण करून मराठा राजवटीत दोन सत्ता केंद्र निर्मितीला प्रोत्साहन दिले. परिणामी शाहू महाराजासमोर अडचणी वाढत गेल्या. याही पुढे जाऊन मोगल बादशहाकडे चौथाई व सरदेशमुखीचा हक्क मागितल्याने शाही राजवट दरबारातसुद्धा शाहू महाराजांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांसमोरील महत्त्वाच्या अडचणी अशा होत्या.

### १) चंद्रसेन जाधवाचे बंड :

चंद्रसेन जाधव हा धनाजीचा मुलगा होता. धनाजीच्या मृत्युनंतर शाहू महाराजांनी चंद्रसेन जाधवाला सेनापती पद दिले होते. मात्र तो चंचल प्रवृत्तीचा होता. त्याच्यावर शाहू महाराजांना संशय वाटत असे कारण तो सुरुवातीपासूनच महाराणी ताराबाईचा समर्थक होता.

चंद्रसेन जाधव महाराणी ताराबाईचा समर्थक असल्याने त्याला शह देण्यासाठी शाहू महाराजाने पेशवा बाळाजी विश्वनाथाला 'सेनाकर्ते' हे नवीन पद दिले. हे पद आपल्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे हे चंद्रसेन जाधवाला समजल्याने चंद्रसेन जाधव शाहू महाराजांवर नाराज होता. तसेच या घटनेमुळे चंद्रसेन व पेशवा बाळाजीमध्ये वैमनस्य निर्माण

झाले. नंतर एकमेकात संघर्ष झाला या संघर्षात चद्रसेनने पेशवा बाळाजीचा पराभव केला. पराभवानंतर पेशवा बाळाजी शाहू महाराजांकडे गेल्यानंतर शाहू महाराजाने पेशवा बाळाजीला संरक्षण दिले.

या घटनेचा चंद्रसेनला राग आला व चंद्रसेन जाधव उघडपणे महाराणी ताराबाईला जाऊन मिळाला. पुढे चंद्रसेन जाधवास समजविण्यासाठी गेलेले परशुरामपंत प्रतिनिधी व खंडेराव दाभाडे हे दोन्हीपण चंद्रसेन जाधवाच्या बाजूने सामिल झाले. याच वेळी कृष्णराव खटावकर, दमाजी थोरात, उदाजी चव्हाण यांनी महाराणी ताराबाईचा पक्ष उचलून धरला.

चंद्रसेन जाधवाची ही उघड उघड बंडखोरी पाहून शाहू महाराजांनी हैबतराव सरलष्कर यास चंद्रसेनविरूद्ध पाठविले. हैबतरावाने चंद्रसेनचा दोन ठिकाणी पराभव केला. १७११ मध्ये चंद्रसेन महाराणी ताराबाईला जाऊन मिळाला. पुढे त्यांनी मोगलांबरोबर आतून सख्य जोडले.

### २) खटावकर व थोरातांचे बंड :

चंद्रसेन जाधवांचे शाहू महाराजांच्या पक्षातून उघड उघड फुटून जाणे व शाहू महाराजांविरूद्ध बंड पुकारणे या घटनेमुळे महाराणी ताराबाईच्या पक्षातील इतर सरदार आक्रमक बनले व त्यांनी शाहू महाराजांच्या प्रदेशावर हल्ले चढविण्यास सुरूवात केली. या सरदारामध्ये धाडगे, घोरपडे आणि चव्हाण या सरदारांचा समावेश आहे. या सरदारांनी शाहू महाराजांच्या सातारा परिसरातील वडगाव, कुमठे, शिरवळ, कऱ्हाड या ठिकाणी हल्ले करून धुमाकूळ घातला होता.

याच संधीचा फायदा घेत खटावचा इनामदार कृष्णराव खटावकर आणि पाटण परगण्यातील हिंगणगावचा वतनदार दामाजी थोरात यांनी शाहू महाराजांविरूद्ध बंड पुकारून शाहू महाराजांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. मात्र खटावच्या लढाईत कृष्णराव खटावकर मारला गेला. दामाजी थोरात पुढे शाहू महाराजांना शरण आला. उदाजी चव्हाण वर नियंत्रण प्रस्तापित करण्यात शाहू महाराजांना यश आले. पेशवा बाळाजीच्या मदतीने चंद्रसेन जाधवाचेही पारिपत्य केले.

### ३) कान्होजी आंग्रेचे आव्हान :

शाहू महाराजांनी चंद्रसेन जाधव, खटावकर थोरात यांची बंडे अटोक्यात आणली असली तरी शाहू महाराजांसमोर कान्होजी आंग्रेचे अजून एक समस्या रूपी आव्हान उभे होते. कारण चंद्रसेन जाधवाने आंग्रेना फितावून महाराणी ताराबाईचा पक्ष स्वीकारण्यास भाग पाडले होते. म्हणजेच आंग्रे महाराणी ताराबाईचे समर्थक होते.

शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या आरमाराचा आंग्रेने विकास केला होता. पश्चिम किनाऱ्यावर स्वतंत्र वचक निर्माण केला होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती. त्याचा सिद्दी, इंग्रज व पोर्तुगीजांना धाक वाटत होता.

महाराणी महाराणी ताराबाईच्या प्रेरणेने कान्होजीने शाहू महाराजांच्या सत्तेपुढे आव्हान निर्माण केले होते. सर्व प्रथम त्यांनी शाहू महाराजांच्या कोकणातील फौजांना हुसकावून लावले. व राजमाची, तुंग, तिकोना आणि लोहगड हे महत्त्वाचे किल्ले आपल्या ताब्यात घेतले.

कान्होजीचा प्रतिकार करण्यासाठी शाहू महाराजांनी बहिरोपंत पिंगळे यास ससैन्य पाठविले परंतु कोन्होजीने त्याचा सहज पराभव करून त्याला कैद केले. या घटनेने शाहू महाराजांपुढील चिंता वाढली. कारण या आगोदर चंद्रसेन जाधव, कृष्णाजी प्रतिनिधी, थोरात, खटावकर यांचा

बंदोबस्त करण्यात शाहू महाराजांची तीन-चार वर्ष खर्च झाली होती. अशा कठिण प्रसंगी मार्ग शोधून काढणारा एकमेव माणूस शाहू महाराजांकडे होता तो म्हणजे पेशवा बाळाजी विश्वनाथ होय. मग शाहू महाराजांनी पेशवा बाळाजी विश्वनाथास या प्रकरणाकडे लक्ष घालण्यास सांगितले.

पेशवा बाळाजीने ४००० सैनिकांच्या फौजेनिशी कोकण मोहिम हाती घेतली. मात्र आपल्या राजकीय मुत्सद्दी डावपेचाच्या आधारे लोणावळ्याजवळ वळवण या ठिकाणी आंग्रेची प्रत्यक्ष भेट घेऊन शाहू महाराज हेच खरे मराठा राजवंशाचे वारसदार आहेत. हे आंग्रेना पटवून दिले. तसेच तुम्ही शाहू महाराजांचे स्वामित्व मान्य करणे किती गरजेचे आहे हे ही आंग्रेना पटवून दिले. मुत्सद्दी पेशवा बाळाजीचा प्रस्ताव धूर्त व धोरणी कान्होजीने मान्य केला. उभयतात तह झाला. पेशवा बाळाजीला आंग्रेंना शाहू महाराजांच्या पक्षात आणण्यात यश आले. या घटनेने शाहू महाराजांची बाजू बळकट तर झाली पण मराठ्याच्या इतिहासाला एक वेगळे वळण लागून पेशवा बाळाजी विश्वनाथाचा मराठ्यांच्या राजप्रणालीमध्ये उदय झाला.

## ११.८ कोल्हापूर राज्यातील क्रांती व महाराणी ताराबाई कैद

शाहू महाराजांच्या आगमनानंतर महाराणी ताराबाईंनी वेगवेगळ्या मार्गाने शाहूमहाराजांना विरोध करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले होते. मात्र शाहू महाराजांनी अत्यंत संयमाने हे विरोध मोडीत काढत आपली बाजू बळकट बनविली होती.

दरम्यानच्या काळात शाहू महाराज बरोबर सतत लढणाऱ्या महाराणी ताराबाईला एका नव्या संकटाला सामोरे जावे लागले. राजारामाची दुसरी पत्नी राजसबाई हिने आपला मुलगा दुसरा संभाजी याच्यासाठी महाराणी ताराबाई बरोबर संघर्ष सुरू केला. या संघर्षाची परिणती १७१४च्या कोल्हापूर क्रांतीत झाली. राजसबाईने कोल्हापूरवर वर्चस्व प्रस्थापित करून आपला मुलगा दुसरा संभाजी यास गादीवर बसविले. आणि महाराणी ताराबाई व तिचा मुलगा दुसरा शिवाजी यांना कैदेत टाकले. उरलेली संपूर्ण ह्यात म्हणजे ४७ वर्ष महाराणी ताराबाईची कैदेत गेली. या घटनेमुळे शाहु महाराजांसमोरील महाराणी ताराबाईचा उपद्रव संपुष्टात आला. मात्र पुढे राजसबाईचा पुत्र संभाजी यांने मुघल सुभेदार निजाम उलमुल्कशी संपर्क साधण्यास सुरूवात केल्याने पुन्हा संभाजीच्या रूपाने शाहू महाराजांपुढे अडथळा उभा राहिला, असे जरी असले तरी या घटनेने शाहू - महाराणी ताराबाई संघर्ष संपुष्टात येण्यास मदत झाली.

## ११.१३ सारांश

औरंगजेबाच्या मृत्युनंतर दक्षिणेच्या राजकीय परिस्थितीत मोठ्या प्रमाणात अस्थिरता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत महाराणी ताराबाईचे आक्रमक धोरण व शाहू महाराजांची संयमी भूमिका या दोन्ही बाजूंनी मराठा साम्राज्यात परिवर्तने घडू लागली होती. अशा कठिण परिस्थितीत पेशवा बाळाजी विश्वनाथाचा झालेला उदय सर्व परिस्थिती बदलून टाकतो.

## ११.१४ प्रश्न

१. छ. शाहू-महाराणी ताराबाई संघर्षाचा थोडक्यात आढावा घ्या ?

२. छ. शाहूंसमोरील अडचणी सांगून त्यावर त्यांनी कशी मात केली ते सांगा.

३. छ. शाहू व महाराणी ताराबाई यांच्यातील संघर्षाचा स्वराज्यावार झालेला परिणाम विशद करा.

## ११.१५ संदर्भ

१. अ. रा. कुलकर्णी व ग. ह. खरे - काँटीनेटल प्रकाशन, ''मराठ्यांचा इतिहास (खंड दुसरा)''.

२. प्रा. सदाशिव आठवले व डॉ. प्र. ल. सासवडकर, ''मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास''.

३. प्रा. जयसिंगराव पवार : मेहता प्रकाशन, ''मराठी साम्राज्याचा उदय व अस्त''.

❖❖❖❖

munotes.in

# १२

# शिवकालीन प्रशासन

**घटक रचना :**

१२.१ उद्दिष्ट्ये

१२.२ प्रस्तावना

१२.३ मुलकी प्रशासन

१२.४ महसूल व्यवस्था

१२.५ न्यायिक प्रशासन

१२.६ लष्करी व्यवस्था

१२.७ सारांश

१२.८ प्रश्न

१२.९ संदर्भ

## १२.१ उद्दिष्ट्ये

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुलकी प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

२. छत्रपती शिवाजी महाराजाच्या महसूल प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायिक प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

## १२.२ प्रस्तावना

एक आदर्श राज्य मध्ययुगीन काळात शिवाजी महाराजांनी निर्माण केले. तत्कालीन मोगल, निजाम व अदिलशाही राजवटीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी राजांचे राज्य अधिकच समाजभिमुख होते. त्यामुळेच इतिहासकार सुरेंद्रनाथ सेन यांनी शिवाजी राजांची तुलना पहिल्या नेपोलीयनशी केली आहे. मुलकी राज्यकर्ते म्हणून शिवाजी राजांची योग्यता अधिकच थोर होती, असे मत सेन यांनी व्यक्त केले आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, प्रभावी योद्धा, कुशल प्रशासक, लोककल्याणकारी राजा म्हणून शिवाजी राजांच्या प्रशासनातील गुण आपल्या निदर्शनास येतील. शिवाजी राजांच्या मृत्युनंतर सुद्धा त्यांची प्रशासन व्यवस्था अनेक वर्षे टिकून राहिली. ही पौर्वात्य राज्यपद्धतीत दिसून न येणारी बाब शिवाजी राजांच्या राज्यपद्धतीत दिसून येते. या राज्यपद्धतीमुळे रयतेला सुव्यवस्था, शांतता यांचा लाभ झाला. प्रत्येक व्यक्तिला विकासाची संधी मिळाली. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानूनच शिवाजी राजांनी आपल्या राज्यकारभाराची यंत्रणा उभारली होती.

munotes.in

## १२.३ मुलकी प्रशासन

शिवकालीन प्रशासनात 'छत्रपती' हे सर्वोच्च पद होते. ते स्वराज्याचे प्रमुख होते. हे पद वंश - परंपरागत होते. न्यायदान, करवसुली, युद्ध, तह, साम्राज्यविस्तार, धर्मरक्षण व प्रजेचे कल्याण करणे ही जबाबदारी छत्रपतींची होती.

### १२.३.१ अष्टप्रधान मंडळ :-

राज्याचा कारभार जास्तीत जास्त सुरळीत चालविण्यासाठी छत्रपती शिवाजी राजांनी अष्टप्रधान मंडळाची रचना केली होती. राज्याभिषेकाच्या निमित्ताने त्यांनी आपल्या प्रशासनव्यवस्थेला औपचारीक स्वरूप दिले. त्यासाठी त्यांनी प्राचीन भारतात प्रचलित असलेल्या प्रशासनव्यवस्थेच्या तत्वांचा व कार्यप्रणालींचा आधार घेतला होता. त्यांच्या प्रशासनव्यवस्थेच्या केंद्रस्थानी अर्थातच राजा होता. राजाच्या मदतीला अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती.

**१) मुख्य प्रधान (पेशवा)** - मोरोपंत पिंगळे - याला सर्व राज्य कारभाराकरीता जबाबदार समजले जाई. त्याने इतर खात्यावर निगराणी ठेवून कामात एकसुत्रता आणावी अशी त्याच्याकडून अपेक्षा होती. राजपत्रावर मुख्य प्रधानाचा शिक्का मारत असे. त्याला सरदारांवर नियंत्रण ठेवून मुलखांचे संरक्षण ही करावे लागत असे.

**२) अमात्य (मुजूमदार) महसूलमंत्री - रामचंद्र निलकंठ मुजुमदार** - राज्याच्या उत्पन्नाचा व खर्चाचा जमाखर्च पहात असे. राज्याच्या खर्चावर कडक निगराणी ठेवत असे. सर्वहिशोब राजाला सादर करत असत. महसूल विषयक सर्व दस्तेवज तसेच महाल व परगण्यांच्या जमाखर्चाच्या कागदपत्रावर त्याची सही व शिक्का आवश्यक होता.

**३) मंत्री (वाकनवीस) मूख्य सचिव** - दत्ताजी त्रिंबक - राज्यातील रोजच्या राजकीय हालचालींची नोंद ठेवण्याचे कार्य त्याच्याकडे असे. छत्रपतींची दिनचर्याही तो लिहीत असे. त्याला हेर व्यवस्थेवरही लक्ष ठेवावे लागत असे.

**४) सचिव (सुरनीस) अर्थमंत्री** - अण्णाजी दत्तो - राजाचा पत्रव्यवहार स्वतः पहात असे. राजपत्रे वाचून त्यावर दुरूस्ती करणे, सरकारी आज्ञापत्रे पाठविणे, नव्याने जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावणे, युद्धकालीन कामकाज पाहणे, महाल व परगण्यांचा हिशेब तपासण्याचे काम करणे इ. कामे सचिवाला करावी लागत असत.

**५) सेनापती (सरनौबत) संरक्षणमंत्री** - हंबीरराव मोहिते - याला सैन्यभरती, सैन्यसंघटन, व सैन्यातील शिस्तीसाठी जबाबदार धरले जाई. लढाईची योजना त्यालाच आखावी लागे. नव्याने जिंकलेल्या प्रदेशाचे संरक्षणही त्याला करावे लागत असे.

**६) सुमंत (डबीर) परराष्ट्रमंत्री** - रामचंद्र त्रिंबक - विदेशी प्रश्नावर सल्ला देणे, परराष्ट्रव्यवहार बघणे, परकीय वकीलांचे स्वागत करणे, परराज्यातील राजकीय समीकरणांचा अभ्यास करून राजाला सांगणे इ. कामे करावी लागत असत.

**७) न्यायाधिश (निराजी रावजी) न्यायमंत्री** - संपूर्ण राज्यातील न्यायदानाचे कार्य यांच्याकडे सोपविण्यात आले होते. सर्व पुराव्यांचा विचार करून न्यायदान त्याला करावे लागत होते.

८) **पंडितराव -** पंडित रघुनाथराव - धार्मिक बाबतीत राजाला सल्ला देणे, धर्म परंपरा, आचार विचार इ. लक्षात घेऊन निर्णय देणे, धार्मिक कृत्ये व विद्वानांची संभावना करणे, दानधर्म, अनुष्ठाने करणे इ. कामे यांना बघावी लागत असत.

### १२.३.२ अष्टप्रधान मंडळाची आधारभूत तत्त्वे -

१) सेनापती खेरीज अन्य सर्व प्रधान ब्राह्मण होते, मात्र सेनापती मराठा असे सर्वच प्रधानांवर राजाचा पूर्ण विश्वास असे. काही महत्त्वाचे अपवाद वगळल्यास एका प्रधानाकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी वर्षानुवर्षे तशीच कायम ठेवण्यात येई. सेनापती पद मात्र या नियमाला अपवाद होते.

२) प्रधानपद वंशपरंपरेने चालत नसे. छत्रपती शिवाजी राजांनी या संबंधी घालून दिलेला नियम नंतरच्या पेशवेकाळात बदलण्यात आला.

३) प्रधानांना कोणतीही जहागिरी किंवा वतन न देता त्यांना रोख वेतन नियमितपणे देण्याची पद्धत छत्रपती शिवाजी राजांनी स्वीकारली होती.

४) प्रत्येक प्रधान आपल्या खात्यांच्या कारभार राज्याच्या नावे व राज्याच्या वतीने चालवत असला तरी त्यासंबंधीची पूर्ण जबाबदारी त्या प्रधानाची असे.

५) प्रशासनाची जबाबदारी अष्टप्रधान मंडळावर संयुक्तरीतीने असे महत्त्वाच्या सरकारी दस्तऐवजांवर व कागदपत्रांवर त्यापैकी बहुतेकांची सही शिक्का असण्याची गरज होती.

६) या प्रधानांना आपला मदतनीस निवडण्याची मुभा नव्हती सर्व मुतलिकाची नेमणूक राजातर्फे केली जाई व त्यावेळी संबंधीत प्रधानाची आवड निवड किंवा मत घेण्यात येत असे.

७) मंत्र्यांची नेमणूक ही जातिभेदविरहीत होती. व्यक्तीचे गुण पाहूनच त्याची नेमणूक ही प्रधानपदासाठी होत असे.

**१२.३.३ ग्रामप्रशासन -** सतराव्या शतकात सामाजिक व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू खेडे हा होता. शेती हा प्रमुख व्यवसाय होता. छोट्या खेड्याला मौजे असे म्हणत तर त्याहून मोठ्या खेड्याला कसबा असे म्हणत. अनेक खेड्यांचा मिळून परगणा तयार होत असे. त्यांचा कारभार देशपांडे, देशमुख, पाटील, कुलकर्णी यांसारखे अधिकारी बघत असत.

छत्रपती शिवाजी राजे महान राजनितीज्ज्ञ असल्याने त्यांनी चातुर्याने अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती. कारण राजा व्यक्तीशः कितीही कर्तबगार असला तरीही राज्याच्या प्रशासनाचा गाडा त्यांना एकट्याने कधीच रेटता येणारा नव्हता. त्यासाठी त्यांना इतरांच्या मदतीची व सहकार्याची आवश्यकता होती. हे शिवाजी राजांनी ओळखले होते.

## १२.४ महसूल प्रशासन

स्वराज्याच्या महसूली उत्पन्नाचे साधारणपणे चार भाग पडतात. १) जमीन महसूल २) विविध कर ३) नाणी टांकसाळी ४) चौथाई व सरदेशमुखी

### १२.४.१ जमीन महसूल -

हे राज्याचे उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. त्यात खूप सुधारणा शिवाजी राजांनी केल्या. जमिनदारी पद्धत बंद केली व रयतवारी पद्धत आणली. पूर्वी महसूल वसूल करणारे पाटील, कुलकर्णी,

देशमुख, देशपांडे हे अधिकारी होते. हे वंशपरंपरेने पद त्यांच्याकडे होते. त्यामुळे रयतेवर अनेक वेळा अन्याय ते करत. सरकारात नाममात्र महसूल भरत व बाकीचा आपल्याकडे ठेवून घेत. छत्रपती शिवाजी राजांनी मलिक अंबर याने अमलात आणलेली महसूल व्यवस्था आदर्श म्हणून समोर ठेवली. महसूल वसूलीतील अन्याय दूर होण्यासाठी जबाबदारीचे तत्व अंमलात आणले. खेड्यातील पाटील किंवा देशमुख, परगण्यातील देशपांडे यांच्याकडे महसुल वसूलीचे काम देण्यात आले. या सर्व अधिकाऱ्यांवर सुभेदारांचे नियंत्रण ठेवण्यात आले.

जमीन मोजण्यासाठी दोर किंवा साखळीचा वापर पूर्वी होत होता. शिवाजी राजांनी स्वराज्यात एक विशिष्ट लांबी असणारी काठी हे परिमाण वापरात आणले. जसे पाच हातांची एक काठी, वीस गुणीले वीस काठ्यांचा एक बिघा होत असे. जमिनीच्या एकंदर उत्पन्नाच्या २/५ भाग शेतसारा म्हणून शेतकऱ्यांकडून घेण्यात येत असे. नवीन व पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना २ ते ४ वर्षांच्या मुदतीचे कर्ज दिले जाई.

जमिनीची मोजणी झाल्यावर तिचे वर्गीकरण अव्वल, दुम, सीम व चारूम असे केले जाई. त्यानंतर दोन किंवा तीन गावांचा एक गट बनवून त्यातील प्रत्येक प्रकारच्या जमिनीतील तीन वर्षाच्या सरासरी उत्पन्नाचा अंदाज घेण्यात येई व त्या सरासरी उत्पन्नाच्या ४०% भाग जमीन महसुलापोटी पैशात घेण्यात येई. दुष्काळ, टोळधाड, साथीचे रोग व युद्धातील हानी अशा प्रसंगी शेतकऱ्यांना महसूल माफ केला जाई किंवा त्यामध्ये सुट देण्यात येई. ''रयतेचा वाटा रयतेस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे'' अशा स्वरूपाच्या सुचना छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

**१२.४.२ विविध कर** - स्वराज्याच्या महसूली उत्पन्नाचे दुसरे महत्त्वाचे साधन म्हणजे आकारण्यात येणारे विविध प्रकारचे कर होय. त्यामध्ये आयात - निर्यात कर, मालावरील जकात कर, उत्पादन कर, न्यायालयात भरलेला दंड व इतर शुल्क, जंगलातून मिळणारे उत्पन्न, मासेमारीकर, खाणी कर, वारसा कर, कोतवाली कर, वतन जप्ती, देवस्थान दुभी, वनचराई, घासकटाई, बेवारसी संपत्ती इ. बाबीपासून सरकारला महसूल मिळत असे.

**१२.४.३ नाणी व टांकसाळी** - टांकसाळी व त्यात पाडण्यात येणारी विविध प्रकारची नाणी ही स्वराज्याच्या महसूली उत्पन्नाची एक महत्त्वाची बाब हाती. सरकारी व खासगी अशा दोन्ही प्रकारच्या टाकसाळी शिवकाळात होत्या. खासगी टांकसाळींना सरकारची पूर्व परवानगी आवश्यक होती. परवाना धारक सोनार टांकसाळीत नाणी पाडत असे. त्यासाठी त्याला निर्धारीत परवाना शूल्क भरावे लागत असे. अटींचा भंग केल्यास सोनाराला दंड भरावा लागत किंवा त्याचा परवाना रद्द होत असे. खाजगी टांकसाळीवर सरकारची कडक देखरेख होती. सभासद बखरीत त्याकाळी प्रचलीत असलेल्या एकूण ३२ प्रकारच्या सोन्याच्या व चांदीच्या नाण्यांचा उल्लेख आढळतो. छत्रपती शिवरायांची मालकीची टांकसाळ रायगडावर होती. मराठ्यांच्या राज्यातील एकूण २५,००० नाण्यांचे निरीक्षण केल्याचा दावा ॲबट या धर्मगुरू प्रवाशाने केला आहे.

**१२.४.४ चौथाई व सरदेशमुखी** - चौथाई याचा अर्थ आपल्या राज्याच्या रक्षणार्थ व युद्ध टाळण्यासाठी दुर्बल सत्ताधीश आपल्या राज्यातील उत्पन्नाचा चौथा हिस्सा प्रबळ राजांना देत असत. छत्रपती शिवाजी राजांनी चौथाईचा पुरस्कार करून सीमारेषेवरील सत्ताधीशांकडून चौथाई वसूल केलेली दिसते. चौथाई स्वराज्याचा महसूल वाढविण्यासाठी वसूल केली जात असे.

सरदेशमुखी म्हणजे सुभ्यातील एकूण उत्पन्नाच्या १/१० भाग होय. अनेक सरदेशमुख हा हक्क वसूल करत असत. स्वराज्य स्थापनेनंतर छत्रपती शिवाजी राजांनी सरदेशमुखीचे अधिकार आपल्या ताब्यात घेतले होते. हे अधिकार स्वराज्यापुरतेच मर्यादित होते, हे लक्षात घेणे आवश्यक ठरते.

**१२.४.५ वतनदारी पद्धत** - ही पद्धत महाराष्ट्रात अगदी यादवकाळापासून प्रचलीत होती. इस्लामी राज्यकर्त्यांनी ही पद्धत स्वीकारली व कायम ठेवली. शिवरायांच्या काळात मात्र वतनदारी पद्धतीला काहीही स्थान नव्हते. किंबहुना शिवरायांनी नवी वतने कोणालाही दिली नव्हती. खुद्द जावयाने वतन मागीतले होते तेव्हा शिवरायांनी त्याला वतन दिले नव्हते. यावरून वतनदारीबद्दल शिवरायांना किती तिटकारा होता, हे लक्षात येते. कारण वतनदार रयतेला लुटत होते हे राजांना माहीत होते. तथापि ही पद्धत बंद करण्यात खुप अडचणी होत्या. म्हणून राजांनी वतनदारांच्या बंडखोर व जुलमी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी काही नियम केले उदा. वतनदारांनी वाडे बांधू नयेत, सामान्य रयतेप्रमाणे रहावे, नाणी पाडू नयेत, किल्ले बांधू नयेत इ. अशा तऱ्हेने राजांनी वतनदारांची मिजासखोरी, अरेरावी व नसती हुकमत बंद करून त्यांच्या बंडखोरीला आळा घातला.

**१२.४.६ महसुलाच्या उत्पन्नाचा विनियोग** - स्वराज्याच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा संरक्षण व्यवस्थेवर खर्च होत असे. त्यामध्ये किल्ले बांधणे, तटांची व्यवस्था भक्कम करणे, तसेच रयतेच्या कल्याणासाठी काही उत्पन्न वापरले जात असे. त्यात शेतकऱ्यांना कर्ज देणे, गुरेढोरे, शेती कसण्यासाठी देणे, बी-बीयाणे पुरविणे, ओस पडलेल्या गावांमध्ये वस्ती निर्माण करण्यासाठी उत्तेजन देणे, जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली कशी येईल याकडे लक्ष देणे, शेतमालाचे उत्पन्न व त्याचे वितरण योग्य प्रकारे कसे होईल यासाठी मदत करणे इ. कामे आपल्या उत्पन्नातून छत्रपती शिवाजी राजांनी 'रयत' केंद्रबिंदू मानून केलेत. खऱ्या अर्थाने शिवकाळात 'रयतेचे सरकार' होते वतनदारांचे किंवा श्रीमंतांचे नव्हते.

सभासद बखरीनुसार, 'शिवरायांचे महसुली उत्पन्न वार्षिक ७ लाख रू. होते.' इतिहासकार जदुनाथ सरकारांच्या मतें,' मुलकी व लष्करी प्रशासनावर शिवाजी राजांचे महसूली उत्पन्न मोठ्या प्रमाणात खर्च होत होते.

अशा तऱ्हेने सततच्या युद्धजन्य परिस्थितीतून शिवाजी राजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवून एक आदर्श व प्रभावी अशी महसूल व्यवस्था व त्याची विनियोग पद्धती निर्माण केली होती.

## १२.५ शिवकालिन न्यायव्यवस्था

शिवकाळात मराठ्यांची वेगळी व स्वतंत्र अशी न्यायदान व्यवस्था नव्हती. त्यांनी पूर्वी प्रचलित असलेली न्यायव्यवस्था स्वीकारून ती पुढे चालविली होती. या न्यायव्यवस्थेनुसार ग्राम पंचायत हे न्यायदानाचे सर्वात कनिष्ठ मात्र अत्यंत महत्त्वाचे केंद्र होते. गावातील कोणताही वाद तेथील पंचायती मार्फत सोडविला जाई. या पंचायतीला 'गोत' असे म्हणत. गोत पेक्षा वरीष्ठ न्यायदानाच्या केंद्राला 'देशक' असे म्हणत असत देशकाच्या निर्णयाविरूद्ध राजाने नेमलेल्या न्यायधिशाकडे अपील करता येत असे त्याहीपेक्षा वरिष्ठ न्यायदानाचे केंद्र म्हणजे स्वत: राजा होता. शिवकाळात गावातच न्याय मिळवण्याची व्यवस्था असल्याने लोकांच्या वेळचा व पैशाचा अपव्यय होत नसे.

**१२.५.१ केंद्रीय न्यायव्यवस्था** - शिवाजी राजांच्या केंद्रीय न्यायव्यवस्थेत राजा, राजमंडळ, हुजुर, मजलीस व गोतसभा (गोतमजलीस) या न्यायालयीन संस्था न्यायदानाचे कामकाज करीत असत.

**१. राजा** - शिवकाळात राजा हाच सर्व न्यायव्यवस्थेचा प्रमुख असे. राजमंडळात अष्टप्रधान मंडळ व ब्राम्हणसभा या दोन महत्त्वाच्या सभा असत. राजमंडळात अष्टप्रधान मंडळ, खाजगी सचिव त्याच्या हाताखाली काम करणारे दुय्यम मुतालिक इ. लोक असत. काही वेळा विद्वान लोकांना राजमंडळात सामील करून घेतले जाई. त्यांची नेमणूक स्वतः राजा करत असे. हिंदु धर्मशास्त्रानुसार राजा हाच न्यायखात्याचा प्रमुख होता, तर न्यायाधीश व पंडीतराव हे दोन मंत्री स्वतंत्रपणे न्यायदानाचे काम करीत असत.

केंद्रीय न्यायालयाचे कामकाज दोन पद्धतीने चालत असे. त्यातील पहिली पद्धत म्हणजे राजा स्वतः मंत्र्यांच्या मदतीने निकाल देत असे. त्याला 'राजमुद्रा' असे म्हणत. तसेच ज्यावेळी दरबारात उघडपणे खटल्याचे काम चालत असे त्यास 'धर्मसभा' किंवा 'हुजूर मजलिस' असे म्हणत. याज्ञवाल्यक्य स्मृतीला अनुसरून राजा सल्लागारांचे मत विचारात घेऊनच न्यायनिवाडा करत असे. तर स्थानिक स्वरूपाचा प्रश्न ज्या खटल्यामध्ये समाविष्ट असेल अशा वेळी राजा गोतसभेचा सल्ला घेत असे. फौजदारी स्वरूपाचे खटले मात्र स्वतः शिवाजी महाराज चालवित असत फिर्यादीला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जात असे.

**२. न्यायाधीश व पंडीतराव** - हे राजा खालोखालचे अधिकारी न्यायदान प्रक्रियेतील होते. न्यायाधिशाने प्रचलीत असलेल्या कायद्यांचा विचार करून निकाल द्यावा असे त्यांच्यावर बंधन असे. त्याने धर्मशास्त्राला अनुसरूनच निकाल देऊन त्या निकालावर राजाची संमतीदर्शक सही देण्याचे बंधन होते. न्यायाधीशाच्या जोडीला पंडीतराव हा एक दुसरा न्यायाधीश असे. त्याच्याकडे धार्मिक स्वरूपाचे खटले असत. काही खटले छत्रपती शिवाजीराजे न्यायाधीश व पंडीतरावांकडेच चालवायला देत असत. अशा अधिकाऱ्यांची निवड करत असताना बुद्धीमत्ता, प्रामाणिकपणा, नि:पक्षपातीपणा, हिंदू कायद्याचे व रूढींचे ज्ञान असणे याकडे राजांचा कटाक्ष असे. कवी परमानंदांच्या मते, 'शिवाजीराजांना न्यायाधीशांबद्दल मोठा आदर वाटत असे. न्यायालयात त्यांना बसण्यासाठी उच्च आसन दिले जात असे.'

**३. राजमंडळ (राजसभा) :** शिवकालीन राजमंडळात, राजा, मंत्री व उच्च अधिकारी असत. या अधिकाऱ्यांमध्ये सुभेदार, हवालदार, मुजुमदार, सरनौबत हे सरकारी अधिकारी आणि देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, शेटे, महाजन हे वतनी अधिकारी असत. न्यायाच्या बाबतीत राजाला सल्ला देण्याचे काम राजसभेला करावे लागत असे. राजाने अंतीम निकाल दिल्यानंतर जी 'राजमुद्रा' तयार होत असे त्यावर सही करणे हे राजसभेचे काम असे.

वतनासंबंधीचे खरेदी विक्री संबंधीचे व्यवहार व खटले, वतनाचे वारस ठरविणे, वतनासंबंधीचे भांडणे या सभेमार्फत सोडविली जात. गावमजलीस किंवा गावराज मंडळ, महालराज मंडळ, परगणा राजमंडळ व सुभा राजमंडळ अशा चढत्या श्रेणीने या राजमंडळाचे काम चालत असे.

**१२.५.२ प्रांतीय न्यायव्यवस्था** -

**अ) सुभेदार** - सुभा राजमंडळामध्ये सुभेदार न्याय देण्याचे काम करीत असे, परंतु त्याने दिलेल्या निकालावर राजाची संमती दर्शक सही असल्याशिवाय निकाल अंतीम समजला जात नसे. दिवाणी व फौजदारी प्रकरणावर देखरेख ठेवत असे. वतनासंबंधीचे खटलेही चालवत असे.

**ब) देशमुख** - सुभेदाराला न्यायदानाच्या कामकाजात मदत करण्यासाठी देशमुख हा अधिकारी असे. काहीवेळा गावकीच्या हक्कासंबंधी बलुतेदारांमध्ये भांडण होत असे तेव्हा ही भांडणे सोडविण्याचे कामही सुभेदार व देशमुखांना करावे लागे. अशा वेळी सुभा मजलीसची सभा कसब्याच्या ठिकाणी बोलविली जात असे. या सभेला अधिकाऱ्यांबरोबरच बलुतेदारांनाही बोलविले जात असे.

**क) हवालदार** - हवालदार हा निश्चित स्वरूपाच्या पगारावर काम करणारा सरकारी अधिकारी होता. त्याला ठाणा मजलीसच्या मदतीने काम करावे लागत असे. मजलीसच्या कामावर देखरेख ठेवणे, गावच्या सरहद्दीसंबंधीचे तंटे सोडविणे, इनामी वतनासंबंधीच्या तक्रारी दूर करणे, हे हवालदाराचे मुख्य काम असे. महाल किंवा ठाणा मजलीसची सभा बोलावून तिच्या मदतीने न्यायदानाचे काम हवालदार करीत असे. पोलीस अधिकारी म्हणून त्याला काम करावे लागत असे. अशावेळी त्याला बरेच न्यायालयीन अधिकार प्राप्त होत असत तुरुंगाच्या व्यवस्थेवरच त्याला देखरेख ठेवावी लागत असे.

**ड) मुकादम** - शिवकाळात ग्राममजलीस हे स्थानिक न्यायव्यवस्थेतील सर्वांत कनिष्ठ न्यायालय होते. त्यामध्ये मुकादम, चौगुला व मुजूमदार हे अधिकारी महत्त्वाची भूमिका बजावत असत.

गावचा मुख्य मुकादम किंवा पाटील याच्याकडे शिवकाळात मुलकी व न्यायालयीन असे दोन्ही अधिकार असत. गावातील गोतसभेचा तो अध्यक्ष असे. गावातील लोकांच्या वतनासंबंधीच्या तक्रारींचा गोतसभेच्या मदतीने निर्णय देण्याचे काम मुकादम करीत असे. दोन गावातील सरहद्दी संबंधीच्या तक्रारी तो गोतसभेच्या सहाय्याने सोडवित असे.

**इ) चौगुला** - हा ग्राममजलीस मधील एक महत्त्वाचा घटक असे. ग्राममजलीस मध्ये खटल्याचे कामकाज चालवित असताना गावचा चौगुला त्यावेळी हजर असे व निकालपत्र तयार झाल्यावर त्यावर तो सही करत असे.

**ई) मुजूमदार** - चौगुल्याप्रमाणे ग्राममजलीसमध्ये निवाडयाच्या वेळी हजर राहून निकालपत्र तयार झाल्यावर त्यावर तो सही करीत असे.

**१२.५.३ ब्राह्मसभा** - डॉ. व्ही.टी.गुणे यांच्या मते, 'ब्राह्मसभा किंवा धर्मसभा ही ग्राममजलीस किंवा परगणामजलीस यांचेच विकसीत रूप होय.' शिवकाळातील ब्राह्मसभा ही विद्वान ब्राह्मणांची सभा असे. तिची बैठक पैठण, कोल्हापूर, पंढरपूर यासारख्या तीर्थस्थळी भरत असे. या सभेपुढे सर्वसाधारणपणे सामाजिक व धार्मिक स्वरूपाचे खटले चालविण्यासाठी येत असत. त्यामध्ये पुजाऱ्यांचे मंदीरांसंबंधीचे खटले, धर्माधिकाऱ्यांचे खटले, दोन जातीजमातींमधील भांडणे, हिंदू मुस्लिम धर्मियातील भांडणे इ. प्रकारचे खटले सोडविले जात असे. काही वेळा न्यायदानासाठी काशीच्या विद्वान ब्राह्मणांचाही सल्ला घेतला जात असे.

**१२.५.४ न्यायदानाच्या कामकाजाचे स्वरूप** - सर्वसाधारणपणे कोणतीही तक्रार प्रथम ठाणा मजलीसच्या हवालदारापुढे किंवा परगण्याच्या प्रमुख अधिकाऱ्यापुढे आणली पाहिजे अशा पद्धत असे. हवालदार या संदर्भात ब्राह्मसभा व जातीसभा यांच्याशी चर्चा करीत असे त्यानंतर ही तक्रार कोणत्या सभेच्या अधिकार क्षेत्रात येते हे ठरवून ती संबंधीत सभेकडे सोपविली जात असे. मात्र सर्वसाधारणपणे तक्रार किंवा घटना ज्या ठिकाणी घडली असेल त्याच ठिकाणी तिचा निकाल लावण्याकडे कल असे.

मजलीस ही बहुधा गावच्या वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर, काही वेळा देशमुखाच्या घरी, कधी देवळात कधी चावडीवर भरत असे. तर काही वेळा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीही मजलीसचे कामकाज चालत असे. मजलीसच्या मुखियाला सभानायक असे म्हणत. शास्त्र आधार व इतर परंपरा असणारी तज्ञ मंडळी एकत्र येत असत त्यांना परीक्षक अथवा 'प्रासनिक' किंवा 'महाप्रासनिक मायेवत' असे म्हणत. एखादा खटला कोणत्या सभेपुढे चालवायाचा हे निश्चित झाल्यावर 'करीना' किंवा 'तकरीर' लिहीली जात असे. खटल्याचे कामकाज सुरू झाल्यावर करिन्यामध्ये लिहिलेली तक्रार मजलीसपुढे वाचून दाखविली जात असे. बचाव करण्याची संधी दिली जात असे. जर आरोपीने गुन्हा कबूल केला तर मजलीसचे काम लवकर पूर्ण होत असे व जर नाकबूल केला तर हे प्रकरण वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविले जात असे.

आरोपीने गुन्हा कबुल केल्यानंतर मजलीसचा निर्णय कायम समजून आरोपीकडून राजीनामा लिहून घेतला जाई. त्यावर एक-दोन साक्षीदारांच्या सह्या घेतल्या जात. मजलीसाचा निकाल कायम झाल्यावर त्या निवाडापत्राची एक प्रत तयार करून त्यावर हजर असणारे सर्व वतनदार आपआपले चिन्हे उमटवित त्याला 'महजर' असे म्हटले जाई. महजरांची अंमलबजावणी मजलीसला हजर असणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याकडे असे. तो अधिकारी आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना संबंधीत महजरसंबंधी लेखी सूचना पाठवित असे. अशा रितीने खटल्याच्या निकालाची अंमलबजावणी होत असे. अशा प्रकारे शिवकालीन न्यायव्यवस्था ही जुन्या धर्मग्रंथांवर आधारित होती. काही नवीन पद्धती न्यायव्यवस्थेत आणल्या असल्या तरी जुन्या परंपरा तशाच अस्तित्वात होत्या.

## १२.६ शिवकालीन लष्करी व्यवस्था

छत्रपती शिवाजी राजांनी स्वपराक्रमाने स्वराज्याची स्थापना केली होती. या स्वराज्याच्या रक्षणासाठी व त्याच्या विस्तारासाठी कार्यक्षम सैन्याची निर्मिती शिवाजी राजांनी केली. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताच्या रांगा व त्यावरील घनदाट जंगलाचा पुरेपुर उपयोग करून घेण्यासाठी त्यांनी गनिमी काव्याचे तंत्र विकसित करून अत्यंत कौशल्याने त्याचा वापर केला. सैन्याची व्यवस्था सेनापती (अष्टप्रधान मंडळातील मंत्री) बघत होते तरीही स्वतः राजे आपल्या सैन्याचे सरसेनापती होते. त्यांच्या सैन्यात पायदळ, घोडदळ, हत्तीदळ, उंटदळ, राजांचे अंगरक्षक दल व हेरखाते असे विविध विभाग होते. स्वराज्याच्या रक्षणासाठी किल्ल्यांची निर्मिती व स्वतंत्र्य आरमाराचीही निर्मितीही त्यांनी केली होती.

**१२.६.१ - पायदळ** - महाराष्ट्रातील डोंगरदऱ्यात गनिमी काव्याच्या तंत्रासाठी पायदलाचा जास्त उपयोग होत असल्याने छत्रपती शिवाजी राजांनी पायदलावर अधिक भर दिला. पायदळात मावळ प्रांतातील काटक मावळे सैनिक भरलेले होते. ते गनिमी काव्याच्या तंत्रात विशेष वाकबदार होते. मुघलांच्या सैन्यातील दोष व उणिवा छत्रपती शिवाजी राजांनी हेरल्या होत्या. त्या उणिवा व दोष त्यांनी आपल्या सैन्यातून दूर करण्याचा प्रयत्न केला होता. विद्यूत वेगाने हालचली करणारे मावळे सैनिक त्वरीत एखाद्या ठिकाणी जमू शकत व तेथून त्याच वेगाने सर्वत्र पांगत असत. पायदळातील सैनिकांची संघटना अत्यंत साधी होती. दर १० सैनिकांवर एक नाईक, दर ५ नाईकांवर एक हवालदार, दर दोन - तीन हवालदारांवर एक जूमलेदार, दर दहा जुमलेदारांवर एक हजारी व दर सात हजाऱ्यावर एक सरनोबत अशी पायदळातील सैनिकांची श्रेणी होती. मावळा सैनिकांकडे ढाल, तलवार, जाबिया, खंजिर व भाले अशी साधी हत्यारे असत. ९१ कलमी बखरीनुसार दोन लाख पायदळ शिवाजी राजांचे होते.

**१२.६.२ घोडदळ** - छत्रपती शिवाजी राजांच्या घोडदळात दोन प्रकारच्या घोडेस्वारांचा समावेश होता. १) पागा-बारगीर (सरकारी नोकर असलेला घोडेस्वार) २) शिलेदार (स्वतःच्या मालकीचे घोडे) बारगीरांना सरकारमार्फत घोडे पूरविले जात. शिलेदारांकडे स्वतःच्या मालकीचे घोडे होते व त्यांच्या दाणा - वैरणीचा तसेच नालाबंदीच्या खर्चाचीही ठराविक रक्कम शिलेदारांना सरकारमधून देण्यात येई. दर पंचवीस घोडेस्वारांच्या गटावर एक हवालदांर, दर ५ हवालदारांवर एक जुमलेदार, दहा जूमलेदारांवर १ हजारी, ५ हजाऱ्यांवर एक पंचहजारी व सर्व पंचहजारीवर सरनोबत घोडेस्वाराच्या प्रशिक्षणाचीही व्यवस्था करण्यात आलेली होती. सभासद व चिटणीस बखरीनुसार १ लाख घोडदळ छत्रपती शिवाजी राजांचे होते.

**१२.६.३ छ. शिवाजी महाराजांचे अंगरक्षक दळ** - या दलातील रक्षकांची निवड छत्रपती शिवाजी राजे स्वतः करीत असत. सशक्त, सुदृढ, चपळ, आज्ञाधारक व विश्वासू इ. विशेष कडक कसोट्यांना उतरणाऱ्यांनाच या दलात सामील करून घेतले जाई. या दलाची संघटना पायदळ व घोडदळाप्रमाणेच होती. प्रत्येक रक्षक आपल्या कपाळी एक मोठा टिळा लावत असत. राजांच्या रक्षणासाठी प्राणपणाला लावण्याच्या निश्चयाचेच ते जणू प्रतिक असे. छत्रपती शिवाजी राजांच्या आयुष्यातील अनेक बिकट प्रसंगी या दलातील अंगरक्षकांनी त्यांचे रक्षण केले होते. उदा. अफजलखान भेटीच्या प्रसंगी जीवा महाला या रक्षकाने राजांचे प्राण वाचविले होते. 'होता जीवा म्हणून वाचला शिवा' या उक्तीने जीवा महालाचे ते कृत्य मराठ्यांच्या इतिहासात नोंदले गेले आहे. तसेच सुरतेवरील हल्ल्याच्या प्रसंगी राजांवर इनायत उल्लाखानाने अचानक हल्ला केला होता, तो त्यांच्या अंगरक्षकाने परतवून लावल्यामुळेच राजांचे प्राण वाचले होते. आग्रा येथील तुरुंगातील प्रसंगी तसेच सुटका व त्यानंतरच्या प्रवासातही रक्षकांनी प्राणाची पर्वा न करता राजांचे रक्षण केले होते.

**१२.६.४ हत्ती व उंटदळ** - तत्कालीन कागदपत्रांवरून हत्ती व उंटदळाचा लष्करात समावेश असला तरी हे लडाखु दल नव्हते. फक्त रसद धान्य, दारूगोळा व तोफा वाहून नेण्या-आणण्यासाठी त्यांचा वापर केला जात असे. सभासद बखरीनुसार हत्ती १२५० इतके होते तर चिटणीस बखरीनुसार उंटांची संख्या १००० ते १५०० च्या दरम्यान होती.

**१२.६.५ हेरखाते** - छत्रपती शिवाजी राजांनी हेरखात्याची गरज ओळखून बहिर्जी नाईकाच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र हेरखात्याची नेमणूक केली होती. परिणामकारक सैनिकी कारवाईसाठी, यशस्वी मोहिमांसाठी, शत्रूपक्षाची, त्याच्या सैन्यबळाची, त्यांच्या ठिकाणाची अद्यावत माहिती मिळविण्याचे काम हे हेर खाते करत असे. सैनिकी मोहीमांपूर्वी गुप्तहेरांकडून राजे माहिती मिळवत असत व नंतरच मोहिमेवर निघत असत. उदा. अफजलखान भेटीच्या पूर्वी त्याच्या सैन्याची इत्यंभूत माहिती फकीरच्या वेशात विश्वासराव प्रभूने घेतली होती. कर्नाटक स्वारी पूर्वीही हेरांनी अशीच उपयुक्त माहिती मिळविली होती. सुरत लुटीपूर्वीही तेथील संपत्तीचा अचूक अंदाज हेरांनी घेतला होता.

**१२.६.६ तोफखान** - हिंदुस्थानातील अन्य राज्यकर्त्यांप्रमाणेच मराठेही तोफखान्याच्या वापरात मागे राहीले होते. छत्रपती शिवाजी राजांच्या काळात लष्करात तोफखाना हा एक स्वतंत्र विभाग होता. दारूगोळ्याचाही एक वेगळा प्रशासकीय विभाग होता. तथापि दारू गोळ्यासाठी छत्रपती शिवाजी राजांना पूर्णपणे युरोपियन व्यापाऱ्यांवर विसंबून राहावे लागत असे कारण राजांकडे तोफा व बंदूका बनविण्याचे कारखाने नव्हते. राजांच्या तोफखान्यात परदेशी व भारतीय अशा दोन्हीही बनावटीच्या तोफा होत्या. जेजाला, झंबरूक व शुतरनाल या नावाने या तोफा ओळखल्या जात. भारतीय बनावटीच्या अर्थातच ओबडधोबड असून त्यात दगडांचा किंवा लोखंडी गोळ्याचा वापर

केला जाई. तोफा व दारूगोळा खरेदीकरिता राजांनी पोर्तुगीज व्यापाऱ्यांना मध्यस्ती म्हणून मान्यता दिली होती. सिध्दी इब्राहिमखान हे शिवरायांच्या तोफखान्याचे प्रमुख होते.

**१२.६.७ - सैन्यविषयक नियम** - अत्यंत दूरदर्शी व धोरणी असलेल्या राजांनी सैन्याच्या सुयोग्य संघटनेचे व शिस्तिचे महत्त्व ओळखले होते. त्यासाठी आवश्यक ते नियमही त्यांनी केले होते. या नियमांची अंमलबजावणीही अत्यंत कडकपणे केली जाई. त्यांनी केले सैन्यविषयक काही नियम पुढीलप्रमाणे –

१. पावसाळ्यात सैनिकांच्या प्रशिक्षणावर भर देण्यात येई.

२. पावसाळा संपल्यावर दसऱ्याच्या मुहूर्तावर सैन्य मोहिम पार पाडण्यासाठी बाहेर पडे.

३. स्त्रिया, मुले, नाचगाणी करणारे, तमासगीर व अन्य बाजार बुनग्यांना मोहिमेवर नेण्यास बंदी होती.

४. मोहिमेवरील सैनिकांना मोहिमेच्या वेळी शिस्तीच्या सर्व नियमांची कडक अंमलबजावणी केली जाई. या नियमांचा भंग करणाऱ्या सैनिकांवर कडक कारवाई केली जाई.

५. मोहिमेतील पराक्रमाबद्दल इनामी जहागीरी ऐवजी रोख पैसे रूपाने बक्षीस सुरू केले होते.

**१२.६.८ किल्ले** - स्वराज्याच्या स्थापनेत किल्ल्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. स्वराज्यात लहान मोठे मिळून २४० किल्ले होते. त्यापैकी १११ किल्ले राजांनी बांधून घेतले होते. किल्ले तीन प्रकाराचे होते. ते म्हणजे गिरी दुर्ग, स्थल दुर्ग, जल दुर्ग होय. प्रत्येक किल्ल्यावर तीन अधिकारी होते. हवालदार किल्ल्याचे संरक्षण करीत असे, सबनीस जमाखर्च पहात असे तर कारखानीस किल्ल्यावरील सर्व भांडारांचा प्रमुख असे. प्रत्येक अधिकाऱ्याच्या बदल्या होत असत. रामोशी जातीकडे किल्ल्यास गस्त घालण्याचे काम होते. शत्रूबद्दलची पहिली बातमी तेच देत असत. प्रत्येक किल्ला चांगला रक्षिला जावा म्हणून तटसरनोबतच्या नेतृत्वाखाली लढाऊ शिबंदी ठेवली जात असे. किल्ला व त्याचा परिसर हे एक स्वयंपूर्ण छोटे खेडे होते. असेच त्याचे स्वरूप होते.

**१२.६.९ युद्धतंत्र** - गनिमी कावा हे शिवकालीन लष्कराचे मुख्य लष्करी युद्धतंत्र होते. जेथे शक्ती कमी तेथे हे गनिमी काव्याचे युद्धतंत्र वापरले जात असे. अचानक छापा घालणे, शत्रूची माणसे कापून काढणे, शत्रू सावध होण्यापूर्वी पळून जाणे, शत्रूची रसद लूटणे, शत्रूच्या मुलखात जाळपोळ करणे, शत्रूस सळो की पळो करून सोडणे, ही गनिमी काव्याची प्रमुख वैशिष्ट्ये होती. समोरासमोरच्या लढाया शिवाजी महाराजांनी शक्यतो टाळलेल्या दिसतात. कारण त्यामुळे मनुष्यहानी मोठ्या प्रमाणावर होत असे.

**१२.६.१० आरमार** - छत्रपती शिवाजी राजांच्या आरमाराबद्दल आज्ञापत्रात विस्तृत माहिती आलेली आहे. १६५९ मध्ये राजांनी आरमार बांधण्यास सुरूवात केली. भिवंडी, कल्याण, पनवेल या ठिकाणी लढाऊ जहाजे बांधली जात होती. लहान लहान जहाजे निर्माण करण्यावर राजांनी अधिक भर दिला होता. राजांच्या आरमारात गुराब, गलबत, शिवाड, तरांडी, तारू, पगार, तिरकाठी या नावाची लहान मोठी जहाजे होती. राजाच्या आरमारातील जहाजांची संख्या काही इतिहाकारांच्या मते ५०० तर काहीच्या मते ७०० इतकी होती. दर्यासारंग व मायनाक या दोन अधिकाऱ्यांच्या ताब्यात २०० जहाजांचे आरमार होते. इंग्रज देखील राजांच्या आरमाराची वाढती ताकद पाहून हबकून गेले होते. मराठ्यांच्या वाढत्या आरमारी शक्तीमुळे इंग्रज, पोर्तुगीज व सिद्दी या तिनही परकीय सत्ता वचकून होत्या.

राजांच्या आरमार निर्मितीमुळे हजारो लोकांना रोजगार मिळत होता. हजारो लोक दुर्ग व जंजिरे बांधण्यासाठी व जहाजे बांधण्यासाठी मोठे कष्ट घेऊ लागले होते. कोळी, भंडारी, पाचकळशी, सोमवंशी, मुसलमान, ख्रिश्चन अशा विविध जातींना आरमारात नोकऱ्या मिळाल्या होत्या. आरमारात मुस्लिम अधिकाऱ्यांची संख्या जास्त होती. दौलतखान हा राजांचा नौदलप्रमुख होता. कोकणपट्टीच्या समुद्रकिनाऱ्यावर राजांनी विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधदुर्ग, पदमदुर्ग यांसारखे किल्ले बांधले होते.

**१२.६.११ राष्ट्रीय लष्कराची निर्मिती** - लष्करी क्षेत्रात राजांची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे त्यांनी निर्माण केलेले राष्ट्रीय लष्कर होय. छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या लष्करात मराठे, मावळे, हेटकरी, ब्राह्मण, रामोशी, महार, मांग, कोळी, भंडारी इ. अनेक जाती जमातींना सामावून घेतल्याने व या सर्वामध्ये स्वराज्यप्रेम निर्माण केल्याने राजाचे लष्कर 'राष्ट्रीय लष्कर' बनले होते. इतिहासकार डॉ. सेन या संदर्भात म्हणतात. 'त्या काळात ज्या अस्पृश्य महार जमातीस घराच्या भिंतीच्या आतच आपले जीवन व्यतीत करावे लागत असे त्या महारांच्या खांद्याला खांदा लावून ब्राह्मण लढत असल्याचे चित्र छत्रपती शिवाजी राजांच्या लष्करात दिसते.'

## १२.७ सारांश

शिवकालीन प्रशासन व्यवस्थेचा विचार करता असे लक्षात येते की, छत्रपती शिवाजी राजे हे अत्यंत कसलेले कुशल प्रशासक, राष्ट्रनिर्माते, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, लोक कल्याणकारी, दूरदृष्टी असणारे, न्यायी, आदर्श महसूल व्यवस्था अमलात आणणारे व राष्ट्रीय लष्कराची शिस्तबद्ध निर्मिती करणारे राजे म्हणून मराठ्यांच्या इतिहासात अजरामर असे व्यक्तीमत्व आहे.

## १२.८ प्रश्न

१. शिवकालीन मूलकी/ महसूल व्यवस्थेचा आढावा घ्या.

२. शिवकालीन न्याय व लष्करी व्यवस्थेचा आढावा घ्या.

३. टीपा लिहा :

अ) शिवाजी महाराजांचे आरमार ब) अष्टप्रधान मंडळ

## १२.९ संदर्भ


१. प्रा. सावंत बी. एस, व प्रा. जाधव व्ही. के मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, विद्याप्रकाशन, नागपूर (१९९७)

२. प्रा. डॉ. कोलरकर मराठ्यांचा इतिहास - मंगेश प्रकाशन, नागपूर (२००३)

३. प्रा. तांबोळी, प्रा. पवार, प्रा. राजदेव, प्रा. रुपनवर - मराठ्यांचा इतिहास निराली प्रकाशन, पूणे (२००४)

४. डॉ. काळे वा. मराठ्यांचा इतिहास, प्राचीन प्रकाशन, मुंबई (१९९८)

५. कुलकर्णी अ. रा. व. खरे ग.ह. मराठ्यांचा इतिहास - कॅन्टिनेन्टल प्रकाशन, पूणे (१९८४)

६. प्रा. महल्ले व प्रा. पाठक - मराठा सत्तेचा इतिहास, विद्याप्रकाशन नागपूर (१९९७)


❖❖❖❖

munotes.in